UNIVERSAL
LIBRARY
OU_192115
UNIVERSAL
LIBRARY

OUP—552—7-7-66—10,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M910 Accession No. M3939

Author J49T

Title तीर्थरूप महाराष्ट्र

This book should be returned on or before the date last marked below.

# तीर्थरूप महाराष्ट्र

[ भाग दुसरा ]

लेखक

पं. महादेवशास्त्री जोशी

प्रथमावृत्ति

( सन १९५१ )

ज्ञानराज प्रकाशन,

४२१ शनिवार पेठ, पुणें.

मूल्य ३ रुपये

प्रकाशक :
सौ. सुधा महादेव जोशी,
ज्ञानराज प्रकाशनाकरितां
४२१ शनिवार पेठ, पुणें २.

Checked 1963

मुद्रक :
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ,
पुणें २.

# मा वं दें

तीर्थरूप महाराष्ट्राचा हा दुसरा भाग रसिकांच्या सेवेसाठीं सादर करतांना मला अपूर्व आनंदाचा अनुभव घडत आहे. कोणत्याहि कार्याला हातच घालूं नये हें पहिलें बुद्धिलक्षण आणि घातलाच तर त्याचा शेवट गांठणें हें दुसरें बुद्धिलक्षण. दैवयोगानें या पुस्तकाच्या बाबतींत मी दुसऱ्याचा धनी झालों आहें. यशाच्या सीमेंत पाऊल पडलें कीं कष्टसुद्धां सुखरूपच होतात.

गेलीं दीड-पावणेदोन वर्षें मी महाराष्ट्रांतल्या तीर्थक्षेत्रांचा नियत यात्रिक होतों. जेव्हां तनानें नसेन तेव्हां मनानें. एक क्षेत्र पाहून आणि लिहून झालें कीं 'ततः किम्' हा प्रश्न पुढें आणायचा. कोणत्या तरी नव्या यात्रेचा संकल्प करायचा. प्रस्थानापूर्वी त्या क्षेत्राविषयीं मिळेल ती माहिती गोळा करायची. मग यात्रा करायची. मिळवलेलें ज्ञान त्या त्या ठिकाणीं समक्ष ताडून पहायचें. अधिकाचा संग्रह करायचा आणि परत आल्यावर लेख लिहून 'प्रसाद'ला द्यायचा. एवढ्या उद्योगांत पंधरावीस दिवस सहज निघून जायचे कीं लगेच पुढच्याचा वेध. माझ्या वाङ्मयीन जीवनांतला हा एक यज्ञ आहे या भावनेनें मी प्रस्तुत लेखमालेकडे पहात होतों. हें एक पुण्यव्रत म्हणून मीं स्वीकारलें होतें. श्रीहरीच्या कृपेनें आज तें पूर्ण झालें आहे. शिरावरचा भार उतरला आहे. त्यामुळें आज मला होणारें समाधान अनिर्वचनीय आहे.

पंढरीहून प्रारंभ करायचा आणि आळंदीला येऊन यात्रा समाप्त करायची असें मीं मुळांतच ठरवून टाकलें होतें. पहिल्या भागांत मीं मोरगांवपर्यंत येऊन मुक्काम केला होता. त्यापुढचीं क्षेत्रें या भागांत आलीं आहेत. मला वाटतें, महाराष्ट्राचीं प्रसिद्ध, प्रातिनिधिक आणि सर्वांच्या मनींमुखीं असलेलीं क्षेत्रें एवढ्यानें पूर्ण झालीं आहेत.

मीं या दोन्ही भागांत जी क्षेत्रविषयक माहिती दिली आहे ती मला अनेक ग्रंथांना शरण जाऊन मिळवावी लागली आहे. क्षेत्रस्थ उपाध्यायांना शरण जाऊन कांहीं उपयोग झाला नाहीं. क्षेत्रस्थ लोकच क्षेत्रापासून फार दूर आहेत असें मला आढळून आलें. त्यांना आपल्या क्षेत्राचें यथावत् ज्ञान नाहीं आणि करून घेण्याची जिज्ञासाहि नाहीं., एखादें मंदिर वा स्थळ वेगळ्या बांधणीचें, वेगळया तऱ्हेचें दिसलें कीं मी त्यांना विचारीत होतों.

'हें कधीं आणि कोणीं निर्माण केलें ?' त्यावर मला ठराविक उत्तर मिळायचें, 'अनादिकालापासूनचें आहे.' पुढें बोलणेंच खुंटलें.

आज आपल्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचीं सर्वच अंगें मलिन आणि शिथिल झालीं आहेत. तीर्थक्षेत्रांनाहि हें मालिन्य बाधल्यावांचून राहिलें नाहीं. कुठल्याहि क्षेत्रांत चला; उपाध्यायवर्गांत धार्मिकता आणि शुचिता यांचा अभाव दिसतो. पूजक आणि सेवकवर्ग श्रद्धाहीन बनला आहे. मंदिरांतले पूजोपचार नेमून दिलेल्या पद्धतीनें होतात; पण त्यांत भक्तिभावाचा जिव्हाळा दिसत नाहीं. सर्वत्र लोभाचें प्राबल्य. सेवेपेक्षां धंदा हीच भावना. यात्रेकरू हें सर्व पहातात, सोसतात, कधीं मनांत तर कधीं जनांत चडफडतात, पण एकदां विरस झाला तरी पुन्हा येतात. तिथल्या माणसांविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला तरी त्यांना क्षेत्राचा आणि देवाचा अनादर कधींच वाटत नाहीं. जनतेची श्रद्धा अभंग आहे म्हणूनच क्षेत्रें हीं क्षेत्रें म्हणून अजून टिकलीं आहेत. आज शतकानुशतकें जनतेनें या श्रद्धेचें जतन केलें हा तिचा मोठेपणा.

पण क्षेत्रस्थांनीं आपलाहि कांहीं मोठेपणा दाखवायला नको का? जिथें तिथें पुढें होणारा हात आवरून त्यांना तो पटवतां येईल. यात्रिकांची श्रद्धा टिकेल कशी आणि वाढेल कशी, याचा त्यांनीं आतां मात्र शक्य तितक्या लवकर विचार करायला हवा. तीर्थस्थानें हीं धर्माचे वसौटे झालीं पाहिजेत. तिथें स्थलशुद्धि, आचारशुद्धि आणि भावशुद्धि हीं मूर्तिमंत दिसलीं पाहिजेत. तिथें येणारा यात्रिक जुलमाचा रामराम करायला आला असेल, अश्रद्धा घेऊन आला असेल, तर तो श्रद्धावंत होऊन परत गेला पाहिजे. मुळांतच सश्रद्ध असेल त्याला तिथें आत्मसंतोष लाभला पाहिजे. परत जातांना 'अद्य मे सफलं जन्म' असे कृतार्थतेचे उद्‌गार त्याच्या तोंडून निघाले पाहिजेत. त्याच्या दानबुद्धीला भिक्षुकांच्या आग्रहानें नव्हे; तर स्वयंप्रेरणेनें अंकुर फुटले पाहिजेत. आमचीं क्षेत्रें जेव्हां स्वच्छता, सेवा, आतिथ्य, भक्ति आणि ज्ञान यांचीं आगरें बनतील तेव्हांच हें घडेल. तेव्हांच तिथें देवाचा खरा अधिवास होईल.

क्षेत्रांची पुनर्घटना करण्याच्या कामीं तिथल्या निःस्वार्थी, प्रतिष्ठित, विचारवंत लोकांनीं पुढाकार घ्यायला हवा. त्या त्या देवस्थानाच्या पंच

मंडळींनीं हा उपक्रम करायला हवा. क्षेत्रांत गेल्यावर यात्रेकरूंचा मुख्य संबंध येतो तो उपाध्यायवर्गाशीं. या वर्गांत आज अध्ययनहि नाहीं आणि कृत्याचें सांगोपांग ज्ञानहि नाहीं. ही परिस्थिति प्रथम बदलायला हवी. उपाध्याय हा सत्पात्र आहे अशी यात्रेकरूंची भावना झाली कीं क्षेत्राचें निम्में पावित्र्य परत आलें असें समजावें. क्षेत्रें शुद्ध, स्वच्छ आणि निर्मळ राखलीं जावीं. पुराणांतरीं ज्यांचें नांव एखाद्या ऋषि-मुनीशीं निगडित आहे अशीं कांहीं तीर्थें आणि कुंडें आज अनेक क्षेत्रांतून दुर्गंधि घाण पाण्याचीं डबकीं होऊन पडलीं आहेत आणि मोडकळीसहि आलीं आहेत, त्यांचा पुनरुद्धार व्हावा. त्या त्या तीर्थस्थळांची माहिती देणाऱ्या पाट्या जागोजाग लावाव्या. कोणत्याहि तीर्थकुंडांतलें पाणी दूषित होणार नाहीं याची दक्षता घ्यावी. बेल, तुळशी, वड, औदुंबर, नाना प्रकारचीं फुलझाडें इत्यादि वनस्पति सभोंवतीं लावून, वाढवून जल-स्थळें सुशोभित करावीं.

क्षेत्रांतलीं प्रसिद्ध आणि दर्शनीय स्थानें, त्यांचें पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व, त्यांची दिशा, परिसरांतलीं प्रेक्षणीय स्थळें, गांवापासून त्यांचें अंतर, क्षेत्रांतले अवश्य कर्तव्य असे धार्मिक विधि, धर्मशाळा वगैरे मुक्कामाच्या जागा, वाहनांची व्यवस्था, वैद्यकीय मदत मिळण्याची जागा, सावधगिरीच्या सूचना इत्यादि माहितीचें नकाशासहित छोटेंसें पुस्तक त्या त्या नगरपालिकेनें छापून अल्प मोलांत विक्रीस ठेवावें. नगरपालिका यात्राकर वसूल करतात त्यांतून त्यांना यात्रेकरूंची एवढी सोय करणें जड वाटूं नये.

प्रत्येक क्षेत्रांत माहितगार स्थलदर्शक असावे. त्या कामाबद्दल यात्रेकरूं-कडून त्यांनीं किती वेतन घ्यावें तें ठरवून दिलेलें असावें. एखादें प्रेक्षणीय स्थळ गांवापासून थोडें दूर असेल तर आपला उपाध्याय कित्येकदां त्याचा नामनिर्देशहि करीत नाहीं. सांगितलें तर दाखवायला जाण्याचे श्रम घ्यावे लागतील म्हणून तो टाळाटाळ करतो. हातांत माहितीचें पुस्तक असेल आणि मार्गदर्शक मिळणें शक्य असेल तर उत्साही यात्रेकरू त्याचा फायदा घेऊं शकतील.

पंचामृतपूजा, महापूजा, महानैवद्य, एकादष्णी, लघुरुद्र, पालखी, अनुष्ठान, इत्यादि धार्मिक कृत्यांना किती द्रव्य द्यावें लागेल त्याचा एक ठळक तक्ता देवस्थानांत दर्शनी भागांत लावलेला असावा. या बाबतींत आणि देवस्थान

स्वच्छ, सुंदर राखण्याच्या बाबतींत गोमंतकांतल्या शांतादुर्गा, मंगेश, नागेश इत्यादि देवस्थानांची दीक्षा घेण्याजोगी आहे.

क्षेत्रांत येणारा यात्रेकरू जेणेंकरून अधिक स्वावलंबी होईल, त्याला दगदग कमी पडेल, त्याची यात्रा सुखावह होईल आणि त्याच्या मनाला प्रसाद नि संतोष लाभेल या दृष्टीनें त्या त्या क्षेत्राच्या सुधारणेची दिशा आंखावी एवढें सांगितलें म्हणजे अधिक तपशील वाढविण्याचें कारण नाहीं.

ही लेखमाला मीं खंड पडूं न देतां लिहिली हें खरें; पण ती अखंडित छापली जाणेंहि आवश्यक होतें. तें कार्य माझे मित्र आणि 'प्रसाद' चे संपादक श्री. य. गो. जोशी यांनीं पार पाडलें याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद! त्यांच्या उदार सहकार्यामुळेंच 'तीर्थरूप महाराष्ट्र'चे दोन भाग लागोपाठ प्रसिद्ध होऊं शकले.

राजगुरु प्रेसनें छपाई सुबक करून दिली. पुण्यांतले सुप्रसिद्ध चित्रकार श्री. ग. वि. देशपांडे यांनीं सुंदर चित्रांनीं 'तीर्थरूप महाराष्ट्र' शोभविला. श्री. गणपतराव मोघे यांनीं चित्रांचे ठसे करून दिले. श्री. दलाल यांनीं मुखपृष्ठ दर्शनीय केलें. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

यात्राप्रसंगीं निरनिराळया क्षेत्रांतल्या उपाध्यायांनीं आणि तिथल्या अनेक आतिथ्यशील सद्‌गृहस्थांनीं मला जी बहुमोल मदत केली त्याबद्दल मी त्या सर्वांचे नामनिर्देश न करतां पण अत्यंत कृतज्ञतेनें आभार मानतों.

रसिक वाचकांनीं, वृत्तपत्रांच्या संपादकांनीं आणि बहुसंख्य विद्वज्जनांनीं पहिल्या भागाचें उदार आणि सप्रेम स्वागत केलें. मी त्या सर्वांचा ऋणी आहें. हा दुसरा भागहि त्यांना तसा आणि तितकाच प्रिय होईल अशी मी आशा करतों. आणि शेवटीं—

**" इति विद्यातपोयोनिरयोनिर्विष्णुरीडितः**
**वाग्यज्ञेनार्चितो देवः प्रीयतां मे जनार्दनः "**

पुणें.
विजयादशमी,
शके १८५३.

—**महादेवशास्त्री जोशी**

ज्यांनीं आणि मीं परस्पर-संगतींत सुखांचा गुणाकार
आणि दुःखांचा भागाकार केला ते माझे
अलिबाग येथील परममित्र
**श्री. रामचंद्र वामन दातार**, बी. ए.
यांस सादर सप्रेम समर्पण.

—लेखक

# अ नु क्र म


| | | | |
|---|---|---|---|
| १ | मल्हारिमार्तंड | .... | १ |
| २ | परशुरामक्षेत्र | .... | २१ |
| ३ | तुळजाभवानी | .... | ४२ |
| ४ | भीमाशंकर | .... | ६३ |
| ६ | वेरुळचा घृष्णेश्वर | .... | ८१ |
| ७ | गोकर्ण-महाबळेश्वर | .... | ९७ |
| ८ | नाथांचें पैठण | .... | ११४ |
| ९ | 'धन्य देहूगांव–' | .... | १३१ |
| १० | आळंदीची वारी | .... | १४६ |


---

## चुकीची दुरुस्ती

'वेरुळचा घृष्णेश्वर' या लेखाचा क्रमांक वस्तुतः ५ असायला हवा; पण तो ६ पडला आहे आणि पुढें शेवटपर्यंत हीच चूक कायम उरली आहे.


---

# १ मल्लारि मार्तण्ड

'इजा बिजा अन् तिजा' असें म्हणतात. एखाद्या कार्याला दोनदां मुहूर्त लागला नाहीं तर तिसऱ्या खेपेसहि कांहीं तरी आडमेळें येतें अशी भाविक समजूत. पण आमचे दोन बेत फसले तरी तिसऱ्या बेताला कोजागरी पौर्णिमेनंतर एक दिवशीं सकाळीं साडेनवाच्या सुमारास आम्ही विनात्रास जेजुरीच्या स्थानकावर उतरलों. आमचे पाय शाबूत नसतील या कल्पनेनें फक्त एक मैल गांवांत जाण्यासाठीं छकडेवाल्यानें तोंडभर भाडें सांगितलें. भंडाराचा आडवा नाम लावून पुढें आलेल्या एका भटजीबुवांनीं फक्त खालच्या देवाची भेट करून आणण्यासाठीं दोन 'गोप्रदानें' मागितलीं. पण आम्हांला तर तेवढ्यावरच न थांबतां तिथून वरच्या कडेपठारावर जायचें होतें आणि त्यासाठीं कोण्या तरी मार्गदर्शकाचीहि गरज होती. अखेर आम्हांला भेटला छबन. तो तिथल्या गुरवाचा मराठी सातवी शिकणारा सोळा वर्षांचा मुलगा. शाळेतल्या विद्यार्जनापेक्षां आम्हांला हिंडवून आणण्याचा हा व्यवसायच त्याला 'तूर्त दान महापुण्य' ठरणार होता.

स्टेशनापासून एक मैल चालून आम्ही गांवाच्या सीमेंत पाय ठेवला. नगरपालिकेच्या दवाखान्यावरून पुढें उभ्या रस्त्याला लागलों. एका बाजूच्या भिंतीला दोन नवीं चाकें टेकून ठेवलेलीं दिसलीं; तो बहुधा गाडीकारखाना असावा. पुढें एका घरावर वाचनालयाची पाटी दिसली; पण तें होतें शिवणकामाचें दुकान. भंडार विकत घेण्यासाठीं आम्ही एका दुकानापुढें थांबलों, त्याच्या वरच्या बाजूला पंधरवड्याच्या शिध्यासाठीं स्त्रीपुरुषांची तळपत्या उन्हांतली रांग पाहिली. भंडार म्हणजे हळदीची पूड. पंढरपुरीं बुक्कयाचें, करवीरांत कुंकवाचें, तसें इथें हळदीचें माहात्म्य. भंडार कागदांतून मिळत नाहीं; तो खोबऱ्याच्या वाटींतून

घ्यावा लागतो. कदाचित् भंडाराबरोबर खोबरेंही खपावें म्हणून संगन-मतानें सर्व दुकानदारांनीं अमलांत आणलेली ही युक्तिही असूं शकेल.



जेजुरीगड

चढत चढत गडाखालच्या महाद्वारापर्यंत आम्ही गेलों आणि पाषाण-नंदीच्या पाठीकडून उजव्या हाताला वळलों. छबन म्हणाला, ‘ आधीं रानच्या रस्त्यानें कडेपठारावर जाऊं आणि मग तिथून खालच्या गडावर येऊं. ’ मीं म्हटलें, ‘ जसं तुला सोयीस्कर वाटेल तसं. ’ मटकी, हुलगे यांच्या शेतांतून आमची पायवाट जात होती. मधूनच ती एखाद्या निर्जळ ओहळांत शिरे, मधूनच वर येई आणि पुन्हा खालीं जाई. डोंगराच्या पायथ्याशीं कांहीं पडके दगडी चौथरे, गतवैभवाची खंत करीत आयुष्य कंठणारी कोणत्या तरी देवाची उघडी पडलेली एक पाषाणमूर्ति, तिच्यावर भक्तिप्रेमाची सावली करणारे मोजकेच एकदोन वृक्ष आणि त्यांच्याजवळच एक ‘ बारव ’ आणि ‘ ढोपरीं कोपरीं ’ पुढें सरकायचा प्रयत्न करणारा म्हातारा, कृशांग जलप्रवाह, हें सगळें पाहून मला वाटलें, प्राचीन काळची धर्मपुत्र लवादि सात ऋषींची तपोभूमि तर ही नसेल !

होय. याच भागांत त्यांचे आश्रम होते. इथेंच त्यांनीं ‘ जपतपसाधन ’ मांडलें होतें. इथेंच भिजवून वृक्षशाखांवर वाळत टाकलेल्या त्यांच्या वल्कलांतून जलधारा गळत होत्या. याच डोंगरावर त्यांचे छात्रगण कंदमुळें खणायला जात होते. इथूनच यज्ञधूमाचे लोट उठून आकाशांत पांगत होते. इथेंच ऋषिकन्या फुलझाडें शिंपून वाढवीत होत्या. इथेंच

अश्वत्थ-औदुंबरांना बांधलेल्या पारांवर वेदघोष आणि शास्त्रचर्चा गाजत होत्या. पण अशा या शांत, निर्वैर आश्रमस्थानावर मणि–मल्ल या दोन दैत्यांची धाड पडली आणि एका घटकेंत सगळें उद्ध्वस्त झालें.

हिरण्याक्ष–हिरण्यकशिपु, रावण–कुंभकर्ण, सुंद–उपसुंद या जशा प्रमत्त दैत्यांच्या जोड्या तशीच ही मणि–मल्लांची जोडी होती. त्यांचें फक्त परस्परांवर प्रेम होतें आणि बाकीच्या सगळ्या जगाशीं वैर होतें. स्वार्थासाठीं, किंबहुना आपला बलकंडू शमवण्यासाठीं ते या प्रांतांतल्या निरागस जनतेंचे काळ झाले होते. धर्मपुत्र लवादि मुनींवर तर त्यांचा विशेष डोळा. कारण ते पुण्यमार्ग वाढवीत होते आणि देवांचें सामर्थ्य चढवीत होते. जेव्हां हा छळवाद असह्य झाला तेव्हां ते आपलें गाऱ्हाणें घेऊन विश्वस्रष्टया ब्रह्मदेवाकडे गेले. तो म्हणाला, 'आपल्या हातून हें काम रेटायचं नाहीं. तुम्ही वैकुंठपतीला गळ घाला.' ते विष्णूकडे जातांच त्यानें त्यांना कैलासाची वाट दाखविली. कैलासनाथानें मात्र त्यांचें गाऱ्हाणें ऐकलें आणि त्यांना अभयवचन दिलें.

आणि मग दैत्यनिर्दालनासाठीं मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी रविवारीं महारुद्र मार्तंड–भैरवाच्या रूपानें इथें अवतरला. तो येतांच त्याचा साह्यकारी म्हणून सगळा स्वर्गच खालीं उतरला. गणपति मोरगावीं करा नदीचा किनारा संभाळून बसला. 'पुरंदर' इंद्रानें सासवडच्या पर्वतश्रेणीवर मोर्चे लावले. आसमंतातल्या शिवारांतून देवसेनेचे तळ पडले. दैत्यांची चहूं बाजूंनीं कोंडी झाली. आणि मग......

पण एवढ्यांत माझी विचारमालिका एकदम तुटली. माझ्या पायांजवळच्या एका बसकर झुडपांतून एक लहानसें पांखरूं फर्रर्‌दिशीं उडालें आणि जमिनींत तिरकस घुसणाऱ्या तीरासारखें मागच्या एका दुसऱ्या झुडपांत शिरलें. तो लावा पक्षी होता. जाणाऱ्या माणसाचा पाय जवळजवळ अंगावर पडेपर्यंत हालायचें नाहीं हा त्याचा जातिस्वभावच.

आतां आम्ही कडा चढूं लागलों होतों. आमच्या डाव्या हाताच्या डोंगरावर ओहोळांच्या चऱ्या इकडून तिकडून निघाल्या होत्या, मधेंच

एकत्र येऊन एकमेकींत गुंतल्या होत्या आणि पुन्हा विलग होऊन पायथ्याला उतरल्या होत्या. चढतांना लागलेला श्वास थांबवण्यासाठी मी एका ठिकाणीं उभा राहिलों, इतक्यांत सौंदर्यदर्शनासाठीं भुकेलेली माझी दृष्टि दूरवरच्या क्षितिजरेषेपर्यंत भिरभिरून आली. पण 'माकड गेलें लुटी अन् आणल्या दोन मुठी' इतकीसुद्धा तिला प्राप्ति झाली नाहीं. सगळें रानच नव्हे; तर माझ्या डाव्या-उजव्या हातांचे डोंगर-सुद्धां 'संन्यासी' च होते. त्यांच्या अंगावर 'मी' म्हणून वाढला होता तो त्रिधारी निवडुंग मात्र. जणुं मणि–मल्लांचे इतस्ततः मरून पडलेले दानवसैनिकच त्या रूपानें जन्माला आले होते. आमच्या वाटेलासुद्धां दोन्ही बाजूंनीं त्याचीच खडी ताजीम. मात्र अशाही स्थितींत निसर्गाच्या योजकतेची करामत दिसली. कांहीं निवडुंगांवर शतावरीची नाजूक हिरवीचार वेल चढून विस्तारली होती. एखाद्या कुलवधूनें पतीचे दुर्गुण झांकून टाकावे तसे तिनें त्यांचे कांटे झांकले होते. काहींच्या अंगभर दुसऱ्या एका वेलीचीं चार पाकळ्यांचीं शुभ्र फुलें बहरलीं होतीं. आणि तीं नुसतींच सुंदर नाहींत तर सुगंधीही आहेत, हें वारा आमच्या नाकाशीं येऊन हळूच सांगत होता. या लतावधूंनीं असले हे कांटेरी वर कसे पसंत केले हेंच नवल होतें. पण त्या तरी करतील काय? त्या मालिनीतीरावरील कण्वाश्रमापुढच्या भाग्यवंत वेली थोड्याच होत्या! सगळेंच 'निर्वीरमुर्वीतलम्' तिथें जो कोणी मिळेल तो सही!

डोंगराच्या कटिप्रदेशापर्यंत चढल्यावर भंडार उधळलेली एक खडकाळ जागा दिसली तें 'घोडे उड्डाण' होतें. घोडे उड्डाण या शब्दामागें इतिहासाची किनार असलेली एक दंतकथा आहे. सुपें मुक्कामीं खैरे पाटील यांच्या वंशांत भाग्या नांवाचा एक पुरुष उपजला. तो खंडोबाचा एकांतभक्त होता. दर रविवारीं गांवाहून निघून करा नदी ओलांडून तो जेजुरीस येई. कडेपठार चढून खंडोबाची पूजाअर्चा करी. सूर्य-चंद्रांच्या विश्वप्रदक्षिणेप्रमाणें त्याचा हा नेम कैक वर्षें अबाधित चालला होता. तारुण्य ओसरलें, पोक्तपण संपलें आणि जरेनें

बळ शोषून शरीर गलित-पलित केलें, तरीही त्यानें आपला नेम सोडला नाहीं. अखेर एक दिवस लटपटत्या पायांनीं आणि धापावत्या काळजानें कसाबसा तो इथवर चढला. ' देवा खंडेराया ! किती उंचावर राहिला आहेस रे ! थकलों मी आतां...' असें म्हणतां म्हणतां त्याला मूर्च्छा आली. त्याच क्षणीं खंडोबा अश्वारूढ होऊन इथें आला आणि त्यानें त्या जराजर्जर भक्ताची मूर्च्छा सांवरली. ' यापुढें कडेपठार चढण्याचे कष्ट तूं घेऊं नको. मी तुझ्यासाठीं गांवाजवळच्या टेकडीवर येऊन राहीन. ' त्यानें त्या वृद्धाला आश्वासिलें. तो आनंदनिर्भर होऊन टकमका पहात राहिला आणि देवाच्या इशाऱ्यासरशीं घोड्यानें एकदम उड्डाण मारलें, तीच जागा ही.

भाग्या जवळच्या टेकडीवर जातो तों त्याला तिथें धनुष्याकृति एक लिंग दिसलें. देवानें आपलें आश्वासन पुरें केलें होतें. भाग्याचा हर्ष त्याच्या अस्थिपंजरांत मावेना. त्यानें गांवांतल्या महाजनांना बोलावून आणून तो साक्षात्कार दाखवला. ते लोकही म्हणाले, ' बरें झालें. तुझ्यामुळें आमचेही आतां कडेपठार चढण्याचे श्रम वांचले. ' आणि त्या दिवसापासून खालच्या टेकडीचें भाग्य उजळलें.

देव जरी खालच्या टेकडीवर आला असला तरी तो वृद्धां—बालासाठीं; आमच्यासाठीं नव्हे. तेव्हां आम्हांला वर जाणेंच भाग होतें. आम्हांला वाटलें होतें कीं, गोल टेकडी गांठली कीं लगेच कडेपठार लागेल. पण तो केवळ ' शाखाचंद्रन्याय ' होता. तिथून मधल्या एका डोंगराच्या माथ्यावरून बरेंच पुढें गेल्यावर मग कडेपठार भेटणार होतें.

' बारा कोसांवर भाषा बदलते ' म्हणतात. पण निसर्गरचना बदलायला डोंगरमाथ्याची लहानशी रेषासुद्धां पुरेशी होते. एका बाजूला सगळा निवडुंग तर दुसऱ्या बाजूला सगळ्या पिवळ्या फुलवंती कण्हेरी हा देखावा निश्चित आश्चर्यजनक होता. तो सगळा उतार जणुं सोन्याचा झालेला मी पहात होतों. जशा कांहीं नववधू पिवळी ' अष्टपुत्री ' पांघरून बोहल्यावर चढण्यासाठीं सजून राहिल्या आहेत. इतर सगळीं झाडेंझुडपें खुरटीं ; मग यांच्याच मुळांत हा जीवनरस कोणीं

आणून ओतला ? हींच तेवढीं फुलें घमक आणि रसरशीत कां ? कां म्हणजे ? आमच्यासारख्या अनेक यात्रिकांच्या स्नेहाळ नजरेंतला अमृतद्रव तीं प्राशीत नव्हतीं का ? कौतुकाचे कोवळे बोल ऐकत नव्हतीं का ? खंडोबाला पिवळा रंग प्रिय कां असावा हें खालपासून वर येईपर्यंत मी मनांत विवंचीत होतों. त्याचें उत्तर मला इथें मिळालें. पण लगेच दुसरा प्रश्न उभा राहिला. इथला आसमंत पिवळा म्हणून देवानें त्याच रंगाची आवडी धरली का देवाच्या इच्छेनुसार निसर्गानेंच आपला कायापालट केला ?

आमच्याऐवजीं 'बीगल' जहाजावरून सृष्टिनिरीक्षणासाठीं सतत पांच वर्षे सफर करणाऱ्या डार्विनला हीं सुवर्णफुलें दिसलीं असतीं तर तो त्यांच्या पाकळ्यांना अलुमाळ स्पर्श करून त्यांच्याशीं घटकाभर त्यांच्याच भाषेंत बोलत राहिला असता आणि बोलतां बोलतां त्याची समाधि लागली असती. आम्हीं फक्त त्यांतलीं कांहीं फुलें देवाला वाहण्यासाठीं तोडून घेतलीं आणि पठारावर पाय ठेवला. उजव्या हाताला छोटेंसें देऊळ दिसलें. तें रामाचें आहे हें पुढें उभ्या असलेल्या हनुमंतानें सांगितलें. तिथून मुख्य देवळाचा पार्श्वभाग दिसूं लागला. कुडचाफ्यांच्या झाडांखालून आम्ही प्रवेशद्वारांत ठाकलों. आम्हांला पहातांच कळकट कपड्यांतला एक म्हातारा गुरव लगबगीनें देवळांत घुसून स्थानापन्न झाला. मध्यान्हाच्या ऐन उन्हांतून आम्ही बंदिस्त जागेंत गेलों होतों, त्यामुळें आसनमांडी घालून बसलेली, शिंदेशाही पगडी घातलेली खंडेरायाची वस्त्रवेष्टित पाषाणमूर्ति दिसायला कांहीं क्षण जावे लागले. आम्हीं भंडार उधळला, खोबऱ्याचा तुकडा दक्षिणेसह पुढें ठेवला, फुलें वाहिलीं आणि अंजलिसंपुट जोडून खालीं बसलों. आमच्यासमोर दोन लहानशीं स्वयंभू लिंगें एकमेकांना चिकटून होतीं आणि तिसरें एक हातभर अंतरावर होतें. गुरव म्हणाला, 'शंकर–पार्वती आणि ती पलीकडची गंगा.' मीं म्हटलें, "शंकराला गंगा इतकी नावडती कधीं-पासून झाली ? मागच्या बाजूस सुंदर संगमरवरी गणपति बसला आहे त्यानें तर हा 'विगड' घातला नसेल ?"

बाहेर येऊन देवळाला प्रदक्षिणा घातली. प्राकारांत तीनचार बिऱ्हाडें होतीं, त्यांतल्या एकांतून गायीचें दहीं विकत घेतलें आणि दुपारची वेळ साजरी करण्यासाठीं जवळच्या तळयाकडे निघालों. 'एरंडोऽपि द्रुमायते' अशा एका दरिद्री झाडाखालच्या नाममात्र सावलीला बसून आमच्या सोबत्यानें शिदोरी सोडली. सावली नसली तर निदान मनासारखा वारा तरी असावा ! आम्ही कमींत कमी चारशें फूट उंचीच्या पठारावर होतों. इथें तर वाऱ्याची हमामा हुंबरी चालू असायला हवी होती. पण तो कुठल्या वेलींना नाचवीत, कुठल्या कमलवनांना लुबाडीत, कुठल्या भातखाचरांतल्या पिवळया लोंब्यांना डोलवीत आणि कुठल्या जलप्रवाहावर तरंगमाला उठवीत कोणत्या प्रदेशांत हिंडत होता देव जाणे ! उन्हाच्या चटक्याला वाऱ्याची मात्रा चांगली लागू पडते म्हणून तर आम्ही त्याची चाहूल घेत होतों.

पण तापशामक असें दुसरें औषध जें पाणी तें मात्र त्या तळयांत भरपूर होतें आणि कमालीचें गार होतें. त्याच्यावर दाट थर सांचला होता ; पण तें शेवाळ नव्हतें. शेवाळ जाळीदार असतें, एकसंघ असतें ; पण हे निव्वळ सुटे कण होते. सारवलेल्या काळयाभोर अंगणांत जणुं वरयाच वाळत घातल्या आहेत. तोच रंग, तोच आकार. हातानें तें द्रव्य दूर लोटून तांब्या भरून घेतला तों त्यानें लगेच पुनश्च सारवासारव केली. तळें म्हणजे अगदींच डबकें नव्हे आणि अवघ्या दहापंधरा माणसांचा वापर. बाजूला बसून घागर घासणाऱ्या बाईला मीं म्हटलें,

" तुम्हांला पाण्याची चंगळ होत असेल नाहीं ? "

त्यावर ती बाई मुद्रेवर विषाद दाखवून म्हणाली,

" न्हाय् व ! उन्हाळयांत पार आटून जातंया समदं तळं. "

" अन् मग ? "

" मंग काय ? खालून आणायचं पाणी. "

खालून म्हणजे दोन मैलांवरच्या जेजुरी गांवांतून आणि जिथून मोकळया

अंगानें चढतांना आम्हांला धाप लागली तो डोंगर उरापोटावर घेऊन. मीं म्हटलें, इतके जिवाचे हालताप सोसून हीं माणसें इथें राहतात तरी कशाला? काय यांचें इथें गांठोडें पुरलें आहे? बोलून चालून तोंड वेंगाडून जीव जगवायचा; मग तो इथेंच कां? पण वास्तूचें प्रेम मोठें जबरदस्त असतें. जिवावर किंवा अब्रूवर बेतली तरच माणूस तिचा मोह तोडतो.

उदरस्थ वैश्वानराला हविर्भाग देऊन आम्ही गडावर जाण्यासाठीं म्हणजे खालचें देवस्थान पाहण्यासाठीं कडेपठारावरून परत फिरलों. तसें पाहिलें तर आमचें आधीं कडेपठार चढणें हें यात्रानियमाला धरून नव्हतें. पण आम्ही तसे नेमाधर्माचे यात्रिक नव्हतोंच मुळीं. विधिपूर्वक यात्रा करायची तर इथें तीन दिवस क्षेत्रवास करण्याच्या तयारीनेंच आम्हांला यायला हवें होतें. कडेपठाराचें दर्शन हा त्यांतला शेवटच्या दिवसाचा विधि होता.

परत येतांना दोन डोंगरांच्या मधल्या खोल, चिंचोळ्या दरीकडे लक्ष जाणें अपरिहार्य होतें. तिथें वृक्षांच्या पुंजांत जानाबाईचें देऊळ चित्रपटांतल्या ' क्रेन शॉट ' नें घेतलेल्या दृश्यासारखें दिसत होतें. फाल्गुन अमावास्येला गांवांतली सगळी मंडळी इथें येतात आणि लहान लहान ' गल्या ' ( वाफे ) खणून त्यांत वेगवेगळीं धान्यें पेरतात. ती सबंध रात्र, बीजांचा जळ–मातीशीं संयोग होतो. पाडव्याच्या दिवशीं गांवकऱ्यांसह पाटील तिथें येतो आणि वाफा उकरतो. जें बीज फुगीर आणि अंकुर फोडायला उत्सुक असें दिसेल तें पीक त्या सालीं चांगलें येणार असें प्रसिद्ध करतो. या प्रकाराला ' गुळ्या काढणें ' म्हणतात.

गिरिशिखरांच्या उतरणीवरून आम्ही खालीं खालीं येत होतों. वाटेंत उजव्या बाजूला एका दरडीच्या कडेवर दोन शिळा एकावर एक चढून बसल्या होत्या. जरा तोल झुकला तरी खालीं पडून दुभंग होतील अशा जागीं त्या होत्या. छबन तिकडे बोट दाखवून म्हणाला, हें ' सासू-सुनेचं भांडण. ' खालची वाटोळी, घरटाच्या तळीसारखी दिसते ती सासू आणि वरची गबदुल, ओबडधोबड, चौपटीच्या वजनाची

दिसते ती सून. म्हणजे सून इथें सासूच्या उरावर बसली आहे. सासूची कणीक तिंबायला तिला निराळें लाटणें घेण्याची गरज नाहीं. मीं म्हटलें, ‘कांहीं दिवस सासूचे, तर कांहीं दिवस सुनेचे’ असें म्हणतात; पण या सासूचे ‘दिवस’ आतां कधीं येतील ही आशा करायला नको.

पण त्यांच्याकडे ‘आश्चर्यवत्’ पाहतांना मला एक निराळीच कल्पना सुचली. या सास्वा-सुना नव्हेतच मुळीं. या दोघी खंडोबाच्या बायका—म्हाळसा आणि बाणाई—असल्या पाहिजेत. देवाच्या अर्धांगी झाल्या म्हणून त्यांच्यांतला ‘सवत इसाळा’ गेला नव्हता. दोघीही एकमेकींचीं वर्मेंशर्में काढीत आणि एकमेकींच्या कांड्याला खिळत. त्यांच्या असंस्कृत ग्राम्य भांडणावरचें एक लोकगीत नुकतेंच एका वाघ्यानें मला ऐकविलें होतें.

म्हाळसा बाणाईला बजावीत होती—

“आईक मी सांगतें तुजला
चित दे माझ्या बोलाला
कां ग तूं भुललिस देवाला?
जा तूं आपल्या देशाला
झांकल्या पाठीनं जाई म्हणती घे तूं ऐकून
एक्या घडीमधिं तोंड बाणाई! टाकिन उतरून”

पण बाणाई तिच्याहून तिखट जणुं लवंगी मिरची होती. तिच्याही तोंडावर लगेच लाही फुटली. तिनें म्हाळसेचीच नव्हे, तर तिच्या-बरोबर देवाचीही उद्धरगत केली.

“इक्तं ऐकुनश्यानी बाणाईला राग आला फार
रातिमातर तुमच्या घरीं न्हाई इच्यार
तूं वाण्याची हायेस म्हूण करशिल पडिभार
आम्ही धनगरणी जशा नागिणी मोठ्या शिरजोर
तुज्या देवानं आमच्या घरीं वळिलीं खिल्लारं
लेंड्या, लोकर, कन्या मिसळी तुझाच भर्तार”

भोळया शंभूनें नवा अवतार घेतला, कैलास सोडून जेजुरीचें पठार पत्करलें, तरीही दोन बायकांचा भ्रतार होण्याचे भोग कांहीं त्याच्या वांट्याचे टळले नाहींत. कैलासावर गंगा-गौरी भांडत होत्या तर इथें या दोघी. पण गंगा-गौरींच्या कलहांत आर्यता होती, मर्यादशीलताही होती. पण इथें हें सगळें 'गांवरान' काम. गंगा-गौरी या एकाच कुळांतल्या एकाच बापाच्या लेकी; तर या दोघी भिन्न कुळांतल्या आणि भिन्न संस्कृतींत वाढलेल्या. म्हाळसा वणिजकन्या, तर बाणाई धनगराची.

म्हाळसेनें नेवाशाला तीमशेट वाण्याच्या घरीं जन्म घेतला होता. त्याच्या घरीं लक्ष्मी राबत होती. या एकुलत्या मुलीला त्यानें फुलांत ठेवून वाढवलें होतें. तिची बाल्यदशा माघारून ती 'पणां'त आली होती. तिच्या गोऱ्या रंगावर गव्हाळी कांति खुलली होती. रेखीव अवयवांना गोलाई प्राप्त झाली होती. तीमशेट तिच्या लग्नाची विवंचना करूं लागला होता. लावण्यद्वीपांतलें हें माणिक कोणाच्या हातीं निरवूं, असा त्याला प्रश्न पडला होता. एवढ्यांत मार्तंड भैरव दैवयोगानें तिच्या दृष्टीस पडला होता. त्याच्या दैवी तेजानें तिचे डोळे दिपले होते. त्या पुरुषार्थी नवयुवकाचा तिला छंद लागला होता. मार्तंड भैरवाचीही तीच अवस्था होती. ती सुंदरतेची मूस आपल्या अर्धांगीं विराजित करण्यासाठीं पडेल तें साहस करण्याची त्याची तयारी झाली होती.

पण सरळ मार्गानेंच त्याचा कार्यभाग साधला. त्याच्या मागणीला तीमशेटीनें मस्तक नमवून रुकार दिला. पाली मुक्कामीं वैभवाच्या झगमगाटांत त्या दोघांचें शुभमंगल झालें. मार्तंड नीलकमलासारखा सांवळा आणि म्हाळसा गोरोचनासारखी आरक्त गौर. मेघ आणि विद्युत् यांच्यासारखा तो वरवधूसमागम झाला. लोक त्याला 'म्हाळसाकांत' म्हणून संबोधूं लागले. त्यालाही ती उपाधि भूषणास्पद वाटली.

पण त्याचा संसार असा एकसुरी, एकमार्गी व्हायचा असता तर बाणाई कशाला त्याच्या मार्गांत आली असती! बोलून चालून धनगराची

पोर. काय पाहिलें त्यानें तिच्यांत ? काय म्हणजे ? तिच्या अंगांतली तरारत्या कोंभाची लवलव. रंगानें कन्हय्याची बहीण. काळया शिवारांत नि काळया मेंढरांत वाढलेली. जणुं नाचती, सळसळती कृष्ण कमळीची वेल. जशी चपळ तशीच अवखळ. जणुं फेंसाळत जाणारी यमुना नदी. रानांतलें वारें-पाणी पिऊन तिचे सगळे अवयव कसे सकस आणि घोटीव झालेले. खंडोबाला ती आपल्या इच्छाशक्तीची प्रतिमा वाटली. तो तिच्यावर एकदम भाळला. तिच्यासाठीं त्याला आपलें मोठेपण बाजूला ठेवून धनगर व्हावें लागलें. तो वेष, ती भाषा, ती वृत्ति. त्यानें तिचीं मेंढरें वळलीं. तिचे गहिरे कटाक्ष झेलले. तिचे रांगडे बोल फुलांचे झेले मानले. तिला रमवून, हंसवून, खेळवून तो तिच्या अंतरांत शिरला आणि मग एके दिवशीं धनगरानें तिचा हात त्याच्या हातीं दिला. बाणाई घरभरणीसाठीं त्याच्यापुढें घोड्यावर स्वार झाली.

म्हाळसा आणि बाणाई. एका म्यानांतल्या दोन तलवारी. त्यांचा खणखणाट कधीं थांबेना आणि खंडोबाला ती कटकट सोसवेना. त्या दोघींत कधींच स्नेहभाव निर्माण होणार नाहीं ही जेव्हां त्याला खात्री पटली तेव्हां त्यानें दोघींना एकदम अलग केलें. म्हाळसेला आपल्या-पाशीं ठेवली आणि बाणाईला गडाच्या पायथ्याशीं नवें घर बांधून दिलें. बाणाईचा भाऊ हेगडी याला त्यानें आपला प्रधान नेमलें होतें, त्यालाच बाणाईचें पाठीराखेपण सांगण्यांत आलें.

आणखी थोडें खालीं उतरून आम्ही गडाच्या पातळीवर आलों. तिथून डाव्या-उजव्या हाताला दोन तळीं दिसलीं. डाव्या हाताचें आपल्या पुऱ्या वैभवांत लहरत होतें तर उजव्या हाताचें 'ते हि नो दिवसा गताः' असा उदास, खिन्न भाव दाखवीत होतें. पेशव्यांनीं बांधलेल्या सदतीस एकर क्षेत्रफळाच्या अष्टकोनी अशा त्या विस्तीर्ण सरोवरांत, डोंगरांतून वाहून आलेले मातीचे थरच्या थर सांचले होते. खालच्या भागाला मधल्याच तुकड्यांत जें थोडेंसें उथळ पाणी होतें, त्यावर आकाशांत मधेंच उपटलेल्या एका भटक्या ढगाची सावली

पडली होती. त्यामुळें लमाणांच्या तांड्यांत सांपडलेल्या परित्यक्ता दमयंतीची दीनता त्या जलदेवीच्या मुखावर काळवंडली होती. तें मला सांगत होतें, "माझ्या वांट्याला 'चक्रनेमिक्रम', नाहीं. अशीच डोंगराची खर वाहून वाहून येईल. थरांवर थर चढतील. एक दिवस सगळें सपाट होईल. थोडाबहुत शिल्लक उरेल तो खालचा दगडी बांध. आणि मग शतकांनंतरचे इतिहाससंशोधक म्हणतील कीं, कोण्या धनवंताच्या अष्टकोनी वाड्याचा हा चौथरा असावा."

जुनी जेजुरी याच तलावाच्या परिसरांत वसली होती आणि गडावरच्या देवळाचें मुख्य द्वार याच बाजूनें होतें. पण काय कारण घडलें नकळे; तिकडची वस्ती उठून किल्ल्याच्या पश्चिम भागाला आली आणि मग तिला 'जीवन' देण्यासाठीं खंडोबा हें कुलदैवत असलेल्या इंदूरच्या अधिपतींनीं म्हणजे तुकोजीराव होळकरांनीं तिकडे नवें तळें खोदलें. पूर्व बाजूचें महाद्वार बुजवलें गेलें आणि उत्तरद्वार हें मग महाद्वार ठरलें.

बुजवलेल्या द्वाराच्या बाजूनें उत्तरेकडे जात असतांना तिथल्या भिंतीला दोन घसघशीत मधाचीं पोळीं पाहिलीं. त्या प्रत्येकांतून दोन दोन तांब्ये मध सहज पिळून घेतां आला असता. ते दोन्ही ओथंबे नुसते 'रवरव' हालत होते. तिथें माश्यांवर माश्या चढल्या होत्या. तळच्या थराला तेवढा मधाचा स्पर्श होत असावा. बाकीच्या नुसत्या एकमेकींवर गर्दी करीत होत्या. ना कलह ना ईर्ष्या. कोणी त्यांच्या संचित धनाला हात-बोट लावायला येऊं दे, कीं संघटित हल्ल्याला एका पायावर तयार. तिर्यग्योनीला संघटनेचें माहात्म्य प्रतिपादावें लागत नाहीं. तें सगळें माणसासाठींच करावें लागतें. आणि तरीही माणूस म्हणतो, 'मी शहाणा!'

मधमाश्यांवरून भुंग्यांची गोष्ट आठवली. भुंगे कोरडें काष्ठ फोडतात. तुळया बहालें पोखरतात. संस्कृत कवि त्याच्या मधुपानाचें आणि गुंजारवाचें कौतुक करूं देत; पण महाविध्वंसक प्राणी आहे तो. पण जेजुरीचें देवस्थान यवनांच्या भंजक आक्रमणापासून वांचवून त्यानें

आजवरच्या सर्व पापांचें क्षालन केलें आहे. जेजुरीच्या उत्तरेस पंधरा मैलांवर असलेलें भुलेश्वर हें शिवस्थान मोडून बेहोष यवनांचा तांडा जेजुरीवर येऊन आदळला. पण तटावर त्यांची पहिली पहार बसली मात्र; प्रवेशद्वाराजवळच्याच एका छिद्रांतून भुंग्यांचें कारंजें वर उसळलें. 'सूंऽऽ चूंऽऽ' करीत वर येणारा भुंगा विध्वंसकांच्या अंगावर आदळून कूंस मारायचा. त्यांच्या तोंडावर, गळयावर, हातावर सगळीकडे ढब्बू पैशाएवढ्या गांधी उठल्या. वारायला हात उगारावा तो क्षणांत करवंदांच्या घडासारखा व्हावा. विलक्षण आग. असह्य खाज. थोबाडें सुजून दुप्पट झालीं. तें परचक्र गडगडत गडाखालीं आलें. पंचक्रोशींतून तोंड काळें करीपर्यंत त्या भुंग्यांनीं त्यांचा पाठलाग सोडला नाहीं.

हें वर्तमान ऐकून औरंगजेब चांगलाच चपापला. त्याला कळलें कीं, हिंदूंचे सगळेच देव कांहीं 'मौन्यरूप' घेऊन बसले नाहींत. तो मग खंडेरायाच्या दर्शनाला आला. धूर्तपणानें नव्हे, तर नम्रपणानें. त्यानें सव्वालाखाचें एक अनर्घ्य रत्न देवाला अर्पण केलें. भुंग्यांच्या प्रकरणांतून तें पुढें आलें होतें आणि त्याचा आकारही तसाच होता. म्हणून सुवर्ण कोंदणांत बसवलेल्या त्या रत्नाला लोक 'भुंगा'च म्हणत.

आम्ही मंदिराच्या प्राकारांत पाय ठेवला तेव्हां घड्याळानें नुकतेच दुपारचे दोन ठोके दिले होते. काळया फरशीवर सर्वत्र ऊन्ह टळटळत होतें. पितळी कांसवावर देवासन्मुख उभें राहून आम्ही 'येळकोट मल्हार' गरजलों आणि आंत शिरलों. पहिल्याच दालनांत दोन बाजूंना दोन दगडी घोडे दिसले. लहानसहान नव्हेत, तर भले भक्कम. उजव्या हाताच्या घोड्यावर खंडेराय आरूढ झाला होता. डाव्या हातचा मात्र पाठीवर जीन मिरवीत मोकळाच होता. कोण बरें त्याच्यावर स्वार होईल? बहुधा हेगडी प्रधान असेल. पण छे! प्रधानानें तर देवाच्या आधीं सज्ज असायला हवें. मग कोण म्हाळसा स्वार होणार आहे? शक्य आहे. तिची तयारी कुठली झटपट व्हायला! बायकांचा चेंगटपणा हा कांहीं आजच्याच युगांतला नव्हे.

गर्भागारांत सगळी रचना वरच्यासारखीच दिसली. तशींच लिंगें.

त्याच दोघी सवती. आणि तोच म्हाळसाकांताचा बैठा पुतळा. इथें आगळें होतें तें वैभव. विशेष होती ती सार्वत्रिक भव्यता. या श्रीमंती-मुळेंच देवाला स्वतःभोंवतीं कोट उभारून घ्यावा लागला होता. दरवाजे भक्कम करावे लागले होते. इथली ही बडेजावी पेशवे आणि इतर कांहीं दौलतवाले भक्त यांनीं निर्माण केलेली आहे. नारायणरावाचा खून झाल्या-नंतर त्याच्या दुर्भागी पत्नीला बारभाईंनीं पुरंदर गडावर नेऊन ठेवलें होतें. तिच्यावर आभाळ कोसळलें त्या वेळीं तिला दिवस गेलेले होते. तिच्या उदरीं पुत्र जन्मण्यावरच बारभाईंच्या कारस्थानाचें यश अवलंबून होतें; पण ती गोष्ट सर्वस्वीं दैवाधीन होती. अशा वेळींच माणसें मग देवाला आळवतात. नाना फडणिसांनीं त्या वेळीं खंडोबाला एक भरभक्कम नवस केला. 'गंगाबाईला मुलगा होऊं दे. एक लक्ष रुपये तुझ्या कामीं लावीन.' आणि खंडेराव त्या नवसाला पावला.

गंगाबाईचा पुत्र सवाई माधवराव जेव्हां गादीवर बसला तेव्हां नानांनीं तो नवस दिरंगाई न करतां फेडून टाकला. पंचवीस हजार रुपये खर्चून त्यांनीं चांदीच्या देवमूर्ति बनवल्या. दगडी मंडपी रुप्यानें मढवली. उरलेल्या रकमेंत सोन्याचे मुखवटे, कवच, छत्री, कलगी-तुरा, इत्यादि राजोपचारांची सामुग्री केली. आणि एवढें करून ते वचनमुक्त झाले.

पण याच श्रीमंतीमुळें बंडखोर, डाकू यांना काळ्या रात्रीं भाले-कुऱ्हाडी घेऊन देवाच्या भेटीस येण्याची वासना झाली. कर आहे तिथें डर असायचीच. सुमारें शंभर वर्षांपूर्वी राघू भांगऱ्या नांवाच्या एका बलदंड कोळ्यानें इंग्रजांविरुद्ध बंड पुकारलें. अहमदनगरच्या एका जमादाराचा हा तरणाबांड पोरगा होता. त्यानें आपल्याभोंवतीं निधड्या छातीचे बरेच लोक जमा केले होते. पुणें जिल्ह्याच्या वायव्येला पर्वतश्रेणीचा आश्रय घेऊन त्यांनीं उपद्रव सुरू केला होता. शक्यतों प्राणहानि न करतां लूटमार करायची अशी त्यानें आपल्या टोळीवाल्यांना 'शास्त्र-मर्यादा' घालून दिली होती. त्याचा डावा डोळा श्रीमंतांकडे आणि उजवा गरिबांकडे असे. तो जणुं महाराष्ट्राचा रॉबिनहूड होता. जणुं जर्मनींतला गॉट्झ व्हॉन होता. गरिबांचा दीनदयाळ आणि धनवंतांचा

कर्दनकाळ. यामुळें दीनदुबळे त्याला दुवा देत. ऋणकोचें घर खाऊन दार तोंडीं लावणाऱ्या एखाद्या शायलॉकचे त्यानें नाककान कापले कीं त्यांना हायसें वाटे. त्याला खंडोबाचें वरदान आहे अशी ग्रामजनांची समजूत होती. त्याच्या पुंडाईच्या रोमहर्षण कथा ते स्तिमित होऊन ऐकत.

याच राघू भांगऱ्यानें एका रात्रीं जेजुरीच्या देवस्थानावर धाड घातली. चौदा तोळे सोन्याचा खंडोबा नेहमीं गळयांत वागविणारा हा देवाचा भक्त, देवावरच उलटला. भोळया सांबाच्या जीवनांतला हा दुसरा भस्मासुर होता. त्यानें चांदीच्या मूर्ति उचलल्या. खंडोबा-बरोबरच म्हाळसेलाहि हालवली. औरंगजेबाची देणगी तो 'भुंगा' हि त्यानें घोंगडीच्या घडींत कोंबला. बरीचशी इतर चीजवस्तहि हातासली. ना प्रतिकार ना विरोध. अंधारांतून ते काळपुरुष आले आणि पुनश्च अंधारांत गडप झाले. सकाळीं लोक येऊन पाहतात तों देऊळ धुतलेलें. देव आपला पुन्हा 'उदास जोगी'!

पण त्या लुटारूंना तें जडजोखीम भारी झालें. त्यांनीं तें सावकाशपणें नेण्यासाठीं ठायीं ठायीं पुरून ठेवलें. देवमूर्तींनाहि धरित्रीच्या पोटांत ठाव घ्यावा लागला. म्हाळसेची श्रीमूर्त बेलसरच्या रानांत पुरून ठेवलेली पुढें बारा वर्षांनीं एका शेतकऱ्याला जमीन नांगरतांना सांपडली. त्यानें जेजुरीला खबर दिली. आणि मग जेजुरीकरांनीं वाजत गाजत आणून पुनश्च तिची देवळांत प्रतिष्ठा केली. 'भुंगा' मात्र एकदां उडाला तो उडालाच.

मंदिरांतून बाहेर येतांना उजव्या हाताच्या देवडीवर खंडोबाचा 'खंडा' म्हणजे खड्ग एका भिंतीला टेकून ठेवलेलें पाहिलें. तें चार फूट लांब आणि चार इंच रुंद आहे. पोषाखी माणूस त्याला हात लावण्याच्या फंदांत पडला तर पुन्हा एकदां सीतास्वयंवरप्रसंगींचें 'रावणाख्यान' लोकांना दिसण्याचा संभव. एक हात तर अकिंचित्करच आहे. पण दोन्ही हातांचें बळ कामीं लावलें तरी—

**"विसां करांनीं धनु तें न तोले!"**

अशी अवस्था होईल. हेंच खड्ग मल्ल दैत्याशीं लढतांना खंडोबाच्या

हातांत तळपलें होतें असें सांगतात. आणि तो मल्ल दैत्य तरी सामान्य होता का ? छेः ! भूलोकींचा कृतांतच तो !

त्याचा जो दगडी पुतळा देवळासमोर एका भिंतीला उभा करून ठेवला आहे, तोच मुळीं नऊ फूट उंच आहे. त्याच्यावर तांबड्या रंगाचा हात फिरवलेला असल्यामुळें नुकताच तो कुठल्या तरी मरण-



खंडोबा आणि मणि-मल्ल

मारणाच्या झुंजावरून आल्यासारखा वाटतो. खंडेरायाचें आणि त्याचें रण माजलें तें तरी किती रौद्र-भीषण ! प्रथम आपला आघाडीवरचा सेनासागर त्यानें खंडोबावर लोटून दिला. खंडोबानें 'अगस्ती' होऊन त्याचें एकच आचमन घेतल्यावर मणिदैत्य, शस्त्रास्त्रें आणि शांबरी माया यांच्यानिशीं त्याला सामोरा झाला. त्यानें आपल्यापरी शर्थ केली. पण त्यालाही वीरशय्येवर निजणें भाग झालें. मणि-मल्ल दोघे बंधु म्हणजे 'दो देहीं एक प्राण.' मणीच्या वधानें मल्लाच्या

हृदयांत क्रोधाग्नि पेटला. त्यानें उरलासुरला दळभार एकत्र करून खंडोबाच्या सैन्यावर धाड घातली. खंडोबानेंही निकराचा प्रसंग जाणून आपलें सैन्य व्यूहबद्ध केलें. उभय दळांत भेरी त्रहाटल्या. शंख, काहळा, मांदळ नादावले. वर्मे चर्मे सरसावून राणे-राऊत घोड्यांवर वळंघले. वीरांच्या विकट हांका उठूं लागल्या. 'सकळांमुखीं एक आरोळी' कीं, 'मारा झोडा!' शस्त्राला शस्त्रानें आणि अस्त्राला अस्त्रानें प्रत्युत्तर मिळूं लागलें. शरवृष्टि, वालुकावृष्टि, अंगारवृष्टि, पाषाणवृष्टि, अशा अनेक वृष्टि झडल्या. मल्लाचे वीर धडाधड कोसळूं लागले. खंडोबाच्या सैन्यांत रणोत्साहाचें वारें भरलें. मल्ल चिडला, क्षोभला. जसा पर्वकाळचा महासागर! खंडोबाच्या वीराग्रणींचींही काळजें कांपलीं.

**"म्हणति मनुष्य नव्हे, हा राक्षस कीं काळ हा खवळला हो**
**कीं आमुची कराया, मूर्त प्रळयाग्नि राख, वळला हो!"**

मल्ल आणि खंडेराय यांचें किती तरी वेळ समोरासमोर रणकांड झालें. पण अखेर मल्लाच्या कळा हळूहळू क्षीण होऊं लागल्या. गिरिशिखरासारख्या त्याच्या देहावर जागोजाग घाव बसले होते. त्यांतून अनावर रक्तस्राव होऊन तो अखेर खंडोबाच्या पायांशीं कोसळला.

पण मरणकाळीं त्याची बुद्धि पालटली. जन्मांतरींचें सुकृत पुढें उभें झालें. त्याच्या हृदयांतला वैरभाव शमून तिथें भक्तिभाव उदित झाला. त्यानें स्तोत्र करून काकुळतीनें खंडोबाजवळ वर मागितला: "देवा! 'माझे माथीं तुझा पाय' कायमचा असूं दे! तूं 'मल्लारि' म्हणून जगांत मिरव. तुझ्या नामाशीं माझें नाम निगडित राहूं दे." देवानें त्याला 'तथास्तु' म्हटलें आणि मग तो दैत्यपुंगव 'शांत' झाला.

शके १३०३ मध्यें वीरपाळ वीरमल्ल यानें या देवळाचा गाभारा बांधला. खटाव येथील राघो बंबाजीनें शके १५५७ त पुढची सदर आणि सभोंवतींचा कोट बांधला. मुख्य मंदिरामागचें पंचलिंगाचें देऊळ विठ्ठल शिवदेव दाणी सासवडकर यानें शके १६११ त उभारलें. त्याच्या नजिकचेंच भंडारघर शके १६७८ त श्रीगोंदेकर यांनीं निर्मिलें.

नादुरुस्त झालेला कोट अहल्याबाईनें पुनश्च बांधला; तें काम शके १६६४ ते ९९ पर्यंत चाललें होतें.

मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी हा खंडोबाच्या मोठ्या वार्षिक यात्रेचा दिवस. महाराष्ट्रांतल्या सर्व भागांतून, विशेषतः खानदेशांतून फार मोठा मेळावा त्या दिवशीं इथें जमतो. आदल्या दिवशीं पंचमीस तेलवणाचा हंडा गडावरून खालीं चावडींत येतो. भक्तगण यथाशक्ति तेल त्यांत घालतात आणि मग तो हंडा समारंभानें वर चढतो. खंडोबाचे भक्त सगळ्या जातींत आहेत. रामोशी लोकांचें तर तें एकमेव उपास्य दैवत. रामोशापासून वचनपालन हवें असेल तर त्याला खंडोबाचा भंडार उचलायला लावावा. रामोशी हे पूर्वीचे लिंगायत असें सांगतात. लिंगायत हे शिवोपासक. पण जेव्हां त्यांच्यांत मांसमच्छर खाणें सुरू झालें तेव्हांपासून त्यांनीं शिवाचें हें दुसरें रूप उपास्य केलें. वीर जातीचे लोकहि खंडोबालाच भजतात. आंधळ्या, अविवेकी भक्तीची अखेर देहदंडनेंत आणि देहदंडनेचा शेवट अघोरी-पणांत झाला नाहीं तरच नवल! खंडोबाच्या उपासनेंत असलेच कांहीं प्रकार कित्येक वर्षें रूढ होते. चंपाषष्ठीच्या दिवशीं या वीर लोकांपैकीं कोणी तरी आपल्या मांडींत स्वहस्तें सुरा खुपसून घेत आणि त्या उष्णोष्ण रक्ताचा टिळा देवाच्या कपाळीं लावीत. मग त्या रक्तरंजित वीरांची तशाच स्थितींत मिरवणूक निघे. भाविक यात्रेकरूंना त्यांच्या या 'वीर'तेबद्दल आदर वाटे का करुणा वाटे, तें आज समजायला साधन नाहीं, पण हे मात्र स्वतःला धन्य समजत.

असाच दुसरा अघोरीपणा 'बगाड' घेण्याचा. कांहीं संकट पडलें, तर एखाद्या भक्तानें नवस बोलावा, 'मल्लारिदेवा! माझ्यावरचें अरिष्ट दूर होऊं दे. माझी मनकामना पुरू दे. मी चंपाषष्ठीस जेजुरीला येऊन बगाड घेईन.' हें बगाड घेणें म्हणजे काय, तर एका खांबाला गळ बाधायचा आणि तो आपल्या पाठींत खोंचून घेऊन लोंबकळायचें. दोन्ही प्रकारांत रक्ताच्या धारा भळभळां वाहायच्या. आचरायला जिवावरचें आणि पहायला भयासुर. वर्षानुवर्षें खंडोबाचें देवद्वार असें

रक्तानें लाल होत होतें. 'दगडाच्या देवा बगाड नवस' म्हणून तुकोबांनीं त्या निदर्शनावर उपहासाचे कोरडे ओढले; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तें रुधिरार्पण बंद करण्यासाठीं इंग्रज-सरकारला कायद्याचा बडगा उगारावा लागला.

कायद्यानें बंद झालेला असाच एक दुसरा प्रकार म्हणजे खंडोबाला मुरळ्या वाहणें. माणसाची मति तरी किती विचित्र पहा. मूल व्हावें म्हणून देवाला नवस करायचा आणि 'मुलगा झाला तर तुझा वाघ्या करीन आणि मुलगी झाली तर तुला मुरळी वाहीन' असें बोलायचें यांत स्वारस्य काय राहिलें! वांझपण फिटलें एवढाच त्यांत लाभ. जें पोर जन्मेल त्याच्या भवितव्याचा विचार कोणीं करावा! मुरळीनें देवाशीं लग्न लावायचें आणि जन्मभर निस्संग, निर्विकार राहून सेवाव्रत चालवायचें. सोमवती, माघी अमावास्या किंवा चैत्री पुनव यांपैकीं एखाद्या तिथीला हा लग्नसोहळा व्हायचा. मुलीला हळदीनें माखायचें, पिवळें वस्त्र नेसवायचें, मुंडावळ्या बांधायच्या आणि देवापुढें उभें करायचें. भटजीनें अंतरपाट धरून मंगळाष्टकें म्हणायचीं. आप्त-स्वजनांनीं भंडार उधळायचा. नऊ कवड्यांची माळ तिच्या गळ्यांत घालायची आणि भटजीनें सव्वा रुपया दक्षिणा घेऊन विवाहविधि पुरा करायचा. एकदां हें मुरळीपद प्राप्त झालें कीं ती देवाच्या नांवावर भिक्षांदेहीला मोकळी. वृषोत्सर्गाच्या वेळीं सोडलेली पाडीच जणुं. सोबतीला वाघ्ये. त्यांचाही धंदा हाच. भंडार भरून पोटावर लांब सोडलेली व्याघ्रचर्माची पिशवी हें त्यांचें भिकेचें भांडवल आणि हेंच बोधचिन्ह. वस्तुतः वाघ्याचा आणि व्याघ्राचा कांहींही संबंध नाहीं. 'वग्गे' म्हणजे भक्त या कानडी शब्दाचा तो अपभ्रंश आहे. शब्दाचा उगम ठाऊक नसला कीं मग वडाची साल पिंपळाला लावली जाते ती अशी.

अर्धा तास वर हिंडून आम्ही गड उतरूं लागलों. सुबद्ध काळ्या सोपानमार्गावरून उतरतांना आमच्या थकलेल्या पायांना सुख वाटत होतें. वृक्षांच्या शीतल सावलीनें त्या सुखांत आणखी भर टाकली

होती. खालपासून वरपर्यंत आमच्या दोन्ही अंगांना लहानमोठ्या दीपमाळांची फौज उभी होती. इतक्या विपुल दीपमाळा ज्योतिबाच्या डोंगरानंतर मी इथेंच पाहत होतों. 'नवलाख पायरी, साडेतीनशें दीपमाळ, अठरा दरवाजे' असा इथला वाक्प्रचारच आहे. दक्षिणचीं भव्योत्तुंग गोपुरें तशाच या महाराष्ट्राच्या दीपमाळा. डोंगरपठारावर तर त्या विशेषच प्रेक्षणीय वाटतात. खालच्या जोड कमानीकडे आल्यावर डाव्या हाताला हेगडी प्रधानाची 'देवळी' आणि तिच्यांत दोन मुनिसदृश बैठ्या मूर्ति पाहिल्या.

त्यापलीकडेच धनगरकन्या बाणाईचें मंदिर आहे. बाणाईला शेळया-मेंढ्या प्रिय हें खंडोबाच्या भक्तांना ठाऊक आहे. ते तिला नवस बोलतात आणि ती पावली कीं शेळया-मेंढ्यांच्या प्रतिमा करून तिला वाहतात. त्या प्रतिमांना तिनें खुशाल गोंजारीत बसावें. तेवढाच तिचा विरंगुळा. तेवढीच बाल्यदशेंत भोगलेल्या सुखाची स्मृतिः बाणाई ही मला करुणरसाची ओतीव मूर्ति वाटली. तिला खंडोबानें हा सक्तीचा विजनवास दिला आहे. वर एवढें वैभव आहे, एवढे सोहाळे आहेत, एवढे यात्रा-उत्सव आहेत; पण त्या भाग्याची धनीण एकटी म्हाळसा. हिच्या वांट्याला फक्त व्यथा आणि उसासे. खंडोबा आठवड्यांतून एकदां रविवारीं फक्त तिच्या घरीं पायधूळ झाडतो आणि पुढच्या सहा दिवसांचें विरहदुःख तिच्यापुढें उभें करून वर निघून येतो. मानाला आंचवलेली आणि प्रेमाला दुरावलेली ती खंडिता अबला बहुधा असेंच म्हणत असेल कीं, 'नकटें व्हावें; पण धाकटें होऊं नये.'

---

# २ परशुराम क्षेत्र

समंतपंचक क्षेत्रांत एक अतिभव्य यज्ञ आरंभला गेला होता. भार्गव परशुराम त्याचा यजमान होता. क्षत्रसंहाराचें अंगीकृत कार्य तडीस नेल्यानंतर शस्त्र खालीं ठेवण्याच्या वेळचें तें जणुं व्रतोद्यापन होतें. त्या वेळीं समुद्रवलयांकित पृथ्वीचा तो प्रशासक होता. पृथ्वीवरचीं सर्व धनें-वैभवें त्याच्या मालकीचीं होतीं. आणि म्हणूनच तो यज्ञ सर्वांगीं सुसंपन्न होता. वेदशास्त्रपारंगत तपोधन त्या ठिकाणीं ऋत्विज म्हणून आले होते. ज्यानें परशुरामाला उपनयनप्रसंगीं द्विजत्व-दीक्षा दिली, तो कश्यप महामुनि त्या यज्ञाचा अध्वर्यु होता. त्या यज्ञांतली दहा वाव लांच आणि नऊ वाव रुंद असलेली वेदि अंतर्बाह्य सुवर्णाची होती, यावरून इतर यज्ञपात्रांची कल्पना करावी.

यज्ञ समाप्त झाल्यावर सर्वांना भरपूर दक्षिणा मिळाली. जे याचक होते ते 'धनी' झाले. अध्वर्यूंचा मान मोठा, अधिकार मोठा, तसें त्याला मिळायचें दानही मोठें. रणयज्ञांत संपादिलेल्या समस्त भूमीचें परशुरामानें कश्यपाच्या हातावर दानोदक सोडलें. निर्लोभ, निरासक्त होऊन आणि 'न मम' म्हणून. मानवजातीच्या इतिहासांतलें ब्राह्मणानें ब्राह्मणाला दिलेलें हें पहिलें आणि शेवटचेंच महादान होय. क्षणापूर्वींचा जगत्पति दुसऱ्याच क्षणाला हंसतमुखानें अकिंचन झाला. भूमीशीं त्याला कांहीं कर्तव्य नव्हतें. दुष्ट, दुर्मद, क्षत्रियांवर दंड धरतां धरतां ती त्याच्या पायाशीं लोळण घेऊन आली होती. त्याला तिचें ओझें झालें होतें. साम्राज्याच्या भवचक्रांत त्याला गळा अडकवायचा नव्हता. आणि म्हणूनच तो घाईघाईनें आपल्या स्वामित्वाचा त्याग करून सोवळा झाला होता.

पण तें दानोदक हातावर वाळायच्या आंतच कश्यपानें त्याला

सुनावलें, 'माझ्या भूमींत तूं राहतां कामा नये. तुझा इथला हक्क संपला.' परशुरामानें ती आज्ञा शिरसावंद्य केली. तो नर्मदा पार करून सह्याद्रीकडे आला आणि घाट उतरून समुद्रतीरीं दाखल झाला.

ज्या भूमींत त्यानें पदार्पण केलें ती नव्यानें जन्माला आलेली होती. ती 'काश्यपी' नव्हती. सह्याद्रीची सतत पायधुणी करणाऱ्या सागराच्या कुशींतून ती वर आली होती. भृगुकच्छा ( भडोच ) पासून तों तहत कन्याकुमारीपर्यंतच्या त्या प्रदीर्घ पट्टीवर थोड्या कालांत वन्य वृक्षांचीं दाटें माजलीं होतीं. दऱ्यादरकुट्यांत रानटी पशूंची वाढ झाली होती. वृक्षकोटरांत पक्षिगण जमला होता. आणि शिकारीवर उपजीविका करणारे अनार्य, असंस्कृत असे 'कोंग' लोक तिथें घरकुलें करून राहिले होते. घाटावरचे लोक त्या भागाला कोंगवणच म्हणत होते. जसें कोळ्यांचें तें 'कोळवण', गोंडांचें तें 'गोंडवन', तसेंच हें कोंगांचें 'कोंगवण'. कोणत्या तरी 'शाकल्या' नें त्यांतल्या 'व'-चा लोप केला आणि तें कोंगण झालें आणि त्याचाही अपभ्रंश होऊन पुढें 'कोंकण' हा सुटसुटीत शब्द रूढ झाला.

पण ती भूमि अजून 'व्रात्य' होती. तिच्यावर कसलेच संस्कार झाले नव्हते. अजून नांगराचा फाळ फिरायचा होता. कुदळीच्या टोंची बसायच्या होत्या. खोरें अंगांत घुसायचें होतें. त्रिकोण–चौकोनांच्या कणेरांगोळ्या काढणारा कलाकार मानव अजून तिच्यावर अवतरायचा होता. आडमुठ्या निसर्गाला 'सबूर' म्हणून तिथें आपली करामत दाखवणारा 'अयं मे हस्तो भगवान्' अजून तिच्यावर वावरायचा होता. खरें म्हणजे तिचा उद्धारकर्ता तिला अजून भेटायचा होता. परशुरामाच्या रूपानें तो प्रगटला आणि त्या नवभूमीनें त्याला 'स्वागतम्' म्हटलें.

हीच भूमि तो आतां आपली म्हणणार होता. त्यानें ठरवलें कीं, आपण हिच्यांत सौंदर्य ओतायचें. हिला कलेची भूमि बनवायचें. या तांबड्या मातींत नवजीवनाचें उद्यान फुलवायचें. आजवर त्यानें केलें होतें तें संहाराचें कार्य. वाहवले होते ते रक्ताचे पाट. अपरिहार्य म्हणून

नररुंडें अंतराळांत उडवण्याचा अघोरी खेळ त्याला खेळावा लागला होता. त्याच्या अंतरांतल्या विधायक प्रवृत्तींना डोकें वर काढायला कधीं उसंतच मिळाली नव्हती. संहाराच्या तांडवांत सृजनाचें लास्य दडपलें गेलें होतें. तें आतां रोमरोमांतून एकदम प्रगटलें. जर्मन महाकवि गटे यानें निर्मिलेला डॉ. फॉस्ट म्हणतो, ' समुद्रकांठच्या या अफाट दलदलींत मी वसाहत उभारीन. लाखों मानव इथें स्वतंत्रतेनें जगतील आणि नांदतील. ' या प्रागैतिहासिक महापुरुषानेंही हें आणि असेंच स्वप्न पाहिलें.

पण हें प्रचंड कार्य केवळ दोन हातांनीं सिद्धीला जाण्याजोगें नव्हतें. सहस्रावधि हात एकजुटीनें त्यासाठीं राबायला हवे होते. म्हणून प्रथम त्यानें कुठून तरी चौदा ब्राह्मणकुळें समुद्रमार्गें या भूमीवर उतरवलीं. नेमकीं कुठून तें इतिहासवेत्ते अजून सांगत नाहींत. कोणी म्हणतात कीं, चित्पावनांचे हे चौदा मूळ पुरुष इराण, ईजिप्त, पॅलेस्टाइन इकडून कुठून तरी आले असावेत. ते बहुधा पश्चिमेकडचे परदेशी असावेत. तर कोणी म्हणतात, इतर भारतवर्षांतूनच परशुरामाचे हे चौदा आवडते ब्राह्मण त्यानें इकडे आणले. विधात्यानें विश्वसृष्टि वाढवण्यासाठीं जसे कश्यपादि दहा मानसपुत्र निर्मिले, तसेच हे त्याच कार्यासाठीं आणलेले चौदा चित्पावन परशुरामाचे मानसपुत्र होत.

त्यांनीं परशुरामाला स्वामीच नव्हे, तर देवही मानलें. त्याच्या योजकतेला अनुसरून ते जीवेंप्राणें त्या भूमींत खपूं लागले. मोकाट वाढलेलीं जंगलें तोडण्यांत आलीं. ओढ्यांना बांध घालून पाट काढले गेले. ' माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें ' तसें तें पाणी त्यांना इष्ट असलेल्या जागीं झुळझुळूं लागलें. केळी-पोफळींची प्रमाणबद्ध लागवड झाली. केळी-पोफळी म्हणजे सुंदर सुकुमार ललना. वाऱ्यानें जरा अधिक दांडगाई केली कीं पिळवटून निघायच्या. दक्षिणायनांतल्या उन्हाची जरा अधिक तिरीप लागली कीं पोफळींचें तेवढेंच आंग उभें करपून जायचें. म्हणून मग त्यांच्या रक्षणासाठीं समर्थ असे आंबे-फणस त्यांच्यासभोंवतीं वाढवले गेले. मधून मधून माडांची

लावणी झाली. माड म्हणजे कोंकणचा कल्पवृक्ष. स्वर्गीतल्या कल्पवृक्षांनीं लाजून 'डहाळ्या पाडाव्या' अशी त्यांची उंची आणि समृद्ध फलसंपदा. तो जणुं मानवाला कवि बोरकरांच्या शब्दांत गाऊन सांगतो —

**स्वर्ग दाविण्या तुला स्वतःच जाहलों शिडी**
**चांदण्याचिया तुला दिल्या भरून कावडी**

त्याचीं शहाळीं म्हणजे जणुं अमृताचे कलश. त्यांतलें मिष्ट, मधुर जल पाहूनच 'सुधा भीता दिवंगता' असें आम्हांला वाटतें. या माडांनीं त्यांच्या घरांवर आणि अंगणांवर कृपाछत्र धरलें. शेतांच्या बांधावर उभे राहून ते राखणदारी करूं लागले. समतळ भूमींत कुणगे तयार झाले. जोत बांधून नांगरट करतांना 'इरीरी', 'पापारी', असले बैलांना उद्देशून उच्चारलेले संज्ञाशब्द घुमूं लागले. शेतांशेतांतून वर्षांतून दोन वेळां पिवळी लक्ष्मी डोलूं लागली. चित्पावनांचा वंशवेल वाढला. त्यांच्यामागून इतरही अठरापगड जाती आल्या. वसाहत विस्तारत चालली. नवनवे तुकडे लागवडीखालीं येऊं लागले. सगळें तळकोंकण हिरवें झालें. चिरंजीव परशुरामानें चिपळूणच्या डोंगरावरून दूरदृष्टीनें हें सगळें पाहिलें. त्याच्या डोळ्यांची धणी पुरली. जीवनांतल्या कृतार्थतेचें सुख–समाधान तो अनुभवूं लागला. पूर्वीं एका काळीं तो कलिंग देशांतल्या महीनदीकांठच्या महेंद्र पर्वतावर वास्तव्य करून होता. आतां त्यानें चिपळूणचा डोंगरच कायम केला. त्यालाच महेंद्रपर्वत मानलें.

आणि याच डोंगरावर याच सहाव्या अवताराच्या दर्शनासाठीं आम्ही त्या दिवशीं निघालों होतों. महाराष्ट्रांतलीं इतर अनेक क्षेत्रें हिंडतांना मीं आनंद उपभोगला नव्हता, असें नव्हे ; पण या कोंकणच्या क्षेत्राचा प्रवासी होतांना मला होणारा आनंद हा निजानंद होता. कोंकण ही माझी जन्मभूमि आणि माझ्या पूर्वजांची कर्मभूमि होती. माझ्या भावनांचे अदृश्य पण अतूट असे धागे तिथे गुंतलेले होते. एस्. टी. च्या बसलाताशीं तीस मैल ही वेगमर्यादा असली तरी माझ्या

मनाच्या रंहवराला कोण आवरणार? पुणें ते थेट चिपळूण अशा वाऱ्या करणाऱ्या गाडींत बसलों असतां माझें मन सह्याद्रीच्या शिखरांवरून खालीं झेंप घ्यायला सोत्कंठ झालें होतें. सातारा, उंब्रज, पाटण या गांवांना क्रमानें मागें टाकीत आमची गाडी पंथ आक्रमीत होती.

पाटण सुटलें आणि कोयना भेटली. ती कऱ्हाड क्षेत्रांत कृष्णेशीं प्रीतिसंगम करायला निघाली होती. आमचा रस्ता तिच्या उगमाकडे चालला होता. आटपसर पात्र आणि बेताचेंच पाणी. आगामी हिंवाळा आतांच तिच्या मुळावर आला होता. पात्र ठायीं ठायीं उघडें पडलें होतें. वर्षाकाळीं 'आऊर' ज्यांच्या डोक्यांवरून जायचा तीं लव्हाळीं आणि झुडपें आतां 'तटस्थ' झालीं होतीं. पण अशा या पडत्या काळीं-सुद्धां कोयना संथ होती, प्रसन्न होती. अजून ती तीरावरच्या मळयांना पोशीत होती. बारा वाटांनीं वैभव पळूं लागलें तरी आपलें दान-धर्माचें व्रत न सोडणाऱ्या एखाद्या सत्त्वधीर गृहलक्ष्मीसारखी ती मला वाटली.

आमचा तांबडा रस्ता तिला कसा समांतर जात होता. नदी जरा 'डोंगी' झाली कीं रस्त्यानेंही जरासें आंग वांकडें करावें. तिनें डावीकडचें मोठें वळण घेतलें कीं मनाला वाटायचें, आतां हिची आणि आमची फारकत होणार. पण रस्ताही नेमकें तसेंच आणि तेवढेंच वळण घेऊन तिला म्हणे: 'मी नाहीं एवढ्यांत तुझ्यापासून दूर होणार.' 'सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति!' तिनें उजवी मोहर दाखविली कीं मी मनांत म्हणें, 'आतां हिचें उल्लंघन करावें लागणार.' पण मार्ग कसला वस्ताद! तोही आपल्या शरीराला तसाच बांक देई. अखेर आम्हीं हेळवाकच्या ग्रामसीमेजवळ तिचा पूल ओलांडला. ती सह्यकन्या मग उजवी वळतां वळतां आम्हांला आशीर्वाद बोलली: 'शान्तानुकूल-पवनश्च शिवश्च पन्थाः!'

हेळवाकच्या पुढें कासटीवाले कुळवाडी गाडींत चढूं-उतरूं लागले. निसर्गांत फरक पडला तसा भाषेंतही. वाटेंत गुरांची गोठण दिसली. गायी पोटभर पाणी पिऊन वृक्षच्छायेंत डुलकी घेत होत्या. दुधाची तलफ आलेलें एक वासरूं आपल्या आईला ढुशा देऊन 'ऊठ' म्हणत

होतें. रानांतल्या नाचण्यांच्या शेताची कापणी सुरू झाली होती. भ्रूविलासांना अनभिज्ञ असलेल्या कृषकवधू आमच्या धांवत्या निळ्या गाडीकडे विळा थांबवून पाहतांना नेत्रदळें उत्फुल्ल करीत होत्या. अशीं ओझरतीं दृश्यें पहात पहात थोड्याच वेळांत आम्ही सह्याद्रीच्या माथ्या-वर दाखल झालों.

आतां खालच्या बाजूला असंख्य शिखरें, अनंत दऱ्या, आणि अगणित वृक्ष पसरले होते. कांहीं शिखरें सपाट होतीं, सुगम होतीं. तीं म्हणत होतीं : ‘ये आमच्यावर. आम्ही तुला खूप गंमत दाखवूं आणि अलगत खालच्या शिखरावर सोडूं.’ तुटलेले काळे कडे मला भिववीत होते : ‘असेल हिंमत तर ये मला भेटायला.’ बाहेर सर्वत्र प्रकाश-धारांचें वर्षण होत होतें आणि त्या तळपत्या उन्हांना भ्यालेल्या अंधाराला सह्याद्रीनें आपल्या उदरांत सुरक्षित जागा दिली होती. पावसाळ्यांत दुधिया रंगाचे जलप्रपात कड्यांकड्यांवरून उड्या घेऊं लागले कीं सह्याद्रि अधिक रुद्र होतो आणि निसर्गानें हरिततृणांचे गालिचे आंथरल्यामुळें अधिक सुंदरही होतो. आज या दोन्ही आगंतुक गोष्टी नव्हत्या. आज त्याचें सहजसौंदर्य तेवढेंच विराजत होतें. स्वाभाविक भव्यत्व तेवढेंच प्रतीत होत होतें. आणि तेवढ्यानेंच डोळे फाटत होते. खरोखर आमच्या प्रवासगीतेंतला हा विश्वरूपदर्शनयोग होता. एकेक वळण घेऊन गाडी एकेक टेकडी उतरत होती. अर्ध्यापाऊण तासांत तिनें पायथा गांठला आणि माझ्या काळजावरचें ओझें उतरलें.

आतां आम्ही वासिष्ठी नदीला उजवी ठेवून चिपळूण जवळ करीत होतों. जागोजाग भाताचीं उंच उडवीं दिसत होतीं. अजून मळण्या व्हायच्या होत्या. आश्विन पौर्णिमेला ‘आग्रयण नवान्न’ झालें असलें तरी भाताच्या राशि अजून घरांत पडायच्या होत्या. वासिष्ठी नदी या बाजूला अक्षरशः निर्जल होती. जणुं उथळसा मोठा चर. तिच्यांतले ओबडधोबड गोटे राख फासल्यागत पांढुरके दिसत होते. जसे कांहीं कुंभमेळ्याला जमलेले दसनाम गोसावी. पागनाक्यावर उतरून आम्ही आमचा सज्जनगडचा संवगडी श्री. नरेंद्र रानडे यांच्या घरीं दाखल

झालों. आणि नंतर आमचे आप्तसंबंधी श्री. अनंतराव ओक यांचा पत्ता शोधून काढून त्यांचे पाहुणे बनलों.

चिपळूणहून परशुरामाला जाणारी पहिली गाडी गर्गाचार्यांच्या मुहूर्तावर निघत होती. पाग विभागांतून चिपळूणच्या बस स्टँडपर्यंत चालून जायचें म्हणजे दीड मैलाची वाट. त्या रात्रीं थंडीनेंही चांगलाच प्रताप दाखवला होता. अंथरुणांतून उठणें जिवावर आलें. चालायला लागलों तर हातपाय कांकडून गेले. 'अद्य शीतं वरीवर्ति नरीनर्ति समीरणः ।' हें सुभाषित अगदीं कडकडून चावलें. पण मनुष्यवस्ती सोडून उघड्या शेतांतल्या रस्त्यानें जाऊं लागतांच खाचरांतून खारी हवा धांवत येऊन नाकातोंडांत शिरली आणि तिनें मला लगेच उत्तेजित केलें. तिच्यांत ताजेपणा, तसाच जोमही होता. शेताच्या वक्षःस्थळावर चंद्रिकेचें क्षौम वस्त्र पसरलें होतें. तो शीतल अमृतमय प्रकाशरस झाडेंमाडें मूकपणें प्राशीत राहिलीं होतीं. पश्चिमाकाशांत कृत्तिका क्षितिजाखालच्या अथांग सागरांत सूर मारावी का न मारावी अशा संदिग्ध मनःस्थितींत दिसत होत्या. चंद्राला मात्र विशेषशी घाई दिसली नाहीं. तो रोहिणीशीं विरहापूर्वीच्या गुजगोष्टी विश्रब्धपणें बोलत राहिला होता. सभोंवतींच्या डोंगरांना आकाशमाउली दंवबिंदूंनीं कार्तिकस्नान घालीत होती. ताजी, टवटवीत, प्राणमय, प्रकाशमय अशी ती पहांट होती. ती मुलांसाठीं, फुलांसाठीं, संतांसाठीं, कर्मवीरांसाठीं प्रगटली होती. ती नव्या दिवसासाठीं नवजीवन घेऊन आली होती. विश्वांत मांगल्य आहे, जीवनांत आनंद आहे, असें जणुं ती माझ्या कानांत सांगत होती. तिचा तो संदेश हृदयांत भरून घेऊन मी गाडींत चढलों.

तिथून पांच मैल परशुरामाच्या डोंगरावर येऊन एका पथिकविश्रामासमोर आम्ही उतरलों, तरी अजून उषा मार्गेंच रेंगाळत होती. प्राचीवधूला सूर्यदेवानें अरुणदूताच्या हातीं अजून गुलाबी साडीचा नजराणा पाठवला नव्हता. तारका अजून दिमाखांत होत्या. झाडांपेडांतला अंधार अजून निश्चिंत होता. पांखरांचें प्रातःस्मरण अजून सुरू

झालें नव्हतें. त्यामुळें आम्हांला त्या विश्राममंडपांत बसून त्याच्या मालकाच्या गोष्टी ऐकत आणि त्यानें शिंक्यांत घालून मांडवाला टांगलेल्या कोहळ्या-भोपळ्यांना पहात वेळ घालवावा लागला.

फटफटीत उजाडल्यावर तिथेंच घसा गरम करून आम्ही देवळाकडे जायला निघालों. त्या अरुंद रस्त्यावरून निसर्गाच्या काव्याचें रसग्रहण करीत रमत गमत चाललों असतां कोणी तरी उद्गारलें, 'तो पहा समुद्र!' मीं उजव्या बाजूला तोंड वळवलें आणि थबकलोंच. समुद्रच होता तो! पण खाऱ्या पाण्याचा नव्हे, तर धुक्याचा. वासिष्ठी नदींतून तें वर उठलें होतें. तिकडची सारी सृष्टि तिनें अज्ञातांत विलीन केली होती. 'वाढतां वाढतां वाढे' अशा क्रमानें तिगडचे डोंगरसुद्धां त्यानें गिळीत आणले होते. कांहींचीं फक्त बोटभर शिखरें वर उरलीं होतीं; पण त्यांचेंही लक्षण ठीक दिसत नव्हतें. अजून लाटांचे लोट वर उठतच होते. पृथ्वी जणुं विरघळून, बाष्परूप होऊन आपल्या 'द्यौस्' पतीला सर्वांगीं खेंव द्यायला निघाली होती.

'द्यौर्वः पिता पृथिवी माता—'

हीं विश्वाचीं मातापितरें आतां एकजीव होतील. अनंतकाळचा दुरावा फेडतील. आलें, आलें! तें आणखी वर चढलें. खालच्या साऱ्या आसमंतावर धूसर पांघरूण पडलें. आतां तें मलाही वेढील. त्याच्या लाटा माझ्या डोक्यावरून जातील. मी द्रवरूप पण अपारदर्शक अशा भिंतींत कोंडला जाईन. विश्वापासून अलग, एकटा पडेन. मग मी मलाच जाणायचें. माझ्यावरच प्रेम करायचें. मीच एकटा माझा आणि बाकी सारें शून्य. पण मी तरी आहे त्या स्वरूपांत शिल्लक उरेन का? कदाचित् माझ्यांतलेही पार्थिव अणु बाष्परूप बनतील. मीही या अनेक तरंगांतला एक तरंग बनून अंतराळांत भ्रमेन. या अभिनव कल्पने-सरशीं मी एकदम निःशब्दाचा कवि झालों. त्या विशाल, मऊ मऊ काव्यांतला रस 'दे दे' म्हणून पिऊं लागलों. एवढ्यांत कोणीं तरी माझी तंद्री मोडली—'चला, जाऊं या आतां!'

ज्या बाजूनें आम्ही डोंगर चढलों त्याच्या दुसऱ्या पालथणाला परशुरामाचें देऊळ होतें. आतां थोडें उतरायला हवें होतें. त्यासाठीं रुंदशी पाज बांधलेली होती. तिच्या तोंडावरच गांवकऱ्यांचें गोधन आम्हांला सामोरें आलें. वरून वैदिक ऋषींच्या प्रकाशधेनु अवतरत होत्या आणि खालून या परशुरामाच्या गायी वर चढत होत्या. त्यांना वाट देऊन आम्ही खालीं उतरूं लागलों. एक हजार फूट उंच डोंगरावर हें गांव वसलें आहे. वस्तुतः गांवाचें नांव आहे पेढें. पण देवस्थानामुळें



परशुरामाचें देऊळ

'परशुराम' याच नांवानें तें प्रसिद्ध आहे. लोकसंख्या दोन हजाराच्या आंतच. उरलेला सगळा गजबजाट वृक्षांचा. परशुरामाच्या भोंवतीं पहिलें मंडल आहे मानवांचें आणि दुसरें वृक्षांचें. प्रत्येक घरापुढें सारवलेलें प्रशस्त, स्वच्छ आंगण. कोंकणच्या संस्कृतींत आंगणाला फार मान आहे. तो जणुं घराचाच एक महत्त्वाचा भाग. एका बाजूला तुळशी-वृंदावन- कडेला जाई, जुई, पाच, शेवंती, अबोली या फुलवंती वाढवलेल्या. अर्धीं फुलें देवाला, नंतर घरच्या लेकीसुनांच्या वेण्यांना आणि उरलेलीं आल्यागेल्याच्या मनाला उल्हास द्यायला. त्या अंगणांत कोणींही येऊन टेकावें. मुलांबाळांनीं स्वच्छंद बागडावें. गृहलक्ष्मी त्या अंगणांतले

खडेगोटे केरसुणीनेंच नव्हे; तर निर्‍यांनींसुद्धां लोटील. पुढच्या वाटेवर इकडून तिकडून दहापंधरा हात झाडणी फिरवील. अतिथ-अभ्यागताला प्रसन्न वाटावें, त्याच्या पायांत खडे रुतूं नयेत, हा त्यांतला कोंवळा भाव. कोंकणच्या खेडेगांवांतला घरधनी एक वेळ उपाशी राहील; पण आंगणांत मांडव उभारील.

कांहींच्या परसांत लिंचिणी लागल्या होत्या. कांहींच्या घराशेजारीं पपनसें लोंबकळत होतीं. कुठें रसबाळया केळयांचे घड आपल्या गोपुच्छा-सारख्या लांब दांड्याच्या बोंड्या हालवीत होते. प्रत्येक घराभोंवतीं गडगा उभारलेला. त्याबाहेर वेळूचीं वनें हालत डोलत असलेलीं. फणस तर जिकडे तिकडे. कोंकणचा दुसरा महावृक्ष फणस. त्याचा आसरा हा आमचा 'महापुरुषसंश्रय.' फणस 'फुटला' कीं तो प्रथम आमच्या पानांतली उजवी बाजू संभाळतो. पिकला कीं सोनेरी, सुगंधी रसाळ गरे जिभेवर ठेवतो. आणि उलगला तरी मातींत मिसळून भिंतीशीं लिंपलेल्या त्याच्या आठळया पावसाळयाला उरतातच. कोंकणच्या कन्या फणसाचें लोकगीत गातात त्यांत त्याच्याविषयींची आमची सगळी कृतज्ञता सांठवलेली आहे—

**"फणस फणस । बाहीं बाहीं फुटे**
**फणस झाले मोठे । पिकावेया**
**पिकले फणस । देवा समर्पिले**
**मग ब्राह्मणांसी । गरे दिले"**

यांतसुद्धां पहा. पहिला फणस 'सादावला' कीं देवा–ब्राह्मणांचें स्मरण प्रथम. 'पहिला डाव देवा गजाननाला' तसें पहिलेंवहिलें फळ देवा–ब्राह्मणाला. मग तो आढींतला हापूस असो कीं गोठयावरचा भोपळा असो.

हें सगळें आसमंतवैभव न्याहाळीत आम्ही चौघड्याखालच्या महा-द्वारांतून देवाच्या प्राकारांत शिरलों. पायर्‍या उतरतांच दृष्टि सभोंवार प्रदक्षिणा करून आली. त्या विस्तीर्ण प्राकारांत त्या वेळीं एकही माणूस नव्हतें. कुठें आवाज नाहीं, कुठें गोंगाट नाहीं. सगळें कसें

नेःस्तब्ध, निवांत! देवाजवळ जसें असायला पाहिजे तसें. इथें भपका नाहीं; पण स्वच्छता आहे. झगझगाट नाहीं; पण शांति आहे. पंढरपूर-करवीरची संपदा नाहीं; पण स्वयंपूर्णता आहे. कोंकणच्या सर्व देवस्थानांत याची थोरवी विशेष आहे.

प्रथम देवदर्शन आणि मग आलतू-फालतू चौकश्या हें उचित समजून आम्ही सोळखांबी सभामंडपांतून मंदिरांत प्रवेश केला आणि गाभाऱ्याच्या उंबरठ्यांत हात जोडून तिष्ठलों. हारीनें उभ्या असलेल्या तीन सुरेख, सायुध पाषाणमूर्तींनीं माझें मन वेधून घेतलें. डावीकडचा खालचे दोन्ही हात उताणे सोडलेला तो काम, उजवीकडचा तसाच दुसरा तो काल आणि मधला परशुराम. काल–काम हे विश्वदेवांपैकीं आहेत. पण त्यांनीं परशुरामाचा शेजार कां केला तें समजत नाहीं. तिथले लोक त्या तीन मूर्ति एकत्र पाहून त्यांना ब्रह्मा, विष्णु, महेश हीं सर्वप्रसिद्ध नांवें देऊन मोकळे झाले आहेत.



काम, परशुराम, काल

तिन्ही मूर्तींत परशुरामाची मूर्ति जरा अधिक उंच आहे. त्याच्या चार हातांपैकीं उजवा खालचा हात अभयकर असून बाकीच्या हातांत अनुक्रमें बाण, धनुष्य आणि परशु अशीं तीन आयुधें आहेत. याच परशूनें प्रथम त्यानें आईचें शिर तोडलें आणि नंतर एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. त्याचा पहिला शत्रु हैहय कुळांतला सहस्रार्जुन.

नर्मदेच्या उत्तर तीरावरची माहिष्मती म्हणजे आजचें ओंकार मांधाता ही त्याची राजधानी होती. हिमाचलाच्या पायथ्यापर्यंत त्याचें साम्राज्य गाजत होतें. त्यानें कारण नसतांना जमदग्नीची होमधेनु त्याच्या आश्रमांतून फरफटीत नेली. आणि त्यानंतर कांहीं काळानें लांडग्याच्या वृत्तीनें परशुराम घरीं नाहीं ही संधि साधून खुद्द जमदग्नीचाच खून पाडला.

आजवर निरनिराळ्या तपोवनांवर क्षत्रियांकडून होणाऱ्या अत्याचारांच्या हकीगती परशुराम ऐकत होता. आज अत्रीची कुचाळकी करावी, उद्यां वसिष्ठाच्या आश्रमावर धाड घालावी, परवां आणखी कोणाच्या पर्णकुटींतून बायकामुली पळवाव्या, कोणावर थुंकावें, कोणावर शिंकरावें, कोणाचें अन्न भक्षावें, कोणाचें धन लुबाडावें, कोणाला जीवें मारावें, असे निंद्य, चीड आणणारे प्रकार वाढत्या प्रमाणांत सुरू झाल्याचें त्याच्या कानांवर येत होतें. त्या दिवशीं तर त्याच्याच आश्रमावर कहर गुदरला. अत्याचार अंगाशीं येऊन भिडला. जागजागीं एकवीस घाव बसून रक्ताच्यो तालणांत पडलेलें आपल्या तपोधन पित्याचें कलेवर पाहून त्याचें रक्त जळजळलें. आपला परशु उंच उभारून त्याच क्षणीं त्यानें प्रतिज्ञा केली : 'या परशूनें मी एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करीन!'

त्यानें आजूबाजूच्या तपोवनांतल्या ब्राह्मण युवकांची दुर्दम्य संघटना उभी केली. रुद्राक्षांची माळ ओढणाऱ्या त्यांच्या हातांत रौद्र शस्त्रें दिलीं. त्यांना धनुर्विद्येंत तरबेज केलें. 'स्वस्थ बसाल तर मराल, नामशेष व्हाल!' हें भीषण सत्य त्यांच्या काळजांत ठसवलें. हजारों ब्रह्मसैनिक त्याच्या आज्ञेसरशीं उडी घ्यायला सिद्ध झाले.

प्रथम त्यानें हैहय कुळाचे कंद छेदले. नंतर इतर क्षत्रियांनाही रणाचें आवाहन दिलें. क्षत्रिय सगळ्या शक्तीनिशीं त्याच्यावर तुटून पडले. पण त्याच्या संहारतांडवापुढें त्यांचें बळ कुचकामी ठरलें. कित्येक क्षत्रिय धारातीर्थीं पडले. कित्येक लपले. कित्येक परागंदा झाले. मधें कांहीं वर्षें शांततेचीं जावीं, क्षत्रियांनीं पुन्हा कुठें तरी उचल खावी,

पुन्हा परशुरामानें आपल्या वज्रकुठाराला धार लावावी, असें लागोपाठ एकवीस वेळां झालें.

मग मात्र उभयपक्ष कंटाळले. क्षत्रियातही त्राण उरलें नाहीं आणि परशुरामालाही ज्ञानवृद्धांनीं या संहारकर्मांपासून परावृत्त केलें. 'पुरे झालें हें वैर' अशी भावना उभयपक्षांत उदित होऊं लागली. या अंदाधुंदींत उभय वर्णांचा उत्कर्ष थांबला होता. या देशांत दृढमूल व्हायचें तर त्यांना कायमचें वैर धरून चालण्यासारखें नव्हतें. कांहीं झालें तरी ते एकमेकांचे शेजारी होते. त्यामुळें उभयवर्णांतले विचारवंत पुरुष हा शेजारधर्म वाढवण्याच्या मार्गाला लागले. 'आमचें चांगलें असेल तें तुम्ही घ्या, तुमचें चांगलें असेल तें आम्हांला द्या' असा परस्पर सहकार निर्माण होऊं लागला. हळूहळू मागचे घाव बुजू लागले. मनांची मिळणी साधूं लागली. आणि याच सात्त्विक वृत्तींतून पुढें दाशरथी रामाच्या कालापर्यंत हिंदूंची वर्णमूलक समाजरचना सिद्ध झाली. मग भगवान् मनु ब्रह्म-क्षत्रांच्या या वर्धिष्णु ऐक्याचे गोडवे गाऊं लागला. त्याची आवश्यकता प्रतिपादूं लागला—

**"नाक्षत्रं ब्रह्म भवति क्षत्रं नाब्रह्म वर्धते**
**ब्रह्मक्षत्रे तु संयुक्ते इहामुत्र च वर्धते"**

'क्षत्रावांचून ब्रह्माचें अस्तित्व टिकणार नाहीं. ब्रह्मावांचून क्षत्र वाढणार नाहीं. ब्रह्म-क्षत्र जर संयुक्त झालें तर समाजाचें इह-पर कल्याण साधेल.' मग कालिदासानेंही याच तत्त्वाचा गौरवान्वित अनुवाद केला: 'क्षत्रियांचें अस्त्रतेज आणि ब्राह्मणांचें तपस्तेज या दोघांचा संगम म्हणजे आगीला वाऱ्याची भेट.'

परशुरामाच्या मूर्तीला न्याहाळीत असतां माझें मन सात-आठ हजार वर्षांपूर्वींच्या त्या कालखंडाची दखल घेऊन आलें. एका जटाधारी वृद्ध वैदिक ब्राह्मणानें आमच्या हातावर तीर्थोदक घातलें. 'अमुक द्या' नाहीं, 'तमुक ठेवा' नाहीं. सगळें यात्रेकरूंच्या मर्जीवर. मधल्या दालनांतलें देवाचें शेजघर पाहून आम्ही बाहेर पडलों. सभामंडपाच्या पूर्वभागीं असलेल्या मारुतीला वंदून तुळशीवृंदावनाकडून प्रदक्षिणेला

प्रारंभ केला. परशुरामाच्या मागच्या बाजूला रेणुकेचें लहानसें मंदिर आहे. रेणुका ही परशुरामाची आई हें सांगायला नको असलें तरी ती सोमपा क्षत्रियाची कन्या होती आणि तिचें दुसरें लाडकें नांव 'कामली' होतें, हें अवश्य सांगायला हवें.

मायलेकरांचीं हीं दोन्ही देवळें हेमाडपंती आहेत. रेणुकामंदिराच्या बाह्य स्तंभांवर कांहीं चित्रें कोरलेलीं आहेत, तीं वगळलीं तर बाकी इथें कसलीच कलाकुसर नाहीं. परशुरामाच्या डाव्या अंगाला गंगा आणि उजव्या सोंडेचा गणपति अशा दोन सुबक संगमरवरी मूर्ति आहेत. बाणगंगा हें इथलें मुख्य तीर्थही प्राकारांत याच अंगाला आहे. या लंबचौकोन कुंडांत निराजीपंत नांवाच्या एका ब्राह्मणानें भैलावरच्या 'सवतसडा' या ओढ्याला चिरेबंदी पाट बांधून पाणी आणून सोडलें आहे. आणखीही एक पाण्याचा झरा वरच्या टेकडीवरून बारक्याशा पाटांतून या कुंडांत येतो. परशुरामानें धरित्रीच्या उरांत बाण खोंचून ही गंगा वर काढल्याचें सांगतात. कुंडांतल्या पाण्याचा उपसा केला कीं तळाशीं पांच बाणरंध्रें दिसतात.

परशुरामाला सातवा चिरंजीव मानतात. भडोचपासून मलबारपर्यंतचे सर्व जातीजमातींचे लोक येन केन प्रकारेण परशुरामाशीं आपला संबंध दर्शवितात. मलबारांत तर परशुरामाचा शकच चालू आहे. त्यानें कोंकण वसवलें ही तर सर्वश्रुत गोष्ट. मूळचा महेंद्र पर्वत सोडून तो आपल्या वसाहतींत कायमचें वास्तव्य करायला आला हेंसुद्धां शतकानुशतक जाणते लोक सांगत आले आहेत. पण तो नक्की कोणत्या ठिकाणीं राहिला आहे हें मात्र सहाशें वर्षांखालीं कोणाला ठाऊक नव्हतें. कदंबांच्या नंतर इ. स. च्या सहाव्या शतकांत हा प्रदेश चालुक्यांच्या अमलाखालीं होता. कोंकण धरून सारें दक्षिण हिंदुस्थान त्यांनीं जिंकलें होतें. त्याचा एक कर्णदेव नांवाचा सुभेदार इथून जवळच असलेल्या संगमेश्वरीं राहून या प्रांताचा कारभार पाहत होता. त्यानें तिथें कर्णेश्वर महादेवाचें एक कलासुंदर मंदिर निर्मून आपलें नांव चिरंजीव केलें आहे. त्याला जर परशुरामक्षेत्राचा पत्ता लागता तर

त्यानें इथें अपूर्व कारागिरीचें देवालय उभारलें नसतें असें म्हणवत नाहीं. त्यानंतर इतरही अनेक राजवटी आल्या-गेल्या. पण परशुरामाचा शोध कोणाला लागला नाहीं.

तो शोध लावला तो एका गायीनें. ती बहुधा जमदग्नीच्या होम-धेनूची वंशजा असावी. आपल्या 'मूळमाये'चा परशुराम हा त्राता आहे, या कृतज्ञताबुद्धीनें जणुं ती या स्थळीं येऊन नित्यनेमानें पान्हा सोडूं लागली. गुराख्यांना त्या गोष्टीचें नवल वाटलें. इतर लोकांनीं पाहिलें, त्यांनाही हें कोडें उलगडेना. अखेर कोण्या पुण्यवंताला दृष्टांत देऊन परशुरामानें आपण इथें असल्याचें निवेदिलें. तेव्हांपासून मग या विशिष्ट भूमिकेचीच परशुराम या भावनेनें पूजाअर्चा सुरू झाली. अजून तिथें मंदिर नव्हतें. पण योग तरी कसा आश्चर्यजनक पहा. या हिंदु अवताराचें मंदिर निर्माण व्हायचें होतें, तें एका अहिंदु यवन स्त्रीकडून.



देवळाची दुसरी बाजू


इ. स. १४०० सालीं आदिलशहाच्या बेगमेचीं तारवें समुद्रांत गेलीं होतीं, तीं बेपत्ता झालीं. बेगमेचें काळीज गलबललें. माणूस संकटाच्या वातचक्रांत सांपडलें कीं त्या वेळीं कोणता तरी कर्तुमकर्तुसमर्थ असा देव पावो असें त्याला होतें. कोंकणचा स्वामी आणि समुद्राचा शास्ता म्हणून परशुरामाला ती ओळखीत होती. तिनें त्याला नवस

केला कीं, ' माझीं तारवें सुरक्षित किनाऱ्याला लागूं देत. मी हातचें कांकण लावून तुझें देऊळ बांधीन.' श्रीकृपेनें तारवें सलामत आलीं. तिनें मग दाभाळ्याहून काळे दगड आणले आणि श्रींच्या स्थानीं गाभारा उभारला. समोरच्या टेकडीवर आम्हांला दिसत होती ती दीपमाळही तिच्याच अमलांतली आहे. ही दीपमाळ रचणाऱ्या कारागिरानें दिशासाधन केलें आहे. परशुराम, त्याच्या दारांतली तुळस आणि दीपमाळ हीं तिन्ही बरोबर एका रेषेंत येतात. कार्तिकी पौर्णिमेला तिथें त्रिपुर पाजळला कीं तो प्रकाश सरळ धांवणें करून भार्गवरामाच्या मुखमंडलावर विसावतो.

पण अजून या स्थळाला ऊर्जितदशा आली नव्हती. पुढें तीनशें वर्षांनीं ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर या सत्पुरुषाच्या मनींमुखीं रिगून परशुरामानें आपल्या क्षेत्राचें माहात्म्य वाढवून घेतलें. स्वामी हे शाहूमहाराज आणि थोरले बाजीराव यांचे गुरु होते. हा पुरुष संत, संन्यासी खरा; पण राजकारण आणि अर्थकारण यांत रस घेणारा होता. जन्मगांव दुधेवाडी नांवाचें वऱ्हाडांतलें एक खेडें. आईबापांचें वृद्धाप्यातलें एकुलतें अपत्य. जवळच्याच राजुरी गावांत गणपतीचें स्थान आहे, तिथें तप करून यांनीं गजाननाचा वरप्रसाद मिळवला. पुढें चतुर्थाश्रम स्वीकारण्याची बुद्धि झाली. ' यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत् ' या उपनिषदातील वचनाचा आधार घेऊन हे काशीस गेले आणि एका वृद्ध यतीकडून संन्यस्त झाले. मूळचें विष्णु हें नांव बदलून गुरूनें त्यांचें ' ब्रह्मेंद्रस्वामी ' असें नवें नामकरण केलें. पुढें अनेक तीर्थें, क्षेत्रें, पुरें, पट्टणें भ्रमून हे कृष्णातीरीं आले. सतराव्या शतकाच्या अखेरीचा तो काळ. छत्रपति संभाजीचा वध झाला होता आणि महाराष्ट्रांत मोंगल पुनश्च जोरावर आले होते. त्यामुळें तूर्त तरी कृष्णाकांठ आपल्या वास्तव्यास प्रतिकूल असें जाणून स्वामी कोंकणांत उतरले. पेठे गांवच्या पश्चिमेस धामणीच्या रानांतली एक गुंफा त्यांनीं पसंत केली. जवळजवळ एक तप त्या निर्जन एकांतांत घालवून इ. स. १६९८ सालीं ते परशुराम येथें प्रगटले. तें स्थान त्यांना रम्य आणि पवित्र वाटलें खरें;

पण त्या वेळीं त्याची सर्वतोपरि दुर्दशा होती. मंदिर जीव टाकण्याच्या बेतास आलें होतें. देवाचे पूजोपचार बंद पडले होते. महानैवेद्याविना तो शतकांचा उपाशी राहिला होता. गोवळकोटच्या सिद्दीसाताच्या गांजणुकीनें पुजारी सगळे पळून गेले होते. त्या स्थानाला जिवंतपणाच उरला नव्हता.

ब्रह्मेंद्रस्वामींनीं तात्काळ त्याचा जीर्णोद्धार करायचें ठरविलें. कोणतेंही महत्कार्य उभारावें तर तें एक लक्षापतीनें अथवा भिक्षापतीनें. स्वामी दुसऱ्या वर्गांतले होते. त्यांनीं हा ' सत्यसंकल्प ' सोडून खाकेला झोळी लावली. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही प्रांतांत दौरे काढून ' ओंभवती ' केली. इकडे काम सुरू, तिकडे भिक्षा सुरू. कार्यापुरतें



रेणुकेचें मंदिर

धन गोळा झालें. प्रथम त्यांनीं परशुरामाचें देऊळ सुधारून वाढविलें. मागच्या बाजूस रेणुकेचें मंदिर बांधून सुपुत्राला वत्सल मातेची जोड करून दिली. तिथें प्रथम होती ग्रामदेवता जाखाई. तिला त्यांनीं सामोपचारानें बाहेरच्या बाजूस नेऊन बसवली. गजानन आणि हनुमान यांचीं देवळेंही त्यांच्याच हातचीं आहेत. एवढें करून त्यांनीं देवाचे

सेवेकरी परत आणले. तिथें एक नवें गांवच वसविलें. पण देवाचे उत्सव, यात्रा, पर्वकाळ अव्याहत चालायचे तर देवस्थानाला कायम उत्पन्नाची जोड करून देणें भाग होतें. पेढें, आंवडस, देवाचें गोठणें, इत्यादि कांहीं गांवें देवस्थानास इनाम मिळवून स्वामींनीं आपल्या कार्याला चिरस्थायीपणा आणला.

जमवायला वर्षांचे श्रम लागतात; पण लुबाडायला एक घटका पुरते. त्या काळीं सिद्दीसात नांवाचा हबशाचा सुभेदार इथून जवळच्याच गोवळकोटावर रहात असे. तो वरून ब्रह्मेंद्रस्वामींचा चहाता म्हणवी; पण आंतून द्वेषानें पुटपाकासारखा कढे. आपल्या डोळ्यांदेखत, दृष्टीच्या टप्प्यांत एका हिंदु देवस्थानाचा होत असलेला उत्कर्ष त्याला कसा खपावा! पण त्याला उघडपणें कांहीं करतां येत नव्हतें. मराठी राज्यांतलें स्वामींचें वजन तो ओळखून होता. एकदां स्वामी कर्नाटकांत भिक्षेसाठीं जात आहेत हें समजून त्यानें त्यांना एक गळ घातली. 'सावनूर-बंकापूर येथील पठाणानें आपणास बक्षीस दिलेला हत्ती स्वामींनीं कृपाळू होऊन येतांना आणावा.' त्याची प्रार्थना मान्य झाली. हत्ती घाट उतरला आणि माखजनपर्यंत आला. तिथें आंग्रे आणि हबशी यांच्या चौक्या जवळजवळ होत्या. दोन्ही चौकीदारांत त्या हत्तीवरूनच तंटा निर्माण झाला आणि आंग्र्यांच्या लोकांनीं तो ताब्यांत घेऊन जयगडास रवाना केला. स्वामी त्या ठिकाणीं हजर असते तर हें प्रकरण उद्भवलें नसतें. पण त्यांची मागच्या मुक्कामावर स्नानसंध्या चालली होती आणि लवाजमा तेवढा पुढें आला होता.

सिद्दीसातानें या गोष्टीचा अन्वयार्थ लावला तो असा कीं, 'स्वामी हिंदु; तेव्हां जातीला मिळाले. आपला हत्ती मुद्दाम आंग्र्याच्या घशांत घातला.' त्याला खवळून उठायला एवढें कारण पुरेसें होतें. त्यानें नेमका स्वामींच्या वर्मावर घाव घातला. शिवरात्रीच्या दिवशीं त्याची परशुरामावर धाड आली. त्यानें पुजारी आणि कारकून यांना निर्दयपणें झोडपलें. त्यांचीं घरेंदारें लुटलीं. देवस्थानाची सारी चीजवस्त ओरबाडून नेली. हवा तसा तिथें हैदोस घातला. स्वामींनीं हें सर्व पाहिलें. त्यांचा

अंतर्यामीं तडफडला. सर्वांग धगधगलें. त्यांनीं सरळ दंडाराजपुरीस जाऊन हबश्याकडे दाद मागितली. हबश्यानें सिद्दीसाताला चांगलाच दम भरला. लुटलेली सगळी संपदा स्वहस्तें परत करायला लावली. सिद्दीसाताची खोड मोडली खरी; पण त्या दिवसापासून तो स्वामींचा अंतर्वैरी झाला. शेवटीं स्वामी त्याच्या त्रासाला कंटाळले आणि परशुराम सोडून वर घाटीं आले ते कायमचेच.

अग्रशाळा, दीपमाळा, नगारखाना, भंडारघर, सभामंडप, हा सगळा सरंजाम झाला खरा; पण सन १७८९ पर्यंत मंदिरांत मूर्ति मात्र नव्हत्या. सगळे पूजोपचार चालत ते शिलासनाला. गुहागरचे श्री. परचुरे यांना तें गोड वाटलें नाहीं. त्यांनीं पुण्याहून कोण्या बंकतराम नांवाच्या शिल्पकाराकडून श्रीमूर्ति घडवून आणल्या. माघ शुद्ध षष्ठीस पंचकुंडी अर्चा होऊन त्यांची प्रतिष्ठा झाली. त्या वर्षापासून वरील तिथीस मूर्तींचा वर्धापनोत्सव होत असतो. याशिवाय मार्ग० वद्य एकादशी आणि शिवरात्र हे दोन पर्वमहोत्सव इथें होत असले तरी इथला मुख्य उत्सव अक्षय्यतृतीयेचा. वैशाख शुद्ध प्रतिपदेपासून त्याला प्रारंभ होतो. प्राकारभर उभारलेल्या मांडवांत मंत्रजागर दुमदुमतो. पुराण–कीर्तनांचा रस गळतो. गायन-वादनांची झक्कड उडते. द्वितीयेस तिन्हीसाजा जन्मोत्सव करतात. तृतीयेला रात्रीं छबिना होतो. मग मानकऱ्यांना प्रसादाचे नारळ वांटले जातात. आणि शेवटीं ललित होऊन उत्सव समाप्त होतो. युद्धकालापूर्वीं या प्रसंगीं मोठी समाराधना व्हायची. आल्यागेल्याला अन्नप्रसाद मिळायचा. पण आतां कालाच्या प्रतिकूलतेमुळें सगळेंच ‘ अनुष्टुप् ’ झालें आहे.

एवढें सारें पहातों ऐकतों तों जवळच कुठें तरी ‘ गुडुऽऽम् ’ झालें. मीं म्हटलें, ‘ तोफेचा आवाज कुठून आला ? कोरियांतली लढाई कोंकणापर्यंत आली कीं काय ? ’ आमचे मार्गदर्शक मला उत्तर देण्यापूर्वीं ‘ भार्गवराम ’ असें उच्चारून नतमस्तक झाले अन् मग म्हणाले, ‘ ही देवाची तोफ. सकाळ-संध्याकाळ ही नित्य गरजते. चला तुम्हांला दाखवतों. ’ प्राकाराबाहेरच्या झार्डीत ती ‘ कालिकामूर्ति ’ आकाशाकडे

तोंड उघडून तिरकी बसली होती. ब्रह्मेंद्रस्वामींच्या काळापासून ही रोज एक रत्तल दारू ठासून घेते आणि आग ओकते. दरसाल एकदां तिचें 'देणें' दिलें कीं मग तिची तक्रार नसते.

पुन्हा पाग चढून आम्ही तिच्या तोंडावर आलों आणि तिथून उजव्या हाताला वळून वर चढूं लागलों. झुळझुळत्या पाटाच्या कांठानें दत्ताच्या देवळाकडे जातांना आम्हांला हुरूप वाटत होता. निसर्गश्रीला जळाची जवळीक असली कीं त्या ओलाव्यानें प्रवाशाच्या मनाच्या पाकळयाही लगेच खुलतात. दत्ताच्या देवळांत पुढच्या अंगाला डाव्या हातीं जी एक पुष्करणी आहे ती या पाटाची मायमाउली. त्याच्याच वरच्या भागाला चिमुकल्या गुंफेच्या मुखांतून जो एक निर्झर प्रगटतो तो त्या पाटाचा मामा म्हणायला हरकत नाहीं.

टेकडीच्या माथ्यावर उभे राहून आम्ही सगळा आसमंत पाहिला. काळया कातळांवर आणि हिरव्या झाडांवर उन्हें चमचमत होतीं. पण सकाळच्या सौंदर्याची टवटवी, आर्द्रता आणि सात्त्विकता आतांच्या सौंदर्यांत नव्हती. सूर्यनारायणानें आपले उष्ण कर आमच्या कानशिलां-वर ठेवून आम्हांला सुचविलें, 'पळा आतां; मुक्काम गांठा.' तिथून मधल्या वाटेनें चिपळूण अवघें अडीच मैल असलें तरी तें अंतर आम्हांला पायींच तोडावें लागणार होतें. वाट उताराची खरी; पण खालीं उतरतांनाच तोल संभाळावा लागतो, हें विसरण्याजोगें नव्हतें. आमच्यांत दोघे वैद्यकशास्त्राचे विद्यार्थी होते, त्यांनीं वनस्पतींची आपुलकीनें विचारपूस चालवली होती. मीही माझ्यापरीनें तेंच करीत होतों. गुंजावेलीच्यीं गर्भपुटें नुकतींच उकललीं होतीं. कणेरें अजून हिरवींच होतीं. रुमडाचे घड अजून गोडीला चढायचे होते. काजूच्या लुसलुशीत रक्तपालवीवर मोहराचे तुरे अजून डोलायचे होते.

अर्ध्या डोंगरांत आल्यावर डाव्या हाताला काळया कड्यावरून उडी घेणारा एक क्षीण, पसरट जलप्रपात आमच्या नजरेस पडला. तो प्रपात हें त्या डोंगराचें वैभव होतें. जणुं तो परशुरामाचा रुद्र प्रताप अनावर-पणें धोधावत होता. ज्या दरींत तो जलसंघात कोसळत होता, ती

भयावह वाटत होती. 'सवत सडा म्हणतात तो हा बरं का!' श्री. ओक म्हणाले. त्याची दंतकथा त्यांनीं आधींच आम्हांला सांगून टाकली होती—

'एका पुरुषाच्या दोघी बायका. अर्थात् थोरली नावडती आणि धाकटी आवडती हें ठरलेलेंच. दोघी वरून गोड बोलत; पण आंतून एकमेकींना पाण्यांत पहात. एक दिवस कशाकरितां तरी त्या दोघी मिळून या सड्यावर आल्या. त्या वेळीं थोरली धाकटीला म्हणाली, 'ये, तुझी वेणी घालतें.' धाकटी तिच्यापुढें पाठ करून बसली; पण थोरलीचा केस विंचरणारा हात थरथरत असल्याचें पाहून तिला अंदेशा आला कीं, हिच्या मनांत कांहीं तरी काळेंबेरें आहे. ही आपल्याला कदाचित् लोटूनही देईल. धाकटी तरी किती विचक्षण पहा. झटकन् बाजूला व्हायचें तें सोडून तिनें आपल्या ढळत्या पदराची आणि तिच्या रुळत्या ओच्याची तिला नकळत पक्की गांठ मारून टाकली. थोरलीनें पेड वळतां वळता दोन्ही हातांनीं एकदम तिला खालीं ढकललें. पण झालें मात्र 'इंद्राय तक्षकाय स्वाहा!' पडतां पडतां दोघींचा एक हृदयभेदक चीत्कार उठला आणि तो जलप्रपात त्यांच्या आत्मघातकी मत्सराबद्दल एकदा खदखदून हंसला.'

---

# ३ तुळजा भवानी

रावणानें सीतामाईचा अपहार केल्यानंतर रामरायाची अवस्था अत्यंत करुणास्पद झाली. 'हा सीते, हा सीते' असा विलाप करीत तो दंडकारण्यांत भ्रमूं लागला. आदिमाया पार्वतीला रामाचें हें दैन्य रुचलें नाहीं. ती शिवशंकराला म्हणाली, 'पूर्णपरब्रह्म म्हणून तुम्ही ज्याचें ध्यान करतां तो पुरुष किती सामान्य मानव आहे तें पाहून घ्या एकदां. बायको नाहींशी झाली म्हणून पुरुषानें काय इतकें दीनवाणें बनावें?' सदाशिव गंभीर होऊन तिला बोलला, 'देवि! माझ्या रामाचें तत्त्व तुला आकलन होणार नाहीं. रडला, कढला तरी तो आनंदकंद परमात्मा आहे. मानवदेह धरल्यामुळें तो मानवी भावनांचे खेळ दाखवतो इतकेंच.' त्यावर पार्वती पुन्हा म्हणाली, 'ठीक आहे. मग मीही त्याला माझा एक खेळ दाखवतें. या खेळांत तो फसेल आणि तुमचाही भ्रम दूर होईल.'

आणि पार्वती लगेच सीतारूप नटली. दंडकारण्यांतल्या यमुनागिरीवर रघुवीर होता तिथें प्रगट झाली. 'सीते ऽऽ!' या रामाच्या आर्त हांकेला तिनें ओ दिली. शेजारीं उभा असलेला लक्ष्मण 'सीता आली' म्हणून आनंदानें उच्चंबळला. पण रामानें मात्र तिच्याकडे पाठ फिरवली. त्यानें उमेचें हें कौटिल्य तेव्हांच जाणलें होतें. ती जेव्हां त्याच्या-समोर आली तेव्हां तो काकुळतीनें एवढेंच म्हणाला, 'आई! कशाला हे श्रम घेतलेस!'

पार्वतीच्या हृदयमर्माला ते शब्द झोंबले. मग निजरूप घेऊन तिनें रामाचें शांतवन केलें. त्याला वरही दिले. जी रामाची छळणा करायला आली होती तीच 'रामवरदायिनी' होऊन लंकेहून परत येणाऱ्या त्याची वाट पहात त्या पर्वतावर राहिली. तीच तुळजापूरची

जगदंबा. पुराणात तिला 'तुरजा' म्हटलें आहे. प्राकृतांत 'र' चा 'ळ' होऊन ती तुळजा झाली. एकनाथमहाराजांनीं तिला तुकाई म्हणून संबोधलें आहे.

तुळजा भवानी ही उभ्या महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. ती महाराष्ट्राची प्राणशक्ति आहे. महाराष्ट्रमहोदयाची स्वयंस्फूर्ति आहे. महाराष्ट्राच्या सुपुत्रांची ती अंबा आहे. आततायी असुरांची ती चामुंडा आहे. भक्तजनांची ती माउली आहे आणि श्रांत-अनाथांची ती साउली आहे. ज्याला महाराष्ट्रांत जन्म घेतल्याचा अभिमान आहे त्यानें एकवार तरी तिच्या पायांशीं गेलेंच पाहिजे.

मकरसंक्रमणाचा पुण्यकाल साधून आम्हीं तिच्या दर्शनासाठीं सोलापुराहून निघालों. सुदैवानें सकाळची पहिलीच मोटार आम्हांला मिळाली. सूर्य त्याच दिवशीं उत्तरायणाचें प्रस्थान ठेवीत होता आणि आमची गाडी पण उत्तरेच्याच रोखानें चालली होती. सूर्याच्या विरहदुःखानें निघणारे दक्षिणेचे निःश्वासवायु गाडींत शिरून आमच्या अंगावर कांटा आणीत होते. सोनेरी सूर्यकिरण शेतांच्या अंगावरची धुक्याची दुलई हलकेच वर करून त्या रोपट्यांना 'उठा उठा हो सकाळिक' म्हणत होते. दंवानें न्हालेलीं कणसें वाऱ्यावर डुलत होतीं आणि त्यांच्यावरचीं पांखरेंही त्यांच्यासंगें झुलत होतीं. गाडीच्या धडधडाटानें रस्त्याच्या कडेचें एक भिरें भुरेदिशीं उडालें खरें; पण तें रिकाम्या चोंचीनें खास नव्हे. त्यांना आपल्याबरोबरच घरट्यांतल्या अजातपक्ष पिलांचीही काळजी होतीच.

थोड्या अंतरावर डाव्या हाताला एक जलाशय दिसला. चौकशी करतां कळलें कीं, सोलापूर शहराला जीवन देणारा हिप्परग्याचा तलाव तो हाच. कासव खुषींत आला कीं जसे पाय पसरतो तसे त्याला कांहीं फांटे फुटले आहेत. ते सगळे जमेस धरून हिशेब केला तर दहा मैलांचा त्याचा घेर होईल. सोलापुराहून तुळजापूर पंचवीस मैलांवर आहे. निजामी राज्यातल्या उस्मानाबाद म्हणजे पूर्वीच्या धाराशीव या जिल्ह्यांतलें तें एक तालुक्याचें ठिकाण आहे. आमची गाडी दीड तासांत तो मार्ग

क्रमून बालाघाटाच्या चढणीला लागली. घाट चढल्यावर लागणाऱ्या पहिल्याच पठारावर तुळजापूर वसलें आहे.

एका धर्मशाळेपुढें गाडी उभी राहतांच क्षेत्रोपाध्यांनीं आम्हांला वेढलें. त्यांपैकीं आमच्या नाशिबाला आला तो उपाध्या आम्हीं पतकरला आणि दोन हजार फूट उंचीवरचें अर्धचंद्राकार वसलेलें तें गांव पाहत त्याच्यामागून निघालों. गांव लहान असलें तरी इथें सीमेंटाचे रस्ते आहेत, वीज खेळवलेली आहे आणि नळही आणलेले आहेत.

मिठाई आणि कुंकूं, फुलें घेण्यासाठीं बाजारांत येतांच तांदूळ, गहूं, वगैरे अन्नधान्यें टोपलींत भरून उघड्यावर मांडलेलीं दिसलीं. मला क्षणभर असा भास झाला कीं, कुठल्या तरी उच्च लोकांत आपण सदेह येऊन पोंचलों आहों. थोडें खालीं गेल्यावर मंदिरप्राकाराचा पहिला अर्धवट उभारलेला दरवाजा दिसला आणि त्यापलीकडे देवीचें शिखरही डोळ्यांत भरूं लागलें. एकेक पायरी उतरत आम्ही देवीचें आवार जवळ करूं लागलों.

उजव्या हाताला एका दगडी मंडपाखालीं कठड्यावर बसून स्नानाचा संकल्प सांगणाऱ्या भस्मभूषित भटजींनीं क्षणभर आपल्या गिऱ्हाइकांकडे दुर्लक्ष करून आम्हांला हटकलें. ‘या, इकडे या, इथें गोमुखतीर्थ आहे.’ आम्ही सोलापुराहून स्नान उरकून आलेले असल्यामुळें आतां त्याच आन्हिकाची पुनरावृत्ति करण्याची आमची तयारी नव्हती. ‘जें फल स्नानाला तेंच मार्जनाला’ हा अपवादनियम आम्हांला तोंडपाठ होता. यात्रेकरूला एवढें तारतम्य ठेवावेंच लागतें. तें न ठेवतां तो जर प्रत्येक तीर्थांत आणि कुंडांत बुचकळ्या मारूं लागेल तर त्याला दुसऱ्या क्षेत्रांत जाण्यापूर्वीं रुग्णालयाचाच मार्ग धरावा लागेल.

त्या ओल्या पायऱ्या जपून उतरत आम्ही कुंडांत प्रविष्ट झालों. पोटरीएवढी जलधारा एका गायमुखांतून दीड पुरुष उंचीवरून तिथें ओतत होती. त्या धारेखालीं उभें राहण्यासाठीं बऱ्याच मंडळींचें ‘मी आधीं का तूं आधीं’ चाललें होतें. आम्हांला पाहून त्या सर्वांनीच बाजूला होण्याचें दाक्षिण्य दाखवलें आणि आम्ही ‘अपवित्रः पवित्रो


वा —' या मंत्रानें मस्तकीं मार्जन करून तिथून दूर झालों. आमचा उपाध्या सांगू लागला, 'हा साक्षात् गंगेचा प्रवाह आहे.' आम्हीं जिज्ञासा दर्शवतांच त्यानें आम्हांला एक जुनाट कथा ऐकवली.

"गरीबनाथ नांवाचा एक साधु इथें देवीची सेवा करून राहत होता. भक्तीला भाळून भवानी त्याच्याशीं बोले. संसारांत काय, किंवा परमार्थांत काय, माणसाला हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्याची खोड फार. त्याला वाटलें कीं, आपण काशीयात्रा करावी. देवी त्याला म्हणाली, 'कशाला एवढी पायपीट करतोस? इथल्या गोमुखांतून वाहते ती खुद्द गंगाच आहे.' पण त्याला तें कसें पटावें? माणूस 'देव, देव' करतो; पण देवाच्या इच्छेची मात्र तो कदर करीत नाहीं. गरीबनाथ तरी त्याला कुठून अपवाद असणार? त्यानें पडशी खांद्यावर टाकलेली पाहून देवीनें त्याच्या हातीं एक लिंबू आणि एक वेताची छडी देऊन म्हटलें, 'काशीला जाशील तेव्हां या दोन वस्तु गंगेंत टाक.' त्यानें तेवढें केलें. यात्रेहून परत आल्यावर गोमुख तीर्था-खालीं ओंजळ धरतो, तर तेंच लिंबू आणि तीच छडी त्याच्या हातांत—"

लोककथा मोठी मार्मिक आहे यांत शंका नाहीं. सांगणारे ती यात्रेकरूंना पटावी इतक्या भाविकपणें सांगतात खरी; पण त्यांना ठाऊक असतें कीं, या तीर्थाचा उगम वरच्या महंकावतीच्या तळ्यांत आहे आणि तळें आटलें तर ही धारही खुटते. समोरचें दुसरें लंब-चौरस कुंड तर खुद्द सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवानें आपल्या चारी हातांनीं खोदलें. त्याला 'कल्लोळतीर्थ' नांव कां, तर त्यानें पाचारण केल्या-वर विश्वातल्या सकळ तीर्थांनीं तिथें कल्लोळ केला म्हणून.

दोन्ही तीर्थांच्या मधून जाणाऱ्या वाटेनें आम्ही मंदिराच्या प्राकारांत उतरलों. दिवस चढत असला तरी तिथें वृक्षांच्या छायेनें गारवा राखला होता. न तापतांच आम्हीं त्या तरुच्छायेचें 'निर्वाण' उपभोगलें. पुढचा ठेंगणा दगडी सभामंडप ओलांडून आम्ही मध्यमंडपांत प्रविष्ट झालों. आम्ही तिथें काळ्या फरशीवरून चालत नव्हतों; तर चांदीच्या चक-

चकीत रुपयांवरून. अंबिकेच्या घरीं लक्ष्मी भक्त-भाविकांच्या पायांतळीं लोळत होती. धनिकांनीं अधिक धनसंपदा मिळविण्याच्या आकांक्षेनें देवीच्या वाटेवर त्या रौप्यमुद्रा खिळवल्या होत्या.



तिथल्या संगमरवरी सिंहाच्या मागें उभा राहून मी समोर पाहतों तर गर्भागारांतलें सिंहासन रिकामें. मनांत म्हटलें कीं, देवी मला पाहून एकदम अदृश्य झाली कीं काय ? मी दर्शनाला पात्र नाहीं असें जगदंबेला वाटलें कीं काय ? पण एवढ्यांत उपाध्यानें मला उजव्या हाताला वळवलें. भवानी तिथल्या शयनमंदिरांत पर्यंकावर पहुडून निद्रासुख अनुभवीत होती. दर्शन घेणारे लोक त्याच बाजूला जमत होते. आम्हीही त्यांतून पुढें झालों. अंबेपुढें नतमस्तक होऊन मी नमस्काराचा श्लोक म्हटला—

"यमुनाद्रिकृतावासां योगिनीवृन्दसेविताम्
भक्ताल्हादकरीं शक्तिमम्बां देवीं नमाम्यहम्"

देवीचें मुख तेवढें उघडें होतें आणि बाकीचें सर्वांग दुलयांच्या खालीं झांकलेलें. निजलेल्याची झोंपमोड करणें हें आमच्या नीतिशास्त्रांत पाप गणलें आहे. त्यांतून ही तर चंडिकेची निद्रा. भीतभीतच आम्हीं

तिच्या पांघरुणाला कुंकूं-फुलें वाहिलीं, नैवेद्य-दक्षिणा ठेवली, पुजाऱ्यानें दिलेला प्रसाद घेतला आणि तिथून दूर झालों.

वर्षातून तीन वेळां इथें देवीची निद्रा असते. चार प्रहरांची नव्हे; तर चांगली पांच ते आठ दिवसांची. भाद्रपद वद्य अष्टमी ते अमावास्या हा पहिला शयनकाल. आश्विन शुद्ध एकादशी ते पौर्णिमा हा दुसरा आणि पौष शुद्ध प्रतिपदा ते अष्टमी हा तिसरा. इतर सर्व काळीं ती अष्टौप्रहर जागृत असते. अहोरात्र भक्तांचीं गाऱ्हाणीं ऐकत रहाते. निद्रेच्या आधीं आणि जागृति आल्यावर तिला अजापुत्राचा एकेक बळि लागतो. इथली नवलपरी अशी कीं, स्थापित मूर्तिच उचलून निजवतात आणि तीच पुन्हा सिंहासनावर चढवतात. इतर ठिकाणीं असले भोगोपचार उत्सवमूर्तीला करण्याची वहिवाट असते.

जगदंबेची श्रीमूर्त गंडकी शिलेची आहे. उजव्या अंगाला वनराज सिंह आहे. शिवाच्या चार भुजा तर अंबेच्या आठ. डाव्या उजव्या स्कंधावर चंद्र-सूर्य विसावले आहेत. सहा हातांत आयुधें आहेत. सातव्या डाव्या हातांत महिषासुराची शेंडी आहे. आठव्या उजव्या हातानें त्याच्या बरगडींत त्रिशूळ खुपसलेला आहे. टाचेखालीं रेड्याचें धड आहे. आणि चरणाजवळ 'अनुभूती'नें मुकुंड घातली आहे.

अनुभूति ही कर्दम ब्राह्मणाची भार्या. ती पतिसेवापरायण होती. तिनें आपल्या संसारांत स्वर्ग उतरवला होता. पण अचानक एके दिवशीं काळानें तिचें सौभाग्यमाणिक गिळलें. तिनें सतीचें वाण उचललें. जिभोळ्या चाटणाऱ्या चिताग्नीला आपली कोवळी काया ती समर्पण करणार एवढ्यांत आकाशवाणी झाली, 'तान्ह्या बाळाच्या आईला सती जाणें वर्ज्य आहे!' निरुपायानें तिला झोंकलेलें अंग मागें घ्यावें लागलें. पुढें याच यमुनाचळावर ती जगदंबेची आराधना करीत राहिली. प्रहरान् प्रहर ती ध्यानमग्न असे. रोज तिचा बाळ तिचें ध्यान मोडायचा. पण त्या दिवशीं तें कुक्कुर दैत्यानें मोडलें. तो तिच्या रूपावर पतंग झाला होता. तिचे नाजूक हात त्या बेभान दैत्याला दूर लोटायला असमर्थ होते. तिनें देवीला टाहो फोडला. साध्वीचें मरण सतीनें जाणलें. सायुध,

सशक्तिक अष्टभुजा तिथें प्रगटली आणि कुक्कुर दैत्याला प्राणांनीं प्रायश्चित्त करावें लागलें.

अष्टभुजेचें हेंच पाषाणमय रूप आपादमस्तक मला पहायचें होतें. पण माझ्या मंदभाग्यानें मी तिच्या निद्राकाळांत तिथें पोंचलों होतों. 'देवीचें दर्शन घेतलें का?' असा कोणी प्रश्न केल्यास 'होय' असें यथार्थ उत्तर मला देतां येणार नाहीं. आणि त्यावर 'समुद्रांत जाऊन कोरडेच कीं' असा जर त्यानें टोमणा दिला तर मी काय बोलणार त्याच्यावर?

देवीची नित्य पूजा दिवसांतून चार वेळां होते. पहांटेस पुजारी येऊन देवीचें श्रीमुख आणि करचरण पुसतो. तेंच वस्त्र नंतर भक्तांच्या हातावर पिळलें जातें. जे चार थेंब हातावर पडतील ते देवीचें 'चरण-तीर्थ' म्हणून भक्त प्राशन करतात. लगेच देवीला भाजीभाकरीची न्याहारी होते.

दुपारीं महापूजा होते. इथले पुजारी मराठे आहेत. पंचामृताच्या वेळीं दह्या-दुधाचीं भांडीं देवीच्या मस्तकावर ओततात. नंतर शुद्धो-दकानें स्नान घालतात. भालीं चंदनाचा मळवट भरतात. मस्तकीं हळद–कुंकू वाहतात. हृदयावर बुक्का उधळतात. नंतर आरती–महा-नैवेद्य होतो. सायंकाळीं धूपारती आणि रात्रीं प्रक्षाळण.

इथें एक गमतीची चाल आहे. महापूजेच्या वेळीं साहित्य घेऊन पुजारी देवळांत आले कीं जामदार देवळाच्या पश्चिमद्वाराकडे उभा राहून मोठ्यांदां ललकारतो—

"पुजारी आले होऽऽ! लौकर याऽऽ!"

हें खुद्द जगदंबेला आवाहन असतें. खालच्या डोंगरघळींत ती दीर्घ साद घुमत घुमत जाते. तिथें उभें राहिलें कीं, डोंगरांची लांबच्या लांब ओळ दिसते. तिथून वर येण्यासाठीं पायऱ्या बांधलेल्या आहेत. थकलेल्या माणसाला दमछाट करायला मध्यें मध्यें विसावेही आहेत. याच बाजूला एका काळीं रणछोडभारती या सत्पुरुषाचा मठ होता. देवी सारीपाट खेळण्यासाठीं त्याच्या आश्रमांत

जात असे आणि 'पोबारा, वांकडे तेरा' करतांना तिला वेळेचें भान राहत नसे. तिनें हारजीत खेळून केव्हां तरी अकालीं मंदिरांत यावें तों पूजा-महानैवेद्य आटोपलेला. पुन्हा दुसऱ्या दिवशींही तसेंच. खेळाचा छंद सुटेना आणि अन्नाची गांठ पडेना. तिला भरल्या मंदिरांत उपास



मंदिराची पश्चिम बाजू

घडूं लागले. तिनें पुजाऱ्याला दृष्टांत देऊन आपली स्थिति कळवली. पुजारी म्हणाला, 'माझ्याकडून कसूर नाहीं. मी अगदीं डोळे मिटून नैवेद्य दाखवतों.' तिनें मग तोड सुचवली, "आजवर झालें तें झालें. उद्यांपासून पूजेच्या आधीं मला 'कुकारा' घालीत चला."

आणि त्या दिवसापासून ही चाल पडली ती अजून कायम आहे. सहस्रावधि वर्षांच्या परंपरा राखण्यांत भारताचें वैशिष्ट्य असलें तरी याच वृत्तींतून गतानुगतिकत्वही पैदा झालें आहे हें विसरतां कामा नये.

तुळजा भवानीच्या सेवेसंबंधीं ज्याना नित्यनैमित्तिक अधिकार आहेत त्यांचीं हुद्द्यांचीं नांवें वाङ्मयांत आणण्यासारखीं आहेत. पहिला बजाजीबुवा. यानें कवाडें उघडायचीं आणि लावायचीं. येतील तेवढे नैवेद्य दाखवायचे आणि नंदादीप संभाळायचा. चिलोजीबुवा म्हणजे

शृंगाराध्यक्ष. देवीचे दागदागिने आणि पाटावें, क्षीरोदकें इत्यादि वस्त्र-संभार त्यानें संभाळायचे. जगदंबा ही स्त्री असली, नगाधिराजाची कन्या असली तरी ज्या दिवशीं भस्मोद्धूलन करणाऱ्या वीतराग शिवाला वरायचें तिनें ठरवलें त्याच दिवशीं अलंकारांचा हव्यास सोडून ती साधीसुधी बनली. पण तिची हौस भागली असली तरी भक्तांची राहिली होती ना. त्यांनीं तिला रुमझुमत्या नूपुरांपासून झळाळत्या किरीट-कुंडलांपर्यंत सर्व प्रकारचे अलंकार समर्पिले आहेत. इथल्याच लिंगाप्पा नाइकानें दिलेल्या रत्नजडित मुकुटाचें मोल लाखांच्या भाषेंत बोलावें लागेल. नथच नुसती पंचवीस हजारांची आहे. वाकोजीबुवा म्हणजे आमच्या कोकणच्या भाषेंत 'पाणियाळा'. पाणी पुरवणें हें त्याचें काम. देवळांत 'दीपत्कार'ही तोच करतो. पलंगेबुवाकडे शेजघर, चवऱ्या, मोरचेलें यांची व्यवस्था असते आणि झाडपिडेबुवानें झाडणें, तण-काडी काढणें हीं स्वच्छतेचीं कामें करायचीं असतात.

मंगळवारीं रात्रीं छबिना निघतो. देवीच्या डाव्या हाताच्या ओवरींत त्यासाठीं सिंह, नंदी, गरुड, हंस, मयूर इत्यादि लांकडी, रंगीत वाहनें तयार असतात. त्यांपैकीं एखाद्या वाहनावर देवीची अंबारी चढते. प्रदक्षिणा सुरू झाली कीं संबळ वगैरे वाद्यें वाजतात. भुत्ये पोत घेऊन नाचतात. मग आराध्याच्या अंगांत देवीचा संचार होतो. त्यानें घुमणें सुरू केलें कीं भक्तमंडळी प्रश्नोत्सुक होते. 'आई जगदंबे! पाणकळा कधीं होईल?' तोही मग 'गळेल तेव्हां कळेल रे ऽऽ!' अशा थाटाचीं उत्तरें देऊं लागतो.

इथला सर्वांत मोठा उत्सव नवरात्राचा. प्रतिपदेच्या दिवशीं गांवचा कुंभार तीन घागरी आणून गोमुखतीर्थाजवळ ठेवतो. अधिकारी, सेवेकरी जमून मग वाजत गाजत ते घट खालीं आणतात. पहिला घट सभामंडपांत ईशान्येला स्थापायचा. दुसरा देवीसमोर जें शिवमंदिर आहे त्याच्या मागच्या त्रिशूळाच्या ओवरींत बसवायचा आणि तिसरा त्याच आवारांतल्या मातंगीच्या मंदिरांत. नंतर सप्तशतीचे पाठ

आणि नवचंडीचें हवन सुरू होतें. त्यासाठीं देवीच्यासमोर एक मोठें होमकुंड बांधूनच ठेवलें आहे. खड्गनवमीस पूर्णाहुति होते तेव्हा बकऱ्याचें शिर धडावेगळें करून 'अग्नये स्वाहा' करतात.

दसऱ्याच्या रात्रीं देवी शिलंगणाला निघते. त्या वेळीं मूर्तीच्या अंगाभोंवतीं कापडाचीं दिंडेच्या दिंडें गुंडाळतात आणि त्यावर वस्त्राचा पिळा करून आवळून बांधतात. लोटलेल्या जनसागराच्या लाटांत मूर्तीला इजा पोंचूं नये म्हणून अशी ही खबरदारी घेण्यांत येते. पालखी निघाली कीं अगणित मुखांतून 'उदो, उदो'चा उच्चैर्घोष उठतो. नगारा, तास,संबळ हीं रणतुरें झडूं लागतात. 'नादें कोंदलें अंबर' असें होतें. गिरिशिखरें आणि दरेदरकुटे नादमय, घोषमय होतात. वन्य श्वापदांना चळकंप सुटतो. दिवे, दिवट्या, पोत यांनीं जणुं त्या सगळ्या डोंगराचाच त्रिपुर पाजळतो. लोकांकडून मुक्तहस्तानें पालखीवर कुंकवाची उधळण सुरू होते. भूमीवर त्याचाच दाट थर जमतो. वातावरणांत त्याचेच कण तरंगूं लागतात. पालखीच्या जवळपासचे लोक आत्तांच एखाद्या कुरुक्षेत्रावरून आले आहेत कीं काय असें वाटतें. सर्वांच्या नाकांत, तोंडांत, पापण्यांवर एकच एक पदार्थ आणि तो म्हणजे कुंकू. बायकापुरुष सगळे देहभान हरवून त्या मिरवणुकींतला अद्भुत रस घोटतात. उत्तर रात्रीपर्यंत ही धुमाळ चालते आणि देवी परत मंदिरांत येते.

भक्तमंडळी तुळजापुरीं दर्शनाला येतात, त्यांपैकीं बऱ्याच लोकांचे नवस फेडायचे असतात. कोणत्या तरी आपत्प्रसंगीं ते केलेले असतात. नवस म्हणजे आर्त अथवा अर्थार्थी भक्तानें देवाशीं केलेला एक प्रकारचा सौदा. यांत देवाकडून आधीं 'कोहळा' घ्यायचा असतो आणि त्यानें तो दिला तरच मग त्याला आपला 'आवळा' द्यायचा असतो. पण नुसता नवस म्हटल्यानें अलीकडच्या पिढीला त्यांतला तपशील कळायचा नाहीं. मानवी मनाचें सौंदर्य, औचित्य, आचरटपण, अघोरीपण यांचें निदर्शन या नवसांच्या प्रकारांवरून चांगलें होऊं शकेल.

पंचामृत आणि ओटी भरणें हा इथला सर्वसामान्य नवस. मग

कोणाचीं लोटांगणें असतात. कोणाला लिंबाचे टाळे नेसून पूजा-प्रदाक्षिणा करायची असते. कोणी नवसासायासानें पुत्रवती झालेली नारी देवीला पाळणा खेळणा बांधते. कोणी सौभाग्य चिरंतन होण्या-साठीं वेणीदान करतात. कोणी स्त्री बांक्या प्रसंगीं म्हणते, 'अंबे भवानी! माझं कुंकू राख, मी तुझ्या दारीं कुंकवाचा सडा घालीन.'

"नवस मीं केला। अंबाबाईला कमळ
परदेशीं तूं सांभाळ। उषाताईला
आई अंबाबाई। खण नारळ ग तुला
राख माझ्या कुंकवाला। जन्मवेरी"

तपस्येच्या बळावर अविनाशी सौभाग्य मिळवून बसलेल्या जगदंबेकडे स्त्रियांनीं अक्षय चुडे मागायचे नाहींत; तर दुसऱ्या कोणाकडे? कोणी देवीवरून कोंबडीं उतरतात. आपलें पोटचें मूल वाहण्याची सुद्धां एका काळीं प्रथा होती. असे अनेक प्रकार आहेत.

मंदिराच्या दक्षिणेस 'येमाई' देवी आहे. गोंधळी हे तिचे उपासक. ते तिच्या ओवरींत बसलेले असतात. तुळजापूरचे ते प्रमुख वतनदार आहेत. पूजेच्या आणि छबिन्याच्या वेळीं संबळ वाजविणें आणि यात्रेकरूंचा गोंधळ घालणें हें यांचें काम. गोंधळी हा शक्तीचा 'प्रस्तोता' आहे. तो इतिहासकाळांतला सूत-मागध आहे. शिवाजी-महाराजांच्या काळीं स्वातंत्र्यलक्ष्मीचा 'उदे, उदे' यानेंच केला. तुम्हांला गोंधळ पहायचा असला तर चला माझ्यासंगें उपाध्याच्या घरीं. तो पहा त्यानें गव्हाच्या पुंजीवर घट मांडला आहे. वर जोंधळ्याच्या धाटांचें त्रिकूट उभें केलें आहे. तो आतां महाराष्ट्र-मंडळांतल्या सगळ्या देवांना गोंधळासाठीं आवाहन करील. साथी-दाराचें तुणतुणें 'तुंई तुंई' बोलत त्याला अनुमोदन देईल. तिसऱ्याच्या गळ्यांतला संबळ कडकडेल. चौथा नाइकाच्या भाषणाला 'शेव' लावीत अधूनमधून विनोदाचे तुषार उडवील.

मलमलीचा आंगरखा, वर जाकिट आणि डोक्याला पेंचाचें बसकें पागोटें घातलेला, कल्लेदार मिशांचा नाइक, खांद्यावरचें चुणीदार

उपरणें सांवरीत आता तुम्हाला एखादी बहारदार लोककथा ऐकवील. समरप्रसंगांनीं खच्चून भरलेली आणि अद्भुत रसांत न्हालेली. हरणावती, निळावंती, चंद्रगुजरी या आणि अशाच लवत्या लचकत्या नाइका तुम्हांला तुमच्या विदग्ध वाङ्मयांत भेटणार नाहींत. या लोककथा म्हणजे गोंधळ्यांच्या जिह्वाग्रीं पिढ्यान्‌पिढ्या नटनाच करणारें निरक्षरांचें अक्षरवाङ्मय आहे. जो रसिक असेल तोच त्याची चव चाखील.

एकनाथमहाराजांच्या घराण्याचीही जगदंबा हीच कुलदेवी. नाथ हे जातिवंत कवि. जनतासंबंध राखणारे कवि. गोंधळ्यांचें पाहून त्यांनाही स्वतः गोंधळ घालण्याची स्फूर्ति झाली. त्यांनीं आपल्या जीवींच्या विठाईला अंबेशीं एकरूप करून गोंधळ मांडला. त्यासाठीं त्यांनीं त्रैलोक्याचा मंडप उभारला. वर चारी वेदांचा फुलवरा बांधला. शास्त्र-पुराणांना साथीला बोलावलें. पुंडलिकाच्या हातीं दिवटी-बुधली दिली आणि मग एकदम पुढें होऊन त्यांनीं अंबेला हाकारलें—

**“गोंधळा ये वो जगदंबे**
**विठाबाई तूं मूळस्तंभे”**

त्या भक्तराजाची साद काय नुसती वाऱ्यावर विरेल? देवी तत्क्षणीं प्रगटली. पण ती अशी रुद्र, उग्र कां दिसते? कां म्हणजे? तिला महिषासुर मर्दायचा आहे.

**“मोहमहिषाचा करावया घात**
**अंबा कडकडोनि दांत खात**
**तो धाकेंचि निमाला निश्चित**
**पूर्णानंद प्रगटला”**

देवीनें पुराणकाळीं दैत्य निर्दाळले खरे; पण ते आतां लिंगदेहानें माणसाच्या हृदयांत शिरून बसले. जनांत होते ते मनांत आले. तो मोहाचा महिषासुर. ते काम-क्रोधांचे शुंभ-निशुंभ. तो अहंकाराचा मुंजा. तो दंभाचा झोटिंग. त्यांचा पुरता निकाल लावायचा तर अंबा पुन्हा प्रगटली पाहिजे. तुळजापुरांत नव्हे; तर प्रत्येकाच्या हृदयपुरांत. पण

त्यासाठीं कांहीं साधना करावी लागेल. मन चोखाळ, निर्मळ करावें लागेल. भूतमात्रीं प्रेम, विश्वमंगलाची आकांक्षा, पापानें हात-तोंड काळें होऊं नये याची दक्षता आणि त्या दयामयीवर नितांत श्रद्धा हीं लेणीं जर तुम्ही ल्यायिलीं असतील तरच ती अवतरेल. तिच्या स्वागतासाठीं तुम्ही सद्भावनांचें मखर बांधूं लागलांत हें दिसलें कीं तेवढ्यानेंच ते अंतःशत्रु आपलें ठाणें उठवतील.

जगदंबा म्हणजेच शक्ति. जेव्हां जेव्हां दैत्य उन्मत्त होऊन जगाचे काळ झाले तेव्हां तेव्हां ती अनेक रूपांनीं प्रगटली आहे. ‘एकच माउली दहा अवतार खेळली’ असा नाथांचा निर्वाळा आहे. या शक्तीची आराधना भारतांत फार प्राचीन काळापासून सुरू आहे. भारतांतच कशाला; अन्य देशांतसुद्धां. आशियामायनर, मिसर, फिनीशिया या देशांतले लोकही एका काळीं शक्तिपूजक होते. आपल्या जगदंबेनें सिंह हें वाहन म्हणून स्वीकारलें आहे. ईजिप्तची प्राचीन देवता ‘सेखेट’ (Sekhet) ही सुद्धां सिंहाधिष्ठितच आहे. सेखेट आणि शक्ति यांतलें वर्णसाम्यही लक्षांत घेण्याजोगें आहे. सीरियन लोक ज्यांना विश्वाचीं मातापितरें मानीत तींही आपल्या पार्वती-परमेश्वराप्रमाणेंच सिंह आणि नंदी याच वाहनांवर आरूढ होतीं. हायरापॉलिस् (Hierapolis) येथील सुप्रसिद्ध वेदीवर ‘हायरा’ आणि ‘झेउस’ या दोन देवतांचा जोडपुतळा आहे, त्यांतही हायरानें सिंहाचा आधार घेतला असून झेउस वृषभवाहन आहे. रोमन स्मारकांमध्येंही देवीचीं चित्रें आणि तींही सिंहासनाधिष्ठित अशींच आढळतात.

जगदंबेचा उगम शोधायचा तर आपल्याला वेदकालापर्यंत जावें लागेल. ऋग्वेदांत ती अदितीच्या रूपानें वावरतांना दिसते. तिथें जें अदितीचें स्वरूप कल्पिलें आहे, तें अतिभव्य आणि महद्दिव्य असें आहे. ‘अदिति द्युलोकांत वास्तव्य करते. अंतरिक्षांतही तिचा संचार आहेच. विश्वाची माउली तीच आहे. ती भजकांना पापपंकांतून उद्धरते. ती आपल्या अपत्यांना सगळें कांहीं देते. भूत-भव्य सर्व कांहीं तीच आहे.’ तिच्या सामर्थ्याविषयीं वैदिक ऋषींची बळकट श्रद्धा आहे.

# तुळजा भवानी

" अदि॑तिर्न उरुष्यत्वदि॑तिः शर्म॑ यच्छतु
अदि॑तिः पात्वंह॑सः "

'अदिति आम्हांला वृद्धिंगत करो. ती आमचें कल्याण करो. तीच आमचें दुरितापासून रक्षण करो' अशी एका ऋषीची प्रार्थना आहे.

अदिति म्हणजेच परमात्मशक्ति. शक्ति आहे म्हणूनच परमात्म्याला परमात्मपण आहे. इच्छा, ज्ञान, आणि क्रिया या तीन स्वरूपांनीं ती विश्वांत प्रगट होते. शिव हें तिचें अधिष्ठान. शिवाहून ती अभिन्न आहे. पण शिव एकरूप तर शक्ति अनेकरूप. शिव एकरस तर शक्ति अनेकरस. शिव अनंग आहे, 'निकवडा' आहे आणि जुनाट जुगादीचा वृद्ध आहे. याच्या उलट शक्ति सांग आहे, समर्थ आहे आणि नित्यतरुण आहे. खुद्द शिवानेंच तशी कबुली दिल्याचें ज्ञानेश्वर सांगतात. शिवांतून शक्तीचा प्रादुर्भाव झाला कीं लगेच चौदा भुवनांची उभारणी होते. जीवसृष्टीचा पसारा मांडतो. चारी खाणींत नाण्यांची टांकसाळ सुरू होते. ही नामरूपें निर्माण करते. गुणांचा चाळढाळ हीच करते. शिव अकर्ता, अभोक्ता, उदास; पण ही पतिव्रता त्याला सर्व कांहीं भोगवते. त्याचे नाक, कान, डोळे हीच बनते. त्याचे भाव, त्याचे अवयव हीच निजांगें होते. हिचें हें अमर्याद कर्तृत्व जाणून सांख्यांनीं हिला 'प्रकृति' म्हटलें. ती इंद्रजाल खेळते, अघटित घटना घडवते म्हणून वेदांती हिलाच 'माया' म्हणूं लागले.

हिनें प्रथम दक्षाच्या घरीं जन्म घेतला. दक्षानें तिचें कन्यादान करून शिव जांवई केला. पण सासऱ्या-जावयांचें बनलें नाहीं. त्यानें जो यज्ञ केला त्यात शिवाला हविर्भाग ठेवला नाहीं. सतीला तो अपमान वाटला. तिनें त्याच यज्ञमंडपांत स्वतःचा देह योगाग्नींत जाळून दक्षाशीं असलेलें बापाचें नातें तोडून टाकलें. तीच पुढें नगाधिराज हिमाचलाच्या पोटीं आली. त्याही जन्मांत ऋषिमुनींना लाजवणारें तप करून तिनें शिवाचीच जोड करून घेतली. त्या दोघांचें पारमार्थिक लग्न लागलेलेंच

होतें. तेंच तिनें लौकिकांतही खरें करून दाखवलें. शिव तिला वरून अर्धनारीनटेश्वर झाला. या अलौकिक दंपतीला मग भक्तजन मायबाप म्हणून शरण गेले. शिवाची पूजा होऊनही शक्तीची पूजा स्वतंत्रपणें होऊं लागली. हळूहळू तिला प्राधान्य येऊं लागलें. आपल्या पंचायतनांत विष्णूची लक्ष्मी नाहीं; पण शिवाबरोबर देवीला मात्र स्वतंत्र स्थान आहे. पुढें तिचीं उपनिषदें, पुराणें, माहात्म्यें निर्माण झालीं. शक्तिसूत्रें, तंत्रग्रंथ आणि स्तोत्रकलाप असें बहुविध वाङ्मय तिच्या सेवेला सादर झालें. श्रीयंत्रासारखीं अनेक यंत्रें तिच्या पूजेसाठीं कल्पिलीं गेलीं. तिच्याकडून वेगवेगळया सिद्धि मिळवण्यासाठीं 'ऐं ऱ्हीं क्लीं' अशासारखे बीजमंत्र पुढें आले. दुर्गा, चामुंडा, तारा, कामाख्या, त्रिपुरसुंदरी अशा नानारूपांनीं तिचें अर्चन होऊं लागलें. भारतांत शाक्तपंथ हळूहळू वाढला, विस्तारला.

त्यांतच कित्येकांना देवीच्या कृपेसाठीं उजू उपचार अपुरे वाटून त्यांनीं वामाचार पत्करला. देवीचे उपचार या नांवाखालीं मदिरा, मदिराक्षी इत्यादि पंच 'मकारां'चा परिग्रह होऊं लागला. पुढें पुढें हे प्रकार इतक्या थराला पोंचले कीं, लोकांना या वाममार्गीयांची घृणा वाटूं लागली. छाकटा (शाक्त) ही नीतिभ्रष्ट माणसाला वापरण्याची शिवी बनली. त्यांनीं उपनिषदांतलें आणि दर्शनांतलें शक्तीचें मंगलोज्ज्वल स्वरूप मलिन करून टाकलें. आजमितीस हे भ्रष्टाचार नामशेष झाले आहेत हें सुदैवच म्हटलें पाहिजे.

बौद्ध आणि जैन धर्मही शक्तिपूजेला पराङ्मुख नाहींत. बौद्धांच्या महायान पंथांत वज्रधर आणि वज्रताराही यांचें युग्म उपास्य आहे. पूजेअर्चेची पद्धतही आपल्यासारखीच. त्यांची दुसरी विशेष देवता म्हणजे तारा. ओंकाराला 'तार' अशी संज्ञा आहे. त्याची भार्या ती तारा. तारेची विद्या आहे. तिचें रहस्य आहे. तारेविषयीं त्यांच्या पंथांत विपुल साहित्य आहे. हीनयान पंथांत देवीला मणिमेखला या नांवानें भजतात. तुफान वादळांतून ती वाचवते अशी त्यांची श्रद्धा आहे.

जैनधर्म ईश्वर मानीत नाहीं. त्याला तीर्थंकर मान्य आहेत. त्यांच्या चोव्वीस तीर्थंकरांची पूजा-अर्चा हिंदु पद्धतीप्रमाणेंच ते करतात. त्यांच्या तीर्थस्थानांत देवीच्या मूर्ति पुष्कळ आढळतात. प्रत्येक तीर्थंकराची एकेक शासनदेवता असते. चक्रेश्वरी, अजितचला, कालिका अशीं त्यांचीं नावें आहेत. राजस्थान प्रदेशांतल्या काम्यकवनांत नेमिनाथ या तीर्थंकराची शासनदेवता जी अंबिका तिची एक भव्य कोरीव मूर्ति आहे.




तिनें एक बालक आपल्या पोटाशीं धरलें आहे. खालीं सिंहवाहन, वरच्या मेहरपींत यक्ष-गंधर्व, माथ्यावर कमलासन नेमिनाथ, उजव्या अंगाला गणेश आणि डाव्या अंगाला कुबेर असा तिचा थाट आहे. मध्ययुगांतली

ती एक दर्शनीय कलाकृति आहे. मंदिरप्रतिष्ठेच्या वेळीं किंवा अनुष्ठानाच्या सांगतेला या देवतांचें आवाहन केलें जातें. जैनांच्या श्वेतांबर आणि दिगंबर या दोन्ही शाखांत शक्तीची उपासना आहे.

भक्तानें देवाचे गुण गावे हें ठीक ; कारण ती त्याची 'आवडीची धणी' आहे. पण जेव्हां एक देव दुसऱ्या दैवताचें महात्म्य सांगूं लागतो तेव्हा तें 'सूर्यें सूर्यासि ओवाळिलें। चंद्रें चंद्रम्या क्षेम दिधलें' अशासारखें अति गोड वाटतें. कुरुक्षेत्रावर भारतीय युद्धाचा रणखांब पुजण्याच्यापूर्वीं योगेश्वर श्रीकृष्णानें अर्जुनाला देवीचें स्तोत्र करायला सांगितलें. आणि लगेच पार्थ अंजलिपुट जोडून तिला स्तवूं लागला—

"हे कात्यायनि, महामाये! तूं सिद्धसमुदायांची नेत्री. तूं कपालधारिणी. शूल हें तुझें तिखट शस्त्र. तुझें हास्य उग्र. तूं विद्यांची महाविद्या. तूं प्राण्यांची महानिद्रा. तुला माझा सादर प्रणाम."

त्याच क्षणीं अष्टभुजा गगनाच्या निळावंतीवर झळकली. दशदिशांना धवल हास्य उधळीत तिनें अर्जुनाला पसायदान दिलें. 'अर्जुना! तूं नर आहेस. नारायण तुला साह्यकारी आहे. या युद्धांत तूं विजयश्रीचा नवरा होशील!' तीनशें वर्षांपूर्वीं स्वराज्यसंस्थापक शिवरायालाही हेंच दर्शन आणि हेंच वरदान जगदंबेकडून मिळालें होतें. तुळजाभवानी ही शिवाजी महाराजांची तशीच समर्थांचीही कुलस्वामिनी. शिवरायाची तिच्यावर अढळ निष्ठा होती. त्याच्या हातांतलें खड्ग हा भवानीचाच वरप्रसाद होता.

> "**एषाऽत्मशक्तिः। एषा विश्वमोहिनी।
> पाशांकुशधनुर्बाणधरा। एषा श्रीमहाविद्या।
> य एवं वेद। स शोकं तरति।**" — देव्यथर्वशीर्ष

शिवराय हें तिचें यथार्थ स्वरूप जाणत होता. जाणून तिला भजत होता. म्हणूनच तो शोकाला तरून गेला. एकटा नव्हे; तर सगळ्या महाराष्ट्रासह. कोणतेंही महत्त्वाचें राजकारण उद्भवलें कीं महाराज प्रथम देवीचा कौल घेत. त्यांचें काया-वाचा-मन पवित्र होतें, यज्ञमय होतें. म्हणून

ध्यान धरतांच त्यांच्या अंगांत भवानीचा संचार होत असे. ती त्याच्याच मुखानें भविष्यार्थ सांगे. देवीचीं अक्षरें बाळाजी आवजी शेजारीं बसून लिहून घेई. शिवाजीला जिता धरून आणण्याचा विडा उचलून जेव्हां अफजुलखान विजापुराहून निघाला तेव्हां महाराजांना तें मोठें अरिष्ट वाटलें. खानाच्या बाबतींत काय धोरण बांधावें याविषयीं संदिग्ध, सचिंत होऊन ते कुलस्वामिनीच्या चरणांशीं आले. त्या वेळीं अंगांत येऊन देवी काय वदली तें चित्रगुप्त सांगतो—

"अरे मुला! चिंता कां करतोस? तुजला माझा वर आहे. अरिष्ट दूर करीन. तुजला ही शिकारच साधून देत्यें."

अफजुलखान निघाला तो प्रथम तुळजापुरावर आदळला. त्यानें मनांत आणलें कीं, शिवाजी जिच्या बळावर एवढा पुंडावा माजवतो, ती त्याची देवीच जाग्यावर ठेवूं नये. तिचींच शकलें करावीं. पण तिथले बजाजी, चिलोजी, वाकोजी सावध होते. त्यांनीं देवीची मूर्ति उचलली आणि होमकुंडाजवळच्या पिंपळाखालीं आग्नेय कोपऱ्यांत असलेल्या ब्रह्मकूपांत सोडून दिली. खानाला वाटलें असेल कीं, देवी आपल्या चंड प्रतापाला घाबरून अदृश्य झाली. पुढें खानाचें धूड प्रतापगडीं कायमचें निजवल्यावर महाराजांना वाटलें कीं, ब्रह्मकूपांतली मूर्ति वर काढून आतां प्रतापगडावर आणावी आणि इथेंच स्थापावी. पण समर्थांना तो विचार रुचला नाहीं. त्यांनीं सांगितलें कीं, 'प्रत्येक देवतेला तिच्या विशिष्ट सामर्थ्यांप्रमाणेंच स्थानमहात्म्यही असतें. जथली देवता तिथेंच शोभायची.' गुरुवचन प्रमाण मानून महाराजांनीं मग तो बेत रहित केला. आज तो ब्रह्मकूप गुप्त आहे. पण यात्रेकरू न चुकतां त्या पाराला करस्पर्श करून तिथें माथा नमवतात.

इथल्या मंदिरांत मुसलमानांना प्रवेश आहे हें नवल नाहीं. कारण आजवर या प्रदेशाचे तेच कर्तुमकर्तुं समर्थ शास्ते होते. पण नवल तें हें कीं, त्या जातींतही भवानीचे भक्त आहेत. तिच्यावर श्रद्धा ठेवणारे, तिला नवस करणारे आणि पुजाऱ्याच्या हातून तिची पूजा बांधणारे. आणि त्याहून नवलाची गोष्ट ही कीं, इथल्या मातंगी देवीचे पुजारी

महार असूनही ब्राह्मणादि वर्ण तिची पूजा करतात आणि तिच्या मातंग-कुंडांत स्नानही करतात.

देवळाला प्रदक्षिणा करीत पुढें जात असतां नैर्ऋत्येच्या ओवरींत प्रल्हादास्तव स्तंभीं प्रगटणाऱ्या नृसिंहाचें दर्शन घडलें. या देवाला ना वतन ना वाडी. पण तरीही त्याला एक पुजारी लाभला आहे. त्याला नंदीबुवा म्हणतात. तो सकाळीं पूजा करतो, दुपारीं माधुकरी मागून देवाला महानैवेद्य करतो आणि त्या यज्ञशिष्ट विघस अन्नावर आपली वृत्ति चालवतो. पण सगळ्यांचीं भोजनें झाल्यावर मग नंदीबुवाच्या मुखांत ग्रास जायचा. त्याला नेहमींच उशीर. म्हणून एखाद्या दिवशीं कोणाच्याही घरीं जेवण अतिकाळलें कीं शेजारचीं माणसें विचारतात. ‘काय, आज जेवणाला नंदीबुवाची वेळ आणलीत ?’ स्थानपरत्वें जशा लोककथा तसेच अनेक विशिष्ट वाक्प्रचारही कानावर येतात. आपली मराठी भाषा संपन्न करायची तर ग्रंथच वाचून भागणार नाहीं. त्याबरोबरच कान, डोळे उघडे ठेवून संचारही करायला हवा.

उत्तरेच्या बाजूला मुख्य मंदिराच्या अंगाला लागूनच खंडोबा आहे. कुठल्याही क्षेत्रांत तुम्ही पहा. मुख्य देवता म्हटली कीं तिचा परिवारही तिच्या अवतींभोंवतीं असायचाच. आपली एकंदर उपासनापद्धति सांग, सपरिवार असते. कोणत्याही यज्ञक्रियेंतलें देवतापीठ पाहिलेंत तरी मुख्य देवतेच्या परिसरांत अष्टदिशांना निरनिराळ्या देवतांच्या नांवाच्या सुपाऱ्या ठेवलेल्या तुम्हांला दिसतील. विष्णूचा परिवार अष्टनायिका, अष्टलोकपाल, शिवाय गरुडादि अनेक वैष्णव यांचा असतो तर शिव-शक्तींच्या भोंवतीं भैरवगण खडे असतात.

तुळजापुरांतही भैरव आहेतच. मधल्या दरवाजाच्या बाजूनें थोडेंसें चढून गेल्यावर तुम्हाला टोळभैरव भेटेल. त्याची गोष्ट ऐकलीत तर तो खट्टू का दिसतो तेंही कळेल. यमुनाचळावर आपल्यासाठीं एखादें रमणीय स्थान पाहून ये, म्हणून देवीनें त्याला धाडलें. हा प्राणी आला तो इथेंच रमला. त्याला आपल्या सेवाधर्माची शुद्धच राहिली नाहीं. भवानी वाट पाहून कंटाळली आणि स्वतः वर आली. तिनें येऊन

त्याच्या टाळूवर जेव्हां एक थप्पड लगावली तेव्हां कुठें स्वारी भानावर आली.

टोळभैरवाच्या दक्षिणेस उंच जागीं काळभैरव आहे. तो इथला मुख्य कोतवाल. एका लहानशा जलाशयाच्या कांठीं त्यानें आपली चौकी उभारली आहे. तो तुम्हीं पैसा आणला आहे कीं नाहीं हें पहायच्या आधीं तुमच्या हातांत गांज्याची पुडी आहे का हें पाहील. रोजच्या पूजेनंतर त्याला एक चिलीम भरून द्यावी लागतेच. त्या तारेंत मग तो अष्टौप्रहर पहारा बजावतो.

अशा रीतीनें सगळया देवांचा आदर करून आम्ही पुन्हा एकदां जगदंबेच्या भेटीस गेलों. 'अंब, प्रसीद!' म्हणून पुन्हा एकदां तिला दंडप्रणाम केला. तिथून उपाध्याच्या घरीं आलों. त्याच्याशीं गोष्टी बोलत उपाहार केला. त्याची यथाशक्ति संभावना केली. त्यानें प्रसादा-सह दिलेलें देवीचें छायाचित्र घेतलें. मोटारीपर्यंत तो आम्हाला पोंच-वायला आला. नव्या यात्रिकांना तिथें उतरून अन् जुन्या यात्रिकांना आंत घेऊन गाडी घाट उतरूं लागली.

घाटशिळेकडे येताना लक्ष गेलें नव्हतें; पण जाताना तें गेलें. घाट-शिळा म्हणजे राम-लक्ष्मणांना दक्षिणापथ दाखवायला तुकाई जिथवर आली आणि जिथें निढळावर हात ठेवून त्यांची वाट पाहत राहिली ती जागा. घाटशिळेवर लहानसें मंदिर बांधलें आहे आणि त्याच्या सभोंवतीं खड्डा आहे. मंदिराच्या कळसाचा एक मोठा टवका उडालेला पाहून मीं शेजारच्या गृहस्थांना पृच्छा केली. ते म्हणाले, 'पोलिस कारवाईच्या वेळीं भारतीय सैन्यांतल्या गोलंदाजांनीं डागलेल्या तोफेचा तो प्रताप आहे.' रझाकार त्या मंदिराचा खंदकासारखा उपयोग करून राहिले होते. या धुमश्चक्रींत देवस्थानला यत्किंचित् धक्का लागूं नये अशी भारताच्या समरधुरंधरांची अपेक्षा होती. आणि हेंच ओळखून गनीम तिथून मारा करीत होता. अशा स्थितींत देवीनेंच सेनापतीला प्रेरणा दिली असावी. 'सुटूं दे गोळा. कळस भंगला तरी भंगूं दे. या आततायांचा संहार झाला कीं

मी तुम्हांलाच माझ्या माथीं कळस करीन.' आणि तोफेचा घनगर्ज उठला. त्याचा परिणाम जो व्हायला हवा होता तो झाला. अनेक मेले. उरलेले जीव घेऊन पळाले. भारताच्या हृदयांतलें शल्य उपटलें गेलें. जो गाजी होता तो—

पण जाऊं दे. त्याचा विशेष विस्तार नको. इतिहासानें त्याची तपशीलवार नोंद ठेवलेली आहे. आपण समर्थांच्या शब्दांत एवढेंच म्हणूं.

**"बोळता भवानी माता महींद्र दास्य इच्छिती**
**बोलणें हें प्रचीतीचें अन्यथा वाउगें नव्हे!"**

# ४ भीमाशंकर

मी कोणत्याही तीर्थक्षेत्रांत यात्रेच्या वेळीं सहसा जात नाहीं. यात्रा म्हटली कीं जनसंमर्द टाळणें अशक्य. जिकडे तिकडे माणसेंच माणसें झालीं कीं दृष्टि बहिर्मुख होते. चोहोंकडून शब्दब्रह्म उठत राहिल्यामुळें कान बधिर होतात. मन अंतर्नादाला मुकतें. नाम, रूप आणि रंग यांच्या पसाऱ्यांत नको असलेला संकोच जिवाला येऊन चिकटतो. संचाराला साहजिकच मर्यादा पडतात. मग निर्बंधपणें कांहीं पाहताही येत नाहीं आणि कशाशीं समरस होतांही येत नाहीं. समुदायाचें सुख भोगायचें असेल तर यात्रेंत जावें. पण त्याहून निराळें कांहीं मिळवायचें असेल तर

"रमाकांत एकांतकाळीं भजावा"

हेंच श्रेयस्कर. निवांतपणांत देव आपलासा होतो. तीं तीं स्थळेंही बोलकीं होऊन आपला इतिहास मौनाच्याच भाषेंत सांगूं लागतात. आपण मिळवलेलें पूर्वज्ञान मग वस्तुस्थितीशीं ताडून पाहतां येतें.

पण भीमाशंकर असा आडवळणाला आहे कीं, मनांत येईल तेव्हां तिथें जायला कसलीच सोय नाहीं. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते म्हणून त्याच वेळीं फक्त गाड्या, मोटारी त्या मार्गानें धांवतात. आधीं दोन दिवस लोकांना वर चढवायला आणि मग दोन दिवस वरून खालीं आणायला. आमची एस्. टी. ची गाडी सकाळीं सात वाजतां पुण्याच्या तळावरून सुटली आणि खेड-मंचरच्या रस्त्याला लागली. गाडींतले सगळे लोक भीमाशंकराचेच 'कापडी' होते. मंचरला थोडी विश्रांति करून तिथून तिनें वाममार्ग पत्करला. गाडी हळूहळू उताराला घसरूं लागली तेव्हांच मीं ताडलें कीं, पुढें एखादी नदी भेटणार आणि त्यापुढें घाटही चढावा लागणार. आंबेगांव पेट्यांतलें घोडेगांव हें त्या मार्गावरचें मोठें ठिकाण. तिथून यात्रेचा पोलिस-चंदोबस्त सुरू झाला होता.

आज त्या रस्त्याचें भाग्य उजळलें होतें. शेंकडों माणसें थव्याथव्यानें त्यावर आपलीं पदचिन्हें उमटवीत, गप्पागोष्टींची रंगत उडवीत भीमा-शंकराकडे निघालीं होतीं. बहुतेकांच्या हातांत शिदोऱ्या लटकत होत्या. बायकांच्या कडेखांद्यावर 'जानीं तानीं' मुलें मधेंच खुस-मुसत होतीं, मधेंच हसत होतीं. एका बुवानें ज्या एका अवगुंठनवतीला खांद्यावरून चालवलें होतें, ती तर चांगली घोडनवरी होती. मध्येंच 'कुण्या गांवचे पाटील' बैलगाड्या जुंपून चालले होते. त्यांच्या लेकी-सुना टोपपदरी लुगडीं नेसून आंत ठाण मांडून बसल्या होत्या. क्षणा-क्षणाला अधिकाधिक प्रखर होणाऱ्या दिनमणीला त्या ग्रामललनांची दयामाया नव्हती.

मध्येंच कोणी मावळचे शिलेदार तट्टांवर स्वार होऊन जातांना दिसत होते. मात्र ते एकांडे नव्हते. त्यांच्या मागें किंवा पुढें एखादें मूल त्यांना बिलगलेलें असायचें. सर्वांच्या चालींत बोलींत उत्साहाचा प्रत्यय येत होता. नेहमीं लहानशा वर्तुळांत फिरत राहणारे, ठराविक जीवन जगणारे ते लोक. त्यांच्या वांट्याला आज आनंदाचें पर्व आलें होतें. सगळीं कामें, सगळ्या विवंचना, मागें सारून ते भीमा-शंकराच्या दर्शनाला, तिथल्या वनविहाराला चालले होते.

माणूस एकदां वाहनांत बसला कीं तो त्याच्या अधीन होतो. वाहनालाही रस्त्याचें पारतंत्र्य असतेंच. पादचारी मात्र या बाबतींत खरा आत्मतंत्र. ज्या पोखरी घाटानें आम्हांला आतां वर चढायचें होतें त्याच्या प्रारंभालाच एक मोठें वांकण आहे. आमची गाडी तिथें पोहोंचते तों कांहीं माणसें रस्ता सोडून उजव्या बाजूनें सरळ टेकडी चढतांना दिसलीं. अर्धा-पाव मैलाचा फेरा वांचवून तीं पुन्हा रस्त्यावर उमटणार होतीं आणि पुढेंही सगळ्या घाटांत हाच क्रम चालवणार होतीं. पायीं प्रवास करणाऱ्यांना अशा युक्त्या सहजच सुचतात. त्यांत साहसाचा, नवी वाट मळवल्याचा, आनंदही मिळतो आणि तेवढीच चालही वांचते.

पोखरी घाट फार उंच नाहीं; पण लांबीला मात्र भरपूर

आहे. तो आडवा आडवा चढावा लागतो. एकेका वळणानें गाडी जसजशी वर चढूं लागली तसतसें खालचें दृश्य लहान लहान होऊं लागलें. पायथ्याजवळचीं चौकोनी भातखाचरें आकसलीं, घरें लहान मुलांच्या खेळांतल्यासारखीं वाटूं लागलीं आणि वृक्ष भुईसरपट झुडपें बनले. वर क्षितिजाचा परिघ वाढला. अष्ट दिशांनीं ओथंबून आलेलें निळें नभांगण पाहून सहजच वाटलें कीं, आपण धरतीमातेचीं लेंकरें नसून आकाशमाउलीचीं आहोंत. घाटातला रस्ता धड काळाही नव्हे, धड तांबडाही नव्हे, असा कांहींसा मिश्र रंगाचा आहे. बऱ्याचशा पिंजरींत थोडासा बुक्का मिसळून एकजीव करावा तशी ती धूळ दिसत होती. पायदळीं तुडवल्याचा अपमान सहन न होऊन ती मोटारीच्या माथ्यावर चढली कीं आमचा जीव कासावीस व्हावयाचा.

'माघ-फाल्गुन शिशिर ऋतु' असें आपण समजतों. पण हें ऋतुमान आतां जवळजवळ एका महिन्यानें अलीकडे सरकलें आहे. शिशिर ऋतूनें सरत्या माघांतच आपली कामगिरी आटोपून वसंताला आमंत्रण केलें होतें. वसंत–माधव आतां उमामहेश्वरांच्या वनमहोत्सवाची आइती करूं लागला होता. झाडांच्या मुळांतून सांठलेली शिशिराची पानगळ लोटून काढण्याच्या कामावर त्यानें प्रथम वाऱ्याची योजना केली होती, आणि तें काम चोख बजावल्यावर वसंत त्याला मकरंद-सुगंधाचें बक्षीस देणार होता. घाटांतले बहुतेक आंबे आरक्त, लुसलुशीत, पालवी पांघरून उभे होते. वसंताच्या सुरवातीला आंबा पालवणें म्हणजे फळांची आशा धरायलाच नको. 'यंदां तुम्ही आमचा पल्लवसंभार पाहूनच संतुष्ट व्हा,' असेंच जणुं ते आम्हाला सांगत होते. कुंदवेलींनीं टाकलेला फुलांचा बहर शेजारच्या करवंदींनीं उचलला होता. त्यांच्याचजवळ पण त्यांच्याहून उंच वाढून वांकलेलीं तोरणीचीं झाडें फलोन्मुख झालीं होतीं. त्या तोरणी, करवंदी आंब्यांना जणुं म्हणत होत्या. 'तुम्ही बापहो, बडे लोक. तुमच्या लहरी लोक चालवून घेतील. पण आम्हांला तुमचें अनुकरण करून चालायचें नाहीं. दरवर्षी फळांचे घड दाखवले तरच माणसें आम्हांला पुसणार!' घाटांत त्रिधारी

निवडुंगही कमी नव्हते. त्यांनाही वाटलें, सगळेंच रान फुलतें तर आपण तरी कां मागें राहावें! फुलवर-कोबीसारखीं पण विरळ आणि आमसुली रंगाचीं फुलें त्यांनींही आपल्या काड्यांच्या टोकांवर उमटवून दिलीं होतीं. गोरा कुंभाराच्या थोट्या हातांना नव्या अंगुली फुटाव्या तसें कांहींसें तें दृश्य मला दिसलें.

घाटांतल्या या नाना वृक्षजातींत जागोजाग डोळयांत भरत होते ते पांगारे. शिशिरानें त्यांचा पर्णमय पोषाख हिरावून नेलेला पाहून वसंतानें त्यांवर फुलांचा साज चढवला होता. त्यांच्या बारकया आडव्या डहाळयांना आमूलाग्र लाल, टोंकदार फुलें आलीं होतीं. कालिदासानें त्यांच्याबद्दल म्हटलें आहे : 'पांगाऱ्याच्या फुलाला वर्णप्रकर्ष असला तरी तें निर्गन्ध असल्यामुळें माझ्या हृदयाला वेदना होते. गुणांची सामग्री एकत्र आणण्याच्या कामीं ब्रह्मदेव पराङ्मुखच म्हटला पाहिजे.' पण मी मात्र त्यांच्या लालीवरच खुष झालों.

सूर्य माथ्यावर यायच्या आंतच आमची गाडी भीमाशंकराचा डोंगर चढली. पुण्यापासून सुमारें पाउणशें मैल तिनें मजल मारली होती. माणशीं दोन आणे यात्राकर दिल्यावरच आम्हांला क्षेत्राच्या सीमेंत प्रवेश मिळाला. आम्ही उतरलों तें एक लांबरुंद पठार होतें. तिथें बाजाराची मांडावळ चालू झाली होती. तो शिवरात्रीचा आदला दिवस होता, तरी आजपासूनच माणसांची मूस फुटली होती. पठारापासून देऊळ एका हांकेच्या अंतरावर होतें. तिकडे जाण्यासाठीं डागडुजी केलेला उताराचा रस्ता होता. सर्वांच्या आधीं तिथें हजर झाले होते ते आंधळे, पांगळे आणि बुवाबैरागी. त्यांनीं रस्त्याच्या दोहों बाजूंस सावली साधून आपापल्या जागा धरल्या होत्या. यात्रिकरूंचें मानस-शास्त्र पुरें अवगत असणाऱ्या कांहीं साधूंनीं मधें मधें धुम्या पेटवून आपापलीं देवतार्चनें मांडलीं होतीं. मस्तकीं जटाजूट बांधून, कपाळीं भस्माचे त्रिपुंड्र ओढून ते सावजें हेरूं लागले होते.

देवळाच्या परिसरांत जीं मोजकीं पांच-सात घरें आहेत, त्यांचीं अंगणें सारवून स्वच्छ केलेलीं होतीं व त्यावर मांडव उभारलेले होते. सहकुटुंब

सहपरिवार आलेल्या यात्रेकरूंनीं तिथें आपापले चौके मांडले होते. बायका भातपिठल्याच्या तयारींत होत्या. पुरुष पाण्याचा पुरवठा करीत होते. कोणी पत्रावळींना काड्या टोंचीत होते आणि कोणीं श्रीकृष्णाचा वसा घेतला होता कीं, 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार.' सगळ्यांना हवें नको पाहतांना घरधन्यांचा संभ्रम उडाला होता. यात्रिकांना पुण्याची तर त्या घरधन्याना अर्थप्राप्तीची ती पर्वणी होती. मींही एका घरीं डबा–पिशवी ठेवून दिली आणि हिंडायला मोकळा झालों.


त्यांतल्या त्यांत आज देवदर्शन सुकर होतें. मंदिरांत कोण्या यजमानाचा अभिषेक चालू होता. ब्राह्मण द्रुत लयींत रुद्राध्याय म्हणत होता. शिवाचा गाभारा खोल असायचा हें अगदीं ठरून गेलेलें आहे. येथेंही तो तसाच होता आणि प्रशस्त पिंडिकेंत एक ठेंगणेंच शिवलिंग अभिषेकपात्रांतून पडणारी जलधारा मस्तकावर घेऊन उभें होतें. बारा ज्योतिर्लिंगांच्या नामावळींतलें हें शिवलिंग आहे. 'भीमा उगमीं भीमाशंकर' असा त्याचा प्राकृत वाङ्मयांत निर्देश आढळतो. त्र्यंबकेश्वरीं शिवशंकर ब्रह्मगिरीच्या पायथ्याला राहिला आहे आणि ब्रह्मगिरि लांचलचक असला तरी तो दुय्यम दर्जाचा पर्वत आहे. तिथें वन-शोभेचीही त्या मानानें वाणच भासते. पण या सगळया उणीवा इथें सह्याद्रीच्या उत्तमांगीं निवास करून सदाशिवानें भरून काढल्या आहेत. त्र्यंबकेश्वराइतकेंच हें स्थानही पुराणप्रसिद्ध आहे.

"पुंजिष्ठेभ्यो निषादेभ्यश्च वो नमो नमः"

हें रुद्राध्यायांतलें नमन भीमाशंकराला ठीक जुळतें. इथें चारपांच कोळयांचीं घरें आहेत ते आपल्याला 'महादेव कोळी' म्हणवतात. इथें पुजारी या नात्यानें जे ब्राह्मण स्थायिक झाले आहेत त्यांच्या बरीच आधींची ही कोळीवस्ती असली पाहिजे. कोळी हे इथले आदिवासी. भीमाशंकर हा प्रथम त्यांचा आणि मग इतरांचा. ते त्याला 'गतिर्भर्ता प्रभुः साक्षी' करून या डोंगर-वस्तींत पिढ्यान् पिढ्या नांदले.

भीमाशंकराचें देऊळ अर्धें जुनें आणि अर्धें नवें आहे. ज्या जागी नंदी

बसलेला आहे तो भुयारासारखा दिसणारा भाग भक्कम काळ्या दगडाचा असूनही आज मोडकळीस आलेला आहे. गाभारा तेवढा जीर्णोद्धार करून नवा बांधलेला दिसतो. मंत्र्युत्तम नाना फडणिसांनीं या जीर्णोद्धाराला प्रारंभ केला आणि ते निवर्तल्यावर त्यांच्या धर्मपत्नीनें तें काम पुरें केलें. जुन्या-नव्या देवळांच्या मध्यें आजमितीस एक मोठें खिंडार आहे आणि त्यामुळेंच कुठेंही शिवाच्या गाभाऱ्यांत शिरूं न शकणारा सूर्यप्रकाश इथें 'घे घे' म्हणून आंत घुसतो. जुनें देऊळ आजच्यापेक्षा बरेंच मोठें होतें. नव्या देवळाचा घेर त्या मानानें लहान धरला गेला आहे. काळ्या, ताशीव दगडांनीं हेमाडपंती धर्तीवर या गाभाऱ्याची उभारणी केलेली आहे. पंचवटींतल्या काळ्या रामाचें



भीमाशंकराचें मंदिर

शिखर ज्या पद्धतीचें आहे त्याच पद्धतीचें हेंही आहे. तिथल्याच नारोशंकराच्या कटिबंधावर जशा मूर्ति कोरलेल्या

आहेत तशाच त्या इथेंही आहेत. देवळाला एक प्रदक्षिणा घातली कीं चतुर्मुख ब्रह्मा, वामन, परशुरामादि अवतार आणि गणपत्यादि देवता यांच्या मूर्तींची प्रमाणबद्ध अशी रांग पाहतां येते. दर्शनी भागाचें कोरीव कामही प्रेक्षणीय आहे. या देवाला सरकारकडून वर्षासन आहे आणि कांहीं जमीनही सोडलेली आहे. देवस्थानाची सर्व व्यवस्था सहा वहिवाटदारांकडे वंशपरंपरेनें चालत आलेली आहे.

एका चमत्कारिक प्रसंगानें भीमाशंकर इथें प्रगट झाला. चौदाव्या शतकाच्या मध्यकालांतली गोष्ट. एक माणूस इथें लांकडें तोडायला आला होता. त्यानें अनेक झाडें तोडलीं असतील; पण एका झाडाच्या मुळांत त्याच्या कुऱ्हाडीचा घाव बसतांच तिथून रक्ताचा प्रवाह सुरू झाला. त्याला वाटलें कीं, हें काय अरिष्ट ! कोणत्या अदृश्य दैवतावर आपली कुऱ्हाड बसली ? आणि आतां आपलें काय होणार ? पण त्याला एक युक्ति सुचली. त्यानें आपली 'तानपी' गाय तिथें आणली आणि त्या वृक्षमूलांत तिला आपल्या चारी धारा वरसायला लावल्या. त्या दुग्धधारेनें रक्तधारा शमवली आणि थोड्याच वेळांत तिथें एक शिवलिंग वर आलें. तोच हा बारा ज्योतिर्लिंगांतला भीमाशंकर. त्या शिवलिंगावर त्यानेंच पहिलें मंदिर उभारलें आणि मग हळूहळू त्याची सर्वत्र ख्याति झाली.

मी तें देऊळ आणि त्याचा परिसर न्याहाळीत उभा होतों. एवढ्यांत एक महान् घंटानाद कानावर आदळला. इतर लहान सहान घंटांचे आवाज त्या नादापुढें कःपदार्थ ठरले. मला एकदम पंचवटींतल्या नारोशंकराच्या घंटेचें स्मरण झालें. नंदीला उजवी घालून मी जुन्या देवळांच्या प्रांगणांत दाखल झालों. तिथें दोन जाडजूड खांबांच्या मधल्या लोखंडी दांडीला ती घंटा लोंबकळत होती. तिचें वजन तीन-चार मण सहज भरेल. दहा-बारा वर्षांच्या मुलाचासुद्धां हात पुरेल इतक्याच उंचीवर ती टांगलेली आहे. मोठ्या आकाराची पूजा करणें हा मानवी मनाचा धर्मच आहे. इथले पुजारी आणि यात्रेकरू या घंटेला शेंदूर फासून आपला पूज्यभाव व्यक्त करतात. मीं जवळ जाऊन तिचें

निरीक्षण केलें. घंटेच्या तोंडावर जी मानवी आकृति आहे ती कांहीं भारतीय नाहीं. ती बहुधा ख्रिस्तमाता व्हर्जिन मेरीची असावी. मूर्तीच्या मस्तकावरच्या चिन्हाला अजाणते लोक स्वस्तिक म्हणत असले तरी तो खराखुरा क्रॉस आहे. मूर्तीच्या पायांखालचा १७२९ हा आंकडा ती घंटा केव्हां ओतली तें वर्ष दर्शवीत असावा. नारोशंकराची घंटा वसईच्या चर्चवरून आणली आहे तशीच हीही १७३९ च्या सुमारास ठाणें जिल्ह्यांतल्या वाशिंद या गांवच्या एखाद्या पोर्तुगीज चर्चमधून आणली असावी असा अंदाज आहे. या दोन्ही घंटांचा घणघणाट हा विजयनाद आहे. मीं त्या विजयघंटेला म्हटलें कीं, अशीच निनादत रहा.

" आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम्
कुरु घंटे रवं तत्र देवताव्हानलक्षणम् "

मंदिर पाहून झाल्यावर पहिली आठवण कोणाची झाली असेल तर ती संतांच्या आवडत्या भिवरेची. मी पंढरपुरीं तिच्या वाळवंटांत लोळलों होतों आणि गाणगापुरीं अमरजेनें तिच्याशीं केलेल्या संगमावर स्नानही केलें होतें. 'आधीं कळस मग पायारे' म्हणतात तसा मुखाकडून उगमाकडे असा हा माझा उफराटा प्रवास होता. 'नदीचें मूळ आणि ऋषीचें कुळ पाहूं नये' ही म्हण सर्वांच्या परिचयाची आहे. ऋषीचें कुळ पाहायला गेलें कीं तिथें अकल्पित आणि पूज्यतेला धक्का देणारें असें कांहीं तरी आढळतें, त्या दृष्टीनें त्याच्या खोलांत शिरूं नये हें ठीक. पण नदीचें मूळ शक्य असेल तर कां न पहावें? नदी म्हटली कीं ती गिरिकन्याच असायची. कुठल्या तरी कडेकपारींत, दुर्गम, दुर्लंघ्य अशा उंच जागीं तिचा जन्म झालेला असतो आणि तें स्थान गांठायला माणसाला बरेच कष्ट सोसावे लागतात म्हणून कांहीं ही म्हण प्रचारांत आलेली नाहीं. खालच्या सपाटीवर आल्यानंतर अनेक वहाळ वोहळ मिळाल्यामुळें तिला जें सौंदर्य आणि वैभव मिळतें तें उगमापाशीं न आढळल्यामुळें एखाद्या व्यवहारी माणसानें ही निषेधार्थक म्हण बनवली असावी. पण जें मुखाजवळ नाहीं तें उगमाजवळ असतें हें जो तिथें

जाईल त्यालाच कळेल. त्या सौंदर्याची रुचिच वेगळी. प्रयागला गंगा-यमुनांच्या संगमावर स्नान करून आपल्या सर्व ज्ञाताज्ञात पातकांचें प्रक्षाळण झालें अशी धारणा होऊनही कित्येक माणसें हिमालयाचीं शिखरें चढूं लागतात आणि देह कष्टवून गंगोत्री, जम्नोत्रीची यात्रा करतात, यांतलें रहस्य हेंच आहे. रसिकता आणि धार्मिकता या दोन्ही भावनांचा तिथें परम संतोष साधतो.

पुजाऱ्याचा एक चुणचुणीतसा मुलगा देवळाच्या दारांत उभा होता त्याला मीं भीमेचा उगम कुठें आहे असें विचारलें. त्यानें लगेच अंगुलिनिर्देश केला. 'ह्या वरच्या झाडींत.' मी त्याचेंच मार्गदर्शन पत्करून मंदिराच्या डाव्या अंगाची टेकडी चढूं लागलों. तिकडे जायला रस्ता असा नव्हताच. होती ती प्रादेशमात्र अस्पष्टशी पायवाट. या चार दिवसांत ती मळणार होती, थोडी मोठी होणार होती आणि पुन्हा पुढच्या पावसाळ्यांत झाडींचें पांघरूण घेऊन झोंपणार होती. टेकडीच्या मध्यभागावर, ठेंगण्या झुडपांच्या वर्तुळांत एका कुंडाजवळ त्या मुलानें मला नेऊन उभें केलें. पुरुषभर खोलीचें काळया दगडांतलें तें कुंड



भीमा उगमाचें कुंड

होतें. आंत डोकावून पाहिलें तों पाण्याचा उगीच्च द्रवता दिसला. विश्वास ठेवायला तक्रार करणाऱ्या मनाला मीं बजावून सांगितलें कीं, ' भीमेचा उगम तो हाच !

त्रिपुरासुराला दग्ध करून त्रिनेत्र शूलपाणि याच जागीं विसावला असला पाहिजे. कळ फिरवतांच इच्छेनुरूप आकाशांत हवा तसा संचार करणारीं लोहमय, रौप्यमय आणि सुवर्णमय अशीं तीन पुरें त्या असुराच्या मालकीचीं होतीं. वरून गोळे टाकणाऱ्या आजच्या विमानांची ती पुराणकालांतली प्राथमिक आवृत्ति असावी. त्या पुरांतून तो देवां-मानवांवर अग्निवर्षाव करी. सर्व देव त्याच्या या अभिनव यंत्रसामर्थ्या-पुढें हतबल झाले. त्यांनीं महारुद्राला ' त्राहि भगवन् ' म्हटलें. पशुपति त्याच्या संहारासाठीं निघाला. आतां मी ज्या डोंगरावर उभा आहें त्याचाच त्यानें रथ बनवला. काळाला महाकाळ भिडला. पण त्रिपुरासुर रथयुद्धांत आवरेना. शेवटीं रुद्राला तिसरा भालनेत्र उघडावा लागला. त्यांतून प्रलयाग्नीचे स्रोत वर उफाळले आणि त्यांनीं वर घिरट्या घालणाऱ्या त्या तिन्ही पुरांची एका क्षणांत तीन चिमट्या राख करून वाऱ्यावर उधळली. त्यांतच तो त्रिपुरासुरही निवटला. संत्रस्त जनतेनें आणि सुरवृंदानें सुटकेचा निःश्वास टाकून शिवाचा जयघोष केला. तो उघडलेला डोळा पुनश्च मिटला. पण बाहेरचे श्रम आणि आंतली धग यांनीं शिवाच्या हिमधवल अंगांतून घामाच्या धारा सुटल्या. विश्वमंगलासाठीं, जगाला जीवदान देण्यासाठीं देह झुंजवतांना निघालेल्या त्या घर्मधारा ! त्यांच्यासारखें पावनतीर्थ दुसरें कोणतें असूं शकेल ? भीमक नांवाचा एक सूर्यवंशीय राजा, शिवप्रसादासाठीं तिथें तप करीत होता, तो या प्रसंगीं नेमका पुढें आला. त्रिपुराविजयामुळें भोळाशंकर हर्षाच्या भरांत होता. त्यानें तावडतोब ' वरं ब्रूहि ' म्हटलें. ' वरांहि वरायास पाहिजे समज ' म्हणतात ती भीमकाला होती. त्यानें वैयक्तिक क्षुद्र स्वार्थाला पुढें येऊं न देतां मागणें मागितलें.

" भगवन् ! या घर्मधारांची लोकपावनी पुण्यनदी होऊं दे ! "

शंकरानें ' तथास्तु ' म्हटलें. डोंगराच्या अंगांत जिरणारे ते घामाचे

लोट फिरून झुळझुळत वर उठले, तीच ही भीमरथी नदी. इथून ती खालीं देवळाच्या बाजूला असलेल्या मोक्षकुंडांत शिरली आणि तिथून पुढच्या प्रवासाला लागली.

हें मोक्षकुंड म्हणजे इथें आश्रम उभारून जपतपसाधन करणाऱ्या कौशिक मुनीच्या सामर्थ्याची साक्ष आहे. ऋचीक नांवाचा एक ऋषिकुमार होता. वंशाचा एकमेव अंकुर. त्यानें वेदाध्ययन केलें, गुरुदक्षिणा दिली, पण ' प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः ' ही गुरूची आज्ञा मात्र पाळली नाहीं. गृहस्थाश्रम न करतां तो तीर्थक्षेत्रें हिंडत राहिला. प्रवासांत एक दिवस पाण्याच्या आशेनें तो एका विहिरीच्या कांठावर वांकला; पण तिच्यांत पाणी नव्हतें. तो एक अंधकूप होता आणि त्यांत कांहीं अंगुष्ठमात्र मनुष्याकृति एका दुर्बळ तंतूला धरून लोंबकळत होत्या. ऋचीकाला तें अद्भुत वाटलें. त्यानें त्या दुर्दैवी जीवांना विचारलें, ' तुम्ही कोण आणि तुमची अशी अधोगति कां ? ' विचारता, पुसता भेटल्यावर त्यांच्या दुःखाला वाचा फुटली.

" ऋचीक हा ऋषिकुमार कदाचित् तुझ्या कानावर आला असेल. आम्ही त्याचे पूर्वज. त्यानें भार्यापरिग्रह केला नाहीं, वंशपरंपरा खुंटवली, हव्य कव्य बुडविलें, म्हणून आम्हांला स्वर्गांतून लोटून देण्यांत आलें आहे. आतां आम्ही असेच खितपत पडणार. ज्या तंतूला लोंबकळतों तो तुटला कीं याहून खालीं अंधतामिस्र लोकांत बुडणार. देहपातानंतर ऋचीकालाही हेंच ताट वाढून ठेवलेलें आहे. ' अपुत्रस्य गतिर्नास्ति ' हें तो विसरला आहे. "

जें आश्चर्य म्हणून ऋचीकाला वाटलें तें त्याच्याच अंगाशीं येऊन भिडलें. त्याला आपल्या पितरांची ती दुर्दशा पाहवली नाहीं. त्याला कन्या तर वरायची नव्हती; पण पितरांचा उद्धार मात्र करायचा होता. इथें आल्यावर कौशिक मुनीनें त्याला या विवंचनेतून सोडविलें. त्यानें आपल्या अंगणांत एक कुंड निर्मून त्यांत आपल्या कमंडलूंतलें पाणी ओतलें. लागलीच भीमाही त्यांत शिरली. ऋचीकानें तिथें स्नान आणि पितृतर्पण करतांच त्याचे ते अंधकूपांत लोंबकळणारे

पितर उद्धरून मुक्त झाले. त्या दिवसापासून या कुंडाचें नांव 'मोक्ष-कुंड' पडलें. वरून आलेला भीमेचा ओढा इथूनच पुढें जातो. आज त्या प्रवाहांतला रस सूर्यानें पुसून टिपून घेतला असला तरी वर्षाकाळीं तो दामदुपटीनें परत मिळेल याची मला खात्री होती. इथून खालीं अर्ध्या कोसाच्या अंतरावर भीमेचा प्रवाह एका खडकावरून खालच्या घळींत कोसळला आहे आणि शंकरानें गुप्तपणें खालीं राहून तो मस्तकीं झेलला आहे. हिमगिरीवरचें गंगावतरण, तसें सह्यगिरीवरचें हें 'भीमावतरण.' त्या स्थानाला 'गुप्त भीमाशंकर' असें नांव असून तिथेंच एका वृक्षाच्या छायेंत साक्षी विनायक आहे.

गुप्त भीमाशंकर पहायला जायचें तर तें एकट्याचें काम नव्हे. त्यासाठीं चांगली खंबीर सोबत हवी. भीमेच्या कडेकडेनें जाणाऱ्या उताराच्या रस्त्यानें बरेंचसें खालीं गेल्यावर उजवीकडे वळावें लागतें आणि घनदाट कारवीचें रान दोन्ही हातांनीं बाजूला करीत एकेक पाऊल टाकावें लागतें. असली गर्द झाडी म्हणजे वाघोबाचा बालेकिल्लाच तो. या ठिकाणीं कुठल्याही जागीं त्याचें अस्तित्व शक्य आहे. इथें लोकवार्ताच आहे कीं, रोज भर मध्यरात्रीं वाघ शिवदर्शन घेऊन जातो. खरें म्हणजे हें वन्य पशूंचेंच निवासस्थान. माणूस तिथें रहातो तो त्यांच्या हक्कावर गदा आणून.


तीन हजार फूट उंचीवरून उडी घेणाऱ्या भीमेनें तिथून पुढें पूर्वेकडे कल घेतला आहे. भीमनेरच्या खडकाळ प्रदेशांतून छत्तीस मैल ती अवखळ वनकन्येसारखी हुंदडत धांवते. वाडें, खेड या गांवांजवळून पुढें पिंपळगांवांपर्यंत तिचा प्रवास झाला कीं, तिथें उजवीकडून तिला पहिली सखी येऊन भेटते ती भामा. दोघी हितगुजें बोलत गळां मिठी घालून निघाल्या कीं तुळापुराजवळ इंद्रायणी त्यांना विचारते, 'मी येऊं तुमच्यांत?' मग दोघींच्या ऐवजीं तिघी होतात. तुळापुराहून ती दक्षिणेकडे वळते आणि हवेली तालुक्याला कव घालते. तळेगांवदाभाडे या गांवाच्या दक्षिणेस पांच मैलांवर तिला वेल नदी मिळते. तिथून ती ईशान्यवाहिनी होऊन महाळुंगीकडे जाते. रांजणगांवाजवळ मुळामुठा

ही संयुक्त नदी तिच्यात शिरते. तिथून वळणें वांकणें घेत ती आग्नेयी-कडे चौदा मैल वाहिल्यावर घोडनदीशीं तिचा संगम होतो आणि पुढें पुणें जिल्ह्याच्या आग्नेय टोकाजवळ ती नीरानदीला आत्मसात् करते.

भीमा ही सरिता असली तरी ' तटिनी ' नाहीं.

" यास्यति जलधरसमयस्तव च समृद्धिर्लघीयसी भविता
तटिनि तटद्रुमपातनपातकमेकं चिरस्थायि "

' पाऊसकाळ निघून जाईल. तुझी जलसंपदा आटेल. हे सरिते, मग तुझ्या वांट्याला उरेल तें वर्षाकाळीं तटवृक्ष उन्मळून विध्वंसिलेस त्याचें पाप ! ' हा बोल जगन्नाथपंडित भीमेला लावूं शकणार नाहीं. तिचीं उभय तीरें अति सखल आहेत. इंद्रायणी मिळाल्यावर तर पुरानें वाहून आणलेल्या गाळानें तीं भरून गेलेलीं आहेत.



देवीचें मंदिर

सूर्य डोक्यावर आला होता तरी उन्हांत विशेषसा चटका नव्हता. वाराही अकारणबंधु झाला होता. त्यामुळें पाय जसे न सांगतांच पुढें पडत. तो मुलगा म्हणाला, ' या, तुम्हांला देवीचें देऊळ दाखवितों. ' आम्ही तसेच आडवाटेनें पुन्हा मोटारतळावर आलों. तिथेंच खालच्या बाजूला तें मंदिर आहे. त्यांतली अधिष्ठात्री देवी देवांनाही दुस्साध्य असें एक वीरकृत्य पार पाडून तिथें वारा घेत बसली आहे. दुर्धर्ष

दैत्याला तिनें एका मुष्टिप्रहारानें यमदूतांच्या हवालीं केलें. ब्रह्मदेवानें कृतज्ञ होऊन कमळांनीं तिची पूजा बांधली म्हणून लोक तिला ‘ कमळजा ’ म्हणतात. आम्ही तिथें पोंचलों तेव्हां बरेचसे जानपद तरुण तिच्या अंगणांत घोळका करून उभे होते आणि आळीपाळीनें तिथली वाटोळी धोंड उचलून आपल्या बळाची परीक्षा देत होते.


देवीच्या देवळापासून थोड्याच अंतरावर ‘ कोंकणकडा ’ आहे. तो जर पाहिला नाहीं तर इथें येण्याचे श्रम व्यर्थ ! तीन हजार फूट उंचीवरून पाहिलेलें तें कोंकणचें विशाल, विहंगमदृश्य मी तरी जन्मांत कधीं विसरणार नाहीं. आम्ही जिथें उभे होतों ती जागा दोन डोंगरांच्या हातमिळवणीची होती. त्यामुळें आमच्या खालच्या भागाला साहजिकच एक अर्धवर्तुळ निर्माण झालें होतें. उजव्या हाताचा तो उभा कडा मधल्या काळ्या कातळानें कालयवनासारखा भासत होता. खालच्या कोंकणभूमीवर धुक्याचा एक विरळसा थर माडून राहिला होता त्यामुळें त्याला गूढरम्यता आली होती. मध्याह्नसूर्याला वांकुल्या दाखवीत तिथें ठाण मांडून बसलेल्या त्या बाष्पाची मला शहामत वाटली. त्या सरपोसाखालीं समुद्र कुठें आहे, जमीन कुठें आहे आणि झाडेंमाडें कुठें आहेत तें आम्हांलाच काय, पण रवीलासुद्धां स्पष्टसें दिसत नसावें. तें जाणायला आणि उलगडून दाखवायला कवीचीच गरज होती. चिपळूणच्या परशुरामाजवळ मीं पाहिलेलें धुकें तामस आणि प्रमत्त होतें तर हें सात्विक आणि शांत होतें. उजव्या बाजूला सर्वत्र प्रकाशच प्रकाश खेळत होता. डाव्या हाताला छायेनें आपलें राज्य थाटलें होतें. दोघांनाही आपल्या घरीं आसरा देऊन सह्यराजानें आपला समभाव दाखवला होता. वरची हिरवी वनराजि, मधले काळे कडे, खालची निळी ‘ माया ’, सगळे रंग कसे मित्र बनून इतरांना भूषवीत होते. ती लांबवर पसरलेली पर्वतांची रांग आणि खालचा पार क्षितिजाला जाऊन भिडलेला तो अनंत, अपार असा समतळ प्रदेश ! मी सहस्राक्ष असतों तरच मला ती विशालता दृष्टींत सांठवून घेतां आली असती.

सहज डाव्या बाजूला पुन्हां लक्ष गेलें तर बरींच माणसें कणीच्या वाटेनें वर चढतांना आढळलीं. ठाणें-कल्याणच्या बाजूनें तीं आलीं होतीं. भीमाशंकराची यात्रा म्हणजे संस्कृतिसंगम आहे. कोंकण आणि देश तिथें एकत्र सरमिसळ होतात. मी तिथला बाजार हिंडायला लागलें तर मावळांतल्या बायकांपेक्षां कातकरी आणि ठाकूर जातीच्या स्त्रियाच अधिक दिसल्या आणि उठूनही दिसल्या. जणुं आपल्या घरचाच समारंभ अशा भावनेनें त्या स्वच्छंद विहरत होत्या. कातकरणी सोळा हात लुगडें असलें तरी अंगाबरोबर अगदीं टांचगें नेसतात. डोंगरांतल्या कांट्याकुट्यांतून आणि आडव्याखाडव्यांतून वावरायचें तर लुगड्याचे फलकारे काय कामाचे! ठाकुराणींना तर पदरच नसतो. दोन्ही जातींत दागिन्यांची हौस मात्र अनिवार. रानच्या वेली जर पानांफुलांनीं तुरभुरून राहतात तर आपणही तसेंच असावें अशी त्यांचीं समजूत असेल. गळ्यांत रंगी बेरंगी मण्यांच्या एकावर एक चढवलेल्या माळा, दंडांत चांदीच्या वांक्या, बोटांत चांदीचीं नाणीं बसवलेल्या आंगठ्या, चांदीचेच दुहेरी गोठ आणि त्याखालीं हातभर कांकणें आणि असेच अन्य कांहीं. एकेका बाईला लंकेची पार्वती केली तर त्या अलंकारांचें शेर दोन शेर वजन सहज भरेल. त्यांच्या साळंकृतपणाची तुलनाच करायची तर तिथल्या रामेठ्याच्या झुडपांशींच करावी लागली असती. जुन्या काळच्या बायका बुगड्यांखालीं सुपारीएवढा मोत्येंजडित घोस लोंबवीत तशा प्रकारच्या गेंदेबाज, केसरयुक्त फुलांनीं तीं ठुसकीं झुडपें अक्षरशः लवलीं होतीं.

शिवरात्रीला इथें सर्व प्रकारचा बाजार मोठ्या प्रमाणावर भरतो. इथलीं माणसें वर्षाचा पुरवठा याच वेळीं करून घेतात. कडधान्यें आणि मसाल्याचे जिन्नस यांचा पुष्कळसा व्यवहार विनिमयावरच चालतो. नाचणे, वऱ्या, आपल्याकडच्या द्यायच्या आणि मोबदल्यांत इतर धान्यें आणि हिंगजिरें वगैरे संसारोपयुक्त वस्तु घ्यायच्या. प्राचीन कालीं सररास सुरू असलेली ही प्रथा भीमाशंकरानें अद्ययावत् आणून ठेवली आहे. पूर्वीं असेंच असे. मेंढ्या द्यायच्या आणि गाय

घ्यायची. गायी घायच्या आणि यज्ञासाठीं सोमवल्ली खरीदायची. पुढें विनिमयाला एक सोयीस्कर मध्यस्थ म्हणून नाणें निर्माण झालें. आणि त्या दिवसापासूनच माणसाच्या मनांत संग्रहाची, राखून ठेवण्याची, वासना निर्माण झाली. जें साधन होतें तें साध्य बनलें. 'लोभमूलानि पापानि' म्हणतात तसा तिथूनच सगळ्या पापांचा उगम झाला. 'दाम करी काम' हा आजच्या युगाचा बीजमंत्र. त्या काळीं 'घाम करी काम' अशी धारणा होती. श्रमल्यावांचून, कांहीं तरी निर्माण केल्यावांचून, त्या काळीं अन्य कांहीं मिळवतांच येत नसे. व्यवहाराच्या सुलभतेसाठीं पैसा निर्माण केला गेला; पण माणसानें जन्माला घातलेला हा भस्मासुर, माणसाच्याच टाळूवरून हात फिरवून विकट हास्य करतो आहे.

इथल्या हनुमान तळयाजवळच्या मारुतींचें दर्शन घ्यायचें असेल तर



हनुमान तळें

भीमाशंकराच्या उजव्या अंगाची एक टेंकडी चढायला हवी, एक उतरतें पठार आक्रमायला हवें आणि पुन्हा दुसऱ्या एका टेंकडी-च्या मुळाशीं यायला हवें. अर्ध्या कोसाची ती वाट आहे. तिथें एक

गोसावी मठ उभारून राहतो. उत्तर हिंदुस्थानांतून कुठून तरी येऊन आज दोन तपें तो इथें जगाचा संबंध तोडून राहिला आहे. 'एकाकी न रमते' या सिद्धांताचा तो अपवाद आहे. वृक्षवल्ली आणि वनचरें हींच त्याचीं सोयरीं. तो एकला असला तरी विटलेला नाहीं. नाना जातींचीं फुलझाडें त्यानें आंगणात लावलीं आहेत आणि समोरच्या काळया दगडांनीं बांधलेल्या तळयाचें जीवन पाजून वाढवलीं आहेत. बागेला लागूनच उजव्या अंगाला त्याची अग्निशाळा आहे. अष्टौप्रहर प्रज्वलित असलेला तो कुंडांतला अग्नि त्याचा अतिथि आहे आणि संरक्षकही आहे. लांडगे, वाघ वगैरे हिंस्र पशु त्याच्या जागेंत पाय टाकायला धजत नाहींत ते त्या अग्नीच्या भयानेंच. तळयाच्या वरच्या बाजूला लहानशा खोपटांत एक मारुति आहे, त्यालाही तोच शेंदूर माखतो. त्याच्या एकांतांत आणि साधनेंत जनसंपर्काचा व्यत्यय कधीं येत असेल तर तो या शिवरात्रीच्या प्रसंगींच.

सगळें फिरून आम्ही मूळपदावर येतों तों अस्तमान झालें होतें. माणसांची आवक मोठ्या प्रमाणावर वाढली होती. पठार आणि मंदिर यांच्यामध्यें अव्याहत रहदारी सुरू झाली होती. घंटानाद अविरतपणें उठूं लागले होते. लोकांची आमोद-प्रमोदाची रात्र उगवली होती. दुकानदारांनीं दिव्यांच्या लखलखाट केला होता. वरती तारामंडळ चमचम करीत होतें. एवढा समाज आमच्या गोव्यांत एकत्र जमला असता तर तिथल्या देवस्थानसमितीनें त्याच्या समाराधनासाठीं एखादा निःशुल्क नाट्यप्रयोग योजला असता. आमच्या हरवळें या गावीं अशीच मोठी शिवरात्र भरते. तिथें प्रेक्षक-गण रात्रभर नाटक पाहतो आणि झुंजुमुंजु होतांच तिथेंच उंच कड्या-वरून कोसळणाऱ्या दुग्धधवल धबधब्याखालच्या भीमकुंडांत स्नान करतो. हरवळयाला पांच गुंफा असून त्या पांच पांडवांनीं खोदल्या अशी समजूत आहे. लोककथा असें सांगते कीं पांडव वनवासांत असता तिथें गेले होते. त्यांना तें स्थान सुंदर वाटलें. एका रात्रींत पांचांसाठीं पांच गुहा तयार होऊन तिथें महाप्रसाद करतां आला

तर तिथेंच वनवासाचा पुढील काळ घालवायचा असें त्यांनीं ठरविलें. पांचांनींही कंबरा कसल्या. गुंफा तयार झाल्या. द्रौपदीनें घाईघाईनें स्वयंपाक केला. धर्मानें वैश्वदेव केला आणि काकबाळे टाकण्यासाठीं तो बाहेर येतो तोंच कावळ्यानें 'कॉं' केलें. भोजन होण्यापूर्वीं तो ओरडला. आपल्या मनोरथावर पाणी पडलेलें पाहून भीमाला निराशेचा संताप झाला आणि त्या भरांत त्यानें आपली गदा भूमीवर आदळली. त्यासरशीं तिथें महाकुंड निर्माण झालें आणि वरच्या प्रपातानें तें लागलीच भरून काढलें. पांडव निघून गेले; पण तें भीमकुंड कायम राहिलें. हरवळ्यांच्या भीमकुंडाशीं भीमाशंकराच्या मोक्षकुंडाची तुलनाच होऊं शकणार नाहीं.

# ६ वेरूळचा घृष्णेश्वर

जी. आय्. पी. लोहमार्गाला मनमाड स्टेशनवर निजामराज्य रेल्वेचा फांटा फुटतो. मनमाड ते औरंगाबाद हें अंतर आगगाडी अडीच-तीन तासांत तोडते. श्रीमंत लोकांना उतरायला इथें स्टेट हॉटेल आहे. पण आमच्यासारख्यानें तें इंद्रभुवन 'दूरतः परिवर्जयेत्' असेंच मानलें पाहिजे. मोटारींतून त्याच्या प्रांगणांत शिरणाऱ्या एका धनपतीला मीं मनांत म्हटलें कीं, 'तुझीच एवढी ऐट नको. तुझ्या निवासापुढचाच हा बंगला पाहून ठेव. बागेंत कारंजं उडत आहे. ओटीच्या पायऱ्यांवर "मनरंजनी"ची कमान आहे. औरंगाबादचे सेशन्स जज्ज श्री. बळवंतरावजी घाटे तिथें रहातात. मी त्यांचा पाहुणा आहें. जें तुला भारंभार पैसें ओतूनही लाभणार नाहीं, तें सज्जनाच्या घरचें प्रेमळ तत्पर आतिथ्य मला तिथें लाभेल.'

दुसऱ्या दिवशीं पहांटे घाटेसाहेबांच्या अभंगमय प्रातःस्मरणानें आम्ही जागे झालों. आम्हांला लवकर निघायचें होतें आणि देवगिरीचा किल्ला नि वेरूळचीं लेणीं पाहून सूर्यास्ताच्या आंत परत यायचें होतें. लेण्यांबद्दलची ख्याति मीं वाचली होती आणि अनेक रसिक कलाविदांच्या तोंडून ऐकलीही होती. 'काशीस जावें, नित्य वदावें' त्याप्रमाणें अनेकदां बेत रचतां मोडतां आज मी त्यांच्याजवळ येऊन ठेपलों होतों. मंदिराच्या गाभाऱ्यांत चंदनी उदबत्तीचा सुगंध भरून रहावा तशी अंतरांत उत्कंठा दाटली होती. स्वतंत्र मोटार ठरवूनच आम्ही निघालों. आमच्या जोडीला एक शीख जोडपेंही मिळालें. शहराच्या बाह्य भागाचा रस्ता फुललेल्या गुलमोहोर वृक्षांच्यामधून जात होता. लाल शेंदरी रंगाच्या फुलांनीं ते नुसते आच्छादले होते. फुलांच्या भाऊगर्दीत पानांना जागाच उरली नव्हती. खालींही सगळा खच पडला होता तो फुलांचाच. ते वृक्ष म्हणजे जसे कांहीं यादवांचे अतिरथी–

महारथी, नुकतेच अल्लाउद्दिन खिलजीच्या सैन्याशीं मुकाबला करून आले होते. पुढच्या मार्गांवर वडाच्या फांद्यांनीं हिरव्या, दाट कमानी उभारल्या होत्या. उजव्या हाताला ओसाड डोंगरांची रांग उंटाच्या काफिल्यासारखी अविच्छिन्न उभी होती. ती कुठून सुरू झाली होती आणि कुठें जाऊन थांबणार होती देव जाणे! पण वेरूळच्या लेण्यांपर्यंत ती जाणार होती एवढें नक्की.

सुमारें दहा मैलांवर डाव्या हाताला दौलताबादचा काळाकभिन्न किल्ला दिसला. त्याचा अनादर करून पुढें जाणें शक्य नव्हतें. भरल्या कुटुंबांतून, नांदत्या गोकुळातून फुटून निघून एखाद्या आपमतलबी पुरुषानें 'वेगळाचार' मांडावा, तसा त्या डोंगरओळींतून बाजूला झालेल्या एका डोंगरावर त्या किल्ल्याची उभारणी झालेली आहे. त्याच्याभोंवतीं किती तरी तट आहेत आणि ते आतां ठायीं ठायीं ढासळले आहेत. आज ज्या ठिकाणीं झाडी वाढली आहे आणि जिच्या आश्रयानें कोल्हे, लांडगे आणि जीवजिवाणू निश्चिंतपणें राहिले आहेत तिथेंच एका काळीं भिल्लम यादवानें स्थापलेली देवगिरीची राजधानी वैभवानें झगमगत होती. तेराव्या शतकाच्या अखेरीस राजा रामदेवरावाच्या कारकीर्दीपर्यंत तिथें धनाचे पूर लोटत होते. नवलाख दिव्यांच्या द्वारकेसारख्या तिथें रत्नांच्या ज्योति आणि माणिकांच्या वाती पाजळत होत्या. हा किल्ला त्या वेळीं डोंगराच्याच नव्हे तर सद्दीच्याही शिखरावर होता. त्याच्याकडे कोणी वांकड्या डोळ्यांनीं पाहूं शकत नव्हता. पण चक्रनेमिक्रम कोणाला चुकला आहे! प्रथम नाशाला टपलेली काळाची आणि नंतर धनाला वखवखलेली अल्लाउद्दिन खिलजीची नजर या राजधानीवर वळली, रामदेवरावाचे नवग्रह पालथे पडले आणि यादवसाम्राज्याचा सूर्यास्त झाला. हा किल्ला यादवांचें बारसें जेवला तसेंच त्यांचें बारावेंही त्याला जेवावें लागलें. केवढा तो त्याचा खोल खोल खंदक! कुठून तरी जलसंघाट आणून तो भरून ठेवलेला असे. आणि त्याला लागून एकशें-पन्नास फूट उंचीचा तो काळवथर कडा, सर्व बाजूंनीं जणूं ओळंबा लावून उभाच्या उभा छिनून

काढलेला आहे. त्याच्यावरून चढायचा प्रयत्न करणाऱ्यानें एकदम स्वर्गद्वारच गांठावें. जसा अनुल्लंघ्य तसाच अभेद्य. पण जगांत फितुरीला अभेद्य असें काय आहे? किल्ल्यांत दाणागोटा भरपूर आहे या खात्रीवर रामदेवरावानें अल्लाउद्दिनाच्या वेढ्याला छाती दिली; पण ऐन वेळीं कोणत्या तरी अघटित घटनेनें कोठारांतलीं धान्याचीं पोतीं मिठाचीं पोतीं झालीं आणि दैवाला निखंदीत रामदेवरावाला दातीं तृण धरावें लागलें.

किल्ला उतरून आम्ही पुढें निघालों तर रस्त्यावरच्या कमानींतून बाहेर पडायच्या आंतच आम्हांला सरस्वतीचें वाहन भेटलें. पण आमची चाहूल लागतांच तें पाठ फिरवून आणि पिसाऱ्याचा संकोच करून खालच्या जाळींत तुरतुरलें. मी एक शारदेच्या दरबारातला लहानसा 'छडीदार'. त्याचें माझें उपास्य एक. असें असतां त्यानें मला वाळींत टाकल्यासारखें करावें हें मनाला रुचलें नाहीं. पण ही खिन्नता पुढच्याच क्षणाला भरून निघाली. त्यापुढें जे चारपांच मोर होते त्यांनीं रस्त्याच्या उजव्या बाजूकडून डाव्या बाजूला लंघण मारतांना आमच्या गाडीवर रंगीत पिसाऱ्याची कमान केली आणि मला धन्य धन्य वाटलें. दिलीप-सुदक्षिणेपेक्षांही आम्ही भाग्यवान् होतों. त्यांच्या रथावर बिनखांबाचें तोरण उभारलें होतें तें नदीकांठच्या सारसपक्ष्यांनीं. पण सारसांपेक्षां मोरांचा दिमाख न्यारा हें काय सांगावयाला हवें!

साम्राज्यतृष्णेचा ओतीव पुतळा औरंगजेब जिथें अस्मानांतल्या चांदण्या मोजीत निळ्या घुमटाखालीं कायमचा पहुडला आहे, तें खुलताबाद गांव ओलांडून आमची मोटार घाट चढूं लागली. दुसऱ्या बाजूनें उतरल्यावर आमच्या सारथ्यानें एका वळणावर गाडी उभी करून म्हटलें, 'ही उजव्या हाताला लेण्यांची रांग सुरू झाली. पहिल्या क्रमांका-पासून पहायला सुरू करा. तोंवर मी गांवांतून माहितगार घेऊन येतों.'

बाहेर धरणी तापली होती. डोंगर रसरसत होते. अंगाची उकडहंडी होत होती. पण पहिल्याच गुंफेंत त्या डोंगराच्या पोखरलेल्या पोटांत जेव्हां आम्ही शिरलों, तेव्हां एकदम हायसें वाटलें. यंत्राच्या साह्यानें

हवामान समधात राखणाऱ्या एखाद्या प्रेक्षागृहांतच जणूं आम्ही प्रवेशलों होतों. मन हळूच कुजबुजलें. 'आतां हिंडूंबिंडूं नकोस. इथेंच आडवा हो. कसे गप्‌कन डोळे मिटतील.' इथें क्रमानें एक ते बारा गुहा बौद्धांच्या आहेत. पुढें सभामंडप, बाजूंना भिख्खूंच्या ध्यानधारणेसाठीं बारक्या बारक्या गुहा, समोर गाभारा, दोहीं अंगीं वज्रपाणि आणि पद्मपाणि हे उभे द्वारपाल, आणि गाभाऱ्यांत बुद्धमूर्ति हेंच सर्वत्र एका साचाचें शिल्प. आंतहि तेंच, बाहेरच्या पडवींतहि तेंच, आणि भिंतीं-वरहि जागजागीं तेंच. 'सर्वं बुद्धमयं जगत्!' फरक कुठें असलाच तर तो गाभाऱ्यांतल्या बुद्धमूर्तीच्या आसनबंधांत. कुठें तो दोन्ही पाय खालच्या कमळावर सोडून बसलेला दिसतो तर कुठें त्यानें पद्मासन घातलेलें असतें. बुद्धाची ध्यानमुद्राच त्यांनीं सर्वत्र कोरलेली आहे. नेत्र मुकुलित आणि डाव्या हाताची करंगळी उजव्या हाताच्या चिमटींत धरलेली. जणूं तो मानवजातीला करपल्लवी भाषेंत सांगतो आहे. 'जगांतल्या पर्वताएवढ्या दुःखावर या करंगळीच्या टोकाएवढें लहानसें पण राम-बाण रसायन आहे. वासना सोडा. तृष्णा त्यागा. तीच सर्व दुःखांचें मूळ आहे.'


बुद्धभगवान् तुम्ही कुठेंही पहा. त्याच्या कानांची पाळीं खांद्याला टेंकलेलीं दिसतात. त्या काळचें तें सौंदर्यलक्षण होतें. दगडाचे वजनदार मणि कानांत लोंबवून ते असे दीर्घ केले जात. एका मण्यानें पाळें जरा खालीं आलें कीं त्याच्या जोडीला दुसरा एक तेवढ्याच वजनाचा मणि तिथें चढे आणि अशा रीतीनें पाळें ताणत ताणत खांद्याला येऊन चिकटे. चिनी लोकांत मुलींचे पाय बारीक व्हावे म्हणून ते जन्मापासून आवळून टाकतात तशाच प्रकारची ही सौंदर्योपासना होती.

पांचव्या लेण्याजवळ पावसाळ्यांत एक प्रपात खालीं कोसळतो. खालच्या कोंडांत अजूनही त्याचें पाणी अवशिष्ट होतें. या बारा बौद्ध लेण्यांत मधेंच एक चैत्य आहे. चिंचोळ्या गुहेंत, खांबांच्या मेहेरपींत बुद्धस्तूप उभा करणें हें चैत्याचें लक्षण. इथें या स्तूपांतहि एक बुद्धमूर्ति घडवलेली आहे आणि शिल्पकारानें तिच्यांत एक विशेष कौशल्य ओतलें

आहे. बुद्धदेव समोरून ध्यानस्थ दिसतो, उजव्या अंगानें सचिंत दिसतो आणि डाव्या अंगानें सुप्त दिसतो. केवळ ओंठाच्या पाकळींत आणि डोळ्यांच्या ठेवणींत 'होय नव्हे' असा फरक ठेवून शिल्पकारानें हे तिन्ही भाव साधले आहेत. बारावें लेणें तर तीन मजली भव्योत्तुंग आहे. जी खोदाई खालच्या मजल्यावर ती आणि तशीच वरच्या दोन्ही ताळांत. इथल्या गुहांची खोली, रचनेची प्रमाणबद्धता, मूर्तींची भव्यता, आणि इसवी सनाच्या पांच तें सात अशा तीन शतकांचा हा विराट् प्रयत्न नि अविच्छिन्न दीर्घोद्योग पाहून 'अहो आश्चर्यम्!' असा उद्‌गार निघतो हें जितकें खरें; तितकेंच प्रत्येक गुंफेत शिल्पकलेचा तो एकसुरी-पणा, तो ठरीव सांचा पाहून पुढें पुढें मन कंटाळतें हेंही तितकेंच खरें. बुद्धाचें जीवन म्हणजे विश्वाला जडलेल्या मृत्यु-जरा-व्याधि या त्रिविध दुःखावर औषध शोधायला निघालेल्या शुद्ध, बुद्ध, मुक्त अशा एका धर्मसम्राटाचें जीवन! त्या दयामय महापुरुषाच्या चरित्रांतले किती तरी हृदयस्पर्शी प्रसंग या काळ्या कातळांवर कोरून अमर करतां आले असते. राजप्रासादांत कुसुमकोमल हातांनीं वाढवला जाणारा बाल गौतम, लावण्यद्वीपांतल्या लक्ष्मीसारखी पत्नी यशोधरा आणि सर्व-सुलक्षणमंडित असा पुत्र राहुल, या दोन प्राणाधिक व्यक्तींचा एका रात्रीं गुप्तपणें त्याग करून जाणारा तरुण पण विरक्त गौतम, अनोमा नदीच्या कांठीं आपल्या लांब, रेशमी केसांना कात्री लावणारा आणि राजपुत्र असूनही भिक्षेचे शिळे तुकडे चघळणारा तपी गौतम, मानव-जातीचा सनातन शत्रु जो मार, त्याच्याशीं दोन हात करून त्याला चीतपट लोळवणारा 'सिद्धार्थ' गौतम, गयेजवळ वटवृक्षाखालीं अखंड साधना करून 'बोधि' मिळवणारा 'बुद्ध' गौतम, असें त्याचें सगळें जीवन इथें साकार व्हायला हवें होतें. त्यानें उपदेशिलेल्या मैत्री, मुदिता, करुणा, उपेक्षा या भावना इथें नारीरूपांत उमटायला हव्या होत्या. आणि बुद्धानें विश्वजनांसाठीं सांगितलेले ते त्रिकालाबाधित दहा नियम आल्यागेल्यांच्या डोळ्यांत भरतील अशा जागीं एका खालीं एक असे एखाद्या रुंद शिळेवर खोल कोरून ठेवणें आवश्यक नव्हतें काय? पण

तसें झालें नाहीं. बुद्धाच्या भक्तीनें भारावलेले ते कारागीर जागा सांपडेल तिथें बुद्ध आणि बुद्धच खोदीत राहिले.

पण प्रेक्षकाच्या मनाला लागलेली ही विविधतेची तहान पुढच्या हिंदु लेण्यांत पूर्णतया शमते. विशेषतः कैलास लेण्यांत तर डोक्यावरून पाणी जातें. प्रवेशद्वारांतून आंत शिरतांच पहिला पडदा म्हणून उभ्या केलेल्या शिळेवर गजलक्ष्मींचें जें चित्र आहे तिथूनच त्यांचा कल्पना-विलास दिसूं लागतो. राष्ट्रकूटांनीं आपल्या गजांतवैभवाचें द्योतक म्हणून तें तेथें कोरलें असावें. खालीं क्षीरसागराच्या लाटा उचंबळत आहेत. त्यांतूनच एक सहस्रपत्र कमल उमलून वर आलें आहे. त्याच्या नाजुक पाकळयांना एवढीशीहि इजा न पोंचेल इतक्या हळुवार-पणें कमलजा लक्ष्मी त्यावर विराजित झाली आहे. जलपृष्ठावरचे दोन आणि वर अधांतरींचे दोन असे चार गजराज तिला दुधानें न्हाणीत आहेत. खालचे दोन हत्ती कलश भरून वर देतात आणि वरचे दोघे सोंडेच्या विळख्यांत धरून तिच्या मुकुटमंडित मस्तकावर ते एकत्र जुळवून पालथे करतात.



कैलास लेणें

तिथून आंत जावें आणि समोर उभें राहून सर्वत्र नजर फिरवावी. कोणताही मनुष्य त्या क्षणीं स्तंभित होईल आणि थोड्या वेळानें भाराक्रांत हृदयांतून निःश्वास सोडील. बुद्धलेण्यांत न भेटलेली विविधता

इथें आपल्याला चोहों बाजूंनीं घेरते. महाद्वारांतच उजव्या हाताला उभा असलेला तो काळा भव्य हत्ती. समोरचा आपलाच सख्खा भाऊ छिन्न-भिन्न झालेला पाहून तो दुःखीकष्टी दिसत आहे.

कैलास लेणें म्हणजे उत्तुंग अशा तीन ताळांचें शिवमंदिर. यालाच रंगमहाल असें दुसरें नांव आहे. भारतांत जीं विशेष उल्लेखनीय लेणीं आहेत, त्यात यालाच अग्रपूजेचा मान लाभेल. 'सीतान्हाणी', 'तीन ताळ', 'इन्द्रसभा' हीं कलाकौशल्याचीं आगरें जर आसपास नसतीं, तर कैलास लेण्याला आजच्यापेक्षांही अधिक महत्त्व आलें असतें. रसिक प्रेक्षक इथें येतो तो एका खेपेंत सगळया गुंफा डोळयाखालून घाल्-ण्याच्या इराद्यानें. त्याला सावकाशी नसते. तो आपली ठोसर नजर सगळीकडून कशीबशी फिरवून आणतो. बुभुक्षितांचें खाणें तसें त्याचें पहाणें. त्यामुळें कैलासाचा आकार, त्यांतल्या कारागिरीचे बारकावे, त्याच्या निर्मितीच्या मागचा शतकांचा अखंड दीर्घोद्योग इत्यादि गोष्टींची त्याला या उडतपगड्याच्या पहाणींत खरी कल्पना येत नाहीं. तो पायांनीं चालत राहतो, मजले चढत राहतो, डोळयांनीं पहात राहतो आणि तासाभरानें पंचप्राण पांगुळले म्हणजे म्हणतो, 'बस्स्! पुरे झालें आता.'

हीं सगळीं लेणीं डोंगरमाथ्यावरून पायथ्याकडे अशा पद्धतीनें खोदीत आणलेलीं आहेत. 'आधीं कळस मग पाया रे' ही उक्ति या मंदिरांना यथार्थत्वानें लागू पडते. इतर लेण्यांपेक्षां कैलासाची रचना सर्वस्वीं अभिनव आणि कलाधरांच्या प्रतिभेचें दिव्यत्व दाखवणारी आहे. हें लेणें सभोंवतींच्या खडकापासून अलग आहे. काळया एकसंध पत्थराचा तेवढाच, म्हणजे १५४ फूट रुंद आणि २७६ फूट लांब पाया घालतां येईल, इतका भाग मोजून मापून त्यांनीं कसा सुटा करून घेतला असेल, तें त्यांचें तेच जाणोत. खालच्या चौथऱ्याला सगळीकडून हत्ती आणि सिंह ह्यांच्या मस्तकांची रांग उभी केलेली आहे. त्यावर सोळ-खांबी सभामंडप उभारलेला आहे. प्रत्येक खांब नक्षी आणि आकृति यांनीं आपादमस्तक कोरून काढलेला आहे. गाभाऱ्यांत भव्य शिवलिंग

स्थापलें आहे. गाभाऱ्याच्या बाहेरच्या बाजूला, वरच्या मजल्यावर पंचायतनाचीं पांच मंदिरें आहेत. मुख्य मंदिराच्या डाव्या अंगाला प्रवेशद्वाराच्या बाजूनें पुढें आलेला एक खडक आहे. त्यावर उभें राहून पहावें, म्हणजे वाटतें कीं, हें मंदिर नसून हा भारतीय युद्धांतला अर्जुनाचा भव्य दिव्य रथ आहे. शिवलिंगाचें स्थान ही अर्जुनाची बसण्याची जागा आणि मंदिराचा सभामंडपाच्यापुढें आलेला सज्जा हें पार्थसारथि भगवंताचें स्थान.

हें लेणें मुख्यत्वें शिवाचें असलें तरी इतर अनेक मूर्तींची विपुलता इथें पहावयास मिळते. मुख्य मंदिरांतच नव्हे, तर सभोंवतींचा काळा कातळ फोडून जो प्रमाणबद्ध प्रदक्षिणामार्ग तयार केलेला आहे, त्यांतही अनेक देवदेवता आणि नानाविध पौराणिक प्रसंग साकार झालेले पहातांना तुम्हांला वाटेल कीं, विधात्यानें आपल्याला दोनच डोळे देण्यांत फार कंजूषपणा केला आहे. इथें लंकेश्वर रावणाला बरेंच प्राधान्य दिलेलें आहे. रावण हा अग्रगण्य शिवभक्त. शिवप्रसाद मिळवण्यासाठीं लंकेंतून कैलासाला येऊन त्यानें उग्र आराधना आरंभली. पण दीर्घ काल लोटला तरी शिव कांहीं प्रसन्न होईना. लंकेंतलें चौदा चौकड्याचें राज्य संभाळायचें तर वर्षानुवर्षें बाहेर राहून चालण्याजोगें नव्हतें. म्हणून त्यानें आपल्या बलदर्पाला साजेसा विचार केला कीं, कैलासच उपटून लंकेंत न्यावा. मंदिराच्या पार्श्वभागावर या प्रसंगाचें चित्र आहे आणि प्रदक्षिणेंतून जातांना तें आपलें लक्ष खेंचल्यावांचून रहात नाहीं.

रावणानें गुडघे टेकून आपलीं दशशिरें आणि वीस हात कैलासाखालीं दिले आहेत आणि तो साऱ्या शक्ति पणाला लावून कैलास उचलतो आहे. सखी-पार्वती आणि शंकर या वरच्या मंडळीला या उत्पाताचा पत्ता नाहीं. एकाएकीं कैलास गदगदूं लागलेला पाहून उमेच्या सखीच्या अंत्रमाळा उडत आहेत आणि ती सुरक्षित आसरा शोधण्यासाठीं ओणवी ओणवी पळत आहे. पार्वती भयचकित होऊन शिवस्कंधाचा आधार घेत आहे. शिवाच्या मुद्रेवर भय नाहीं, पण आश्चर्य

आहे. हालता डोलता कैलास स्तब्ध करण्यासाठीं तो वरून आपल्या पायाचा दाब देत आहे आणि तो दाब रावणाला असह्य होऊन त्याचीं दहाही शिरें ओझ्याखालीं पिळवटून पाठीकडे वळत आहेत. शिवधनुर्भंगाच्या वेळीं रावणाची जी फजिती झाली ती पहिली आणि ही दुसरी. याच चित्रावरून या लेण्याला कैलास हें नांव पडलें असावें.

दुसऱ्या एका ठिकाणीं रावणानें आपलीं नऊ शिरकमलें स्वहस्तें उतरून त्यांची शिवलिंगाभोंवतीं प्रभावळ रचली आहे. त्या पुढच्या चित्रांत पार्वती शिवाला विचारते, 'रावणाच्या भक्तीला प्रसन्न केव्हा होणार? त्याला काय देणार?' या ठिकाणीं तिची मुद्रा जिज्ञासु आहे. तिच्या प्रश्नाचें उत्तर त्यापुढील चित्रांत दिलेलें आहे. शिव म्हणतो, 'रावण आत्मलिंग मागतो. मी तें त्याला देणार.' या ठिकाणीं तिची मुद्रा म्लान आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं पार्वती-परिणयाचा समारंभ उभा केलेला आहे. तिथें सर्वांच्याच ओठावर सूक्ष्म हास्य फुलून राहिलें आहे. आणखी एका ठिकाणीं एक भयानक दृश्य उभें आहे. पशुपतीनें एका राक्षसाच्या पोटांत त्रिशूळ खुपसून तो उंच धरला आहे. त्या राक्षसाचें नांव रक्तबिंदु. त्याला असा वर होता कीं, त्याच्या रक्ताचा एक थेंब जमिनीवर टपकतांच त्यांतून तसलेच शंभर निशाचर प्रकट व्हावे. दुसऱ्या हातानें नरकपाल धरून शिवानें तसें न होऊं देण्याची खबरदारी घेतली आहे. राक्षसाचें रक्त कपालात सांडतें आणि त्यांतून जें खालीं गळेल तें मुख पसरून आडवी झालेली कालिका वरच्यावर चाटून टाकते. आदिवराहाच्याही अनेक उंच उंच मूर्ति इथें पहायला मिळाल्या. आदिवराह हें राष्ट्रकूटांचें प्रतीक होतें. त्यांनीं दिलेल्या ताम्रपटांवरच्या प्रशस्तींतही वराहाचा उल्लेख आढळतो. या वराहानें रसातळांतून वर काढलेली पृथ्वी ही निरवयव वाटोळी नसून तन्वी श्यामा अशी नाजूक नार आहे आणि ती त्याच्या सुळयावर निश्चिंतपणें विसावली आहे. केवळ दगडांतून या ठिकाणीं भय, विस्मय, चिंता, ईर्ष्या, आनंद इत्यादि भाव-भावना प्रकट झालेल्या पाहून त्या विश्वकर्म्याला धन्यवाद देण्याइतकीसुद्धां प्रेक्षकाला शुद्धबुद्ध रहात नाहीं.

तसेंच आणखी पुढें जातांना एका वळणावर शिवशंकर तांडवाच्या अभिनिवेशांत उभा दिसला. त्याचा एक पाय पुढच्या चवड्यावर टेकलेला आहे आणि दुसरा अधांतरीं. किती विलक्षण पीळ आहे त्याच्या शरीराला. उंच पण रेखीव अशी ती आकृति आहे. त्याच्या सौष्ठवयुक्त पाठीच्या कण्यावरून तर दृष्टीच काढूं नये. संस्कृत वाङ्मयांतल्या शिवविषयक सर्व कल्पना त्या मूर्तींत एकवटल्या आहेत. तांडवाचें स्फुरण त्याच्या नेत्रांत आणि मुखावरच नव्हे; तर प्रत्येक अवयवांत भरून उरलेलें दिसतें. त्याचे भुजदंडच उठावलेले नाहींत तर अंगावरचे नागही. शिवगण बेहोशीनें त्याच्या नृत्याला वाद्याची साथ देत आहे. त्याच्या पाठीमागें एक मानवी हाडांचा सांगाडा उभा आहे आणि तोही अंतरीं अनावर होऊन खदखदून हंसतो आहे. हें चित्र माझ्या स्मृतिपटलावरून कधींही पुसलें जाणार नाहीं. स्वप्नांतसुद्धां तें जसेंच्या तसें उभें राहील. पहातां पहातां मला मालती-माधवांतल्या त्या तांडव-वर्णनाची आठवण झाली.

'आतां तें पाठीवरचें गजचर्म फडफडेल. त्याचें टोंक अंगीं घुसून जटाजूटांतली ती चंद्रकला पाझरेल. त्या अमृतद्रवानें शिवाच्या गळ्यांतलीं नररुंडें सजीव होऊन अट्टहास मांडतील. बाजूबंदाचे काळे भुजंग घुसळले गेल्यामुळें फूत्कार सोडतील. हातांतलें खट्वांग अलातचक्रासारखें हवेंत भिराभिरतांना आकाशांतल्या नक्षत्रांना तडाखे बसतील. कटपूतना, वेताळ वगैरे भूतगण टाळ्या पिटींत पुढें येतील आणि सर्व प्रकारें हा भयानक रस पुंजाळलेला पाहून गौरी घाबऱ्याघुबऱ्या धांवेल. धवळ्याभोळ्या शिवाच्या गळ्याला मिठी घालून ती म्हणेल, 'नाथ, आतां पुरे करा. विश्वाचा प्रळयकाळ ओढवेल.'

हें सगळें लेणें पुरें करायला तीन लाख घनफूट दगड खोदावा लागला आहे. दिव्य लोकींचें हें अप्रतिम शिल्प उभें व्हायला पुरीं शंभर वर्षें खर्ची पडलीं आहेत. छन्नी आणि हातोडा या दोनच साध्या आयुधांनीं इथले दगड फुटले आणि घडले आहेत. पण या त्रिगुणात्मक अश्मसृष्टीचा विधाता कोण म्हणून पुसाल, तर इतिहास कानावर हात

ठेवील. अडीच हजार वर्षांपूर्वी ग्रीकांच्या अथेन्स शहरांत सर्वत्र पुतळेच पुतळे उभारणारा, प्रोपिलिआचें भव्य शिल्प निर्मिणारा, टेकडीवर ॲथिनी देवतेची उत्तुंग मूर्ति उभी करणारा, दगडाधोंड्यांतून रंगीबेरंगी पाकळ्या-फुलें उमलवणारा, अथेन्सला दुजा अमरपुरीची कळा चढवणारा तो शिल्पकारांचा सम्राट् फिडियस — त्याचें नांव जगाला ठाऊक आहे; आपल्याला माहीत आहे. पण बाराशें वर्षांपूर्वी आपल्याच महाराष्ट्रांत स्वर्गांतली दैवतसृष्टि खालीं आणणारा हा प्रतिस्रष्टा विश्वामित्र मात्र कोण आणि कुठला तें आम्हांला माहीत नाहीं. बरें, तोही महाभाग असा निःस्पृह कीं, एखाद्या कोपऱ्यांतल्या लहानशा दगडावरसुद्धां आपल्या नांवाचीं चार अक्षरें उमटवायला त्यानें छन्नी उचलली नाहीं. जणुं तो आपल्याला म्हणतो, 'माझें नांव काय पुसतां? या लेण्याचें जें नांव तेंच माझें. या मूर्तींचीं जीं नाम-रूपें तींच माझीं. मी यांच्यावेगळा नाहीं. मला समजून घेणें असेल तर माझी ही अफाट कलासृष्टि समजून घ्या!'

कलादर्शनाचा आनंद हृदयांत तुडुंब भरून घेऊन बाहेर पडतांना मीं म्हटलें, याचें वर्णन मी काय करूं अन् कसें करूं? उगाच शब्दांचे बुडबुडे उठवण्यांत अर्थ नाहीं. सच्चिदानंद परब्रह्माप्रमाणेंच हा कलेचा खजिनाही वाणीला अगोचर आहे. हा शब्दाचा विषय नसून प्रत्यक्षाचा आहे. मुक्या माणसानें साखर खावी, त्याला तिची गोडी कळावी, पण सांगतां मात्र येऊं नये, अशी इथें अवस्था होते. या दगडांची भाषा समजायला निराळेच डोळे, निराळेंच अंतःकरण घेऊन जायला पाहिजे.

राष्ट्रकूटांच्या यश-कीर्ति-प्रतापाचा तो काळ होता. हिंदुधर्माच्या पुनःप्रतिष्ठेचा तो काळ होता. भारतभर फैलावलेला बौद्ध धर्म अव्यव-हार्य म्हणून जनांच्या मनांतून उतरला होता. आणि भगवान् आद्य शंकराचार्यांनीं तर्कांच्या धारेवर धरून त्याच्या तत्त्वज्ञानाचें ठिसूळपण सिद्ध केलें होतें. आसेतुहिमाचल दिग्विजय करून त्यांनीं अगस्तीप्रमाणें बुद्धधर्माच्या सागराचें एकच आचमन केलें होतें. भारतीयांचा सनातन धर्म त्यांना परत मिळवून दिला होता. आणि हें सगळें राष्ट्रकूटांच्या

अमदानींत झालें होतें. हें घराणें इ. स. ७५० च्या सुमारास सरसावलें आणि पुढें दोन सव्वादोनशें वर्षें त्यानें सत्ता गाजवली. त्यापूर्वी महाराष्ट्रांत त्यांचीच लहान लहान राज्यें होतीं. पण दन्तिदुर्ग नांवाचा एक शक्ति-युक्तींचा पुरुष त्यांच्यांत निपजला. त्यानें हीं सर्व राज्यें एकत्र केलीं. चालुक्यांची मांडालिकी फेंकून दिली. सम्राट कीर्तिवर्म्याचा युद्धांत पराभव केला आणि एक बलाढ्य साम्राज्य स्थापलें. हिंदुस्थानच्या इतिहासांत ज्या स्वाऱ्या झालेल्या आहेत, त्या प्रायः उत्तरेकडून दक्षिणेवर. पण राष्ट्रकूटांच्या अमदानींत याच्या उलट झालें. मराठी आणि कानडी सैनिकांनीं एक होऊन उत्तरदिग्विजय केले आणि हिंदुस्थानभर आपला दरारा बसवला. राष्ट्रकूटांच्या नंतर दाक्षिणात्यांचा उत्तरेवर असा वचक पाहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपर्यंत पुन्हां बसला नाहीं.

दन्तिदुर्गाच्या अर्धवट राहिलेल्या महत्त्वाकांक्षा त्याच्या मृत्यूनंतर त्याचा चुलता कृष्णराज यानें पुऱ्या केल्या. ‘ अकालवर्षवल्लभशुभतुंग ’ ही प्रदीर्घ बिरुदावलि धारण करून तो गादीवर आला. कैलास लेणें आणि घृष्णेश्वराचें मंदिर हीं दोन्ही त्यानेंच बनविलीं. असंख्य कलाकार लेणीं खोदण्यासाठीं पुढें सरसावले. पण आश्चर्याची आणि तितकीच अभिमानाची गोष्ट ही कीं, त्यांनीं एकाही बुद्ध-गुंफेतल्या एकाही मूर्तीवर हातोडा उगारला नाहीं. बौद्ध धर्म परास्त झाला होता. हिंदुधर्माचा नवोदय झाला होता. हर्षाच्या उद्रेकाचा तो काल होता. पण तशाही स्थितींत त्यांच्या अंतरांतला विवेकहरि जागा राहिला. ते जणूं म्हणाले, ‘ बौद्धांची खोदकला आपण अणखी पुढें नेऊं. तिच्यांत अधिक सूक्ष्मता, अधिक विविधता आणूं. भावी पिढयांना दोन्ही प्रकार एकाच वेळीं एकाच रांगेत पाहूं देत. ’

बौद्धांनीं आपल्या उपास्याला तसेंच हिंदूंनीं हरिहरांना आपल्या कारागिरींत महत्त्व दिलें. शैव-वैष्णव संप्रदाय याच कालातून उगवले आणि वाढीस लागले. ज्या चालुक्यांचा पाडाव करून राष्ट्रकूटांनीं आपलें साम्राज्य जोडलें, त्याच चालुक्यांनीं इ. स. ९७७ मध्यें पुनश्च तें मोडलें. चालुक्य हे जैनधर्मी होते. त्यांनाही याच खोदकलेच्या द्वारें आपल्या धर्माचा उत्कर्ष दाखवावा असें वाटल्यास नवल नाहीं. त्यांनीं

याच रांगेत पांच लेणीं कोरलीं आणि त्यांत महावीर, पार्श्वनाथ इत्यादि तीर्थंकर आकाराला आणले. चालुक्यांनीं राष्ट्रकूटांचें वैर केलें; पण त्यांनीं निर्मिलेल्या कैलासाचें नाहीं. कैलासाचें अनुकरण तर त्यांनीं केलेंच; शिवाय आपल्याही कांहीं अभिरुचि त्यांत प्रगट केल्या. जैनांचींही शेंदोनशें वर्षें या कामांत खर्चीं पडलीं आहेत. काळ्या मातीच्या, बिनझाडीच्या, वरवर उपेक्षणीय वाटणाऱ्या या सामान्य गिरिमालेच्या पोटांत संपूर्ण एक हजार वर्षें सांठवलेलीं आहेत. विस्मृतीच्या अंधारांत विरून जाणारा भूतकाल इथें वज्रलेप केला गेला आहे. राजनैतिक आणि धार्मिक घडामोडींचे तीन टप्पे या ठिकाणीं ठळकपणें दिसून येतात.




घृष्णेश्वर-मंदिर

हीं चौतीस विशाल सुंदर कलामंदिरें सुमारें पस्तीस वर्षांपूर्वी केवळ बेवारशी गुरांचे गोठे, वन्य पशूंच्या लपण्याच्या जागा, दिवाभीतांच्या तमोमय ढोली आणि भिकाऱ्या-टाकाऱ्यांचीं बिन-भाड्याचीं घरें होतीं. कोणाला त्यांची कदर नव्हती.* निजाम-सरकारही आंधळेंच होतें. पण कोण्यातरी जाणकार आणि वजनदार माणसानें या गुंफांचें महत्त्व पटवून हैद्राबाद-सरकारचे कान उघडले असावे. त्यानंतर

यांच्या सुरक्षेची तरतूद झाली. आजमितीस या सर्व गुंफा अंतर्बाह्य स्वच्छ आहेत, जोपासलेल्या आहेत आणि जरूर त्या ठिकाणीं डागडुजी केलेल्या आहेत. मुख्य रस्त्याला फांटे फोडून ते प्रत्येक टेंकडीकडे नेलेले आहेत, तेही सुंदर आहेत.

त्यांतल्याच एका रस्त्यानें खालीं उतरून आपल्याला घृष्णेश्वराच्या मंदिराकडे जातां येतें. बारांपैकीं हें शेवटचें ज्योतिर्लिंग समजतात. याच डोंगरावरून इलागंगा नांवाची एक लहानशी नदी निघून पुढें गोदेला मिळाली आहे. तिच्या अरुंद आणि कोरड्या पात्राच्या कांठीं कोरड्याच भूमीवर घृष्णेश्वर-मंदिर आहे. आवारांतलीं तीन-चार बकुळीचीं झाडें आणि पिछाडीच्या डाव्या कोंपऱ्यांतली, तृषिताची कधींही निराशा न करणारी विहीर हीं जर नसतीं तर तें स्थान अगदीं भकासच दिसलें असतें. कृष्णराजानें बांधलेलें हें देवालय मोडकळीला आलेलें पाहून अहल्याबाईनें त्याचा जीर्णोद्धार केला आहे. अहल्याबाई ही एक अशी धर्माची माउली होती कीं, भरतखंडांतल्या बहुतेक क्षेत्रांत तिच्या नांवाची कांहीं ना कांहीं तरी निशाणी आढळतेच. हें मंदिर दगडी बांधणीचें, ठेंगणें, ठुसकें पण रुबाबदार आहे. ८४ आणि ६१ फूट एवढी त्याची लांबी-रुंदी आहे. महाद्वाराशिवाय त्याला दोन पक्ष-द्वारेंही आहेत. देवाचे पुजारी गुरव, पण त्यांची वस्ती देवासन्निध नसून खालच्या गांवांत आहे. महादेवाला एकांतवासाची खंत नाहीं म्हणूनच ठीक. देवळाच्या परिसरांत कोणाच्या तरी दोन समाध्या आहेत. मीं त्याबद्दल पृच्छा केली, पण त्यांची माहिती मिळण्याऐवजीं क्षेत्रस्थ लोकांचें ' अगाध ' ज्ञान मात्र कळलें. मग मीं आपला अनुमानधपका बसवला कीं, भोसल्यांचे पूर्वज येथें रहात असत, त्यांपैकीं कोणाच्या तरी दहन-भूमीवर या मठ्या उभारलेल्या असाव्या. त्या दिवशीं सोमवार असल्यामुळें जवळच्याच कुठल्या तरी गांवांतून कांहीं ब्राह्मण मंडळी सकुटुंब सपरिवार घृष्णेश्वराला लघुरुद्र करण्यासाठीं तिथें आली होती. तें कार्य उरकल्यावर जवळच्या धर्मशाळेंत त्यांचा महाप्रसाद चालला होता. आम्हांलाही त्यांतला अंशभाग मिळाला.

तिथून आम्ही गेलों, 'शिवालय' तलाव पाहायला. हा तलाव दृष्टि लुब्ध होईल इतका सुंदर आहे. चोंहों बाजूंनीं तो खोलवर बांधून काढलेला आहे. मध्यावर चार कोनांवर चार घुमट्या असून त्यांत लिंगें बसवलेलीं आहेत. शिवरात्रीच्या दिवशीं घृष्णेश्वराची उत्सवमूर्ति पालखींत बसून वाजत गाजत इथें स्नानाला येते आणि यात्रेसाठीं जमलेला सहस्रावधि जनसमूह, शिवाचा हा स्नानोत्सव भावभक्तीनें पहातो. या सुरेख, सुश्लिष्ट तलावांतलें पाणीहि जर स्वच्छ-सुंदर असतें, तर त्याची शोभा द्विगुणित झाली असती. पण विधात्याच्या सृष्टींत एकस्थ सौंदर्य पहायला मिळणेंच दुर्लभ. रात्र असली तर चंद्र नसायचा, चंद्र असला तर त्याच्या कळा पुऱ्या नसायच्या, त्या असल्या तर बारक्या बारक्या नक्षत्रांचे शोभिवंत पुंजच झांकळून जायचे. एवंच एक आहे तिथें एक नाहीं.



'शिवालय' तलाव

मंदिराप्रमाणेंच हा तलावही अहल्याबाईनेंच बांधला आहे. हिरव्या बाबुळीच्या थराखालीं झांकलेलें त्याचें पाणी स्वर्गंगेशीं स्पर्धा करणारें,

पाताळींच्या भोगावतीचें आहे आणि तें सदाशिवानें आपल्या अर्धांगीची तृषा हरण करण्यासाठीं भूमींत त्रिशूळ खुपसून वर आणलेलें आहे.

या वनाला पुराणांतरीं काम्यवन म्हटलेलें आहे. तसेंच वाराणसीचें दुसरें नांव आनंदवन असें आहे. याच आनंदवनांत पार्वतीबरोबर सारीपाट खेळतांना शिव सर्वस्वीं हरला, नंतर क्षोभला आणि गिरिजेचा त्याग करून गोदेच्या उत्तर तीरावरील या काम्यवनांत येऊन बसला. पार्वती त्याचा शोध घेत घेत वनें-दांगें तुडवीत इथवर आली. निजरूपांत शिवांपुढें ज़ाण्याची सोय नव्हती म्हणून भिल्लिणीचा वेष नटली. मल्हार रागांत गाऊन आणि कलाकुसरीचें नृत्य करून तिनें शिवाला प्रसन्न केलें. आशुतोष शंकराचा राग निवायला फार वेळ लागला नाहीं. पार्वतीला हें स्थान आवडलें आणि शिवाला आग्रह करून बराच काळ ती इथें राहिली. एक दिवस ती डाव्या हातावर उजव्या हाताच्या आरक्त अंगुलीनें कुंकू चोळीत असतां त्यांतून एक लहानसें शिवलिंग प्रगटलें तोच हा ' घृष्णेश्वर. '

जें पहावयाचें होतें तें पाहून झालें होतें. सकाळपासून चढ-उतार करतां करतां पाय थकले होते. आमच्याप्रमाणेंच पश्चिमेचा दिनमणीही टेकीला आला होता. किरणजाल ओसरत होतें आणि सांध्यच्छाया हळूहळू पघळत होत्या. ' चला आतां मुक्काम गांठूं ' म्हणून आम्ही मोटारींत चढलों आणि संध्याकाळीं चौखुरांनीं धुरळा उडवीत तान्ह्या गाई जशा घराच्या दिशेनें धांवत सुटाव्या, तशी आमची मोटार औरंगाबादकडे भरवेगांत पळूं लागली.

---

# ७ गोकर्ण-महाबळेश्वर

गोंदिया ते गंगावळी ही महाराष्ट्राची अनुप्रासात्मक दक्षिणोत्तर सीमा मानतात. गोकर्ण हें या सीमेच्या खालीं आहे. महाभारत-कालींही ऋषींच्या तपोवनांची ही नैर्ऋत्येकडील सीमा होती. शेंकडा पंचवीस टक्के लोक तिथें मराठी बोलतात यावरून गोकर्णाला एक-चतुर्थांश महाराष्ट्र समजायला हरकत नाहीं. महाराष्ट्राची ही दक्षिण-सीमा रुद्र पण शिव अशा महाबळेश्वरानें सांभाळून आपल्याला निर्धास्त केलें आहे. सागरतीरावर असल्यामुळें जल-स्थलांवर त्याची समदृष्टि आहे. 'जो भूमिरूपानें विश्व धारण करतो तो माझें स्थलापासून रक्षण करो आणि जो आपोरूपानें प्राण्यांचें संजीवन करतो तो माझें जला-पासून रक्षण करो' असें तिथल्या शिवभक्तांना त्याला प्रार्थितां येतें.

'मार्गेषु मां रक्षतु नीलकण्ठः
शैलादिदुर्गेषु पुरत्रयारिः'

अशी मीही पुष्पदन्त कवीच्या शब्दांत त्याची प्रार्थना करून कारवारहून निघणाऱ्या मोटारींत बसलों.

आम्ही निघालों होतों तो कलता मध्याह्न होता. ग्रीष्मताप अंगांतून घामाच्या धारा काढीत होता आणि खारा वारा लागोपाठ त्या पुसूनही टाकीत होता. तांबूस रेतीच्या नागमोडी रस्त्यावरून आमची गाडी घोंगावत चालली होती. कधीं उन्हांतून तर कधीं छायेंतून. डाव्या हाताला हिरव्या झाडींचे साजरे डोंगर आणि उजव्या हाताला लहरत्या शुभ्र किनारीचा निळा दरिया हे माझें चित्त द्विधा करीत होते. एखादी टेंकडी आडवी आली कीं गाडीला आरोह-अवरोह करावे लागत आणि तेवढ्यांत समुद्र दृष्टीआड होई. पण तेवढी जवनिका फिटली कीं पुन्हां तो डोळ्यां-समोर पसरे. कधीं टेंकड्यांच्या पोटांत घुसणारा, कधीं उंच खडकांना

ढुशा देणारा तर कधीं पुळणीवर लोळणारा. प्रत्येक वेळीं नवें रूप, नवा आविष्कार. कारवारभागांतल्या किनाऱ्याला जर कोणी विशेष शोभवलें असेल तर तें सुरूच्या वृक्षांनीं. ते जणुं त्याचे अविश्रांत 'चवरीधर' आहेत.

कारवारपासून अंकोलें बारा मैल आणि तिथून पुढें गोकर्णही तितकेंच आहे. गोकर्णाच्या अलीकडे दोन कोसांवर गंगावळी नदी भेटते. हिला पुराणांतरीं 'शाल्मली' म्हटलेलें आहे. हिला सेतुबंध नसूनही मोटार पलीकडे जाऊं शकते. त्यासाठीं दोन होड्यांचा 'सांगड' करून त्यावर लांकडी पूल तयार केलेला आहे. सांगड धक्क्याला लागला आणि सांध्या-वर दोन फळया टाकल्या कीं गाडी सुखेनैव त्याच्यावर चढते. माणसांनीं हवें तर गाडींतच बसावें अथवा खालीं उतरून बाजूला उभें रहावें. मी इतरांच्या आधीं खालीं उतरलों. संथ, गाढ्याच्या पात्रामधून तो सांगड चालू झाला. त्याला वल्ह्यांचीही गरज नव्हती. एक उघड्या अंगाचा, पीळदार बांध्याचा नाविक केवळ एका लांब काठीच्या साहाय्यानें तें अवजार पुढें रेटीत होता. उत्तरेला हृषिकेशजवळ गंगा-मैय्यावर मीं झुलता पूल पाहिला होता. आज दक्षिणापथांतल्या गंगा-वळीवर मी तरता पूल पहात होतों. डावीकडे लांब नदीच्या वळणा-पर्यंत मीं दृष्टि फेकली. तटस्थ घनदाट वृक्षांचे मुजरे घेत सलील, मंथर गतीनें एखाद्या राजमहिषीसारखी गंगावळी खालीं येत होती. पांच मिनिटांत आम्ही दुसऱ्या तीरावर उतरलों. त्या काव्यमय जलप्रवासाची गोडी जिभेला लागते न लागते तोंच तो संपूनही गेला. मीं म्हटलें, 'ही नदी याहून दुप्पट, चौपट रुंद कां झाली नाहीं?'

आतां गोकर्ण जवळ येऊं लागलें होतें. समुद्र दिसत नव्हता खरा; पण तोही आतां जवळ झाला होता. उजव्या हाताला मिठागरें दिसलीं. तिथें ठायीं ठायीं त्या 'सबरसा'च्या टेंकड्या रचलेल्या होत्या. कांहीं-वर पेंढ्याचें आच्छादन टाकलेलें होतें तर कांहीं उघड्या होत्या. मीठ हें पांढरें नसलें तर काळें असायचें. पण हें मात्र तांबूस छटेचें होतें. तें मिठागर पाहून माझ्या मनांत अनेक स्मृति चुळबुळल्या.

भारताच्या इतिहासांतल्या एका दिव्य, तेजाळ कालखंडाचा पट दृष्टीसमोर तरळून गेला. याच मिठासाठीं महात्मा गांधींनीं सामुदायिक सत्याग्रह पुकारला होता. त्या महापुरुषाची ती 'दांडीयात्रा' देश-देशांतरीं दुमदुमली होती. शिरोडें वगैरे समुद्रतीरें हीं धारातीर्थें बनलीं होतीं. सत्याग्रही युवकांच्या रुधिरधारा तिथल्या वाळूंत थिजल्या होत्या. ते अहिंसक वीरपुंगव प्राण सोडायला तयार होते; पण मिठाची मूठ सोडायला तयार नव्हते. याच मिठावरून पूर्वीं द्वारकेच्या राणीवशांतही एकदां वादळ निर्माण झाल्याचें मीं मागें एका स्त्री-गीतांत ऐकलें होतें. 'तूं मला मिठासारखी आवडतेस' हें श्रीहरीचें प्रेमवचन ऐकून रुक्मिणीनें रुसून देवाशीं असहकार मांडला होता आणि मग दुसऱ्या दिवशीं षड्रस अन्नें अळणी रांधायला लावून यादवराण्यानें तिला वरवर क्षुल्लक दिसणाऱ्या मिठाचें महत्त्व काय आणि त्यावाचून सगळें कसें व्यर्थ, तें सप्रयोग पटवून दिलें होतें.

मिठागरांना वळसा घालून पुढें निघालों आणि मधून मधून कुळागरें दिसूं लागलीं. दोन पोफळींच्या मध्यें एक केळ असे चौरस भूभाग त्यांनीं व्यापले होते. जणुं वृंदावनांत गोपींचा रासच मांडला आहे. कृष्ण-कन्हय्या अधरावर मुरली ठेवून प्रगट व्हायचाच काय तो अवकाश! तांबड-मातीच्या टेंकड्यांवर ठेंगण्या ठुसक्या काजू आपला हंगाम संपवण्याच्या बेतांत होत्या. आकाशाला भिडूं पाहाणाऱ्या भिरंडी मात्र ऐन भरांत दिसल्या. त्यांचीं हिरवीं, लाल कोकंबें प्रत्येक डहाळीला आमूलाग्र बिलगून बसलीं होतीं. आंब्याचीं झाडें विपुल होतीं; पण फणस मात्र तुरळकच दिसले. कुळागरांच्या आश्रयानें दिसणारीं बहुतेक घरें जांभ्या दगडाचीं होतीं.

गोव्याहून गोकर्ण अगदीं जवळ; पण तिकडे असेपर्यंत तें पहाण्याचा योग आला नाही. हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं नसलें तरी आत्मलिंग असल्यामुळें पुरातनकालापासून प्रसिद्ध आहे. काशी, पुष्पगिरी, कांची इत्यादि दहा भास्करक्षेत्रांत गोकर्णाची गणना होते. रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथांतून त्याचे किती तरी नामोल्लेख काढून

दाखवितां येतील. त्या कालापासून इथें अखंड यात्राप्रवाह सुरू आहे. अनेकानीं भल्याबुऱ्या अनेक हेतूंनीं इथें तपःसाधना केली आहे. देवराज्य मोडावें, दैत्यराज्य जोडावें या आसुरी आकांक्षेनें चौदा चौकड्यांचा रावण इथें तपोबल मिळवायला आला होता. अहल्येशीं पापकर्म आचरून भगांकित झालेल्या देवेंद्रानें त्या महादोषाची बोहरी व्हावी म्हणून इथेंच अनुष्ठान मांडलें होतें. नैमिषारण्यांत गेल्या वेळीं बलरामानें क्रोधाच्या भरांत रोमहर्षण सूताची हत्या केली आणि त्याच्या प्रायश्चित्तासाठीं बारा मास तीर्थयात्रा करीत असतां तोही इथें आला होता. नारदमुनींचें या क्षेत्रांतलें आगमन तर मी कधींच विसरणार नाहीं. स्वर्गीय गायन करून शिवाला संतुष्ट करण्यासाठीं आपल्या ब्रह्मवीणेसह तो आकाशमार्गानें येत होता. त्यानें वीणेच्या अग्रावर दिव्य पुष्पांची माळ ठेवून दिली होती. नारद वरून जात होता. खालीं अयोध्येच्या उपवनांत अज राजा इंदुमतीशीं विश्रब्ध गोष्टी बोलत बसला होता. वाऱ्याच्या सोसाटयानें ती माळ वीणेवरून सुटली आणि नेमकी पडली ती इंदुमतीच्या हृदयावर! त्या आघातानें भूलोकींच्या त्या लावण्यसरितेनें जे डोळे मिटले ते कायमचेच! आणि मग सरोवरांतल्या हंस-कारंडवांसह परिजनांचा तो आक्रोश, अजाचा तो श्लोकत्व पावलेला शोक, तो बाष्पगद्गद विलाप—कोणता सहृदय मनुष्य हें करुणाख्यान विसरूं शकेल! नारदाप्रमाणेंच सनत्कुमारही या क्षेत्रीं आले होते. 'पहिला भागवत' प्रल्हादही नरसिंहमूर्ति स्थापून इथें निवांतपणें भजन-पूजन करीत राहिला होता. ऐतिहासिक कालांत पूज्यपाद श्रीआद्य शंकराचार्यांनींही इथें येणें केलें होतें. आमच्यासारखे इतरे जन तर 'आले बहु येतिल बहु—' कोण त्यांची गणती ठेवणार!

बाकी इथें नगरपालिका स्थापन झाल्यापासून सर्वांचीच गणती होते. नांवासह पावली देऊन कराची पावती घेतल्याशिवाय तुम्हांला गांवांत जाऊं देतो कोण! आणि दुसरी पावली द्यावी लागते ती महाबळेश्वराच्या दर्शनासाठीं, देवळाच्या देवडीवर. नगरपालिका आणि देवस्थानसमिति

यांनींच पहिल्याप्रथम अशी सक्तीची दक्षिणा वसूल केल्यावर क्षेत्रस्थ भिक्षुकांना आपण कोणत्या तोंडानें नांवें ठेवायचीं !

पण तिथले जोगळेकरभटजी मात्र या लोभाविष्ट भिक्षुकांच्या पंक्तींत बसत नाहींत. 'असंतुष्टा द्विजा नष्टाः' या जातींतले ते नव्हत. त्यांच्याकडे आतिथ्यही चांगलें होतें आणि यात्राविधिही यथासांग होतो. वस्तुतः इथें मुंडन, अष्टतीर्थांत स्नान, उपवास, श्राद्ध इत्यादि धर्मकृत्यें करावीं लागतात. पण तुम्ही म्हणालांत, 'देव-दर्शनापलीकडे आम्हांला कांहीं कर्तव्य नाहीं' तर ते म्हणतील, 'अयं विशेषः !' तीस-चाळीस माणसांचें त्यांचें एकत्रकुटुंब आहे. त्यांच्या घरीं जो 'यावा-जावा' आहे त्याला एवढें मनुष्यबळ हवेंच. पुरुष पुरोहित आणि बायका अन्नपूर्णा ! त्यांच्या स्वयंपाकघरांत चारी प्रहर अग्निनारायण जागृत असतो.

स्वयंपाकघरांतच नव्हे, तर त्यांच्या अग्निशाळेंतसुद्धां त्यांचें अग्नि-होत्र आहे. आजकालचें नव्हे; तर सात-आठ पिढ्यांचें. ब्रह्मचारी अग्नि-होत्र घेऊं शकत नाहीं. विधुरालाही तें धारण करतां येत नाहीं. तो फक्त सपत्नीक गृहस्थाचाच अधिकार. जोंवर धर्मपत्नी हयात असते तोंवरच तो चालतो. अग्निहोत्राचें खरें बंधन गृहिणीला. पुरुष प्रवासाला गेला तरी स्त्री घरांत असेपर्यंत अग्निविच्छेद होत नाहीं. तिनें मात्र ग्रामसीमा ओलांडायची नाहीं. पतीच्या अनुपस्थितींत तिच्या हातची समिधा अग्नीला चालते. ती अखेरच्या महायात्रेला निघाली कीं अग्नि चालला तिच्यापुढें ! ज्याची तिनें मनोभावें सेवा केली तोच शेवटीं तिच्या देहाचें सोनें करतो.

वे. बाळकृष्णभटजी जोगळेकर मला सांगत होते, 'मीं ऐन तारुण्यांत अग्निहोत्र घेतलें. हिनें आढेवेढे न घेतां परवानगी दिली. तिला महिना-भर माहेरीं पाठवून आणली आणि मग एके दिवशीं दीक्षित झालों. त्या दिवसापासून हिनें घराची पायरी ओलांडली नाहीं. बाहेरची दिशा पाहिली नाहीं. अग्निशाळा आणि ती. वर्षांमागून वर्षें लोटलीं. मी तरण्याचा म्हातारा झालों. तीही आतां थकली आहे......' ऐकतां ऐकतां माझे

डोळे पाणावले. मीं त्या धर्मदेवतेला 'निवांत नमन' केलें. असा निकराचा संयम, अशी प्रखर तितिक्षा भारतीय स्त्रियाच करूं जाणोत!'

घरांतला एक मुलगा बरोबर देऊन त्यांनीं आम्हांला देवदर्शनाला पाठविलें. इथें महाबळेश्वराच्या आधीं गणपतीचें दर्शन घ्यावें लागतें. महादेवाचा नैर्ऋत्य-कोन संभाळून बाहेरच्या बाजूला तो उभा आहे. उभा म्हणजे खरोखरच उभा! चार भुजांपैकीं दोन भुजा त्यानें देवलोकीं ठेवल्या असाव्या. दक्षिणेंत असे द्विभुज-गणपति पुष्कळ आहेत. त्या बाजूला गणपति ब्रह्मचारी आणि कार्तिकेय गृहस्थ. या गणपतीच्या मस्तकावर जो लहानसा खळगा हाताला लागतो ती रावणानें वज्र-मुष्टि मारल्याची खूण!



द्विभुज गणपति

रावणाला 'खंडेराव' करण्यासाठीं बटुवेषानें तो इथें आला होता. भोळ्या सांबानें रावणाच्या भक्तीला भाळून त्याला आत्मलिंग दिलें होतें आणि तें घेऊन तो लंकेच्या मार्गानें निघाला होता. ही वार्ता समजून देवलोकीं हाहाकार उठला. काय वाटेल तें होवो; हें लिंग

लंकेंत जाऊं देतां कामा नये, असा देवांनीं मनसुबा रचला. गणपति बुद्धिसागर म्हणून त्याला त्या कामांत पुढाकार मिळाला. तें आत्मलिंग जमिनीला टेकलें कीं तिथेंच घट्ट होईल आणि रावण आपली संध्येची वेळ चुकविणार नाहीं, हीं दोन्ही वर्में त्याला ठाऊक होतीं. तदनुसार त्यानें आपला धूर्त डाव मांडला. लंकेश्वर गोकर्णाला पोंचतो तों सूर्यास्ताचा समय झाला. आतां वरुणाला अर्घ्य द्यायचें तर आत्मालिंग कोणाच्या तरी हातीं देणें आवश्यक होतें. नेमकी त्याच वेळीं गजाननाची स्वारी बटुवेषानें पुढें झाली. रावण त्याला म्हणाला, 'थोडा वेळ एवढें लिंग संभाळ!' बटु उत्तरला, 'संभाळीन; पण जड झालें तर खालीं ठेवीन!' लंकेश्वर त्यावर आणखी बोलला, 'मला आधीं तीन हांका मार!' बटूला तें मान्य झालें. रावण मोकळ्या हातांनीं जलाशयावर गेला; पण आचमन करतो तों पहिली हांक दणाणली. अघमर्षण होतें तों दुसरी आणि अर्घ्य ओंजळींत घेणार तोंच लागोपाठ तिसरी! रावण धांवत-पळत जाऊन पहातो तर आत्म-लिंग जमिनीवर ठेवलेलें. वीस हातांनीं तो तें उपटूं लागला; पण तें वज्रलेप झालें होतें. त्याचे कपचे निघाले; पण मूळ लिंग कांहीं उपटून घेतां आलें नाहीं. त्यानें हवेंत भिरकावलेले लिंगखंड जेथें पडले तीं शेजेश्वर, गुणवंतेश्वर, मुरडेश्वर, धारेश्वर अशीं चार स्वतंत्र लिंगें झालीं. हीं चार आणि गोकर्णाचें मूळ लिंग पांचवें मिळून ही पंच-क्षेत्री आहे.

रावण चडफडला. त्याचीं दहाही 'शिसाळीं' क्रोधानें लालबुंद झालीं. त्या आवेगांत त्यानें बटूच्या मस्तकीं ठोसा हाणला. पण उपयोग काय! तें लिंग कायमचें तिथें प्रतिष्ठित झालें. या क्षेत्राचा निर्माता म्हणून गजाननाला इथें अग्रपूजेचा मान मिळाला. आम्हीं त्याला श्रीफल ठेवून यात्रा सुफल करण्याविषयीं प्रार्थिलें आणि महाबळेश्वराच्या महाद्वारांत शिरलों.

थोड्याच वेळांत सूर्य मावळणार होता. प्रकाशांतले सूर्यकिरण माडांच्या झुबक्यांवर चढले होते आणि तिथून समुद्रांत उडी घेण्याच्या

वेळांत होते. यात्रा विशेषशी नसल्यामुळें आसमंत निर्जन, निवांत होता. पश्चिमाकाशानें नव्या पालवीसारखी तांबूस पण सौम्य प्रभा मंदिराच्या कळसांवर पसरून दिली होती. तिचा आनंद इंद्रियांतून मनाच्या कोशांतही झिरपत होता. देवाच्या भेटीसाठीं हवी असलेली प्रसन्नता अनायासें मिळत होती. हृत्कमल भावमकरंदानें भरत होतें. प्रदोषकाल हा शिवाचा हर्षनिर्भरतेचा समय. अनुरागवती संध्या ही त्याची पार्वतीहून 'पढियंती'. त्याच्या गात्रांतला अणु-रेणु या वेळीं नाचूंउडूं लागतो. त्याच्या आत्म्यांत नकळत नृत्य संचरतें. तो या वेळीं निजानंदाचे घुटके घेऊं लागतो. त्यांचें स्वाभाविक औदार्य या वेळीं पघळतें. शिवशंकराकडे जें अभीष्ट मागायचें असेल तें या वेळीं मागावें.

आणि याच वेळीं मीं मंदिरांत प्रवेश केला. सभामंडपाच्या चारी कोनांतून काळोख पुढें पुढें येत होता. पण मला काय त्याची भीति! माझें अंतर्याम पाजळलें होतें आणि समोरचा तो गाभाराही. तिथल्या अनेक नंदादीपांचा सौम्य, सात्त्विक 'दीपत्कार' गंडकीशिळेच्या पिंडीवर आणि तितक्याच सांवळ्या यामपूजकाच्या मुखमुद्रेवर पसरला होता. आत्मविस्मृति करणारें, आधिव्याधि शमविणारें महन्मंगलदर्शन होतें तें. माझा देह 'स्थाणु' झाला. दृष्टि मुकुलित झाली. अंजलिसंपुट उंच झाला. मस्तक नत झालें. नकळत ओठ पुटपुटूं लागले—

**'ॐ नमो भगवते सदाशिवाय......नीलकण्ठाय, पार्वती-मनोहरप्रियाय, सोमसूर्याग्निलोचनाय......'**

तिथें पूजक दिसला. पूजासाहित्य आढळलें. जलधारा दिसली. पिंडी-वर कालोद्भव पुष्पांची पखरणही दिसली. पण आत्मलिंग कुठें होतें? मी तर नुसती घरटाच्या आकाराची प्रशस्त पिंडीच पहात होतों. घर आहे, पण धनी नाहीं; तळें आहे, पण जळ नाहीं; घरटें आहे, पण पक्षी नाहीं; तसाच तो प्रकार मला वाटला. मीं माझ्या पुरोहिताला जिज्ञासा दर्शविली. तो म्हणाला,

'पिंडीच्या मध्यभागीं दिसतो त्या खळग्यांत आंगुळभर लांब आणि

तितकेंच उंच आत्मलिंग आहे. बाकीचा सारा विस्तार भूमिगत. चाळीस वर्षांच्या मुदतीनें 'अष्टबंधमहोत्सव' होतो त्या वेळीं ही वरची पिंडी काढून नवा बंध घातला जातो. पिंडी काढली कीं आत्मलिंगाचा बराचसा भाग दिसतो. त्यावर रावणाच्या अंगुलिमुद्राही आढळतात. हा सोहळा पाहण्यासाठीं लाखों यात्रा जमते.'

त्यापुढचें तिसरें दर्शन ताम्रगौरीचें. ती त्याच प्राकारांत महाबळेश्वराच्या उजव्या अंगाला आहे. तिचें मंदिर लहानसेंच आहे. आम्ही गेलों त्या वेळीं तिचा शृंगार केलेला होता. निढळावर, वस्त्रांवर, अलंकारांवर आणि पायांतळीं कुंकवाची उधळण झालेली होती. तिनें आपल्या सौभाग्याची लयलूट केली होती. जुन्या काळच्या सुवासिनी कुंकूं जितकें अधिक लावणें शक्य तितकें लावून आपलें अहेवपण भोगीत होत्या, त्यांची आदर्श पतिव्रता ही ताम्रगौरी होऊं शकेल. हिनें आपलें ताम्रगौरी हें नांव सार्थ केलें आहे.

ताम्रगौरी ही शिवाची भार्या खरी; पण अर्धांगी पार्वती मात्र नव्हे. ही ब्रह्मदेवाच्या ध्यानावस्थेंत त्याच्या उजव्या करतलापासून निर्माण झालेली कन्या. विधाता तिला म्हणाला, 'आतां उपजलीच आहेस तर शिवाला वरून कृतार्थ हो!' ती लगेच गगनमार्गें इथल्या ताम्रपर्वतावर अवतरली. पार्वतीप्रमाणेंच जिवेंभावें सेवा करून तिनें सदाशिवाचें मन जिंकलें. नंतर ब्रह्म्यानें प्रगट होऊन तिचें रीतसर कन्यादान केलें. लग्नमास कोणता तर अश्विन आणि तिथि वद्य चतुर्दशी. कोणत्या गणकभास्करानें हा मुहूर्त काढला असेल तें देव जाणे! पण सदाशिवाला सगळेंच शुभ-मंगल!

या ताम्रगौरीच्या हातांत तराजू आहे. ती तुम्हां-आम्हां सर्वांना गोकर्ण क्षेत्र तोलून दाखविते. 'जनहो! नीट पहा. या डाव्या हाताच्या पारड्यांत मी विश्वेश्वराची काशी घातली आहे आणि या उजव्या पारड्यांत महाबळेश्वराचें हें गोकर्ण घातलें आहे. गोकर्णाचें पारडें खालीं झुकलें. कारण, काशींतलीं सर्व तीर्थें इथें आहेतच; शिवाय

सकलतीर्थांचा आधार हा पश्चिमसागर काशीला नाहीं तो इथें अधिक आहे.'

उघडें सत्य आहे हें. गोकर्णाची शोभा, त्याचें वैभव, त्याचें प्रभुत्व, सगळें कांहीं या सागराच्या सान्निध्यामुळेंच आहे. त्याचा तो उतरता किनारा भाग्यवंताच्या भालपट्टासारखा वाटतो. त्याची तांबूस रंगाची स्वच्छ वाळू पायांखालीं दाबीत सारखें पुढें पुढें जावेंसें वाटतें. बैठक मारल्यावर पुढच्या भागाची 'धूळपाटी' बनवली कीं तिच्यावर कोणाकोणाचीं नामाक्षरें लिहावीं याचा मधुर संभ्रम पडतो. एखादी टेंकडी पुढें घुसून तिनें किनारा तोडला कीं तिला कोसळून घालायला लाटांचा भगीरथ प्रयत्न चालतो तो मोठा प्रेक्षणीय वाटतो. तिथल्या दगडांवर शंभर लाटांनीं डोकेंफोड करून घेतली तरी एकशें-एकावी पुन्हा तेंच करायला पुढें येते. भरतीच्या लांबच लांब लाटा किनाऱ्यापासून आंतपर्यंत एकामागून एक फुटून पसरायला लागल्या कीं विश्वकर्म्यानें समुद्रांत रुंद पायऱ्यांचा उलटा घाट बांधला आहे आणि त्यावर काश्मिरी पाषाणाचा शुभ्र चुरा पसरून टाकला आहे असें वाटतें. निळ्या, नितळ सागरपृष्ठावरून 'अनकळित' धांवत आलेल्या ओल्या अंगाच्या वायुलहरी तीरावरील माडांच्या कानांशीं लागतात आणि द्वीपांतरींचीं रहस्यें त्यांना सांगतात, तीं आपल्यालाही कळावीं अशी लालसा उत्पन्न होते. 'कळलें, पटलें' म्हणून ते झुकलेले माड जेव्हां माना डोलवूं लागतात तेव्हां त्यांचा हेवा करावासा वाटतो.

मी सकाळीं समुद्रावर गेलों होतों तो स्नानासाठीं; पण आंत उतरण्यापूर्वीं किती तरी वेळ मी त्याचें ध्यान धरूनच बसलों. अनेक ज्ञातअज्ञात दर्यावर्दी माझ्या भोंवतीं घेरून आले. अनेक देश–विदेशांतले कवि हृदयांत शिरले. रत्नाकराची उदात्तता, अद्भुतता अनेक परींनीं ते माझ्या कानांत गुणगुणले. कांहीं संस्कृत कवींनीं मधेंच अनादराचेही सूर उमटवले. एकानें त्याच्या खारटपणाबद्दल तक्रार केली. दुसरा त्याच्या गर्जनेबद्दल कपाळाला आंठी घालतांना म्हणाला, 'धरित्रीची तहान शमवणारा मेघ गरजतो, हें एक ठीक; पण कोणाचाहि घसा

ओला करायला समर्थ नसलेल्या या 'निष्प' सागरानें काय म्हणून गर्जावें ?' 'रत्नें पायांतळीं घालून, क्षुद्र तृण-पर्णें डोक्यावर घेऊन नाचणारा हा समुद्र शहाणाच म्हटला पाहिजे' अशी आणखी एकाची तक्रार. 'मेघांना दिलेलें जलदान त्यांच्याकडून तूं परत घ्यावेंस ना? अरेरे!' हे जगन्नाथपंडिताचे खेदोद्‌गार! शेवटीं कालिदासावर येऊन थांबलों. हें निळें अनंत जळमैदान पाहून तो मात्र म्हणाला, 'श्रीहरी-प्रमाणेंच हा सागर दशदिशा व्यापून उरला आहे. याचें स्वरूप असें आहे आणि एवढें आहे हें सांगणें कठीण! असंख्य पर्वतांना यानें आपल्या उदरांत ठाव दिला आहे. शेषशायी भगवान् युगांनीं याच्याच घरीं चिरनिद्रा घेतो.'

पुरा एक तास भरतीच्या लाटा पाठीवर, डोक्यावर घेऊन मी स्नानानंद उपभोगला. नंतर पुनश्च देवदर्शनाला गेलों. याच वेळीं मला



महाबळेश्वराचें मंदिर

मंदिराची रचना स्पष्टपणें पहायला मिळाली. त्या वर द्राविड शिल्प-कलेचा ठसा आहे. शिखर कमींत कमी साठ फूट उंच भरेल. त्यावर अष्टदिक्पाल, नवनाग, दशावतार कोरलेले दिसले. सभामंडप ६०×४०

फूट आहे. सभोंवतीं अग्रशाळा आहेत. देवासमोरच्या चंद्रशाळेचें बांधकाम अर्धवटच पडलें आहे. ताम्रगौरीचें मंदिरहि जीर्णोद्धाराला आलेलें आहे. मुख्य मंदिराचा सभामंडप कुंदापूरच्या तुलव ब्राह्मणानें बांधल्याचें समजतें. पण मंदिर कोणीं आणि कधीं बांधलें त्याचा मात्र शोध लागत नाहीं. ज्याला गोत्र नाहीं, त्याचें काश्यप गोत्र हें जसें ठरलेलें, तसेंच ज्याचा स्थपति अज्ञात त्याचें कर्तृत्व विश्वकर्म्याकडे सोंपवायचें हेंही ठरलेलें आहे. भाविकांचें तेवढ्यानें समाधान होतें. कांहीं लोकांचें म्हणणें कीं, तें पांडवांनीं बांधलें. चिकित्सकांचा इतिहासाच्या जवळ जाऊं पाहणारा तर्क असा कीं, कर्नाटकांत अनेक मंदिरांची उभारणी करणाऱ्या जक्कणाचार्यानेंच हेंही देवालय बांधलें असावें.


याचा पहिला ऐतिहासिक उल्लेख सापडतो तो आठव्या शतकांतला. कदंबांचें जें एक कुल बनवासी प्रांताचें राज्य चालवीत होतें त्यांत मयूरवर्मा नांवाचा एक राजा झाला. कोणत्या तरी प्रसंगानें तो गोकर्णाला आला होता. त्यानें हें मंदिर पाहिलें: होतें आपलें अज्ञात, उपेक्षित आणि भिल्लांच्या वस्तीनें वेढलेलें. कधीं मनांत आलेंच तर त्यांनींच देवाची अविधि, अमंत्रक पूजा करावी. कसला तरी नैवेद्य दाखवावा. मयूरवर्म्याच्या भक्तिप्रवण मनाला तें रुचलें नाहीं. त्यानें अहिक्षेत्रांतून तीनशें ब्राह्मण इथें आणले. त्यांना भरपूर द्रव्य देऊन त्यांच्याकरवीं देवाचे नित्योपचार सुरू केले. पण हीहि व्यवस्था कायम टिकली नाहीं. मयूरवर्म्याच्या मृत्यूनंतर या ब्राह्मणांना उपद्रव होऊं लागला आणि ते गोकर्ण सोडून पळून गेले. बहुधा तिथल्या आदिवासी जनांनींच त्यांना पिटाळून लावलें असावें. कारण ब्राह्मणांच्या हातांत देवस्थान गेल्यापासून त्यांचा देव त्यांना दुरावला होता. त्यांची तिथली सत्ता संपुष्टांत आली होती. त्यानंतर कालांतरानें लोकादित्य राजानें पुन्हा सात गोत्रांचीं आणि तीन वेदांचीं चोवीस ब्राह्मणकुटुंबें इथें आणून वसवलीं आणि त्यांना वर्षासनें नेमून देऊन त्यांनीं पुनश्च 'यः पलायते' करूं नये अशी व्यवस्था केली. इथले सगळे ब्राह्मण त्यांचेच वंशज

असून जातीचे ‘ हविक ’ आहेत. कर्नाटक, म्हैसूर, कुर्ग या प्रांतांत त्यांची वस्ती आहे.

देवस्थानाची व्यवस्था विश्वस्त मंडळींच्या हातीं आहे. देवाला मिळणारें सरकारी उत्पन्न अवघें बाराशें रुपयांचें. एवढ्यावर वर्षाचा खर्च काय चालणार ? पण यात्रेकरूंकडून कराच्या रूपानें बराच निधि गोळा होतो. शिवाय नैवेद्य, नंदादीप यांसाठीं धनिक भक्तांनीं देवाला बऱ्याच जमिनीही दिलेल्या आहेत. इथें बाराही महिने निरनिराळया देवतांचे लहानमोठे उत्सव चालू असतात. पण महाबळेश्वराचा सर्वांत मोठा उत्सव म्हणजे माघांतल्या महाशिवरात्रीचा. फाल्गुन शुद्ध प्रतिपदेला देवाचा रथोत्सव होतो. एका उंच छपराखालीं निवाऱ्याला ठेवून दिलेला हा रथ म्हणजे सामान्य प्रकरण नाहीं. त्याच्या दोन भरीव, लठ्ठ चाकांमधलें अंतर सुमारें नऊ हात आहे. वर उंच डोलारा, तीळ ठेवायला जागा नाहीं अशा भरगच्चपणें त्यावर कोरलेलीं देवतांचीं चित्रें, आणि वरच्या भागावर देवासाठीं सुखासन, अशा त्या रथराजावर आयत्या वेळीं बहुरंगी पताकांचा भार चढतो आणि मग देवाच्या जयजयकारांत भक्तगण कासरे उचलतात. शत-सहस्रांचें बळ जेव्हां एकवटावें तेव्हां कुठें तें अवडंबर जागचें हालतें !

काल आदिगोकर्ण पहायचा राहिला होता तो आज पाहिला. देवाच्या उजव्या अंगाला प्राकारांतच खोलगट जागीं आदिगोकर्णाचें लिंग आहे. महाबळेश्वराच्याही पूर्वीचें हें स्थान ; पण आज त्याची सद्दी नाहीं. त्याला कोणी नारळ ठेवीत नाहीं. रुद्राचा अनुवाक म्हणून धारभर पाणीही कोणी घालीत नाहीं. वेदकाळांतलें इंद्राचें माहात्म्य ब्राह्मणकाळीं लुप्त होऊन ‘ उपेंद्र ’ विष्णु पुढें आला तसाच हा प्रकार आहे. याचें आख्यान श्रवण करायचें असेल तर स्कंदपुराणाची पोथी सोडली पाहिजे. आदिगोकर्ण हा ब्रह्मदेवाच्या ललाटापासून निर्माण झालेला पहिला रुद्र. विधात्याकडून त्याला सृष्टिरचनेची आज्ञा मिळाली. तो म्हणाला, ‘ मी आधीं तप करून सामर्थ्य मिळवीन. ’ त्यासाठीं तो पाताळांत

जाऊन बसला आणि युगें लोटलीं तरी उठलाच नाहीं. त्याच्या चेंगटपणाला ब्रह्मदेव कंटाळला आणि त्यानेंच चारी खाणी, चौऱ्यायशीं लक्ष योनि रचून सृष्टिविस्तार करून टाकला. प्रकृतीनें पाताळांत जाऊन ही वार्ता रुद्राच्या कानावर घातली. वस्तुतः ही लावालावी करण्याचें तिला कांहींच कारण नव्हतें. पण बायकांचा स्वभाव म्हणतात ना! रुद्र खवळून वर यायला निघाला. पण एवढ्या अवधींत पृथ्वीचें कवच बरेंच घट्ट झालें होतें. तो जेव्हां त्याचें विदारण करायला प्रवृत्त झाला तेव्हां धरित्री घाबरली. तिनें त्याला प्रार्थिलें कीं, 'सूक्ष्म रूप घेऊन माझ्या कर्णाकार प्रदेशांतून वर ये.' रुद्रानें ती प्रार्थना मानली. तो ज्या विवरांतून वर आला त्याच जागीं ही लिंगस्थापना झालेली आहे. ही कथा म्हणजे अज्ञात काळांतल्या एखाद्या भूकंपावरचें काव्य असावें. कदाचित् हें सगळें गोकर्णमंडलच समुद्रांतून वर आलें असेल आणि समुद्र तितका मागें हटला असेल.



कोटितीर्थ

कोटितीर्थ हें इथलें सगळयांत महत्त्वाचें तीर्थ, हें त्याच्या नांवावरूनच कळून येईल. आकारानेंही तें विशाल आणि लंबचौरस आहे. चारी बाजूंनीं मनुष्यवस्ती आणि माडाचीं झाडें असल्यामुळें त्याला

शोभा आली आहे; पण कोणतेंही सरोवर जळावांचून ओकें आणि कमळांवांचून फिकें. त्या दृष्टीनें आजमितीस तरी तें स्वत्व गमावून बसलें आहे. तयांतलें सगळें पाणी काढून टाकून त्याचें नवें बांधकाम सुरू झालेलें आहे. त्रिपुरी पौर्णिमेला याच्या सभोंवतीं बघण्यासारखा दीपोत्सव होतो असें आमच्या मार्गदर्शकानें सांगितलें.

ज्या डोंगराच्या पायथ्याला गोकर्ण वसलें आहे त्या शतशृंग पर्वतावरही अनेक पुराणपुरुषांचीं तपःस्थानें आहेत. त्यांपैकीं सर्वांत कडेचें स्थान म्हणजे रामतीर्थ. कल्पवृक्षांच्या मेळाव्यांत, समुद्राच्या अत्यंत निकट आणि त्याच्यापासून दहा-बारा हात उंचीवर असल्यामुळें याचें सौंदर्य निरपवाद आहे. कुंड लहानसेंच; पण बांधून काढलेलें आहे. डोंगराच्या पोटांतून बाहेर आलेला झरा पन्हळीच्या मुखानें त्यांत अविच्छिन्न पडतो. खाऱ्या जलराशीजवळ ती गोड्या पाण्याची धार जवळच्या राममंदिरात राहणाऱ्या बुवा-बैराग्यांना आणि आमच्यासारख्या यात्रिकांना 'जीवन' देऊन धन्य होते. रामतीर्थाला लागूनच भरताच्या मंदिराकडे जाण्याची वाट आहे. मात्र तिथें जाण्यासाठीं शंभर-दीडशें पायऱ्या चढाव्या लागतात. पण भरताची सुंदर संगमरवरी मूर्ति पाहून चढण्याचे श्रम परिहार होतात.

तिथून थोडें अलीकडे आलें कीं माणेश्वर भेटतो. त्याचें मूळ नांव मणिभद्र. तो आणि त्याचा मित्र सिद्धेश्वर हे दोघे शिवाचे भक्त. गोकर्ण-क्षेत्र पाहण्याच्या इच्छेनें ते शिवाची अनुज्ञा घेऊन कैलासाहून इथें आले. गोकर्णाच्या सीमेवर येतांच क्षेत्राची समृद्धि आणि उज्ज्वलता पाहून सिद्धेश्वर इतका दिपला कीं, या भूमीवर पाय ठेवण्याची आपली योग्यता नाहीं असें त्याला वाटलें. क्षेत्राच्या पूर्व सीमेवर आश्रम उभारून तो तिथेंच तप करीत बसला. मणिभद्रालाही तसेंच वाटलें; पण तो बाहेर थांबला नाहीं. तो खालीं डोकें वर पाय करून हातांनीं चालत इथवर आला आणि तशाच स्थितींत तपस्या करूं लागला. शंकरानें प्रसन्न होऊन त्याला पश्चिम दिक्पाल नेमलें. पुढें प्राकृत जन त्याला 'माणेश्वर' म्हणूं लागले. या स्थानावर शिवलिंग नसून त्याचींच उलटीं

पावले आहेत. लोक त्यांचीच पूजा करतात. गोकर्णाच्या चतुःसीमेंतलीं सगळीं तीर्थें करायचीं आणि सगळे देव वंदायचे तर चार दिवस तरी तिथून हालतां येणार नाहीं. 'सागरे सर्वतीर्थानि' म्हणून मीं सर्वांच्या वांट्याचें समुद्रस्नान केलें आणि सर्व ज्ञाताज्ञात देवतांसाठीं महाबळेश्वराच्याच चरणांजवळ आणखी एक प्रणाम सादर केला.

एवढें करून जोगळेकरांच्या घरीं परत येतों तों त्यांच्या अग्निशाळेंत नक्षत्रसत्र चाललें होतें. हें पांच दिवसांचें यजनकर्म आहे. आज द्वितीयदिनकृत्य होतें. वे. बाळकृष्णभटजी कानांत सुवर्णाचीं मकरकुंडलें लेवून अग्नीजवळ बसले होते. सोमयाग करून त्यानीं त्या कुंडलांचा अधिकार मिळवला होता. त्यांच्या उजव्या हाताला ब्रह्म्याचें आसन होतें. गार्हपत्य अग्नींत पुरोडाशाचीं पात्रें शिजत होतीं, तोंवर ऋत्विजांनीं पूर्वसिद्धता केली होती. एक पाय वेदीच्या आंत आणि दुसरा बाहेर अशा स्थितींत उभा राहून 'होता' देवतांचें समंत्रक आवाहन करीत होता.

**'अनुमतिमा ऽऽऽ वह । देवाँ ऽऽ आज्यपाँ ऽऽ आवह'**

अध्वर्यु पुरोडाशावर आणि अग्नीवर प्रथम तुपाचा 'अभिघार' करीत होता. नंतर दोन स्रुवा जोडीनें घेऊन वरचीच्या तिवळ्यांत पुरोडाशाचा अंशभाग ठेवीत होता. आहवनीय अग्नीपुढें उभें राहून त्यानें 'ओऽऽ श्राऽऽऽवय' म्हटलें कीं समोरचा 'आग्नीध्र' 'अस्तु श्रौऽऽषट्' म्हणून त्याला प्रतिवचन देत होता. 'येऽऽयजामहे' म्हणून 'होता' पुढचे मंत्र म्हणत होता. अखेरीस 'वौषट्' म्हणून तो थांबला कीं अग्नींत आहुति पडत होती.

सकाळचें उन्ह, झऱ्याचें पाणी, दूधभात, वगैरे जीं आयुष्यवर्धक साधनें सांगितलीं आहेत, त्यांत यज्ञधूमही आहे. तो आमच्या पोटांत भरपूर गेला. नको म्हणत असतां डोळ्यांतही शिरला. आपण आज पुनीत झालों असें वाटलें. अग्निहोत्र आणि तदनुषंगानें होणारे यज्ञयाग हा प्रकार

आतां इतिहासजमा झालेला आहे. त्या कालखंडांतून आपण फार पुढें आलेले आहों. ती समाजव्यवस्थाही आमूलाग्र बदलली आहे. काल बदलला कीं धर्मसाधनेंही बदलतात, बदलावीं लागतात. पण तरीही प्राचीन यज्ञसंस्थेचे हे तुरळक आढळणारे अवशेष शिल्लक राहिले पाहिजेत असें मी मानतों. प्राचीन संस्कृतीच्या अभ्यासकांना त्यांचा पुष्कळ उपयोग होईल. आपलें ज्योतिष, गणित, स्थापत्य हीं यज्ञसंस्थेंतूनच विकास पावलीं आहेत. आपलीं इतिहास-पुराणें आणि धर्मप्रवचनें यज्ञमंडपांतूनच समाजाच्या सर्व थरांत पसरलीं आहेत. यज्ञसंस्था ही भारतीयांना अभिमानास्पद अशी पुरातन संस्था आहे. तिचे हे अल्पसे अवशेष भारतीय संस्कृतीला शतकांचीच नव्हे; तर सहस्रकांची परंपरा आहे हें सांगण्यास समर्थ आहेत. नव्या-जुन्या कालामधले ते 'धर्मसेतु' आहेत.

---

# ८ नाथांचें पैठण

आज आपण औरंगाबादला मोटारींत बसलों कीं तीस मैलांचा रस्ता दोन तासांत आटपून पैठणला उतरूं शकतों. यंत्रयुगाचे हे आपल्यावर उपकार आहेत. पण या प्रवासांत एकदां माझ्या मनांत आलें कीं, सातशें वर्षांपूर्वी किशोर-वयांतलें ज्ञानेश्वरमंडळ जेव्हां आळंदीहून पैठणच्या यात्रेला निघालें तेव्हां त्याला किती हाल-ताप भोगावे लागले असतील! ते बंधु तरी काय सडे होते? मुक्तेचा बालजीव आलटूनपालटून त्यांच्या पाठुंगळीस असायचाच. किती दिवस त्यांना मुक्काम गांठायला लागले असतील हरि जाणे!

त्या काळीं प्रवास कष्टदायक होता ही गोष्ट खरी; पण त्या कष्टांचें परिमार्जन होईल, एवढा आनंदही त्यांत गवसे. जुने प्रवासी निसर्गाच्या पोटांत शिरत. ते जणुं त्यांतलेच एक असे बनत. निसर्गाचे नवे नवे रंग, कलाकुसरी, लीलालहरी, त्याचें कधीं रुद्र तर कधीं शिव असें सौंदर्य हें सगळें त्या प्रवाशाला डोळयांच्या अंजुळीनें घोटतां येत असे. आज आपण त्याच्या अंगावरून भरेकन् जातों. संकीर्ण असें पहातों पुष्कळ; पण अनुभवीत मात्र कांहींच नाहीं. नुसतीं पानें फडफडवून ग्रंथ वाचल्याचें जेवढें समाधान तेवढेंच अशा धांवत्या प्रवासाचें.

सकाळीं नऊ वाजतां आम्ही पैठणास मंडईपुढच्या मोटारतळावर उतरलों. त्या दोन दिवसांत तिकडच्या भागाला वळवाचे पाऊस पडत होते. आजही सकाळपासून दुर्दिनच होतें. काळसर पांढरे ढग सूर्याला उघडण्या-झांकण्याचा पोरखेळ करीत होते, त्यामुळें हवेंत उकाडा बराच जाणवत होता. मीं म्हटलें, 'उकडूं दे किती उकडतें तें. गोदामाई आतां जवळच आहे.' धूळभरल्या निरुंद रस्त्यावरून आम्हांला प्रथम थोडासा चढ चढावा लागला आणि मग थेट नदीच्या पात्रापर्यंत गेलेल्या उताराच्यां

मध्यभागीं श्री. नरहरिबुवा जहागिरदार यांचें घर भेटलें. बारा वर्षांनीं प्रेमाचा बंधु घरीं यावा, तसें त्यांनीं आमचें स्वागत केलें. बुवा म्हणजे तथाकथित संतमहंत नव्हेत. ते पैठणचे नामांकित वकील आहेत. ते प्रसंगविशेषीं सांप्रदायिक 'निरूपण' करतात म्हणून लोक त्यांना बुवा म्हणतात. एकनाथांचे ते बारावे वंशज आहेत. वाणी लाघवी, वृत्ति निरहंकार आणि मन मोकळें. मी स्वतःशींच म्हणालों, 'गृहस्थ नाथांच्या वंशांत शोभतो खरा!'

उन्हाळयांत नदी आटते; पण लोकांना ती अधिक प्रिय होते. त्यांतून ही नदी म्हणजे ब्रह्मगिरीवरून निघालेली दुसरी गंगाच. तब्बल एका वर्षानें आज मला पुनश्च ती पदराखालीं घेणार होती. मला मायेनें कुरवाळणार होती. मोठ्या उल्हासानें आम्हीं चंबूगवाळें खांकेला मारलें. मी तीरावरच्या वृक्षच्छायेंत जाऊन उभा राहिलों. तिथून ऐलतीर-पैलतीर न्याहाळले. 'गोदावर्याः दक्षिणे तीरे शालिवाहन शके—' असा नित्य संकल्प मी म्हणत होतों त्या नेमक्या जागीं आज मी येऊन ठाकलों होतों. गोदावरीचें पात्र 'चक्षुर्वै सत्यम्' होतें आणि शककर्ता शालिवाहन इथेंच जन्मला हें इतिहास सांगत होता. केवढें विस्तीर्ण तें वाळवंट! चंद्रभागेचें याच्यापुढें अगदींच तोकडें. डाव्या हाताच्या लांबवर दिसणाऱ्या नागघाटाखालीं काय डोह असेल तेवढाच; बाकी सगळें पात्र उथळ. आटून कृश झालेला प्रवाह पलीकडच्या तीराला चिकटून वाहत होता. मी सपशेल आडवा पडलों तेव्हां कुठें डोक्या-वरून पाणी गेलें.

कालच रामनवमी झाली होती. पुढच्या पौर्णिमेला हनुमानजयंती येणार होती. या दोहोंच्या मधली एकादशी साधून गांवोगांवच्या कावडी येऊं लागल्या होत्या. आम्ही नदीवर होतों तेवढ्या वेळांतच कावडीवाल्यांचे दोनतीन मेळ काठीनें डफ-दिमड्या वाजवीत तिथें पोंचले. गाय दिसतांच वासरूं जसे धांव घेईल तितक्या लगबगीनें ते धांवत, धडधडत पैलतीराच्या उंचवट्यावरून प्रवाहांत उतरले. आंगभर पाणी उडेल इतक्या घाईगर्दीनें ऐलतीराला आले आणि

गांठला एकदांचा मुक्काम' अशा समाधानानें वाळवंटांत ऐसपैस पसरले. त्यांच्या आधींही आणखी बरेच जथे तिथें येऊन थडकले होते आणि कोंडाळें मांडून फराळ किंवा गप्पा-गोष्टी करीत होते. त्या रात्रीं ते वाळवंटांतच आभाळाच्या रत्नजडित चांदव्याखालीं झोंपणार होते. दुसऱ्या दिवशीं एकादशीचें पर्वस्नान आणि नाथदर्शन करणार होते आणि मग आपापल्या गांवच्या मारुतिरायासाठीं गोदाजलाच्या कावडी भरून घेऊन पैठण सोडणार होते. चैत्रवारीला अशी हजारों कावड तिथें येते आणि त्या कावडवाल्यांच्या संगें गोदामैय्या गांवोगांव, घरोघर जाते. आसपास दहा-बारा कोसांतले मारुति आपल्या जयंतीच्या दिवशीं गोदाजलानें न्हातात.

पैठणगांव गोदातीरावर आहे हें म्हणणें अल्पोक्त ठरेल. तें गोदावरीनें वेढलेलें आहे. त्याच्या तीन बाजू भरतखंडाप्रमाणें सजल आहेत. गोदावरी प्रथम पूर्वपश्चिम वाहते, नंतर दक्षिणोत्तर वळते आणि पुन्हा मूळ दिशेला येते.

नदीकिनारीं ज्ञान आणि संस्कृति यांची विशेष प्रकारें वाढ होते असा एक सामान्य नियम आहे. पैठणही त्याला अपवाद नाहीं. तें एका काळीं विद्यापीठ आणि धर्मपीठ होतें. इथला धर्मनिर्णय महाराष्ट्र मंडळांत अखेरचा मानला जाई. पैठणच्यापुढें धर्माच्या बाबतींत बोलणें नाहीं. उत्तरेला काशी ज्या तोलाची, त्याच तोलाचें दक्षिणेंत प्रतिष्ठान म्हणजे पैठण. लखलखीत विद्वत्तेचे वैदिक आणि पंडित इथें अखंड परंपरेनें निर्माण होत होते. इथल्या धर्मसभांतून शास्त्रार्थ गाजत होते. रामेश्वरभट्टांसारखे आचार्य विद्येचें सदावर्त घालून बसले होते. कोणीही यावें आणि हवें तें शास्त्र अभ्यासावें. 'निर्णयसिंधु' या ग्रंथाचा कर्ता कमलाकरभट्ट आणि शिवछत्रपतीच्या मस्तकावर राज्याभिषेक करणारा गागाभट्ट हे दोघे मूळ पैठणचेच. या भट्टघराण्याला काशींत अद्यापि अग्रपूजेचा मान आहे.

हेंच पैठण पुढें नाथांच्या काळांत भक्तिपीठ बनलें. ज्ञान आणि वैराग्य या दोन पुत्रांसह भगवद्भक्ति आपल्या पोषणासाठीं इथें दाखल

झाली. महाराष्ट्र रसवंती तर म्हणाली कीं, ' गोदातीर हेंच आता माझें माहेर ! आतां मी ओवीछंदानें पूर लोटीन. अभंगरूपानें कीर्तनरंगी रंगेन. भारुडांच्या रूपानें लोकसमाजांत लीलानृत्य करीन. गोदावरी जनांचे देह क्षाळते ; मी त्यांचीं मनें क्षाळीन ! '

गेलीं दोन हजार वर्षें या ना त्या कारणासाठीं पैठणचा कीर्ति-परिमल दिगंतीं धांवणें करीत आहे. सम्राट् अशोकाच्या शिलालेखांतून 'पेत्तनिक' म्हणजे पैठणवासी लोकांचा उल्लेख आढळतो. ख्रिस्त शकाच्या पूर्वीपासून व्यापारधंद्यानिमित्त पैठणचे श्रेष्ठी आणि महाजन देशांतरीं संचार करीत असल्याचा पुरावा मिळतो. पहिल्या शतकांत पेरिप्लस नांवाच्या एका ईजिप्शियन लेखकानें भारताचें ग्रीस, रोम इत्यादि देशांशीं व्यापारी दळणवळण कसें चालतें या विषयावर एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो, ' दक्षिण देशांत फक्त दोनच शहरें व्यापारी दृष्टीनें फार महत्त्वाचीं आहेत. एक पैठण व दुसरें तगर. पैठणला पोहोंचण्यास भडोचहून वीस दिवसांचा प्रवास करावा लागतो. पैठणहून भडोचला ' गोमेद ' नांवाच्या दगडाची फार मोठी निर्यात होते. हा सर्व माल मोठ्या गाड्यांमधून व चांगले रस्ते नसलेल्या प्रदेशांतून आणावा लागतो. तेथें नाना प्रकारचें कापड तयार होतें. ' जरीचें काम सर्वांत कुठें चांगलें होत असेल तर तें पैठणला. रेशमी जरीबुट्टयांच्या लुगड्याला ' पैठणी ' म्हणतात तो नग पैठणच्या पेठेंतच बनत होता म्हणून.

शातवाहनांच्या कालांत पैठणचा सर्व अंगांनीं उत्कर्ष झाला. हा काल ख्रिस्तपूर्व आणि ख्रिस्तोत्तर असा मिळून चारशें वर्षांचा आहे. शातवाहन राजे इथूनच साऱ्या दक्षिणेवर राज्य करीत होते.

**' पइट्ठाणे नगरे सालिवाहणो राया '**

असे त्याचे जैनवाङ्मयांत गौरवोल्लेख सांपडतात. बृहत्कथेचा कर्ता गुणाढ्य शातवाहनांचाच आश्रित होता. गुणाढ्याचें पैठणांतलें वास्तव्य हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांतला महत्त्वाचा काळ समजला जातो.

पैशाची, महाराष्ट्री वगैरे प्राकृत भाषांना त्यानें राजाश्रय मिळवून दिला. शातवाहनांनाच आंध्र असें दुसरें नांव आहे. आंध्रांनंतर चालुक्य आले, राष्ट्रकूट आले; पण त्यांनीं आपल्या राजधान्या पैठणाहून हालवल्या आणि त्यामुळें पैठणचें माहात्म्य कमी कमी होऊं लागलें. आजमितीस पैठण हें निजामी राज्यांतलें एक लहानसें तालुक्याचें ठिकाण आहे. शहर या दृष्टीनें त्यानंतर त्याची कधींच भरभराट झाली नाहीं. चौदाव्या शतकांत राजशेखरानें पैठण पाहून जे उद्‌गार काढले, त्यांचाच आजही अनुवाद करतां येतो.

"अधुना तु दाक्षिणदेशस्थितं प्रतिष्ठानपुरं क्षुल्लक-ग्रामतुल्यं वर्तते"

श्री. नरहरिबुवांनीं आम्हांला फिरायला नेतांना शालिवाहनाचा तो प्राचीन वाडा दाखवला. केवढें प्रशस्त आवार आहे त्याचें! मुसलमानांनीं त्याचें आज मशिदींत रूपांतर केलें आहे. त्या राज्यांत असें न होतें तरच नवल! पोलिसकारवाईच्या पूर्वीं या वाड्याच्या आवारांत प्रवेश करणें हें एक दिव्यच होतें असें मला कळलें. मोकळ्या पटांगणांत कबर आहे आणि दोन बाजू बांधलेल्या आहेत. बाहेरच्या बाजूला उन्हा–पावसांत झिजलेले, तुटलेले, कांहीं दगडी खांब आहेत. त्यांवरची कोरीव कुसर पाहिली कीं वाड्याच्या प्राचीनत्वाची साक्ष पटते. आंत विहीर आहे तिला शालिवाहनाची विहीर म्हणतात. वाटोळ्या, लहान तोंडाच्या त्या विहिरींत तळापर्यंत नजर बुडविली म्हणून तो भूतकाळ हाताला लागणार आहे थोडाच! एक दंतकथा मात्र गवसली.

कुठून तरी एक ब्राह्मणकन्या पैठणच्या एका कुंभाराकडे येऊन राहिली. त्यानें तिचा प्रतिपाळ केला. शेष नांवाच्या नागाचें तिच्यावर मन जडलें. त्याच्यापासून तिला जो पुत्र झाला तो शालिवाहन. तोही त्याच कुंभाराच्या घरीं वाढला. कुंभार गाडग्ीं-मडकीं घडवी तेव्हां हा त्या गाऱ्यांतली थोडी माती घेऊन हत्ती, घोडे, शिपाई बनवी. त्या मातीच्या चित्रांनीं त्यानें घरदार भरून टाकलें. जणुं भवितव्यतेनेंच

त्याला हा चाळा लावला होता. अनेक सौंगडी जमवून तो जळीं-स्थळीं खेळे. त्याच्याच कालांत तिकडे नर्मदेच्या पलीकडे विक्रमानें आपला शक ( संवत् ) सुरू केला होता. भरतखंडभर तो चालू व्हावा ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. पण एका ज्योतिष्यानें त्याला सांगितलें कीं, 'तुझा एक प्रतिस्पर्धी वाढतो आहे. तो दक्षिणेंत आपला शक चालू करील. तूं एका हत्तीच्या मस्तकावर सुवर्णपत्रिका लावून तो सोड. या हत्तीचें वजन करून द्यावें, नाहीं तर युद्धाला सिद्ध व्हावें अशी राज्याराज्यांतून द्वाही फिरव. जो हत्तीला तुळील तो तुझा प्रतिस्पर्धी असें समज.' विक्रमादित्यानें तसें केलें. हत्ती संरक्षकदलासह पैठणपर्यंत आला. तोंवर कांहीं त्याचें वजन करणारा कोणी चतुरस्त्र भेटला नाहीं. शालिवाहनानें तें आव्हान स्वीकारलें. त्यानें हत्तीला एका नावेंत चढविलें. नाव जिथवर पाण्यांत बुडाली तिथें एक रेघ ओढली. मग हत्तीला उतरवून त्या रेघेपर्यंत बुडेल इतकी वाळू त्यानें नावेंत भरली. त्या वाळूचें जें वजन तें हत्तीचें. सर्वांना त्याच्या कल्पकतेचें नवल वाटलें. विक्रमादित्यानें त्याच्याशीं युद्ध पुकारलें. शालिवाहनानें कशाच्या बळावर त्याला तोंड द्यायचें? पण शेषनागानें त्याला आयत्या वेळीं अमृत आणून दिलें. तें त्या मृण्मय सैन्यावर शिंपडतांच ते 'कोल्हेरीचे असिवार' प्राणमय झाले. शालिवाहनानें तो दळभार विक्रमावर लोटला. त्याला नर्मदेपार हुसकून लावलें आणि लगेच आपला शक जाहीर केला. हा शालिवाहन म्हणजे पुलुमाई आंध्र आणि विक्रमादित्य म्हणजे जयदामन् शक असावा असा इतिहासवेत्त्यांचा कयास आहे.

आम्ही ग्रामरचना पहात पहात दक्षिणेकडे चाललों होतों. पुढें शिवदीन केसरीचा मठ लागला. मठ म्हणजे मोठा वाडाच आहे. कांहीं पायऱ्या चढून आम्ही वर गेलों. अंधारानें आमचें स्वागत केलें. धुळीनें आम्हांला पायघड्या घातल्या. मठाच्या देवघरांतही सगळा 'उत्साह'च दिसला. एखादी जीर्ण वास्तु पहायची या भावनेनें मी तिथें गेलों असतों तर हीं सगळीं लक्षणें ठीक होतीं; पण मी गेलों होतों मठ पहायला. मठांत आरास नसो; पण निदान स्वच्छ झाडलोट तरी? हा

मठ 'दीना'चा असला तरी तो दीन अनाथ नाहीं. त्याला जहागीर आहे आणि पैठणांत मोठा मानही आहे. एकनाथमहाराजांची पालखी निघाली कीं शिवदीनांचा झेंडा आघाडीवर असतो. शिवदीननाथ हे अठराव्या शतकांतले महंत आणि ग्रंथकार. 'दीन' ही त्यांना एका मुसलमान साधूनें दिलेली पदवी आहे. उजव्या हाताच्या दालनांत त्यांची पर्यंकारूढ तसबीर आहे. राजविलासी पोषाखांतली आणि नील-कमळासारख्या डोळ्यांची ती आकृति पाहिली कीं हा कोणी तरी अधिकारी पुरुष असावा हें कळून येतें.

असाच इथला दुसरा मठ कृष्णदयार्णवस्वामींचा. तो गोदावरीच्या कांठीं वृक्षांच्या छायेंत आहे. या माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मणाचें मूळ नांव नरहरि. पण भिक्षा मागतांना तो 'कृष्णदयार्णव समर्थ' असा पुकार करी म्हणून लोकांनीं तेंच त्याचें नांव रूढ केलें. पुढें त्याच्या अंगीं कुष्ठ उजळलें म्हणून नाथसेवेच्या उद्देशानें तो पैठणला आला. नाथांनीं त्याला दृष्टांत दिला कीं, 'मीं भागवताच्या एकादश स्कंधावर टीका केली तशी तूं दशमावर कर. तुझा रोग दूर होईल. हाच नव्हे; तर भवरोगसुद्धां!'

कृष्णदयार्णवानें हा आदेश मस्तकीं धरला. ओवीछंदांत ग्रंथरचनेला प्रारंभ झाला. भावभक्तीच्या अमृतरसांत न्हाऊन त्यांची प्रतिभा भगवत्पूजेसाठीं नित्य नवीं कल्पनारत्नें आणि शब्दसुमनें वेंचून आणूं लागली. 'हरिवरदा' ग्रंथ अध्याया-अध्यायानें वाढूं लागला. ग्रंथरचनेच्या आनंदांत निर्भर, निमग्न असतां अंगावरचें कुष्ठ केव्हां मावळलें त्याचा कृष्णदयार्णवाला पत्ताही लागला नाहीं. वाग्देवतेनें महारोगांतून मुक्त केल्याचें हें अठराव्या शतकांतलें दुसरें उदाहरण. पहिलें उदाहरण सातव्या शतकांतल्या मयूरकवीचें आहे.

यूर हा बाणाचा समकालीन आणि जवळचा नातेवाईक. एके दिवशीं सुप्रभातीं तो बाणाच्या घरीं जातो तर त्याची भार्या संतापली आहे आणि हे 'कादंबरी'कार कविश्रेष्ठ करुणशब्दांनीं तिची मनधरणी करीत आहेत. आंतल्या दालनांत हा सांत्वनाविधि चालला होता

आणि मयूर बाहेर उभा राहून ऐकत होता. गद्यानें तिचा क्रोध शमेना म्हणून शेवटीं बाणानें ललितमधुर पद्याचा आश्रय केला. त्यानें तीन श्लोकचरण कसेबसे रचले आणि एकदम त्याचा कंठ दाटला. पुढें शब्दच फुटेना. तें पाहून मयूराची कविवृत्ति एकदम उसळून आली.

**‘ कुचप्रत्यासत्त्या हृदयमपि ते चाण्डि कठिनम् ’**

असा त्या श्लोकाचा चौथा चरण स्वतः पुरा करीत तो सरळ घरांत घुसला. आपल्या एकांतांत हा प्राणी अचानक उगवलेला पाहून त्या ‘ चंडी ’ नें त्याला शाप दिला. ‘ तुझ्या अंगीं महारोग जडेल ! ’ तिला वाक्सिद्धि होती त्यामुळें तो लागलीच बाधला. मयूर सूर्योपासक होता. त्यानें आपल्या आराध्यलिंगाला आळविण्यासाठीं ‘ सूर्यशतक ’ नांवाचें काव्य रचलें आणि त्याच्या प्रभावानें मग तो निर्दोष झाला.

कृष्णदयार्णवाचा ‘ हरिवरदा ’ हा भव्य ग्रंथ आजमितीस छापलेला आहे. पण खुद्द कवीच्या हातची हस्तलिखित प्रत पहातांना एक निराळाच आनंद मिळतो. जणुं त्या रूपानें साक्षात् कवीच आपल्याला भेटतो. मीं हलक्या हातानें पोथीचें वेष्टण सोडलें आणि वरची फळी उलटून ठेवली. आतां वाचूं तरी किती आणि काय ? शेवटीं प्राचीन पंडितांच्या शलाकापरीक्षेचा अवलंब केला आणि दोन्ही आंगठ्यांनीं उचलतां आलीं तेवढीं पानें एकदम उचललीं. उघडलेल्या पृष्ठावर दृष्टि टाकतों तों तिथें यशोदेचें घुसळण मांडलेलें. त्या प्रसंगावर कवीचें प्रसन्न, सुढाळ वर्णन चाललें होतें.

**जिचे कटिभार रम्य पृथुळ । वरी अमोल्य परिधान पट्टकुळ**
**सूत्रबद्ध कांची सोज्ज्वळ । रत्नझळाळ जडिताचें**
**पदर खोविला परवंटीं । कंचुकी बिरडा सुटली गांठी**
**कृष्णस्नेह दाटला पोटीं । तेणें दृष्टी उन्मीळित**
**दोहीं हस्तीं करितां मथन । तेणें सर्वांग कंपायमान**
**पुत्रस्नेहें द्रवलें मन । दुग्धें स्तन पाझरती**

या ग्रंथावरून दुसऱ्या दोन ग्रंथांचें स्मरण झालें. पहिला एकनाथांनीं

संशोधिलेली ज्ञानेश्वरी आणि दुसरा खुद्द नाथांच्या हातचें भागवत. हे दोन्ही हस्तलिखित ग्रंथ पैठणांत आणि विशेषतः नाथांच्या वाड्यांत मिळायला हवे होते. पण महाराष्ट्राचें भाग्य या बाबतींत उणें पडलें आहे. कोणी त्याबद्दल विचारलें कीं नाथांच्या वंशजांना 'षड्विध नकार' सांगावा लागतो. त्यांचें 'जुनें ठेवणें' त्यांनाच आजमितीस अगम्य आहे. पैठणला 'नाथवाङ्मयोपासक मंडळ' स्थापन झालें आहे. त्यानें या दोन प्रतींचा जर शोध लावला तर महाराष्ट्र त्याचा जयजयकार करील.

आणखी थोडें चालल्यावर श्री. नरहरिबुवांनीं आम्हांला बक्षी, लढ्ढू, वानोळे या मातबर सावकारांचे वाडे दाखवले. त्यांतले कांहीं पडले आहेत, कांहीं त्या मार्गावर आहेत. लक्ष्मी तर गेलीच; पण कांहींचा निर्वंशही झाला आहे. पेशवाईच्या काळांतले हे कनकनारायण. राघोबादादाचा तळ इथें पडला आणि त्याच्या कांखा वर झाल्या तेंव्हां या वानोळ्यांनीं रोजीं सव्वालक्ष रुपये याप्रमाणें महिना–सव्वा महिना त्याच्या सैन्याचा खर्च चालविला. त्यांच्या घरींदारीं रुपयांचीं पोत्यांवर पोतीं पडलेलीं असत. बायाबापड्या जातां-येतां त्यांना आदळत आणि म्हणत, 'काय मेल्याची संपदा—' बक्षी सावकाराचीहि अशीच गोष्ट. पेशवे स्वारींत असतांना पैठणास येऊन गोदातीरीं उतरले होते. त्यांना यानें भोजनाचें निमंत्रण दिलें. नाना फडणिसांनीं त्याला सांगितलें कीं, रुपयांवरून चालवीत नेलेंस तर श्रीमंत तुझ्या घरीं पायधूळ झाडतील. बक्षींनें तसें तर केलेंच; शिवाय रुपयांच्या राशीवर बसवून त्यांना पुजलें आणि तो सगळा द्रव्याचा डोंगर त्यांच्या चरणीं समर्पिला. पेशव्यांचें त्यावर उत्तरहि त्यांच्या दौलतीला साजेसेंच होतें. 'गोदावरीचा नागघाट नादुरुस्त झाला आहे. या द्रव्यानें त्याचा जीर्णोद्धार करा.'

या घाटावर एका अंगाला जीर्णोद्धाराचा शिलालेख आहे आणि दुसऱ्या अंगाला एका बुरुजावर ज्ञानेश्वरांनीं ज्याच्या मुखानें वेद वदविले त्या रेड्याची लहानशी कोरीव प्रतिमा आहे. घाट अरुंद पायऱ्यांचा खूप उतरता बांधलेला आहे. पाणी त्याच्या अंगावरून खळाळत जातें

आणि खालच्या बाजूला वळसा घेतें. आम्ही तिथल्या नागप्रतिमेजवळ थोडा वेळ बसलों. मनांत उत्साह होता; पण वातावरण कोंदलें होतें. सूर्याचा प्रवास आतां वांवभर उरला होता; पण ढगांचे निळे हत्ती तो त्याला सुखानें पुरा करूं देणार नव्हते. ते उडतही नव्हते नि पडतही नव्हते. उगाच तिथल्या तिथें एकमेकांना ढोसण्या देत राहिले होते. पश्चिमेचें क्षितिज कुठें तरी लांब लांब गेलें होतें. समोरच्या वाळवंटांत कोणी दिसत नव्हतें. घाटावर कोण्या जानपद रमणीची घागर भरत नव्हती. उड्या मारायला चांगली जागा असूनही मुलाचा तिथें पायरव नव्हता. आम्ही तीन माणसें जणुं शून्यारण्यांत सांपडलों होतों. गोदा-मैय्याचें सान्निध्य होतें; पण संध्या आणि मेघ यांच्या संमिश्र, सांद्र छायेनें तीही दुर्मुखल्यासारखी झाली होती. अशा स्थितींत पाठीमागची रुक्ष, खडकाळ 'पालथी नगरी' या वेळीं किती उल्हसित दिसेल याची कोणींही कल्पना करावी.

पालथी नगरी म्हणजे 'दे माय, धरणी ठाय' म्हणून धरित्रीच्या उदरांत गडप झालेलें शालिवाहनकालीन पैठण. हैद्राबादच्या पुराण-वस्तुसंशोधनखात्यानें कांहीं वर्षांपूर्वी त्याचें उत्खनन केलें. त्यांत सांपडलेल्या कांहीं मूर्ति आणि फुटकींतुटकीं मातीचीं भांडीं जवळ-च्याच एका वाड्यांत ठेवलेलीं आहेत. मौल्यवान् चिजा हैद्राबादच्या वस्तुसंग्रहालयांत जाऊन बसल्या आहेत. तिथले ते खड्डे आणि चर तोंडें उघडून प्रेक्षकांना खायला उठल्यासारखे दिसतात. जें नेतां आलें तें संशोधकांनीं उचललें; पण घरांचे पाये, सांडपाणी बाहेर घालवण्या-साठीं विटांनीं बांधून काढलेले नाले आणि पाणी जमिनींत मुरवण्यासाठीं खोल खणलेल्या विहिरी या गोष्टी स्थावर असल्यामुळे जाग्यावर राहिल्या आहेत. आपल्या पूर्वजांचें वास्तुशास्त्र कुठवर प्रगत झालें होतें याचे वस्तुपाठ आजच्या स्थपतींना तिथें मिळूं शकतील. कऱ्हाड येथील उत्खननांत आणि नाशिकच्या टेकावरही अशाच विहिरी आढळल्या आहेत. नदीकांठच्या उंचवट्यांवर वसलेल्या शहरांची उभारणी त्या काळीं एका विशिष्ट पद्धतीनें होत असे याची त्यावरून

कल्पना येते. पैठणच्या आसपास आणखीही उत्खननयोग्य अशीं कांहीं टेकाडें आहेत आणि तीं जर खोदलीं तर शातवाहनकालीन इतिहासावर अधिक प्रकाश पडेल असा इतिहासविदांचा अंदाज आहे.



नाथांच्या पूजेंतील बाळकृष्ण

हें सगळें भोंवतालचें आम्हीं आधीं पाहून घेतलें. पहाणें झालें; आतां 'दर्शन' उरलें होतें. 'आंतले नाथ' आणि 'बाहेरचे नाथ' या दोन्ही स्थळांचें. दुसऱ्या दिवशीं एकादशी होती आणि आम्हांला एक मोठा लाभ घडणार होता. आतल्या नाथांच्या मंदिरांत म्हणजे नाथांच्या रहात्या वाड्यांतल्या देवघरांत अनेक मूर्ति आहेत. त्यांत सर्वोपरि विराजित अशी मूर्ति म्हणजे नाथांच्या पूजेंतला बाळकृष्ण. रोज त्याला जिथल्या तिथें गंधादि पंचोपचार होतात; पण एकादशीला मात्र खालीं काढून त्याची अभिषेकपूर्वक पूजा केली जाते. मी स्नान करून सोवळयानें गाभाऱ्यांत प्रविष्ट झालों. माझ्या आधीं दोघे पुजारी आंत

जाऊन संकल्प म्हणूं लागले होते. अवतींभोंवतीं समृद्ध पंचामृतें, मिठाई आणि फळें यांचा नैवेद्य आणि डोळे तृप्त होतील असें पूजा-साहित्य मांडलेलें होतें. बाळकृष्ण, 'भिंगाचें भिंगुलें खांद्यावर आंगुलें' वगैरे पोशाख काढून मांगलिक स्नानाला सिद्ध झाला होता.

वीतभर उंचीच्या त्या पंचरसी धातुमूर्तीकडे मीं दृष्टि स्थिर केली. 'दास जेवूं घाला, न घाला' अशीं अक्षरें उमटलेल्या विटेवर तो बाळकृष्ण उभा होता. उजवा हात लोणीसाखर चाटून उताणा कटीवर ठेवलेला. डाव्या हातीं दक्षिणावर्त शंख. पायांत सांखळ्या-वाळे. हातांत कडींतोडे. तुंदिल उदर. पाठीवर शिदोरी. काखेला कामधेनु म्हणजे झोळी. डाव्या खांद्यावर श्रीखंड्याच्या रूपानें बारा वर्षें कावड वाहिल्याची खूण म्हणून घट्टा. गळां रत्नहार. कपाळीं रत्नटिळा. मस्तकीं शिवलिंगाच्या आकाराचा मुकुट. मुकुटाला खालची रांग रत्नांची. तें बाळध्यान माझ्या चित्तांत ठसलें. मला वाटलें, आत्तां हा गोधनें चारण्यासाठीं वृंदावनांत जायला निघेल. यशोदेचें मातृहृदय व्याकुळेल. आपलें तान्हें नाजूक सुकुमार आणि वन तर कात्याकुत्यांनीं भरलेलें. ती कळवळ्यानें त्याच्या सवंगड्यांना म्हणेल,

**"जवळीच खेळा नका जाऊं दुरी**
**संभाळा मुरारी प्राण माझा"**

ही श्रीमूर्त उज्जयिनीच्या एका सावकारानें आपल्या उपासनेसाठीं घडवली होती. तो तिची आपल्या घरीं स्थापना करणार होता; पण त्याला रात्रीं स्वप्नदृष्टांत झाला कीं, 'मला पैठणला नाथांच्या घरीं पोंचव!' देवाची आज्ञा खरी; पण त्यानें ती कशी मानावी? मग त्याच्या भावभक्तीचें काय? त्यानें आइकनाइक केलें आणि स्थापनेची आरती आरंभिली. पुन्हां दुसऱ्या रात्रीं देवानें आदेश दिला आणि तोही कठोर शब्दांत. 'माझी इच्छा अवमानूं नको. तुझें बरें भलें होणार नाहीं!' सावकार घाबरला आणि तसाच्या तसा देवाला घेऊन पैठणला आला. मनाजोगता देव आवडीची धणी पुरवायला घरीं चालून आलेला पाहून नाथांना परमानंद झाला. मी विचार करूं लागलों कीं, या देवाला

पुजून नाथ धन्य झाले का नाथांसारख्या परम भागवताच्या हस्तें पूजा घेऊन देवच धन्य झाला? पण मीं हा विकल्प काय म्हणून मनाला शिवूं द्यावा? देवच निजमुखानें बोलतो आहे ना!

**‘विचारितां आंतुवट अर्थ। मी आणि भक्त एकचि’**

नाथांचा जुना वाडा हेंच आतां मंदिर झालें आहे. देवघर हेंच गाभारा बनलें आहे. त्याचा जीर्णोद्धार झालेला असला तरी महाद्वार आणि भिंती नाथांच्या वेळच्याच आहेत आणि तो नाथदारींचा रांजण-सुद्धां. रांजण म्हणजे तांब्यालोखंडाचा नव्हे; तर भूमिगत हौद. तिकडे त्यालाच रांजण म्हणायची वहिवाट आहे. तिथल्या प्रत्येक जुन्या वाड्यांत पुढच्या बाजूला पाण्याच्या सांठवणासाठीं असे रांजण बांधलेले आहेत. नाथांच्या घरचा जरा अधिक खोल आहे. कारण त्यांच्या घरीं ‘येवा-जावा’ फार; त्यामुळें पाणी मुबलक लागायचें. तोंडावर लांकडी फळया टाकून तो नेहमीं बंद ठेवलेला असतो. कोणी पहायची इच्छा दर्शवली तर फळया बाजूला करतात आणि दोराला गडू बांधून त्याचें पाणी काढतात.

जीर्णोद्धाराच्या वेळीं बाकीचे सगळे खांब निराळे घातले असले तरी गाभाऱ्यापुढचे दोन मात्र मूळचेच ठेवलेले आहेत. त्यांना सांप्रदायिक महत्त्व आहे. देवासन्मुख उभे राहिल्यावर उजव्या हाताच्या खांबांत ‘श्रीखंड्या’रूपी भगवान् गुप्त झाला आहे आणि डावा खांब ही नाथांची पुराणाला बसण्याची जागा. नाथांचें व्यासपीठ खांबाला टेकून असायचें. समोर भक्त-भाविकांचा, बाळयाभोळ्यांचा समाज कर्णेंद्रियांत पंचप्राण गोळा करून श्रवणाला बसायचा. नाथ त्यांना शुद्ध, स्नेहाळ, रसभावफुलीं बहरलेल्या वाणीनें भागवतधर्म विशद करून सांगायचे. त्यांना आत्मकल्याणाचा सुगम पंथ दाखवायचे.

“माझे हरीचे जनहो! जन्मा आलियाचें फळ मिळवायचें आहे ना? मग भागवतधर्म आचरा. तोच एक सर्वसुलभ तरणोपाय आहे. भवरोग दूर करण्यासाठीं वनांत जायला नको. इंद्रियें कोंडायला नकोत. बायकापोरें सोडायला नकोत. संसार सुखेनैव करा; पण तो

श्रीहरीचा म्हणून करा. सकल इंद्रियांना हरिसेवेची गोडी लावा. त्याचें प्रेम धरलेंत, सकळ कर्मे त्याला अर्पण केलींत, मनबुद्धींना तोच छंद लावलात, कीं श्रीहरि तुमच्या अंतरांत प्रगटेल. मागें-पुढें उभा राहून तुम्हांला सांभाळील. चक्रानें तुमच्या अभिमानाचा चेंदा करील. गदेनें मोह-ममता छेदील. शंखानें निजबोध जागृत करील आणि अशा रीतीनें तुम्ही भक्ति–ज्ञानांनीं निर्वाळलांत कीं आपल्या हातातलें कमल तुमच्या मस्तकीं ठेवून तो तुम्हांला पुजील. भागवतधर्माचें मुख्य सूत्र मी तुम्हांला सांगतों.

**“ जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ”**

सर्व प्राणिमात्रांत देव पहाणें आणि त्याच्या सेवेची आवडी धरणें हीच खरी भक्ति. कोणी उच्च नाहीं, कोणी नीच नाहीं. सर्वत्र जनीं-जनार्दन भरून उरला आहे. त्याची प्रचीति घेतली पाहिजे. त्याच्याशीं अनन्य झालें पाहिजे...... ”

जनता हाच जनार्दन आणि जनसेवा हीच भक्ति असें नाथांनीं निःसंदिग्धपणें प्रतिपादिलें. नाथांची ही नवी दृष्टि होती. नाथांनीं गुरु आणि ईश्वर हे एक केले आणि जनतेच्या विराट् स्वरूपात त्यांचा साक्षात्कार घेतला. त्यांची भक्ति सेवावृत्तीनें रंगलेली आहे. नाथ हे ज्ञानेश्वरीचे संशोधक तसेंच भाष्यकार. ज्ञानेश्वर जें सूत्ररूपानें सांगतात तेंच नाथ ‘ रसिकमुद्रे ’नें विशद करतात. नाथांचा वाङ्मयसंसार अफाट आहे. त्याला समुद्र म्हणायचें तर ‘ क्षीरसागर ’ हें नांव द्यावें लागेल. कारण त्यांत शेषशायी भगवान् निद्रित नव्हे ; तर जागृत आहे. त्यांनीं महान् ग्रंथ रचले आणि ते कर्तृत्वाच्या अभिमानासह जनार्दनचरणीं अर्पिले. ते स्वतः निर्लेप, मोकळे. त्यांच्या कोणत्याही ग्रंथांत अद्वैताची बैसका कुठेंही सुटलेली नाहीं. द्वैताची सावलीसुद्धां त्यांना खपत नाहीं. भागवताच्या टीकेला त्यांचें नांव ‘ एकाकार टीका ’ हें आहे. भावार्थ रामायणांत त्यांनीं राम हा पूर्ण ब्रह्म आणि सीता ही चिच्छक्ति असें भावून सगळें अध्यात्म खेळविलें आहे. कृष्णरुक्मिणीचें लग्न हें जिवाशिवांचें सामरस्य म्हणून ते वर्णितात. नाथांनीं परमार्थ ग्रंथांतच


ठेवला नाहीं, तर तो जीवनांत आणून ओतला. ‘ अंत्यजतोक ’ कडेवर घेऊन, श्राद्धान्न महारांना वाढून, निंदकांना ‘ आत्मारामाचे गडी ’ समजून, चोरांवरही प्रेमाची पाखर घालून त्यांनीं अभेद आचरणांत दाखवला. त्यांची धर्मपत्नी गिरिजाबाई हिनें त्यांच्या संसारांत आणि परमार्थांतही त्यांना अंगें-प्राणें साथ दिली. तिच्या जीवनाचा सौरभ नाथांच्या चरित्रांत सर्वत्र भरून राहिलेला आहे. भागवतधर्माच्या परंपरेंत नाथ हिमाचलासारखे भव्योत्तुंग वाटतात. ज्ञानदेवांनीं रचिलेल्या पायावर त्यांनीं विशाल, सुंदर आणि कलाकुसरीचें वाङ्मय-मंदिर निर्मिलें !

आज तीन-साडेतीनशें वर्षें पैठणची नाथषष्ठी गाजते याचसाठीं. नाथ-षष्ठी म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठी. पांच पर्वें या तिथीला एकत्र झालीं आहेत. जनार्दनस्वामी हे नाथांचे गुरु. त्यांच्या जन्माची आणि निर्याणाची तिथि हीच. जनार्दनांना दत्ताचा आणि नाथांना जनार्दनांचा अनुग्रह झाला तोही याच तिथीला. आणि पांचवें पर्व म्हणजे नाथांचें निर्याण. शके १५२१ या वर्षीं नाथांनींही याच तिथीवर आपला देह विसर्जिला. षष्ठीचा हा उत्सव नाथांनींच गुरूची पुण्यतिथि म्हणून सुरू केला होता. तोच पुढें नाथांची पुण्यतिथि म्हणून त्यांच्या वंशजांनीं आणि वारकऱ्यांनीं रूढ केला. गोदेचें विस्तीर्ण वाळवंट पुरूं नये अशी अलोट यात्रा दर वर्षीं या तिथीला इथें जमते.

या उत्सवाचा सांगोपांग कार्यक्रम श्री. नरहरिबुवांनीं आम्हांला सांगितला. वद्य द्वितीया ते अष्टमी एवढा उत्सवकाल असतो. द्वितीयेला रांजण उघडा करून त्याची पूजा होते. ‘ श्रीखंड्या ’ म्हणून कोण्या-तरी पाणक्याची पूजा करतात. केशवस्वामीकृत नाथचरित्राचा पाठ चालू होतो. गोदेच्या घागरी आणून लोक रांजण भरूं लागतात. पंचमीला देवाची अक्षत निघते. षष्ठीच्या दिवशीं माध्यान्हीं वाळवंटां-तून दिंडी निघून मागच्या दारानें बाहेरच्या नाथमंदिरांत येते. मग निरूपण होतें. ज्या अभंगावर नाथ स्वतः निरूपण करीत तोच अभंग निरूपणाला घ्यायचा हें ठरलेलें आहे.

" अवघेंचि त्रैलोक्य आनंदाचि आतां
चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें
माये जगन्नाथ बाप जगन्नाथ
अनाथाचा नाथ जनार्दन
एका जनार्दनीं एकपणें उभा
चैतन्याची शोभा शोभतसे "

नंतर वाड्यांत ब्राह्मणांची पाद्यपूजा होऊन लाह्यांचा कुटा आणि पीठ यांचा महाप्रसाद होतो. सप्तमीच्या रात्रीं छबिना निघतो. अष्टमीस सूर्यास्ताला बाहेरच्या नाथांसमोर गोपाळकाला होतो. रात्रीं दिंडी कृष्णकमला तीर्थावर रहाते आणि तिथें सेवेसाठीं आलेल्या हरिदास-पुराणिकांची हजेरी लागते आणि एवढें सगळें झाल्यावर उत्सव समाप्त होतो.



बाहेरचे नाथ

आम्ही संध्याकाळीं बाहेरच्या नाथाला गेलों. तें समाधिमंदिर गांवाच्या कडेला वाळवंटाला लागूनच आहे. वृक्षवेष्टित असल्यामुळें त्या बाजूला पाहिलें तरी तिकडची ओढ लागते. मंदिर वैभवशाली नसलें तरी प्रशस्त, हवेशीर आहे. प्रदाक्षिणेसाठीं मोकळा मार्ग असून सभोंवतीं ओवऱ्या आहेत. आंतली-बाहेरची स्वच्छता वाखाणण्याजोगी आहे. मंदिराच्या गर्भागारांत मूर्ति नसून पादुका आहेत. 'एका-जनार्दन' समरसतेनें त्या पादुकांत अंतःप्रविष्ट आहेत. नाथांना स्तवनपूर्वक प्रणाम करायला माझी वाचा दुबळी म्हणून मी हळूच मोरोपंतांच्या वाणींत शिरलों आणि हात जोडले.

"नमिला शमिलास्यप्रद शांतिजलधि एकनाथ तो भावें
शोभावें ज्याचें यश विश्वीं, ज्या देववृंद लोभावे"

माझ्या मागें-पुढें बरेच भक्तगण उभे होते. कपिला गायीचें धारोष्ण दूध सुवर्णपात्रांतून पिण्याची इच्छा धरावी तसें स्वभावशुद्ध गोदाजल गुरुपादुकांच्या प्रक्षालनांतून आपल्या शरीरावर शिंपडलें जावें ही आस धरून ते तिथें आले होते आणि येत राहिले होते. पुजारी सुस्नात होऊन समईच्या प्रकाशांत त्या पादुका धूत होता. तें पायवणी कमंडलूंत धरून त्यानें तिथूनच सर्व स्त्री-पुरुषांच्या मस्तकावर सिंचिलें. त्यांतले कांहीं तुषार माझ्याही भाग्याला आले. माझी काया एकदम मोहरून उठली. त्या क्षणापुरतें तरी मन उन्मन झालें. नतमस्तक होऊन मी पुटपुटलों.

"आपः पादावनेजनीर्द्विषन्तं निर्दहन्तु मे"

'चरणप्रक्षाळणाचीं हीं जळें माझ्या शत्रूला निःशेष जाळोत.' हा शत्रु कोण? अहंकाराशिवाय दुसरा कोण असणार! एकनाथमहाराजांनी तर तोच 'घुसळखांबा' पहिल्या प्रथम उपटून टाकला आहे. जोवर अहंकार तोंवर माणसें हीं माणसेंच दिसतील. त्यांचे गुण-दोष, विचार-विकार, सगळे प्रतीत होतील. अहंकार सुटला कीं आपणांसकट सगळा ईश्वरच ईश्वर! सगळाच जनींजनार्दन!!

# ९ 'धन्य देहू गांव-'

श्रावणांतली सकाळ आहे. पावसानें रिपरिप चालवली आहे. दिशा फांकण्याऐवजीं घेरून आल्या आहेत. अंधार उजळायच्या ऐवजीं अधिकच काळवंडत आहे. ढगांनीं डोक्यावर दाट मांडव घातला आहे. पुणें–मुंबई राजरस्त्यावर जागोजाग पाणी सांकळलें आहे. कडेनें जाणाऱ्या लोकांच्या आधींच गारठून गेलेल्या अंगांवर निर्दयपणें पाण्याचे फवारे उडवीत एस्. टी. चीं गाडी घडघड चालली आहे आणि याच गाडींत बसून मी पुण्याहून वायव्येस तीस मैलांवर असलेल्या देहूला जायला निघालों आहें.

धरित्रीच्या कुशींतून नुकतेंच वर डोकें काढलेल्या सभोंवतींच्या शेतांतल्या अंकुरांना पावसाची गरज होती; तेव्हां त्याच्याबद्दल तक्रार करण्यांत अर्थ नव्हता. माझ्यापुढें प्रश्न एवढाच होता कीं, हा पाऊस मोकळ्या अंगानें मला देहूंत फिरूं देईल कीं नाहीं? पण मनांत आलें कीं, हा 'सकाळचा पाहुणा' आहे. तो बहुधा दुपारला रहायचा नाहींच. आणि झालेंही तसेंच. देहूरोड स्टेशनाजवळून आमच्या गाडीनें उजवें वळण घेतलें आणि पूर्वेला वावभर उंचीवर सवितानारायण ढगांच्या चक्रव्यूहांतून बाहेर पडत म्हणाला, 'अयमहमस्मि!'

तावडतोब आसपासच्या ढगांच्या कडा रुपेरी झाल्या. अक्षरशः सोन्यासारखे किरण हिरव्या धरित्रीवर पघळले. देहूच्या रस्त्यावरचीं डाव्या-उजव्या अंगांना असलेलीं लष्करी अधिकाऱ्यांचीं घरें उजळून निघालीं. त्यांच्या बागेंतलीं विलायती फुलें नाचून, डोलून आनंद व्यक्तवूं लागलीं. क्षितिजाकडच्या गिरिशिखरांवर नेटानें चढणाऱ्या भुरक्या ओलसर ढगांत किरणाची सुवर्णछटा अशी कांहीं बेमालूम मिसळली कीं, जणुं एखाद्या सिद्ध योग्याची किमयाच! मीं म्हटलें, ज्ञानेश्वरांचा 'सोनियाचा दिवस' आपल्याला कधीं काळीं तरी लाभेल कीं नाहीं देव

जाणे! पण हा अवचित जोडलेला सोन्याचा क्षण तरी हर्षोत्फुल्ल मनानें भोगून घ्यावा.

आज देहूचा परिसर हा एक लष्करी केंद्र बनला आहे. रणसाहित्याचें आगर झाला आहे. तारांच्या वेटोळ्यांचीं दाट दुर्गम कुंपणें, ठायीं ठायीं चौक्या-पहारे, उंच उंच माचे, बंगले, डेरे, राहुट्या, ध्वजस्तंभ, रानोमाळ पडलेल्या अगणित गाड्या, असंख्य खोकीं असा सगळा अवाढव्य पसारा. तीनशें वर्षांपूर्वीं तुकोबा 'आवडीनें भावें हरिनाम' घेत ज्या भूमीवरून संचार करीत होते त्या भूमीचें आजचें स्वरूप हें असें गंभीर आणि बंदिस्त आहे. तुकोबाही युद्धाला अपरिचित नव्हते.

"रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग
अंतर्बाह्य जग आणि मन"

असें ते स्वमुखानें सांगतात. पण त्यांचे युद्धसंकेत वेगळे होते. पद्धति भिन्न होती. परिणामही निराळा होता. आंतलें जग म्हणजे कामक्रोधादि शत्रु नि संकल्प-विकल्पात्मक मन आणि बाहेरचें जग म्हणजे त्यांच्या परमार्थ-मार्गांत कांटे पसरणारीं, निंदा-स्तुतीचे घाव घालणारीं माणसें. या दोघांच्या विरुद्ध त्यांना शस्त्रावांचून नि उघड्या अंगानें लढायचें होतें. ते लढले; रात्रंदिवस लढले. या युद्धांत त्यांना विजय मिळाला आणि ते अद्वैताच्या सिंहासनावर पट्टाभिषिक्त झाले.

पुढचा रस्ता चिखलाचा असल्यामुळें आमची गाडी देहू गांवापासून अर्धा मैल मागें माळवाडी येथें उभी राहिली. विषयपंक अंगावर उडूं न देतां तुकोबा जशी परमार्थाची वाट चालले, तसाच मीहि तो चिखल चुकवीत चुकवीत गांवाच्या शिवेवर आलों. तिथें एक गृहस्थ भेटले. त्यांनीं सांगितलें, 'गांवांतून देवळाकडे जाणारा रस्ता निसरडा आहे. तुम्ही डाव्या हातानें इंद्रायणीच्या तीरानें वर या.' मी त्यांची सूचना स्वीकारून निघालों तों पहिली भेट झाली ती मंबाजीबुवाची. नदी-कांठींच इनामदारांच्या वाड्याच्या पिछाडीस त्याची बखळ आहे. मीं म्हटलें, 'चला; दुर्जनं प्रथमं वन्दे!'

आज जिथें शंकराचें लहानसें मंदिर आणि सभोंवतीं शेत आहे

तिथेंच त्या काळीं मंबाजीनें आपली मठी उभारली होती आणि देवतार्चन थाटलें होतें. जो येईल त्याला उपदेश द्यायला तो ' टिळा-टोपी, माळा ' घालून तयार असे. तो जणुं सावजें पकडायला सांपळा मांडून बसला होता. पण लोक देहूला येत ते मंबाजीच्या पायां पडायला नव्हे; तर तुकोबांच्या दर्शनाला आणि त्यांचेच नितविते चार शब्द ऐकायला. त्यांना आस असे ती तुकोबांच्या कृपाप्रसादाची. आपलें बद्द नाणें देहूच्या बाजारांत चालत नाहीं हें पाहून मंबाजी चडफडे, कावे आणि हात चोळी. तुकोबा असल्या पिंडपोषक दांभिकांची कीर्तनांत यथेच्छ खरवड काढीत, ती त्याला जळत, तापत ऐकावी लागे.


" तुका म्हणे ऐसे मावेचे मविंद
त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं "

म्हणून ते जनांना सावधानतेचा इषारा देत. ते कोणाचें नांव घेत नसत; पण ती टोपी नेमकी मंबाजीच्या डोक्याला बसे. ज्यांना सत्याचा आणि न्यायाचा आधार नाहीं त्यांनीं शेवटीं क्रोधाचा आसरा घ्यायचा हें ठरलेलेंच. अशाच रागाच्या भरांत त्यानें एक दिवस तुकोबांच्या अंगावर हात टाकला आणि त्यांना यथेच्छ झोडपलें. तुकोबांच्या अंगावर वळ उठले खरे; पण आंतली तितिक्षा तावून-सुलाखून निघाली. ' बरवें संचित होतें तैसें जालें रे ' म्हणून ते अनाक्रोश राहिले.

इंद्रायणीला त्या दिवशीं पूर नव्हता; पण पाणी मात्र गढूळ होतें. तिला तारुण्य आलें होतें, पण मुसमूस नव्हती. ती तुकोबांचा कसला तरी सांगावा घेऊन लगबगीनें आळंदीकडे निघाली होती. लहानशीच नदी आणि तिच्यावर लहानसाच घाट. त्यावरचीं न्हातीं-धुतीं माणसेंही परिमितच. मी खालीं उतरून तिच्या जलाचें मार्जन केलें आणि घाटाला लागूनच असलेल्या विठ्ठलमंदिराच्या महाद्वारांत दाखल झालों. देहूला आपण जातों तें तुकोबांचें दर्शन घ्यायला; पण आपणांस तिथें दर्शन होतें तें पांडुरंगाचें.

'भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज'
'तुका म्हणे होतीं । तुझी माझी एक ज्योति'

ही पारमार्थिक धारणा ठीक असली तरी व्यावहारिक दृष्टीनें सांगायचें झाल्यास देहूंत तुकोबांचें मंदिर नाहीं. सदेह वैकुंठगमन केल्यामुळें कुठें समाधीचा चिराही नाहीं ; पण भाविकांना या गोष्टीचें शल्य बोचत नाहीं. त्यांचा विरस होत नाहीं. ते विठ्ठलाच्या आकारांतच तुकोबांना पहातात. ही शिकवण त्यांना संतांच्या भागवतधर्मानें दिली आहे आणि ती त्यांच्या हाडींमासीं भिनली आहे.



तुकोबांच्या पूर्वजांचें विठ्ठल-मंदिर

देवळाच्या प्राकारांत गेल्यावर समोरच गरुड-हनुमंत आहेत. तिथेंच दोन दीपमाळा आहेत. त्यापुढें मंदिरापासून किंचित् विलग, पण दुरून मंदिराचाच भाग वाटणारा गरुडमंडप आहे. तिथें अष्टौप्रहर वीणा उभा असतो. पुढें मंदिराचा सभामंडप आणि त्यापुढें गाभारा आहे. तिथें विठ्ठल-रखुमाई जोडीनें उभीं आहेत. देवळांत आणि प्राकारांत फरसबंदी आहे. सभोंवतीं ओवऱ्या आहेत. हें प्राकार-बांधणीचें काम महाळुंगे येथील इंगळे पाटील आणि कल्याण शिवाजी या दोघां तुकारामभक्तांनीं केलें आहे. त्याच्या शेजारींच एक राम-मंदिरही आहे. या स्थळासंबंधीं तुकोबांनींच केलेला एक अभंग दिला कीं त्यांत सगळा तपशील आला असें समजावें.

" धन्य देहू गांव पुण्यभूमि ठाव
तेथें नांदे देव पांडुरंग
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे
उच्चारिती वाचे नामघोष
कर कटीं उभा विश्वाचा जनिता
वामांगीं ते माता रखुमादेवी
गरुड पारीं उभा जोडोनियां कर
अश्वत्थ समोर उत्तरामुख
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर
शोभे गंगानीर इंद्रायणी
लक्ष्मी नारायण बल्लाळाचें बन
तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर
विघ्नराज दारीं बहिरव बाहेरी
हनुमंत शेजारीं सहित दोघे
तेथें दास तुका करितो कीर्तन
हृदयीं चरण विठोबाचे "

तुकोबांचे आठवे पूर्वज विश्वंभरबावा यांनीं हें मंदिर प्रथम बांधलें. यांचें आडनांव आंबिले आणि कुळी मोरे असल्याचें नाशिक येथील क्षेत्रोपाध्यांच्या बाडांत नमूद आहे. तुकोबांच्या घराण्याकडे देहू येथील महाजनकीचे अधिकार होते. बाजारपेठेंत महाजनकीचा वाडा होता आणि देवाच्या पूजेअर्चेंसाठीं पुरातन इनाम चालत होतें. तुकोबांनीं उदासीन वृत्तीमुळें या महाजनकीची उपेक्षा केली; पण त्यांचे धाकटे चिरंजीव नारायणबोवा यांनीं शके १६०० मध्यें शिवाजीमहाराजांना सदर वृत्ति आपल्या घराण्याकडे यथापूर्व चालू ठेवावी म्हणून अर्ज केला आणि त्यावर शिवछत्रपतींनीं पुणें परगण्याच्या देशाधिकाऱ्यास पुढीलप्रमाणें आज्ञा दिली—' यांची महाजनकी मिरासी पहिलेपासून चालत आली आहे तेणेंप्रमाणें चालविणें. '

विश्वंभरबावा—हरिबावा—विठोबा–पदाजी–शंकरबावा–कान्हया बोल्होबावा—आणि तुकाराम अशी त्यांची वंशवेल आहे. विश्वंभरबावा हे विठ्ठलाचे भक्त आणि वारकरी. यांच्या प्रेमाला भुलून पंढरीनाथ देहूंत आला. 'तूं मजकडे येणें थांबव. मींच तुझ्या घरीं येतों. जवळच्या आंबे-वनांत गेलास कीं तिथें तुला आम्हां दोघांच्या पाषाणमूर्ति सांपडतील. त्या तूं घरांत आणून पूजेला लाव.' या दृष्टान्ताप्रमाणें विश्वंभरबावांना मूर्ति गवसल्या. द्वारकेचें केणें आपल्या बंदराला लागलें असें त्यांना वाटलें. त्यांनीं त्यांची रीतसर प्रतिष्ठा करून पुढें मंदिरही उभारलें. 'माझ्या वडिलांची मिरासी' म्हणून पुढें तुकोबांनीं या देवाचे पाय दृढ धरले.

ज्यांनीं तुकोबांच्या अभंगांचें मनन केलें नाहीं ते त्यांना एक 'साबडा भाबडा प्राणी' असें समजतात. चित्रकार त्यांचीं बावळट मुद्रेचीं चित्रें रेखाटून वास्तवदर्शी कला दाखवल्याचें समाधान मानतात. पण लोकांची ही समजूत बिनबुडाची आहे. 'एथ चातुर्य शहाणें जाहलें' अशा अधिकाराचे तुकोबा होते. ते आपलें वाणसवद्याचें दुकान उत्तम चालवीत. त्यांना जमाखर्चाची चोख माहिती होती. अनेक व्यापारी पेठांशीं त्यांचा संबंध होता. त्या पेठांतून चालू असलेल्या गुजराती-हिंदी या भाषांचाही त्यांनीं कामचलाऊ परिचय करून घेतला होता. तत्कालीन हिंदींतून त्यांनीं पद्यरचनाहि केली आहे हें लक्षांत ठेवायला हवें. मुख्य धंद्याशीं संबद्ध असे अनेक गौण धंदे ते चालवीत होते. त्या वेळीं निराळ्या अर्थानें 'पांडुरंग' हा त्यांचा देव होता. ते आपल्या व्यवसायांत बाराचे सोळा करण्यांत इतके गढून गेले होते कीं, सबंध दिवसांत एका क्षणाचीही त्यांना उसंत मिळत नसे.

बाराव्या वर्षी त्यांच्या मस्तकावर पहिल्या मंगलाक्षता पडल्या. बोल्होबावाना सून मिळाली. पण थोड्याच दिवसांत त्यांना कळून आलें कीं, घराला आणलेली पोरगी दमेकरीण आहे. ही मोठी होणार आणि आपल्या तुक्याला सुख देणार हें मिथ्या, असें समजून त्यांनीं तुकोबांना पुन्हां मंडावळ्या बांधायला लावल्या आणि पुण्याच्या अप्पाजी गुळव्यांची मुलगी जिजाई ही पहिलीवर दुसरी आणली.

तुकोबा भोळसट असते तर त्यांच्या गळयांत बांधायला त्या वधू-पित्यांच्या मुली कांहीं वर आल्या नव्हत्या.

देशावरून कोंकणांत मीठ विकायला नेणें आणि कोंकणांतून मिरच्या घाटावर चढवणें असला आचरटपणा त्यांच्यावर लादूं पहाणाऱ्या शहाण्यांना तुकोबा स्पष्ट सांगतात कीं, ' मी व्यवहारांत पक्का होतों. अट्टल ठकाचीसुद्धां माझ्यापुढें हिकमत चालली नाहीं. आपल्या काळजाचा ठाव दुसऱ्याला लागूं न देणें ही कला तर मला स्वभावसिद्ध होती. ' असा टुमटुमीत चाललेला त्यांचा संसार कोसळला तो त्यांच्या नालायकी-मुळें नव्हे ; तर नियतीनें फांसा उलटा टाकल्यामुळें !

त्यांच्यावर एकामागून एक आपत्ति धांवत येऊन आदळल्या. प्रथम शिरावरचें आईबापांचें छत्र उडालें. बाळगोळीचा हा पहिला वळसा त्यांना चांगलाच झोंबला. पुढें आलें अवर्षण आणि त्यांतून दुष्काळ. प्रथम द्रव्य गेलें, नंतर मान गेला आणि पुढें जगण्यापुरतें अन्न मिळण्याचीसुद्धां भ्रांत पडली. एक मुलगा खपला. पहिली बायको अन्नान्न करीत मेली. धंद्याचें दिवाळें वाजलें. सर्व बाजूंनीं पातेरा उडाला. जिजाईनें कर्कशेचा वसा घेतला. कठिण, विषम काळीं तिनें तुकोबाच्या मनाची जपणूक केली नाहीं. त्याच्या आहाळलेल्या हृदयावर सहानुभवांची फुंकर घातली नाहीं. बाहेर अपमान ; घरांत अप्रतिष्ठा अशी दुधारी सुरी लागून तुकोबा घायाळ झाले. ते अनुतापानें कढूं लागले. त्यांना एकंदर प्रपंचाचाच वीट आला. त्यांचें मनपाखरूं फडफड करीत अधांतरीं गिरगिरूं लागलें. संसाराची डहाळी मोडली ; आतां बसायला जागा कोणती ?

आणि याच वेळीं त्यांना निर्वाणींचा पांडुरंग आठवला. त्यांनीं त्याच्या पायीं मिठी घातली. त्यांना वाटलें कीं हाच आतां आपली तड लावील. त्या वेळीं तें देऊळ मोडकळीस आलें होतें. विठ्ठलाकडे मन गुंतवण्याचें साधन म्हणून त्यांनीं त्याचा स्वहस्तें जीर्णोद्धार करायचें ठरवलें. आप्तसुहृदांना त्यांचा हा उद्योग म्हणजे ' अव्यापारेषु व्यापार ' वाटला. पण त्यांनीं कोणाकडे लक्ष न देतां आपल्या घरच्या पांडुरंगाचा

आसरा नीट केला. देवळांत भजन चाले, त्यांत ते हळूहळू रस घेऊं लागले. त्यांनीं एकादशीचें उपोषण धरलें. ज्ञानेश्वरी-भागवतांतले बरेच वेंचे कंठस्थ केले. त्यांची श्रद्धा हळूहळू जीव धरूं लागली. कुठेंच कांहीं नाहीं असें झालें होतें तें निजाचें विश्रांतिस्थान मिळाल्याचा त्यांना प्रत्यय येऊं लागला. संतांच्या कीर्तनांत ते आवडीनें ध्रुपद धरूं लागले. वाढत्या मनोल्हासानें त्यांनीं संतसेवा आरंभली. लोकांनीं याही बाबतींत नाकें मुरडलीं. पण—

**" सत्य असत्यासी मन केलें ग्वाही**
**मानियेलें नाहीं बहुमता "**

या निर्णयावर येऊन त्यांनीं लोकलाज लाथाडली आणि सर्वभावें देव आपलासा केला. भक्तिसुखाची गोडी त्यांना अपूर्व वाटली. प्रपंचांत जें कधींच भेटलें नव्हतें तें त्यांना परमार्थांत गवसलें. आपल्या-प्रमाणेंच आपल्या पत्नीनेंही सुखी व्हावें अशी त्यांची इच्छा. 'संसाराचें हें क्षुद्र सुख थुंकून टाक. आपला गळा उगवून घे' म्हणून ते तिला सारखें उपदेशीत; पण तुकोबांचा जसा संसारावरचा विश्वास उडाला होता तसा तिचा परमार्थावरचा. आपला नवरा देवलसी झाला, आपली आणि पोरांची कदर करीनासा झाला हें पाहून ती अगदीं कावून गेली होती आणि तिच्या हातचा एकमेव उपाय म्हणून तुकोबांवर हवें तसें तोंडसुख घेत होती—

'कोण मेला दावेदार होता तो या जल्मीं वैर साधायला नवरा होऊन आला आहे. किती आपदा काढायच्या मी संसारांत! काय घालूं या पोरांच्या पानांत? हीं सगळीं मरतीं तरी बरं होतं. हा तर डोचकं तिंबतो, माळा घालतो आणि देवळांत टाळ कुटीत बसतो. याच्याबरोबरीला आणखी कांहीं वेडे जमले आहेत. सगळे मेले लाजा कोळून प्याले आहेत. यांच्या 'रांडा' घरांत तळमळतात त्यांची दखलगिरी आहे का यांना? या विठ्यानं माझ्या संसाराचं वाट्टोळं केलं......'

पुढें पुढें तुकोबाना एकांताचा नाद लागला. त्यांचीं एकांतस्थळें म्हणजे गोराडा, भंडारा आणि भामनाथ हे डोंगर. देवळाच्या मागें पश्चिमाभिमुख उभें राहिलें कीं डाव्या हाताला देहूरोड स्टेशनाच्या बाजूस सहा मैलांवर गोराडा दिसतो. थेट पश्चिमेस दोन मैलांवर भंडारा आहे. त्याच्या शिखरावरचें विठ्ठलमंदिर देहूतून अस्पष्टसें दिसतें. उजव्या बाजूला डोहाच्या पलीकडे आठ मैलांवर भामनाथ आहे.

तुकोबा लहर लागली कीं कधीं या तर कधीं त्या डोंगरावर जाऊन बसत. वृक्षांचा डोल, वल्लरींचें लीलानृत्य, पाखरांची किलबिल, वर आकाशाचा मंडप, खालीं पृथ्वीचें सिंहासन या सर्वांत त्यांना पांडुरंगाचा साक्षात्कार घडे. तुकोबांचा हा अनुभव दुहेरी होता. वृक्षवल्ली आणि वनचरें यांत ते विठ्ठल पहात आणि विठ्ठलाच्या व्यापकपणांत हीं सर्व भूतें अवलोकीत. तिथें त्यांचा मनाशीं संवाद होत असे. शास्त्रांचें सार आणि वेदांची मूर्ति असा पांडुरंग जिवाचा सखा होऊन तिथें त्यांना सोबत करी. सगुण-निर्गुण हीं ज्याचीं अंगें तो विठ्ठल तिथें त्यांच्याशीं क्रीडा मांडी. ते त्या निवांतपणांत तहान-भूक विसरत असले तरी जिजाईला त्यांच्या भुकेचा कधींही विसर पडत नसे. घरीं केलेला भाकरतुकडा फडक्यांत बांधून ती धर्मपत्नी त्यांना शोधीत डोंगर उरापोटावर घेई आणि त्यांच्या मुखीं ग्रास गेल्यानंतरच स्वतःचें पोट पुजी. ती विठोबाला शिव्या देई; पण त्याला त्या ओव्या वाटत. देहभान विसरलेल्या आपल्या भक्तराजाची काळजी घेणाऱ्या जिजाईचें देवाला मोठेंच कौतुक वाटत होतें.

अशा रीतीनें एकांत तुकोबांच्या जिव्हारीं जडला होता. तिथल्या अखंड चिंतनानेंच त्यांच्या अभंगवाणीला ओज चढलें. ते डोंगरावर आत्मानात्म विचार करीत आणि रात्रीं ' मथियेलें सार नवनीत ' अभंगरूपानें श्रोत्यांच्या मनींमुखीं घालीत. ते अभंग देवाला गोड घासासारखे वाटत. पूर्वीं नामयाच्या अभंगांनीं वेडापिसा झालेला देव आतां तुकोबांच्या अभंगानीं रिझे, रंजे.

**" श्रीनामदेव तुकया, तदभंग प्रभुसि गोड घांस तसे**
**गहिंवरतसे परिसतां नाचतसे पांडुरंग हांसतसे "**

अशी मोरोपंत देवाची अवस्था वर्णितात.

नारदाप्रमाणेंच तुकोबांनींहि अखंड कीर्तनभाक्ति गाजविली. कीर्तन हा त्यांचा नित्य नेम होता. श्रोते येवोत, न येवोत, यांचें आपलें कीर्तन व्हायचेंच. त्या कीर्तनांत जनांना 'मेघवृष्टीनें' उपदेश चालायचा. जिजाईला, गांवच्या पाटलाला, रामेश्वरभट्टाला आणि मंबाजीबुवालासुद्धां त्यांनीं एकाच हरिनामाचा मंत्र सांगितला. नामरंगासाठीं 'या रे या रे लहान थोर' म्हणून सर्वांना हांकारलें. जिथें कथा करतील तिथें देव, भक्त आणि नाम असा त्रिवेणीसंगम उभा केला. कीर्तनांत त्यांनीं सर्वांना ब्रह्मरसाचें भोजन वाढलें आणि आपल्याबरोबरच श्रोत्यांनाही 'देहीं विदेहदशा' अनुभवायला लावली.

"उघडी समाधि हरिकथा सोहळा
नरनारी बाळां लहानथोरां"

तुकोबांची अभंगवाणी ही ईश्वरी प्रेरणा होती. पांडुरंगासह नामदेवानें स्वप्नांत भेट देऊन त्यांना अभंगरचनेचा आदेश दिला होता. नामदेवाला आपला 'शतकोटि' अभंगांचा अपुरा राहिलेला संकल्प तुकयाच्या द्वारें समाप्तीला न्यायचा होता आणि देवाला त्या अभंगांचे अलंकार मिरवायचे होते. अभंगाच्या शेवटीं 'तुका' हीं अक्षरें लाव, हीही त्यांचीच शिफारस. तुकोबा त्या आदेशाला जागले आणि मग त्यांच्या स्वैरकथाही अभंगरूप घेऊं लागल्या. याच अभंगांच्या द्वारें तुकोबांनीं परमार्थ गांवोगांव, घरोघर, झोंपडींझोंपडींत पोंचविला. प्रत्येकाच्या जिभेवर 'तुका म्हणे' हीं अक्षरें नाचूं लागलीं. अभंगावांचून कीर्तन म्हणजे सूर्यावांचून दिवस असें झालें; पण ज्या कारणामुळें तुकोबा हे भागवतधर्माचे कळस ठरले त्याच कारणानें ते वैदिक-पंडितांच्या हृदयांत शल्य झाले.

"वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा
इतरांनीं वहावा भार माथां"

हे तुकोबांचे निधडे बोल त्या वैदिक कर्मकांड्यांना! कसे रुचावे?

तुका वाणी श्रुतिस्मृतिप्रतिपादित गुरुगम्य अर्थ मराठींत आणतो आणि चवाठ्यावर मांडतो हें त्याच्या दृष्टीनें अब्रह्मण्यम् होतें. सनातनधर्माला सपशेल विरुद्ध होतें आणि हा अत्याचार शक्य तितक्या लवकर थांबायलाच हवा होता. मंबाजीबुवानें अशा लोकांचें धुरीणत्व स्वीकारलें. गांवचा पाटीलही अनुकूल करून घेतला. दिवाणींत गाऱ्हाणें गेलें आणि शेवटीं तुकोबांना हुकूम मिळला तो हा, कीं 'अभंगांच्या वह्या इंद्रायणींत बुडव!'

तुकोबा आलिया भोगासी सादर झाले. त्यांनीं चांगल्या वेष्टनांत बांधून ठेवलेल्या त्या वह्या, तो ज्ञान–भक्तीचा अमोल परिपाक, तो मराठींत अवतरलेल्या दैवी प्रतिभेचा कुवासा, तो त्यांचा ज्ञानमय प्राण, तो शब्दरूप विठ्ठल त्यांनीं स्वहस्तें इंद्रायणीच्या डोहांत बुडविला. तो दारुण शिक्षाप्रसंग पाहून कोणी रडले तर कोणी हंसले! तुकोबांच्या अंतराची मात्र तळमळ सुरू झाली. त्यांना कसेंच आणि कुठेंच चैन पडेना. विचार करून करून मस्तक फुटायची वेळ आली. ते म्हणाले, 'काय मिळवलं मी जीवनांत? काय उरलं आतां माझ्या हातांत? 'देव ना संसार। तुका दोहींकडे चोर!''

आणि मग त्यांनीं देवाचें ब्रीद पहायचें ठरवलें. एका शिळेवर आसन घालून त्यांनीं प्रायोपवेशन मांडलें. इतिहासांतला पहिला सत्याग्रही पंचप्राण इरेला घालून बसला. एक देव तरी भेटो; नाहीं तर हा भारभूत जीव तरी जावो, असा त्यांनीं निर्धार केला. उगवता सूर्य ज्या जागीं त्यांना पाही, त्याच जागीं मावळता सूर्यही. रात्रीं नक्षत्रें त्यांच्या अनशनव्रताचीं साक्षी होत. एक दिवस गेला, आश्वासन नाहीं. दोन दिवस उलटले, कुठूनही कृपेची शीतळ झुळूक नाहीं. तीन...चार... पांच...असे तेरा दिवस संपले; पण कुठेंच कशाला पत्ता नाहीं. अखेर त्यांनीं विठुरायाच्या नांवें टाहो फोडला.

**"तेरा दिवस झाले निश्चक्र करितां**
**न पवसी अनंता मायबापा**

पाषाणाची खोळ घेऊन बैसलासी
काय हृषीकेशी झालें तुज
तुजवरी आतां प्राण मी त्यजीन
हत्या मी घालीन पांडुरंगा
फार विठाबाई धरिली तुझी आस
करीन जीवा नाश पांडुरंगा
तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण
प्राण हा सांडीन चंद्रभागे "

आणि दयावंत देवानें मायबापावर ताण केली. पांडुरंग बालवेषानें तुकोबांच्या पुढें धवधवीत उभा राहिला. त्यानें तुकोबांना सर्वांगीं निववलें. जळांतल्या लाह्यांप्रमाणें पाण्याचा बुंद न लागतां अभंगवह्या डोहावर तरंगूं लागल्या. भक्त हर्षनिर्भर झाले. निंदक-छळकांच्या मुद्रा उतरल्या. तुकोबांचें सत्त्व भगवंतानें राखलें. त्यांची वाणी शुद्ध, सोज्ज्वळ ठरली.

देहूंत पांडुरंगाच्या मंदिराला लागूनच तुकोबाची पहिली भार्या रुक्मिणी हिचें वृंदावन आहे आणि ज्या शिळेवर तुकोबांनीं तेरा दिवस 'निश्चक्र' केलें ती शिळा आजमितीस त्या वृंदावनाला टेकवून ठेवलेली आहे. तिथेंच रुक्मिणीची पाषाणमूर्ति भिंतीला टेकून उभी केलेली असून जिजाबाईची तसलीच मूर्त तुकोबांच्या जन्मस्थळाजवळ आहे. आणि हें जन्मस्थानाहि पूर्वद्वारांतून बाहेर आल्यावर उजव्या हाताला इनामदारांच्या वाड्याला लागूनच पलीकडे आहे. शके १५३० या वर्षीं ज्या जागीं तुकोबांचें ललाट धरणीला लागलें तिथें विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ति स्थापिलेल्या आहेत. महापुरुषांच्या जन्माभोंवतीं एक काल्पनिक तेजोवलय आपोआप निर्माण होत असतें तसें तें तुकोबांच्या भोंवतींही झालें आहे. एक लोककवि त्याबद्दल आपल्याला सांगतो.

"चाकण-चौऱ्यायशीं परगण्यांत देहू गांवीं तुकोबा जलमले तेव्हां स्वर्गांत घंटा वाजल्या. बाराव्या दिवशीं विठोबा साक्षात् देहूला आला आणि त्यानें तुकोबाची 'नांवरसी' सांगितली. देवाचा शब्द ऐकून


तुकोबा बाजेवर हंसला. सगळया आयाबायांना ' विपरीत ' झालं. योगी पुरुष जलमल्याची खूण पटली."

ह्याच वामनकवि पुढें सांगतो कीं, तुकोबांच्या पितरांचा पक्ष वाढायचा होता तर विठोबा-रखमाई, तुकोबा-जिजाईचीं रूपें नटून देहूस आले. रखुमाईनें षड्रस पक्वान्नें रांधलीं. विठोबा देहूकर मंडळींना बोलवायला गेले ; पण ' तुक्या दरिद्री ; तो काय जेऊं घालणार ? ' म्हणून सर्वांनीं आवंतण्याची उपेक्षा केली. देव म्हणाला, ' ठीक आहे. तुम्ही नाहीं तर तुमचे पितर येतील. ' मग देवानें काय केलें—

> "दारवटे उघडुन स्वर्गलोकाला गेला
> त्यांचे वडिल आणले जेवायाला
> भोजन वाढितात पंगतिला
> पाठीं आर्याश्लोकांचा गजर झाला
> जेऊं घातलें वडलांला पोचवले ठिकाण्याला
> भक्ताची लाज राखुन देव पंढरीला गेला
> ............"

महाद्वारांतून बाहेर आल्यावर समोर तुकोबांच्या वंशजांच्या कांहीं समाध्या एकाच ठिकाणीं दिसतात. त्यांतली सर्वांत मोठी तुकोबांचे धाकटे चिरंजीव नारायणबावा यांची आहे. नारायणबावा हे ज्ञानेश्वरांचे अवतार आणि त्यांनींही जिवंतसमाधि घेतली अशी एक आख्यायिका देहूंतच मला ऐकायला मिळाली. तिथून सरळ इंद्रायणीच्या कांठानें उत्तरेला निघालें कीं कांहीं पावलांवर इंद्रायणीचा तो मैल दीड मैल लांबीचा डोह सुरू होतो. तिथेंही एक लहानसा घाट आहे. त्यावर उभें राहून चार शेंगा डोहांत फेकल्या कीं भल्या मोठ्या माशांची झुंड पृष्ठभागावर येऊन त्या आमिषावर तुटून पडते. हे मासे म्हणजे स्वर्गांतले तेहतीस कोटी देव असें समजतात. ' कालियाच्या आशे । देव जळीं झाले मासे ' अशी वारकऱ्यांची धारणा आहे. देहूकर म्हणतात कीं, पावसाळयांत ते आळंदीला जातात आणि भाद्रपद संपल्यावर परत उलटे स्वस्थानीं येतात.

तिथून आणखी जरा पुढें गेलें कीं गोपाळपूर लागतें. नांदरुखीच्या झाडांनीं तें सुंदर आणि छायामय झालें आहे. त्यांतल्याच एका झाडाखालीं लहानशा देवळींत तुकोबांची वीणाधारी पाषाणमूर्ति आहे. शके १५७१ फाल्गुन वद्य द्वितीया या दिवशीं तुकोबांचें इथेंच अखेरचें



तुकाराम इथून अदृश्य झाले

कीर्तन झालें आणि इथूनच ते सदेह वैकुंठाला गेले. जाण्याच्या पूर्वी त्यांनीं आपल्या श्रोत्यांचा आणि टाळकऱ्यांचा निरोप घेतला.

**"आम्ही जातों आमुच्या गांवा**
**आमुचा रामराम घ्यावा"**

'मला देवाचें आमंत्रण आलें. आतां मी माहेरास मोहरलों. शंखचक्र आणि पीतांबर धारण करणारा पांडुरंग मला पैलतीरावरून पालवीत आहे. गरुडही फडत्कारें आला आहे. पहा ती मेघश्याम साजिरी-गोजिरी श्रीमूर्ति! त्याच्या तेजापुढें गभस्ति लोपत आहे. आतां तुमची-आमची हीच गांठभेट! यापुढें सर्व इतिहासाचा पसारा! देवानें मला अक्षयपद दिलें. कृपेच्या सिंहासनीं पैठें केलें.

**"याजसाठीं केला होता अट्टहास**
**शेवटचा दिस गोड व्हावा"**

आणि तो आज झाला. शेवट गोड तें सर्व गोड! धर्मकर्माप्रमाणें तुमचें कल्याण होवो, हा माझा तुम्हांला आशीर्वाद! ‘ रामकृष्ण मुखीं बोला। तुका जातो वैकुंठाला! ’

त्यासरसा नामाचा गजर सुरू झाला. श्रोत्यांच्या हृदयावर पडलेलें दुःख-शोकाचें दडपण त्या नामघोषानें दूर झालें. सगळेच नामधुंद झाले. काय घडत आहे आणि काय घडणार आहे याची कोणालाच जाणीव उरली नाहीं. थोड्या वेळानें त्या तंद्रींतून भानावर येतात तों त्यांना काय दिसलें?

### “ कुडीसहित झाला गुप्त ”

या नांदरुखीच्या शेजारींच एका झोंपडीवजा ओवरींत एक पाषाण-प्रतिमा आहे ती तुकोबांची कन्या भागीरथी. आपला पुण्यश्लोक पिता आपल्याला न कळवितां न येण्याच्या वाटेला निघून गेला हें समजतांच त्या लडिवाळ मुलीच्या काळजानें ठाव सोडला. तिनें अन्नपाणी वर्ज्य केलें. जवळच्याच गांवीं तिचें सासर होतें. सून प्राणांत मांडून बसली हें पाहून सासरचीं माणसें घाबरलीं. अखेर तुकोबांना तिच्या समाधाना-साठीं तिच्या घरीं प्रगट व्हावें लागलें. मुलीच्या हातची शेवयांची खीर खाऊन मग ते तिला अदृश्य झाले.

देहूला पहाण्याजोगें फार थोडें आहे; पण चिंतनाजोगें पुष्कळच आहे. एका महाभागवताचें समग्र चरित्र या भूमीवर घडलें आहे. तुकोबांनीं संसार फलकट मानला, भोगावर पाषाण घातला, विवेक-वैराग्याची कास धरली आणि ते इतके समर्थ झाले कीं, ‘ देवाहून बळी! ’ इंद्रायणीनें हा ‘ नराचा नारायण ’ आपल्याला दिला. सुखाचा मार्ग, प्रेमाची जागा आणि जीवनाचें श्रेय त्यांनीं आपल्याला दाखवून दिलें आहे. देहूला कशासाठीं जायचें तें मातामाउली आपल्याला सांगतात.

“ देहूला जाऊन। देह विसरावा
अंतरीं स्मरावा। तुकाराम ”

# १० आळंदीची वारी

मीं आळंदीच्या अनेक वाऱ्या केल्या आहेत. पुण्याहून आळंदी अवघी चौदा मैलांवर आणि सतत वाहती वाट; त्यामुळें कोणालाही मनांत येईल तेव्हां अल्प श्रमांत आणि अल्प खर्चांत ज्ञानेश्वरदर्शनाचा महान् लाहो घेणें शक्य आहे. पण माझ्या चित्तावर ज्या एका खेपेचा ठसा वज्रलेप होऊन राहिला आहे, तो प्रसंग भारताच्या इतिहासांत अत्यंत पुण्यपावन आहे.

म. गांधींच्या रक्षाविसर्जनाचा तो दिवस होता. आसेतुहिमाचल अवघ्या भरतखंडामध्यें गंगायमुनादि लोकमातांच्या जळांत, पूर्व–पश्चिम सागरात आणि अनेक पुण्य सरोवरांत त्या दिवशीं बापूजींची रक्षा विसर्जित होणार होती. आत्मतत्त्वानें विश्वमानव्याला कव घालून उरलेले बापू रक्षारूप जडदेहानेंहि जगावर पसरणार होते. त्यांतलीच अंशमात्र रक्षा इंद्रायणीच्या वांट्याला आली होती. चक्रतीर्थाच्या घाटावर पुंडलिकाच्या मंदिराजवळ ती रक्षा इंद्रायणीला लाभायची होती. पुण्याहून आणि आजूबाजूच्या गावांतून फार मोठा जनसमूह आपलीं चिऱ्यासारखीं जड झालेलीं अंतःकरणें घेऊन तिथें जमला होता. भाग्यवशात् त्या विधींचें धार्मिक पौरोहित्य मजकडे आलें होतें. तें सर्व झाल्यावर ती रक्षा इंद्रायणीच्या जलपृष्ठावर तरंगली. अनेकांनीं त्यासरशीं पाण्यांत बुड्या मारल्या. अनेकांनीं मार्जनें केलीं. सर्व लोक तीरावर गर्दी करून तो विसर्जन-विधि पहात होते. मी मात्र त्या वेळीं वास्तवांतून कल्पनेच्या राज्यांत शिरलों होतों. एक निराळेंच दिव्य, तेजोमय दृश्य माझ्या मनश्चक्षूं-पुढें उभें झालें होतें—

इंद्रायणीच्या तळांतून महात्माजींची आत्मज्योत ज्ञानेश्वरांच्या समाधि-स्थानांत प्रवेशत आहे. चिरा न हालवतां, दार न उघडतां. ज्ञानेश्वरांची

निष्कंप आत्मज्योत या नव्या ज्योतीच्या स्वागतासाठीं समोर झोंक देत आहे. दोन्ही ज्योतींमधलें अंतर हळूहळू कमी होत आहे. दोघीही एकमेकींच्या हृदयांत आपलें प्रतिबिंब पहात आहेत. दोघीही गीतामाउलीच्या कन्या. दोघीही गीतार्थाच्या सोयऱ्या. दृश्यपणें वेगळ्या; पण अंतरीं अभिन्न. एक 'भावार्थदीपिका' पाजळणारी, तर दुसरी अनासक्तियोग सांगणारी. दोघीही शुद्धसत्त्वागळया. दोघीही तमाची काजळी फोडून राहिलेल्या. संकुचितपणाचा, क्षुद्रतेचा, विषमतेचा दोघींनाही तिटकारा. दोघींचाही विश्वाला पोटाळून घेण्याइतका व्यापकपणा.

"हें विश्वचि माझें घर। ऐसी मति जयाची स्थिर
किंबहुना चराचर। आपण जाहला!"

हें विचारबीज ज्ञानेश्वरांच्या ज्योतीनें पेरलें. बापूजींच्या ज्योतीनें त्या बीजाचें 'तरू' सगळया क्षेत्रांत लावलें, वाढवलें. आणि आतां त्या दोघी पुनश्च एक होत होत्या. प्रेमानें उचंबळून एकमेकींना खेंव देत होत्या. आतां आधींची कोण आणि नंतरची कोण हें बोलणें खुंटलें होतें. 'दो ओठीं एक बोलणें। दो पायीं एक चालणें,' तसा दोघींचा मिळून एकच ज्ञानप्रकाश झाला होता.



पुलावरून आळंदीचें दर्शन

मला वाटलें, इंद्रायणींत महात्माजींची रक्षा विसर्जिण्यांत जें आध्यात्मिक औचित्य साधलें तें अन्यत्र कुठेंच साधणार नाहीं. हें रक्षाविसर्जन नव्हे; तर ज्योतिर्मीलनच झालें !

आळंदीला गेल्यावर इंद्रायणींत स्नान करून शुचिर्भूत होऊन ज्ञानेश्वरांच्या दर्शनाला जावें हा उत्तम पक्ष. पाण्यांत उतरून आळंदी-कडे पुढा केला कीं प्रसन्नता धावून येते. एक सुंदर वळण घेऊन इंद्रायणी आळंदींत शिरली आहे. 'नदी वेगेन शुद्धयति' हें जितकें खरें तितकेंच ती वळते तेव्हां अधिक शोभते हेंही खरें. त्यानंतर पुलाखालून ती बऱ्याच लांबवर सरळ गेली आहे. हिचें 'इंद्रायणी' हें नांवच दिव्य म्हणजे देवांशीं संबद्ध आहे. इंद्राच्या तपाचें हें अयन म्हणजे स्थान. इंद्रच नव्हे; तर कुबेरसुद्धां इंद्रायणीविषयीं आदर बाळगीत होता. जवळच्याच धानुरें गांवीं त्यानें आपल्याजवळचा अतिरिक्त धनाचा सांठा धरित्रीच्या पेढींत ठेवला आणि तिथें धने-श्वराची स्थापना केली अशी लोककथा आहे. 'ज्ञानबा तुकाराम' हा मधुर महामंत्र इंद्रायणीच्या पाण्यांतूनच उठला. हिची काया छोटी; पण करणी मोठी. हिच्या पंचक्रोशींत तीनशें वर्षांच्या अवधींत ज्ञानेश्वर-तुकाराम हे दोघे संतांचे मेरुमणि गाजले हें हिचें लोकोत्तरत्व. इंद्रायणीचें पाणी ज्ञानानें पाचक आणि भक्तीनें रोचक आहे असें पू. विनोबा सांगतात. हिच्या पात्रांत मासे आहेत, तशींच कासवेंही आहेत. त्यांतलें एखादें खडकावर बसून लांब मानेनें तुमच्याकडे पाहूं लागलें कीं ज्ञानेश्वरांची कृपादृष्टि कशी असेल त्याची तुम्हांला कल्पना येईल.

घाटावर एका ठिकाणीं लहान लहान समाधिवृंदावनांचें संमेलन आहे. त्यांतच अलीकडच्या कालांतले भागवतधर्माचे निष्ठावंत प्रचारक विष्णुबुवा जोग यांचीही समाधि आहे. पुण्यांतला हा एक प्रधान मल्ल ज्ञानेश्वरांच्या प्रेमधर्माचा पुरस्कर्ता आणि शांतीचा उपासक बनतो, हा सकृद्दर्शनीं तरी विरोधालंकारच वाटतो. भगवंताचे आणि भागवतांचे द्वेष्टे चाणूर-मुष्टिक हे मल्ल मथुरेंत निर्माण झाले. भगवद्भक्त मल्ल

आपल्याला आळंदीनें दाखवला. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव हे म्हाताऱ्यांनी डोळे पुशीत वाचायचे ग्रंथ अशी अजून बहुतेकांची समजूत; पण ध्रुव-प्रल्हादाच्या पंथांतल्या या विष्णुबुवांनीं तरुणपणींच त्यांत बुडी दिली. साक्षात्कारासाठीं ज्ञानेश्वरांच्या पायांशीं बसून निग्रही अनुष्ठान केलें आणि अखेर शांतिप्रमदेचे कांत होऊन ते स्वरूपीं रमले. वारकरी शिक्षणसंस्था प्रथम त्यांनींच निर्माण केली आणि अजूनही आळंदींत तिचें ज्ञानदान चालू आहे.

चक्रतीर्थाजवळूनच एक दगडी रस्ता वर जाऊन आपणांस ज्ञानेश्वरांच्या महाद्वारांत पोंचवतो. तिथें माळा, फूलपत्री, नारळ, बुक्का, हें पूजासाहित्य आणि नैवेद्यासाठीं मिठाई विकणारीं दुकानें दुतर्फा द्वारीनें बसलेलीं आहेत. पंढरपुरांत महाद्वारांतली पहिली पायरी जशी नामदेवाची, तशी आळंदीच्या महाद्वारांत हैबतरावबाबांची. तिथला मुंडासें घातलेला पितळी मुखवटा पाहिल्यावर समजून येतें कीं, या महाभागानें इथें अखेरचा ठाव मागितला आहे. त्यांच्या भक्तियोगाला आर्तीतून प्रारंभ झाला आणि ते अखेर ‘ स वै भागवतोत्तमः ’ असे झाले. मोठी ऐकण्याजोगी कथा आहे ती.

सातारा जिल्ह्यांतलें आरफळ हें बाबांचें मूळ गांव. ऐन तारुण्यांत नशीब काढण्यासाठीं ते घराबाहेर पडले आणि ग्वाल्हेरला पोंचले. शिंद्यांच्या दरबारांत त्यांनीं चाकरी धरली. चढत-वाढत ते तिथें सरदारकीपर्यंत पोंचले. बऱ्याच वर्षांनीं त्यांना जन्मभूमीच्या दर्शनाची इच्छा झाली. बरीचशी संपत्ति आणि शिपाई, प्यादे समागमें घेऊन ते निघाले. वाटेंत सातपुड्याच्या पर्वतश्रेणींत भिल्लांनीं त्यांना गांठलें आणि त्यांच्या जवळचें सर्वस्व लुबाडलें. प्रतिकाराला सिद्ध होतांच मारलें, झोडपलें. सगळयांची पांगापांग झाली. भिल्लांच्या नायकानें बाबांना पकडून एका गुहेंत नेऊन कोंडलें. दारावर शिळा लावून परततांना तो म्हणाला, ‘ मर आतां इथें ! ’

बाबांना त्या वेळीं ब्रह्मांड तर आठवलेंच ; पण त्याबरोबरच ब्रह्मांड-नायकही आठवला. त्यांना ज्ञानेश्वरांचा हरिपाठ मुखोद्‌गत होताच.

त्याचें त्यांनीं अखंड पारायण सुरू केलें. ते 'हरिनामीं संकल्प' घालून राहिले. अन्नपाण्याविना देहाचें काष्ठ होऊं लागलें; पण ओंठ हरिपाठ पुटपुटतच राहिले. कर्मधर्मसंयोगानें त्यानंतर थोड्याच दिवसांत भिल्लनायकाची पत्नी पुत्ररत्न प्रसवली. त्या आनंदाप्रीत्यर्थ तिनें बाबांना सोडण्याबद्दल नवऱ्याला गळ घातली. एकवीस दिवसांनंतर त्यांच्या गुहेच्या तोंडावरची शिळा हालली. निषादपतीनें त्यांना बाहेर काढलें. त्यांचें शरीर अचेतन झालें होतें; पण ओंठ हालत होते, त्याचा त्याला अचंबा वाटला. त्यानें त्यांना सावध केलें. ताकद येईपर्यंत त्यांची शुश्रूषा केली. नंतर लुटलेलें द्रव्य परत देऊन त्यांची सन्मानानें रवानगी केली. सुरक्षित रस्ता भेटेपर्यंत त्यांना सोबत करायलाही तो चुकला नाहीं.

बाबांचा पुनर्जन्म झाला होता आणि तो नामाच्या बळावर. ज्या ज्ञानेश्वरांची मूर्ति त्यांनीं आळवली, तिचें सामर्थ्य त्यांना कळून चुकलें होतें. ज्यांना श्रद्धेचा साक्षात्कार घडला, ते संसाराकडे पाठ फिरवून संतांना सन्मुख झाले, तर त्यांत नवल कसलें! बाबा आरफळला जाण्याच्याऐवजीं सरळ आळंदीला आले. पदरीं होतें तें द्रव्य गोर-गरिबांना वांटून केवळ भक्ति तेवढी त्यांनीं आपल्यासाठीं ठेवली. पुढें बारा वर्षें त्यांनीं सिद्धबेटांत अनुष्ठान केलें आणि महाद्वारीं उभें राहून भजन केलें. बाबांचें भजन रंगांत आलें कीं ज्ञानेश्वरांची समाधि डोलत असे असें सांगतात. महाराजांच्या पादुका गळ्यांत बांधून प्रथम त्यांनीं पंढरीची वारी सुरू केली. पुढें त्याच पादुका पालखींतून जाऊं लागल्या आणि त्यानंतर आळंदी संस्थानानें हें कार्य आपल्या शिरावर घेतलें. या पालखीच्या सोहळ्याचे सर्व नियम बाबांनीं बांधून दिले आहेत.

महाद्वारांत एक मोठी घंटा आहे. समोर जुनाटसा गरुडमंडप आहे. वर नगारखाना आहे. आंत शिरल्यावर समोरच संगमरवरी फरसबंदीचा सभामंडप आहे. त्यापुढें आणखी एक लहान दालन असून त्याला लागूनच पुढें गाभारा आहे. आंत दिव्यांचा मंदसा प्रकाश

पसरून राहिला आहे. उदबत्त्यांचा घमघमाट बाहेर येतो आहे. फूल-पत्रीचा वासही त्यांतच मिसळत आहे. दर्शनेच्छु लोकांची इथें वाण नाहीं. तुम्ही डाव्या बाजूला रांगेत उभे रहा. आंतले लोक उजव्या बाजूनें बाहेर येतील आणि तुम्हांला आंत प्रवेश मिळेल.



समाधि आणि विठ्ठल-रखुमाई

आंत शिरल्यावर समोरच काळया पाषाणाची जी ठेंगणीशी वेदी दिसते तीच ज्ञानोबारायांची समाधि. तुम्ही खालीं बसा आणि दोन्ही भुजा पसरून तिला उराउरीं भेटा. ' एथ भीड कवणाची धरूं। तूं माय आमुची ' असें म्हणा. माउलीजवळ संकोचाल तर वात्सल्याला मुकाल. नेणतें लेंकरूं होऊन, धनाचा, ज्ञानाचा, वयाचा, कर्तृत्वाचा सगळा अभिमान फेकून देऊन, तिच्या पायीं मिठी घाला. जो अहंभाव

सोडील त्यालाच माउली ओळखील. तोच आल्याची दखल घेईल. मस्तक ठेंगणा करायच्या वेळीं मोरोपंतांची पुढील आर्या स्तुतीचा मंत्र म्हणून तुम्हांला उपयुक्त होईल.

**“ ज्ञानेशा भगवंता ! भगवज्जनवल्लभा महासदया**
**कलियुगवर्ती जन जो देसी स्मरणेंचि मुक्तिचें पद या ”**

तुमच्या आमच्या मोठेपणाचा काय पाड ! सकल संत त्यांच्या पदीं लीन झाले आहेत. नामयाची जनी म्हणते कीं, ‘ मी जन्मोजन्मीं तुझयावरून ओवाळून जाईन.’ एकनाथमहाराज या चैतन्याच्या जिव्हाळयाला अंजलिसंपुट जोडतांना म्हणतात कीं, ‘ तुम्ही बसोनि अंतरीं । मज जागवा निर्धारीं.’ तुकोबा ‘ राखा पायांपें किंकरा ’ म्हणून त्यांना गळ घालतात. महाराष्ट्र–शारदेचा तन्मणि मुक्तेश्वर ‘ त्याचे चरण चिंतिले मनीं । तेणें पावन झालों जनीं ’ अशी निरभिमान कबुली देतो. मग आपण माउलीच्या पायीं कसें आणि किती जडायचें तें ज्याचें त्यानेंच ठरवावें.

मंदिरापुढें उभें राहिल्यावर डाव्या-उजव्या हाताला दोन पिंपळपार दिसतील. पैकीं उजव्या हाताचा तो सोनपिंपळ. ‘ जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ ’ तो हाच. आज कैक शतकें तो तिथें द्वारीं तिष्ठत आहे. नवी त्वचा आंतून येते आणि बाहेरील सालीच्या खपल्या झडून जातात. जुनीं पानें पिवळीं होऊन गळतात न गळतात तोंच नवी आरक्त पालवी वाऱ्यासंगें झुलूं लागते. पुन्हां आपला तो नवा तरणा ! आज यात्रेकरू त्याच्या पाराला पाठ घांसतात. सात शतकांपूर्वी ज्ञानेश्वरांची आई प्रदक्षिणा घालून तो पार झिजवीत होती. आपले यजमान विठ्ठलपंत कुठें बेपत्ता झाले आहेत ते परत येऊन संसाराला लागूं देत, म्हणून त्या अश्वत्थनारायणाला सांकडें घालीत होती.

विठ्ठलपंत हे अभिजात विरक्त. तीर्थें, क्षेत्रें हिंडावीं, साधुसमागम करावा आणि आत्मकल्याण साधावें हाच त्यांना हव्यास. आळंदीचे कुलकर्णी सिधोपंत यांनीं आपली मुलगी देऊन त्यांच्या पायांत सोनेरी शृंखला घालण्याचा प्रयत्न केला; पण अडवलेला ओघ एक दिवस

काशीच्या दिशेनें धावलाच. रामानंदस्वामींच्याकडे जाऊन त्यांनीं भगवीं वस्त्रें घेतलीं. त्यांना काय कल्पना कीं, हा नवा शिष्य आपल्या पत्नीची अनुज्ञा न घेतां, पितृऋण न फेडतां चतुर्थाश्रम स्वीकारायला आला आहे म्हणून !

दैववशात् रामानंदस्वामी दक्षिण–यात्रेला निघाले आणि एक दिवस आळंदीस पोंचले. त्या काळीं हें स्थान सिद्धेश्वरक्षेत्र म्हणून विश्रुत होतें. आदिनाथ शंकराची ही तपोभूमि. अगस्तिप्रमुख अनेक ऋषिमुनींचें हें सिद्धिक्षेत्र! पूर्वेला मर्कळचा केशवराज, दक्षिणेला पुण्याचा पुण्येश्वर, पश्चिमेला इंदुरीचा ब्रह्मेश्वर आणि उत्तरेस भीमातीरीं खेटकग्रामीं सिद्धेश्वर, अशी ही पावन पंचक्रोशी त्या काळीं गाजत होती. आणि म्हणूनच रामानंद इथें आले होते.

अनेक माणसें या परिव्राजकाच्या दर्शनाला आलीं तशी रुक्मिणीही आली. कपाळीं कुंकुमतिलक पाहून त्यांनीं तिला ठराविक आशीर्वाद दिला कीं, ‘ पुत्रवती भव ! ’ ती बिचारी दैवदुर्विलासाला हंसली. स्वामींनीं हंसण्याचें कारण पुसलें. ‘ महाराज, जिचा पति परागंदा झाला आहे ती पुत्रवती कशी होणार ? म्हणून हंसूं आलें.’ स्वामी जरा अधिक खोल पाण्यांत शिरले. विठ्ठलपंतांच्या खाणाखुणा विचारतां त्यांची खात्री झाली कीं, आपला शिष्य ‘ चैतन्य ’ हाच हिचा पति असला पाहिजे. काशीस जाऊन त्यांनीं त्यांना छेडलें आणि सर्व प्रकार त्यांच्या मुखानें वदवून घेतला. ‘ जा ; माझ्या आज्ञेनें पुन्हां गृहस्थ हो ’ म्हणून त्यांनीं त्यांना परत आळंदीस धाडलें. संन्याशानें उलटून शिखासूत्र धारण करणें आणि गृहस्थाश्रम चालवणें हा प्रकार त्या काळांत अक्षम्य अधर्म होता. ब्राह्मणांनीं या दांपत्याला ताबडतोब वाळींत टाकलें. साहजिकच आप्तवर्गानेंही उपेक्षिलें. सर्वतोमुखीं निंदा आणि अपमान. पण एकमेकांच्या प्रेमबळावर त्यांनीं आला दिवस साजरा केला.

संसारांत त्यांना एकंदर चार अपत्यें झालीं. तीन मुलगे आणि एक मुलगी. निवृत्ति शके ११९५ त, ज्ञानेश्वर ११९७ त, सोपान ११९९ त आणि मुक्ताबाई १२०१ त. चारी भावंडांत दोन दोन वर्षांचें अंतर.

सोन्यासारखीं शहाणीं सुंदर मुलें; पण आळंदीकरांना त्यांचें काय कौतुक! शब्दज्ञानी पंडित आणि भिक्षुक ब्राह्मण यांनीं या लेंकरांचा परोपरी उपहासच केला. जिथें जातील तिथें एकच वाक्य त्यांच्या कानीं पडायचें. 'संन्याशाचीं मुलें!' आईबापांवरचा बहिष्कार मुलांनाही लागू झाला.

ज्ञानेश्वरांना मौंजीबंधन हवें होतें. त्याद्वारें मिळणारें संस्कारयुक्त ब्राह्मण्यही हवें होतें. पण रूढिनिष्ठ समाज त्यांना तें द्यायला कबूल होईना. धर्माची सत्ता ज्ञानेश्वरांना मान्य होती; पण धर्मच त्यांना आपंगीना. आपल्या मुलांना व्रात्यास्थितींत आयुष्य घालवावें लागणार, त्यांचा जन्म केवळ धरणीला भार होणार, म्हणून विठ्ठलपंत उदास झाले. त्यांनीं ब्रह्मवृंदाला कळवळून प्रार्थिलें कीं, मला प्रायश्चित्त सांगून पावन करा. रूढिपूजक शास्त्री-पंडितांची वाणी वदली कीं, 'देहान्त प्रायश्चित्त!' आणि मुलांचें जीवन धर्म्य आणि श्रेयस्कर व्हावें म्हणून खरोखरच त्या करुणाघन मातापितरांनीं प्रयागाला जाऊन गंगा-यमुनांच्या संगमांत देह लोटून दिले. मुलांसाठीं स्वार्थत्याग करणारे पुष्कळ आईबाप भेटतील. पण स्वात्मत्याग करणारे हेच!

पण तरीही प्रश्न सुटला नाहीं तो नाहींच. संन्याशाच्या मुलांना मुंजीचा अधिकार सांगायला आळंदींत एकाही ब्राह्मणाची पोथी पुढें झाली नाहीं. आळंदीकरांनीं या भावंडांना शास्त्रनिर्णयासाठीं पैठणची वाट दाखवली. पण तिथेंही तेंच. ज्ञानेश्वरांनीं पैठणच्या नागघाटावरें रेड्यामुखीं वेद वदाविलेले पाहून पैठणकर चकित झाले. त्यांना या मुलांचें अलौकिकपण कळून चुकलें. ते म्हणाले, अशा लोकोत्तरांना आम्हीं शुद्धिपत्र तें काय द्यायचें! गंगेला कोणीं धुवावें आणि अग्नीला कोणीं शुद्ध करावें! एतावता या ना त्या कारणानें त्यांना शास्त्रार्थ मिळाला नाहीं तो नाहींच. त्यांचें उपनयन होऊं शकलें नाहीं आणि त्यामुळेंच ते चहूं आश्रमांहून शेवटपर्यंत निराळेच राहिले.

आईबापांची शिरावरची सावली गेली आणि हीं भावंडें उघडीं पडलीं. निवृत्ति आठ वर्षांचे होते तरी आपोआपच त्यांच्याकडे वडील-

पण आलें. कोरान्न मागून तीं निर्वाह चालवीत. पण तें तरी सुखानें मिळत होतें का? तोंडभर अपशब्द ऐकावे तेव्हां मूठभर दाणे झोळींत पडावे. तें अन्न खातांना त्या कटु वचनांची जळजळ ज्ञानेश्वरांनां बहुधा असह्य होत असावी. एक दिवस ते भिक्षेहून आले ते अपमानाच्या ज्वाळांनीं अंतरीं जळत. कोणाचेंही दर्शन नको म्हणून ते खोपटांत शिरले आणि ताटी लावून घेऊन आंत बसून राहिले. पाठीमागून आली मुक्ता. ती मुळांतच मानापमानांतून 'मुक्ता' होती. तिनें ताटी बंद पाहिली. ज्ञानेश्वर जगावर रुसल्याचें त्या ब्रह्मींच्या चित्कळेला उमगलें. जरा लहान तोंडीं मोठा घास घेऊन ती बोलली, 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा!'

"हें पहा, पावन मनाच्या योग्यानें जनांचे अपराध पोटीं घालावे. विश्व रागानें आग झालें असेल तर संतानें पाणी व्हावें...." आणि या सगळया विनवणीचा उद्देश हा कीं, 'तुम्हि तरुनि विश्व तारा!' एवढीशी चिमुरडी मुक्ताबाई. पण तिची अध्यात्माची झेप पहातांना कल्पनेचेही डोळे थकतात. आणि म्हणूनच चौदाशें वर्षें जगलेल्या योगसिद्ध चांगदेवाचें गुरुपद ती भूषवूं शकली. खरें म्हणजे बाहुलीला मूल समजून खेळ खेळण्याचे तिचे ते दिवस. पण तिनें हा जुनाट, जखखड म्हातारा आपला मुलगा मानला. तिनें निजबोधाचा पाळणा हालवल्यावर त्यानें उद्‌गार काढले आहेत कीं, 'चांगा म्हणे आईपोटीं आलों.'

तुम्हांला जर त्या सोनपिंपळाची सळसळती भाषा समजणें शक्य असेल तर ज्ञानेश्वरमंडळाचा सगळा बाळपणचा वृत्तांत तो तुमच्या कर्णसंपुटांत घालील.

डाव्या हाताचा पिंपळपार ही एकनाथमहाराजांच्या ध्यानाची जागा. 'अजानवृक्षाची मुळी माझ्या कंठाला लागली आहे; ती तूं येऊन सोडव.' हा ज्ञानेश्वरांचा दृष्टांत घेऊन ते आळंदीस आले. पण त्यांना समाधीचें द्वार सांपडेना. शेवटीं या पारावर बसून त्यांनीं ध्यान धरलें. त्या अवस्थेंत त्यांना द्वार सुस्पष्ट दिसलें. मग ते चिरा काढून आंत

गेले. मुळींचें केवळ निमित्त होतें. ज्ञानेश्वरांना नाथांशीं निजगूज बोलायचें होतें. ज्ञानेश्वरींचें संशोधन आणि प्रसार हा आदेश घेऊन तिथून ते बाहेर पडले. शुद्ध ज्ञानेश्वरी नाथांनीं आम्हांला दिली. तीनशें वर्षांनंतर नाथांच्या काळीं ज्ञानेश्वरी जागी होऊन उठली आणि महाराष्ट्रजनतेला अमृतरसाचा पान्हा पाजूं लागली. अजूनही तिच्या त्या कार्यांत खंड नाहीं.

याच पिंपळपारासमोर सभामंडपाच्या डाव्या अंगाला ओळीनें दोन समाधि आहेत. डाव्या हाताची केसरीनाथांची आणि उजव्या हाताची भोजलिंगबोवांची. केसरीनाथ हे नाथसंप्रदायांतले अधिकारी पुरुष होते. भोजलिंगबोवा हे जातीनें सुतार आणि वृत्तीनें योगारूढ. हे ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. वयानें वडील असल्यामुळें ज्ञानेश्वर त्यांना काका म्हणत.

तिथून पुढें गेल्यावर गाभाऱ्याच्या पूर्वबाजूला लागून एक गवाक्ष आहे; तें यात्रेच्या गर्दीत स्त्रियांना दर्शन घेण्यास उपयुक्त होतें. तिथेंच जवळ एक सोळखांबी हेमाडपंती मंडप दिसतो. याच्या दक्षिण अंगाला ज्ञानेश्वरांचें शेजघर आहे. इथें महाराजांच्या पादुका ठेवलेल्या असतात. समाधीच्या थेट पाठीमागें मुक्ताबाईचें मंदिर आहे. तिथें कटेवर कर ठेवून मुक्ताबाई उभी आहे. समाधीच्या पश्चिम अंगाला सिद्धेश्वराचें मंदिर लागतें. गाभारा, मंडप आणि नंदीची जागा असे याचे तीन भाग पडतात. गाभाऱ्यांत स्वयंभू शिवलिंग आहे. या क्षेत्रांतलें आद्यस्थान तें हें. या देवळाचें बांधकाम सुमारें तीनशें वर्षां-पूर्वीचें आहे.

पाषाणनंदीच्या खालींच समाधीचें द्वार आहे असें सांगतात. एकनाथ इथूनच खालीं गेले आणि परत आल्यावर त्यांनीं तें बुजवून टाकलें. मीं तिथें उभा राहून त्या जागेवर टक लावलें. पण चर्मचक्षूंचे किरण आंत शिरेनात. मज अभाग्याला ज्ञानचक्षु कुठले! मन केवळ कल्पना करूं लागलें. 'इथें खालीं बेल-तुळशींच्या आस्तरणावर ज्ञानियांचे राजे सिद्धासन घालून बसलेले असतील. दोन्ही करकमळें जानूंवर ठेवलेलीं

असतील. डोळां 'भीमसुद्रा' लागलेली असेल. सभोंवतीं तेजोवलय स्फुरण पावत असेल आणि त्याच्या मध्यभागीं सच्चिदानंदस्वरूप ज्ञानेश्वर. 'निष्कलं निष्क्रियं शान्तम्।'

आणि मला वाटलें कीं, नामदेवाचा त्या प्रसंगींचा तो टाहो अजूनही इथल्या वातावरणांत सूक्ष्मपणें घुमून राहिला आहे. कापूर जळून जावा आणि अव्यक्त असा वास तेवढा नाकाशीं जाणवत असावा तसा. पाण्याचा लोंढा निघून जावा आणि भूमीवर ओल्हासा तेवढा उरावा तसा. 'ब्रह्मीं ज्ञानराज मेळविला' त्या प्रसंगावर नामदेवानें अभंग रचले आहेत ते जणूं काळजाचा गाभा पिळून निघालेल्या रसानें. नामदेवाचें तें विलापकाव्य आहे. अनलंकृत, पण थेट हृदयाला भिडणारें. तो विलाप म्हणजे अजविलाप नव्हे. रतिविलापही नव्हे. त्याला पार्थिवतेचा वारा-सुद्धां लागलेला नाहीं. आपला भक्तिमार्गातला सखा, विठ्ठलाचा ज्ञानी भक्त, संतमंडळाचा मूर्त जिव्हाळा, आत्मप्रकाशानें विश्व उजळणारा महात्मा आणि जगाचा कोवळा सद्गुरु समाधींत कायमचा डोळयां-आड होतो म्हणून नामदेवाच्या वाणीचा तो काव्यमय आक्रोश आहे.

ज्ञानेश्वरांच्या वयाला अवघें बाविसावें वर्ष; पण त्यांनीं तेवढया तरुण वयांतच जीवत् समाधि घेण्याचें ठरवलें. शके १२१८ ची कार्तिक वद्य त्रयोदशी हा दिवस निश्चित केला. शुद्ध एकादशीस पंढरीच्या वारीला जाऊन त्यांनीं देवाला आपला मनोदय कळवला. देवानें मन मारून संमति दिली. सगळया संतांना ही वार्ता कळली. ते उदास, अस्वस्थ झाले. पंढरीचा 'पोहा' त्यांच्यासंगें अळंकापुरी म्हणजे आळंदीस आला. इंद्रायणीच्या 'अल्याड पल्याड' पताकांचे भार जमले. रखुमाईसह पांडुरंगही आला. आळंदीस भजन-कीर्तनांची गर्दी उडाली. एकादशीला हरिजागर झाला. द्वादशीला सर्वांनीं ज्ञानेश्वरांच्या पंक्तीला पारणें सोडलें. त्रयोदशीच्या दिवशीं नामदेवाचे पुत्र नारा आणि विठा यांनीं, आधींच तयार करून ठेवलेल्या समाधिस्थानाची झाड-सारव केली. वर बेल-तुळशी आंथरल्या. ज्ञानेश्वर निरवानिरव करूं लागले. प्रथम त्यांनीं निवृत्तिनाथ-सद्गुरूंचें पदवंदन केलें.

निवृत्ति म्हणजे हर्षशोकांच्या पार गेलेला स्थितप्रज्ञ. गांभीर्याचा सागर आणि धैर्याचा हिमाचल; पण तो वोसंडून ज्ञानेश्वरांना आळंगूं लागला. बांधल्या तळयाचा पाट फुटावा आणि ओघ बारा वाटा मुरडावे, बांधल्या तृणाचा आळा सुटावा आणि तणकाड्या रानोमाळ पांगाव्या, तशी निवृत्तीची अवस्था झाली. ज्ञानेश्वर त्याला कृतज्ञतेच्या भरानें म्हणाले,

" पाळिलें पोशिलें चालविला लळा
बा ! माझ्या कृपाळा निवृत्तिराजा ! "

त्या बोलांनीं निवृत्ति आणखी विरघळला. त्यानें त्यांच्या मुखावरून हात उतरला. शिष्याचें मुखमंडल नेत्रांत सांठवून घ्यायचें; पण अश्रु त्याला जागा देईनात. दाटलेल्या जनसंमर्दाकडे पाहून तो बोलला, " माझें निधान आज चाललें. ' वरिष्ठाच्या आधीं कनिष्ठाचें जाणें । केलें नारायणें उफराटें. ' यानें माझी कधीं अमर्यादा केली नाहीं. माझें गुरुपण आणि आपलें शिष्यपण सिद्धीला नेलें. याच्यासारखें आतां कोणी भेटायचें नाहीं. "

सोपान आणि मुक्ता प्राण कासावीस करूं लागलीं तेव्हां देवानें पुढें होऊन त्यांना पोटाशीं धरलें. नामदेवाला गहिंवर फुटला तो आवरेना. पण वृत्ति पहा कशी ती. आपण स्वतः आकुळ-व्याकुळ झाला आहे; पंण ' करा समाधान निवृत्तीचें ' म्हणून देवाला विनवतो आहे.

नंतर ज्ञानेश्वरांनीं देवाला १०८ ओव्यांचें नमन केलें. सकल संतांना अष्टांगीं नमस्कार घातला. अवघ्या संतांनीं त्यांना वंदिलें. पांडुरंगानें त्यांच्या कपाळीं केशरी गंधाचा टिळा लावून गळयांत पुष्पहार घातला. ' फार केले कष्ट जगासाठीं ' या शब्दांत देवानें त्यांचे उपकार दर्शवले. त्यांचा एक हात देवानें आणि दुसरा निवृत्तीनें धरला. ज्ञानेश्वरांचीं रातोत्पलांसारखीं पाउलें समाधीच्या पायऱ्या उतरूं लागलीं. त्यासरशीं संतमंडळीला दुःखाचे कढ आले. जनवन शोकानें कालवलें. दाही दिशा, वरचें गगन जणुं ओस, भिंगुळवाणें झालें. देवानें त्यांना आसनस्थ केलें. समोर भावार्थदीपिका ठेवली. ज्ञानेश्वरांनीं देवाला

तीन वेळां अंजलिसंपुट जोडला. देवानें विचारलें, ‘ काय अखेरचें मागणें ? ’

“ ज्ञानदेव म्हणे सुखी केलों देवा
पादपद्मीं ठेवा निरंतर ! ”

ऐन तारुण्यांत, देहापासून अलग होतेवेळचे ज्ञानेश्वरांचे धालेपणाचे हे उद्गार. त्यांच्याहून चौपट आयुष्य लाभलेल्या जीवांना खाऊन पिऊन, त्यागून भोगूनही अंतकाळीं हे शब्द उच्चारतां येतील का ? देहासक्तींत गुरफटलेल्यांना, विषयपंकांत खोलवर रुतलेल्यांना हें भाग्य कुठलें ! ज्ञानेश्वरांना देवानें सुखी केलें होतें आणि तें सुख त्यांच्या आत्म्यांत भरून ओसंडत होतें. देव त्यांना वरदान बोलला. ‘ यावच्चंद्रदिवाकरौ तुझी समाधि स्थिर राहो ! ’

देव आणि निवृत्ति बाहेर आले. समाधीच्या दारावर शिळा घातली. संतांनीं समाधीवर फुलें वाहिलीं. नामदेवानें प्रेमपडिभरानें पूजा केली. अजूनही त्या तिथीला आळंदीस महायात्रा भरते. कार्तिक शुद्ध एकादशी पांडुरंगाची; वद्य एकादशी ज्ञानेश्वरांची. भजनें, निरूपणें, नामघोष यांनीं त्या दिवशीं आळंदी दुमदुमून जाते.

अंतरांतलें बोलायचें तर वारकऱ्यांना देवापेक्षांही ‘ माउली ’चें प्रेम अधिक. संतदर्शनांत पद्मनाभ सहजपणें जोडतो, हा त्यांचा दृढ विश्वास. पंढरीच्या वारीप्रमाणेंच आळंदीची वारी करण्याची प्रथा तुकोबांनीं पाडली आणि आळंदीहून पालखी पंढरपुरीं नेण्याचा प्रघात हैबतरावबाबांनीं पाडला.

ज्येष्ठ वद्य अष्टमीला आळंदीहून पालखी निघते आणि आषाढी एकादशीस पंढरपूर गांठते. पालखीचा सरंजाम अंकली येथील सरदार शितोळे यांच्या घराण्यांतून येत असतो. त्यांत दोन घोडे असतात. एक जरीपटक्यासाठीं आणि दुसरा ज्ञानेश्वरांच्या स्वारीसाठीं. त्याला नटवून, सजवून मोकळा मिरवीत नेतात. ‘ ज्ञानोबांचा घोडा ’ आळंदींत शिरला कीं आबालवृद्ध त्याच्या दर्शनासाठीं गर्दी करतात.


तो सर्वांच्याकडून पूजा-नमस्कार घेतो आणि कोणालाही इजा करीत नाहीं.

माउलीच्या समागमें वारीला जाणाऱ्या भावुकांची सकाळपासून आळंदींत रीघ लागते. या लोकगंगेला वाटेंत शेवटपर्यंत अनेक जनप्रवाह मिळतच रहातात. वाखरीस पोंचेपर्यंत सरितेला सिंधूचें स्वरूप येतें. खांद्यावर शिधोरीची पडशी, वर भगवी पताका, दुसऱ्या खांद्यावर कांबळ, गळयांत टाळ किंवा वीणा, बायकांच्या डोक्यावर पितळेच्यीं छोटीं छोटीं तुळशीवृंदावनें, कंबर धोतरानें आंवळून बांधलेली आणि मुखीं 'ज्ञानबा तुकाराम' हा मंत्र. वारकऱ्यांत उतार वयाच्या, दुबळया देहयष्टीच्या माणसांचा भरणा कांहीं कमी नसतो. पण आपल्याला प्रवास कसा झेपणार, आपली वारी कशी पूर्ण होणार, याची काळजी कोणाच्याच मुखावर दिसत नाहीं. माउली सांगातीं असल्यावर त्यांनीं कशाला चिंता करावी ! शतकें लोटलीं तरी अजून या श्रद्धेंत तिळमात्र उणेपणा आलेला नाहीं. समाजाच्या सर्व थरांत अशा प्रकारें चिरकालिक अखूट श्रद्धा निर्माण करणाऱ्या संतांची थोरवी कोण वर्णील !

पालखींचें प्रस्थान निघण्यापूर्वीं ज्ञानियांच्या राजाचा दरबार भरतो. मानकऱ्यांना नारळ वांटले जातात. 'जय शब्दो नमः शब्दः' गर्जून उठतो. त्या दिवशीं ज्ञानेश्वर आळंदींतच आजोळघरीं पहिला मुक्काम करतात. पूर्वेकडील गणपतिदरवाजाजवळच एक बैठें जुनाट घर आहे तें आजोळघर समजतात. आषाढ वद्य दशमीस पालखी परत आळंदीस येते तेव्हां शिणून-भागून आलेल्या वारकऱ्यांना चक्रांकितबुवांच्या घरीं भाकर-पिठलें वाढतात.

सभामंडपाच्या उजव्या अंगाला अजानवृक्षाचा कट्टा आहे. मध्यम उंचीचे रोपे तिथें दोन-तीन ठिकाणीं वाढून वांकलेले दिसतात. तिन्ही बाजूंना भिंती उभारून तो भाग बंदिस्त केलेला आहे. ज्ञानेश्वरांनीं आपल्या हातांतली काठी समाधीच्या वेळीं जवळच उभी करून ठेवली तिचाच हा पुढें वृक्ष झाला असें सांगतात. साक्षात्कारासाठीं भुकेलेले भक्त तिथें बसून ज्ञानेश्वरीचीं पारायणें करतात. आळंदीला जायचें म्हणजे ज्ञानेश्वरी

जवळ असणें उचित आणि तिथें बसून एखादा अध्याय तरी वाचणें त्याहून उचित. गीता ही प्रभूची तशी ज्ञानेश्वरी ही महाराजांची वाङ्मयी मूर्ति आहे. तिचे तुम्हीं अंतरंग अधिकारी व्हावें अशी त्यांची आस आहे.



अजानवृक्ष

त्याचा मुळारंभ अजानवृक्षाच्या सावलींतच करावा आणि त्यामुळें होणारा चित्तप्रसाद घेऊन परत यावें. एवढें तरी सर्वांना सहज साध्य आहे.

आपलें मन भावप्रवण असेल, संसारचिंतेचें गांठोडें इंद्रायणीच्या पुलापलीकडे टाकून तिथें गेलेलें असेल, तर या आवारांत प्रदक्षिणा करीत असतांना एक प्रकारचा सर्वत्र भरलेला सूक्ष्म सुगंध अनुभवाला येईल. हा महाराजांच्या विकसित आत्म्याचा सुगंध आहे. त्यांनीं आपल्या हृदयद्वारीं लावलेला मोगरीचा वेल तिथें बहरून राहिला आहे.

> " इवलेंसें रोप लाविलें द्वारीं
> त्याचा वेल गेला गगनावरी
> मोगरा फुलला, मोगरा फुलला
> फुलें वेंचितां अतिभारु कळियांसी आला "

अमुक-तमुक स्थान जागृत आहे असें आपण म्हणतों तेव्हां ती साक्ष आपल्या भावार्द्र अंतराला अशाच कोणत्या तरी प्रकारें पटलेली असते. संतांच्या परम उदार भागवतधर्माशीं ज्यांचें थोडेंबहुत आंतलें नातें आहे त्यांना आळंदी कधींच जुनी वाटत नाहीं. अतिपरिचय होऊनही त्या स्थळाची अवज्ञा होत नाहीं. भक्तीच्या डोळ्यांना इथें कैवल्य बागडतांना आणि अद्वैत खेळतांना दिसतें.

प्रदक्षिणा पुरी करून तुम्ही सोनपिंपळाखालीं उभे रहा आणि पुन्हां एकदां मंदिराकडे, कळसाकडे नजर टाका. या वेळीं एखादा इतिहासवेत्ता तुमच्याबरोबर असेल तर तो तुम्हांला पुढील माहिती ऐकवील. 'हें समाधिमंदिर शके १४९२ त पुरंदरच्या आंबेकर देशपांड्यांनीं बांधलें. मंदिराचा 'कलशाध्याय' पुण्याच्या नंदराम गवंड्यानें रचला. मुख्य सभामंडप शिंद्यांचे दिवाण रामचंद्र मल्हार शेणवी यांनीं शके १६८२ त बांधला. समाधीमागचें मुक्ताबाईचें मंदिर नरसिंहसरस्वतीस्वामींनीं शके १८०३ त निर्मिलें. महाद्वार, दोहों बाजूंचा तट आणि ओवऱ्या शके १६७२ त काशीराव शिंदे यांनीं बांधल्या. पश्चिमेचा पाणदरवाजा बाळाजी बाजीराव यांनीं वरील सालींच बांधला. गरुडपाराच्या मागें श्री. प्रसादे यांच्या वाड्याच्या आवारांत असलेली दीपमाळ कान्होजी आंग्र्यांची थोरली स्त्री लक्ष्मीबाई हिनें शके १६६५ त उभारली. गांवाजवळचा इंद्रायणीवरचा सेतुबंध पुण्याचे श्री. आगरवाला यांनीं शके १७४२ त केला.

तिथून बाहेर पडलांत कीं मागच्या बाजूला राममंदिर आणि विष्णुमंदिर हीं दोन सुंदर देवालयें ओळीनें पहा. समाधीच्या पश्चिमेस हरिहरेंद्रस्वामींचा मठ आहे तोही प्रेक्षणीय आहे. हे स्वामी शके १७४१ त पैठणहून आळंदीस आले आणि इंद्रायणीच्या पात्रांत वरच्या बाजूला सिद्धबेट आहे तिथें देहपातापर्यंत त्यांनीं तप केलें. सिद्धदशेंतला 'अमृतानुभव' घेण्याची ज्ञानेश्वरांचीही हीच जागा होती असें सांगतात. सिद्धबेटासमोर पलीकडच्या तीराला ह. भ. साखरेबुवा यांचा साधकाश्रम आहे. हरिहरेंद्रस्वामींच्या मठाच्या पश्चिमेला

दत्तमंदिर आणि त्याच्या पलीकडे मल्लाप्पा वासकर या वारकऱ्याची समाधि आहे. तिथून आणखी पुढें गेल्यावर नरसिंहसरस्वतींनीं बांधलेलें विठ्ठल-रखुमाईचें मंदिर लागतें. तिथल्या चौसोपीच्या वायव्य कोणांत स्वामींनीं समाधि घेतली आहे.


शिवाजीमहाराजांनीं शके १५९३ त एका सनदेच्या द्वारें एका जिराईत जमिनींतून येणारें एक खंडी अडीच मण धान्य ज्ञानेश्वरांच्या नैवेद्यासाठीं अर्पण केलें आहे. त्यानंतर शके १६६१ त बाळाजी बाजीराव यांनीं 'आळंदी हा गांव हक्कांसुद्धां श्रींकडे इनाम करून दिला आहे.' पेशवे आळंदीच्या यात्रेस जात असल्याचे कागदोपत्रीं उल्लेख आहेत. बाळाजी बाजीराव नाना फडणिसांना एका पत्रांत लिहितात—

'हल्लीं आळंदीची यात्रा भरत असेल. वाणी--उदमी यात्रेस येत असतील त्याची रखवाली जाली पाहिजे. तरी कृष्णाजी महादेव यांजकडील वगैरे जागांचे जे लोक जमा जाले असतील त्यांपैकीं दोनतीनशें माणोस आळंदीचे यात्रेचे रखवालीस पाठवून देणें.'

आळंदीच्या राजरस्त्यानें जायला लागलें कीं जागोजाग प्रशस्त धर्मशाळा दिसतात. नाना जातींच्या लोकांनीं आपल्या समाजाच्या सुखसोयीसाठीं त्या बांधलेल्या आहेत. बारा मास त्या मोकळ्या असल्या तरी कार्तिकी यात्रेच्या वेळीं मात्र गजबजून जातात. या रस्त्यानें प्रथम गोरोबाकाकांचें मंदिर लागतें आणि तेथून आणखी कांहीं पावलें चालल्यावर गांवाच्या ईशान्येला ज्ञानेश्वरांनीं चालवलेली भिंत दिसते. चांगदेव वाघावर बसून जेव्हा त्यांच्या भेटीला आले तेव्हां ज्ञानेश्वर भिंत चालवून त्यांना सामोरे गेले आणि इथें त्यांची भेट झाली. चांगदेवाचें गर्वनिर्वाणही इथेंच झालें.

आळंदीला आलेला भक्त-भाविक भिंतीच्या दर्शनाला यायचा आणि तिथली मूठभर माती घेऊन जायचा. होतां होतां भिंत तर संपलीच; पण तितक्याच उंचीचा तिथें चर पडला. आतां तिथें दगडी भिंत आहे आणि ती चंद्रभागा नांवाच्या एका खानदेशी महिलेनें बांधली आहे.

तिच्यावर एकामागें एक अशा चारी भावंडांच्या संगमरवरी मूर्ति असून समोरच्या कोनाड्यांत चांगदेव हात जोडून, माथा नमवून बसलेला आहे. खरें म्हणजे या मूर्ति किशोरवयाच्या हव्या होत्या; पण त्या चाळिशीच्या घरांतल्या दिसतात. मुक्ताबाई सर्वांत धाकटी; पण ती तर



ज्ञानेश्वरांनीं चालवलेली भिंत

चार मुलांच्या आईसारखी पोक्त, स्थूल आहे. भिंतीशेजारीच भैरवाचें देऊळ आहे.

एका वारीच्या वेळीं माझे मित्र कवि श्री. बोरकर माझ्या समागमें होते. आम्हीं भैरवाच्या सभामंडपांतल्या स्वच्छ फरशावर दोन तास बसून ज्ञानेश्वरांच्याविषयीं सुखसंवाद केला होता.

ज्ञानेश्वर हे रसेश्वरही होते. ज्ञानेश्वरींत सगळ्या रसांना त्यांनीं शांतरसाच्या घरीं पाहुणेर दिला आहे आणि हें सगळें टीचभर ओवी-वृत्तांत. एवढयाशा साडेतीन चरणी वृत्तांत निकराचें तत्त्वज्ञान आणि परतत्त्वाला स्पर्श करणारें अप्रतिम काव्य ओतून त्यांनीं त्या वृत्तावर 'ओवी ज्ञानेशाची' असा छाप उठवून ठेवला आहे. याच ओवीचा पुढें नाथ, मुक्तेश्वर, श्रीधर इत्यादि संतकवींनीं आधार घेतला आणि घरोघर स्त्रियांनींही. महाराष्ट्राची संस्कृति ओवींतून अभिव्यक्त झाली

आहे असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति नव्हे. संस्कृतांत अनुष्टुभाला जें प्राधान्य तेंच मराठींत ओवीला.

ज्ञानेश्वरांनीं मुमुक्षु साधकांसाठीं ज्ञानेश्वरी लिहिली, स्वानुभवी परमहंसांसाठीं अमृतानुभव रचला आणि जाणते-अजाणते या सर्वांसाठीं हरिपाठ निर्मिला. अशा प्रकारें ज्ञानेश्वर सर्वांचे कल्याणकर्ते झाले. तत्त्ववेत्त्या पुरुषांनीं तर्कांच्या बळावर अद्वैतापर्यंत मजल मारली ; पण तें अद्वैत शुष्क होतें, नीरस होतें. ज्ञानेश्वरांनीं त्यांत भक्ति-प्रेम ओतलें. बुद्धि आणि हृदय दोघांचेंही त्यामुळें समाधान साधलें. त्यांच्या चरित्रांत काय, किंवा ग्रंथांत काय, विश्वप्रेमाचा महासागर भरलेला आहे. त्यांनीं ज्ञानाला द्राक्षारसांत बुडविलें आणि भक्तीला ज्ञानाचे डोळे जडवले. जग सत्य का मिथ्या असल्या शुष्क वादांत ते पडले नाहींत. भूतमात्रीं एकच श्रीहरि नांदतो आहे आणि तोच सर्वभावें सेव्य आहे हें त्यांनीं आळवून सांगितलें आहे.

**‘ भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचें ’**

हेंच विश्वधर्माचें रहस्य त्यांनीं प्रगट केलें आहे.

आणि म्हणूनच त्यांची वाणी स्वादु, मधु झाली आहे. त्यांचें अलौकिकपण दिसेपर्यंत समाजानें त्यांना अत्यंत तिरस्कारानें वागवलें. समाजाकडून ज्यांचा छळ होतो त्यांची वाणी बहुधा तुसडी होते, विषमय बनते. पण ज्ञानेश्वरांच्या वाणींत तसल्या दुर्गुणांचा वास-वाराही नाहीं. ते शांत, प्रसन्न वृत्तीनें आपलें तत्त्वज्ञान प्रतिपादितात. त्यांनीं समाजाला क्षमा तर केलीच ; पण ती केल्याची जाणीवसुद्धां उरूं दिली नाहीं. ‘ अनाक्रोश क्षमा ’ म्हणतात तें हिलाच. जगातले कित्येक ‘ धर्मस्थापनेचे नर ’ ही क्रोधाला वश झालेले दिसतात. मतप्रस्थापकही आदळआपट करतांना आढळतात ; पण ज्ञानेश्वर मात्र कोणाला ‘ दुखाळी ’ होणार नाहीं, कोणाची ‘ भवई ’ उचलणार नाहीं अशा मृदुतेनें सर्वत्र बोलले आहेत. जीवातळीं जीव आंथरून राहिले आहेत. इतरांनीं शब्दचर्चा, अर्थचर्चा केली. खंडन-मंडनासाठीं दंड थोपटले. पण ज्ञानेश्वरींत असला खटाटोप नाहीं. त्यांचें विवेचन

भावार्द्र, निर्मळ आणि अनुभवाचें आहे. म्हणूनच तें धर्मप्रवचन, धर्मसंकीर्तन वाटतें. वारकरी तर ज्ञानेश्वरीला 'माउली' म्हणून शिरीं धरतातच ; पण सुबुद्ध महाराष्ट्रानेंहि तिचा आदर करायला हवा. विवेचकपणें, सूक्ष्मपणें तिचा अभ्यास करायला हवा. ज्ञानेश्वरांना विसरणें म्हणजे आईला विसरण्यासारखें आहे आणि आईला विसरणें म्हणजे माणुसकीला पारखें होणें हें ओघानेंच आलें.

---

## तीर्थरूप महाराष्ट्र

[ भाग पहिला ]

पंढरपूर

कोल्हापूर

नरसोबाची वाडी

औदुंबर

नाशिक

त्र्यंबकेश्वर

सज्जनगड

मोरगांव

हीं क्षेत्रें पहिल्या भागांत आलीं आहेत.

- पृष्ठसंख्या १३२
- रेषाचित्रें २६
- मूल्य २ रुपये

पं. महादेवशास्त्री जोशी यांचें

## बालवाङ्मय

१ महीपाल
२ उद्धार
३ पुनर्जन्म
४ सुदर्शन
५ वैशाली
६ जय नटराज
७ वरदान
८ खलग्रह
९ मरुत्त
१० राजा उत्तम

या सर्व गोष्टी पौराणिक असून जितक्या मनोरंजक तितक्याच बोधप्रदहि आहेत.

१० भागांचें मिळून
मूल्य ५-६-०

## ज्ञा न रा ज प्र का श न,

४२१ शनवार, पुणें २